कर्नाटक सरकार

समाज विज्ञान

भाग - 1

10

Standard

इयत्ता-10

Karnataka Textbook Society(R)

No.4,100 Feet Ring Road, Banashankari 3rd Stage,

Bengaluru - 85

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

ಮುನ್ನುಡಿ

2005ನೇ ರಾಷ್ಟ್ರೀಯ ಪಠ್ಯಕ್ರಮದ ಆಧಾರದ ಮೇಲೆ ರಚಿತವಾದ ಕರ್ನಾಟಕ ರಾಜ್ಯ ಪಠ್ಯವಸ್ತುವಿನ ಆಧಾರದ ಮೇಲೆ ಕರ್ನಾಟಕ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕ ಸಂಘವು 2010 ನೇ ಸಾಲಿನಿಂದ ಒಂದನೇ ತರಗತಿಯಿಂದ ಹತ್ತನೇ ತರಗತಿವರೆಗಿನ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳ ರಚನಾ ಕಾರ್ಯದಲ್ಲಿ ತೊಡಗಿದೆ. ಒಟ್ಟು 12 ಭಾಷೆಗಳಲ್ಲಿ ಭಾಷಾ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳನ್ನು ಹಾಗೂ ಕೋರ್ ವಿಷಯಗಳನ್ನು 7 ಮಾಧ್ಯಮಗಳಲ್ಲಿ ರಚನೆ ಮಾಡಲಾಗುತ್ತಿದೆ. 1 ರಿಂದ 4 ನೇ ತರಗತಿಯವರೆಗೆ ಪರಿಸರ ವಿಜ್ಞಾನ, ಗಣಿತ ಮತ್ತು 5 ರಿಂದ 10 ನೇ ತರಗತಿಯವರೆಗೆ ಕೋರ್ ವಿಷಯಗಳಾದ ಗಣಿತ, ವಿಜ್ಞಾನ ಮತ್ತು ಸಮಾಜ ವಿಜ್ಞಾನಗಳಿರುತ್ತವೆ.

2005 ರ ರಾಷ್ಟ್ರೀಯ ಪಠ್ಯಕ್ರಮವು ಈ ಕೆಳಗಿನ ವೈಶಿಷ್ಟ್ಯಗಳನ್ನು ಹೊಂದಿದೆ.

- ಕಲಿಕೆಯನ್ನು ಜೀವನದ ಅವಶ್ಯಕತೆಗಳೊಂದಿಗೆ ಜೋಡಿಸುವುದು
- ಕಂಠಪಾಠ ವಿಧಾನದಿಂದ ಕಲಿಕೆಯನ್ನು ಮುಕ್ತಗೊಳಿಸುವುದು
- ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳ ಹೊರತಾಗಿ ಪಠ್ಯಕ್ರಮವನ್ನು ಶ್ರೀಮಂತಗೊಳಿಸುವುದು
- ಜ್ಞಾನದ ಅಭಿವೃದ್ಧಿಗೆ ಕಲಿಕಾ ಅನುಭವಗಳನ್ನು ಬಳಸುವುದು
- ಭಾರತದ ಪ್ರಜಾಸತ್ತಾತ್ಮಕ ನೀತಿಯನ್ವಯ ಮಕ್ಕಳ ಅವಶ್ಯಕತೆಗಳಿಗೆ ತಕ್ಕಂತೆ ಸ್ಪಂದಿಸುವುದು
- ಶಿಕ್ಷಣವನ್ನು ಇಂದಿನ ಹಾಗೂ ಭವಿಷ್ಯದ ಜೀವನಾವಶ್ಯಕತೆಗಳಿಗೆ ಹೊಂದುವಂತೆ ಮಾಡುವುದು
- ವಿಷಯಗಳ ಮೇರೆಗಳನ್ನು ಮೀರಿ ಅವುಗಳಿಗೆ ಸಮಗ್ರದೃಷ್ಟಿಯ ಬೋಧನೆಯನ್ನು ಅಳವಡಿಸುವುದು
- ಶಾಲೆಯ ಹೊರಗಿನ ಬದುಕಿಗೆ ಜ್ಞಾನ ಸಂಯೋಜನೆ
- ಮಕ್ಕಳಿಂದಲೇ ಜ್ಞಾನವನ್ನು ಅಭಿವೃದ್ಧಿ ಪಡಿಸುವುದು.

ನೂತನ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳಲ್ಲಿ ನೂತನ ವಿಧಾನಗಳಾದ ಅಂತರ್ಗತ ವಿಧಾನ (Integrated Approach), ರಚನಾತ್ಮಕ ವಿಧಾನ (Constructive Approach) ಹಾಗೂ ಸುರುಳಿಯಾಕಾರದ ವಿಧಾನ (Spiral Approach) ಗಳನ್ನು ಅಳವಡಿಸಲಾಗಿದೆ.

ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳ ವಿಷಯ ಹಾಗೂ ಅಭ್ಯಾಸಗಳು ವಿದ್ಯಾರ್ಥಿಗಳನ್ನು ಯೋಚನೆ ಮಾಡುವಂತೆ ಮಾಡಿ, ಚಟುವಟಿಕೆಗಳ ಮೂಲಕ ಜ್ಞಾನ ಹಾಗೂ ಸಾಮರ್ಥ್ಯಗಳನ್ನು ಪಡೆಯುವಂತೆ ಮಾಡುವ ಪ್ರಯತ್ನ ಮಾಡಲಾಗಿದೆ. ಪಠ್ಯವಸ್ತುಗಳೊಂದಿಗೆ ಅತ್ಯಂತ ಅವಶ್ಯಕ ಜೀವನ ಮೌಲ್ಯಗಳನ್ನು ಅಂತರ್ಗತವಾಗಿ ಬಳಸಲಾಗಿದೆ. ಈ ನೂತನ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳು ಪರೀಕ್ಷಾ ದೃಷ್ಟಿಯಿಂದ ರಚಿತವಾಗಿಲ್ಲ. ಬದಲಾಗಿ ಅವುಗಳು ವಿದ್ಯಾರ್ಥಿಗಳ ಸರ್ವಾಂಗೀಣ ವ್ಯಕ್ತಿತ್ವ ವಿಕಸನಕ್ಕೆ ಪೂರಕವಾಗಿವೆ. ತನ್ಮೂಲಕ ಅವರನ್ನು ಸ್ವತಂತ್ರ ಭಾರತದ ಸ್ವಸ್ಥ ಸಮಾಜದ ಉತ್ತಮ ಪ್ರಜೆಗಳನ್ನಾಗಿ ಮಾಡುವ ಪ್ರಯತ್ನ ನಡೆದಿದೆ.

5ನೇ ತರಗತಿಯ ಸಮಾಜ ವಿಜ್ಞಾನ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕದಲ್ಲಿ ಒಂದು ಹೊಸತನವನ್ನು ತರಲಾಗಿದೆ. ಕರ್ನಾಟಕದ ನಾಲ್ಕು ವಿಭಾಗಗಳಿಗೆ ಬೇರೆ ಬೇರೆ ಪುಸ್ತಕಗಳನ್ನು ತಯಾರಿಸಲಾಗಿದೆ. ಅವುಗಳಲ್ಲಿನ ಮೊದಲ ಅಧ್ಯಾಯ ಆಯಾ ವಿಭಾಗದ ಇತಿಹಾಸ, ಭೌಗೋಳಿಕ ಲಕ್ಷಣಗಳು, ಜನಜೀವನ, ಸಂಸ್ಕೃತಿ, ಸಂಪ್ರದಾಯಗಳು ಹಾಗೂ ಆ ವಿಭಾಗದ ಜನಜೀವನವನ್ನು ಶ್ರೀಮಂತಗೊಳಿಸಿದ ವಿವಿಧ ಕ್ಷೇತ್ರಗಳಲ್ಲಿನ ಹಿರಿಯನಾಯಕರ ವಿಚಾರ ಮಾಹಿತಿ ಇತ್ಯಾದಿಗಳನ್ನು ಕೊಡಲಾಗಿದೆ. ಎನ್‌ಸಿಎಫ್ 2005 ರ ಮಾರ್ಗಸೂಚಿಯಂತೆ ಇತಿಹಾಸ, ಭೂಗೋಳ, ಪೌರನೀತಿ, ಅರ್ಥಶಾಸ್ತ್ರ ಹಾಗೂ ವಾಣಿಜ್ಯಶಾಸ್ತ್ರಗಳ ಅಂಶಗಳನ್ನು 8 ನೇ ತರಗತಿಯಲ್ಲಿ ಸೇರಿಸಲಾಗಿದೆ. ಅನೇಕ ಅವಶ್ಯಕ ವಿಚಾರಗಳನ್ನು ಆವರಣಗಳಲ್ಲಿ ಕೊಡಲಾಗಿದೆ. ಮಕ್ಕಳು ಸ್ವಂತವಾಗಿ ಕಲಿಯುವುದಕ್ಕೆ ಅವಕಾಶ ಮಾಡಿಕೊಡುವ ನಿಟ್ಟಿನಲ್ಲಿ ಅನೇಕ ಪ್ರಾಜೆಕ್ಟ್‌ಗಳನ್ನು ಸೂಚಿಸಲಾಗಿದೆ. ಆದರೆ, ಕಂಠಪಾಠ ಮಾಡುವ ಅಂಶಗಳಾದ ಇಸವಿಗಳು, ಅನಾವಶ್ಯಕ ವಿಷಯಗಳನ್ನು ಕಡಿಮೆ ಮಾಡುವುದರ ಮೂಲಕ ಕಲಿಕಾ ಹೊರೆಯನ್ನು ಕಡಿಮೆ ಮಾಡಲಾಗಿದೆ. ಹತ್ತನೇ ತರಗತಿಯ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳು ಒಂದು ದೃಷ್ಟಿಯಲ್ಲಿ ವೈಶಿಷ್ಟ್ಯಪೂರ್ಣವಾಗಿವೆ. ಇತರ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳಂತೆಯೇ ಈ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳು ವಿದ್ಯಾರ್ಥಿ ವಿದ್ಯಾರ್ಥಿನಿಯರಿಗೆ ಸಾಮರ್ಥ್ಯ ಹಾಗೂ ಕೌಶಲ್ಯಗಳನ್ನು ಬೆಳಸಿಕೊಳ್ಳಲು ಸಹಾಯ ಮಾಡುತ್ತವೆ. ಇದರೊಂದಿಗೆ 10ನೇ ತರಗತಿ ಶಿಕ್ಷಣದ ಒಂದು ಹಂತದ ಅಂತ್ಯದಾಣವಾಗಿರುವುದರಿಂದ ವಿದ್ಯಾರ್ಥಿ ವಿದ್ಯಾರ್ಥಿನಿಯರು ಪಬ್ಲಿಕ್ ಪರೀಕ್ಷೆಯನ್ನು ಎದುರಿಸಬೇಕಾಗುತ್ತದೆ.

ಕರ್ನಾಟಕ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕ ಸಂಘವು ಈ ಪುಸ್ತಕದ ತಯಾರಿಯಲ್ಲಿ ಸಹಕರಿಸಿದ ಸಮಿತಿಯ ಅಧ್ಯಕ್ಷರಿಗೆ, ಸದಸ್ಯರಿಗೆ, ಕಲಾಕಾರರಿಗೆ, ಪರಿಶೀಲಕರಿಗೆ, ಸಂಯೋಜಕ ಅಧಿಕಾರಿಗಳಿಗೆ, ಶಿಕ್ಷಣ ಮಹಾವಿದ್ಯಾಲಯಗಳ ಸಿಬ್ಬಂದಿವರ್ಗದವರಿಗೆ, ಜಿಲ್ಲಾ ತರಬೇತಿ ಸಂಸ್ಥೆಗಳು, ರಾಜ್ಯ ಮಟ್ಟದ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕ ಸಂಪಾದಕ ಮಂಡಳಿಯ ಸದಸ್ಯರಿಗೆ ಮತ್ತು ಪುಸ್ತಕವನ್ನು ಸುಂದರವಾಗಿ ಮುದ್ರಿಸಿದ ಮುದ್ರಕರಿಗೆ ತನ್ನ ಹೃತ್ಪೂರ್ವಕ ಕೃತಜ್ಞತೆಗಳನ್ನು ಸಲ್ಲಿಸುತ್ತದೆ.

ಡಾ. ಜಿ. ಎಸ್. ಮುಡಂಬಡಿತ್ತಾಯ
ಮುಖ್ಯ ಸಂಯೋಜಕರು
ಪಠ್ಯಪುಸ್ತಕ ಪರಿಷ್ಕರಣೆ ಹಾಗೂ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕ ರಚನೆ
ಕರ್ನಾಟಕ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕ ಸಂಘ, ಬೆಂಗಳೂರು

ನಾಗೇಂದ್ರ ಕುಮಾರ್
ವ್ಯವಸ್ಥಾಪಕ ನಿರ್ದೇಶಕರು
ಕರ್ನಾಟಕ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕ ಸಂಘ,
ಬೆಂಗಳೂರು

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

ಅಧ್ಯಕ್ಷರ ನಿವೇದನೆ

ಎಳೆಯರ ಶಿಕ್ಷಣದ ಒಂದು ನಿರ್ದಿಷ್ಟ ಹಾಗೂ ಪ್ರಮುಖ ಹಂತ ಹತ್ತನೆಯ ತರಗತಿಯಾಗಿದೆ. ಅದೇ ರೀತಿ ಕಡ್ಡಾಯ ಹಾಗೂ ಉಚಿತ ಸಾರ್ವತ್ರಿಕ ಶಿಕ್ಷಣದ ಸಾಂವಿಧಾನಿಕ ಹಕ್ಕಿನ ಸೌಲಭ್ಯದ ಪರಿಪೂರ್ಣತೆ ಒದಗಿ ಬರುವುದೂ ಈ ಮಹತ್ತರ ಘಟ್ಟದಲ್ಲಿ. ನಮ್ಮ ನಾಡಿನ ಮಕ್ಕಳು ಮನೆಯಂಗಳದಿಂದ ಹೊರಟು ಪಾಠಶಾಲೆಗೆ ಅಡಿಯಿಡುತ್ತಾ ಹತ್ತು ಸಂವತ್ಸರಗಳನ್ನು ಕಳೆಯುವಲ್ಲಿ ಸಮಾಜದ ಒಳಹೊರಗುಗಳನ್ನು ಚೆನ್ನಾಗಿ ಅರಿತುಕೊಳ್ಳಬೇಕಾಗಿದೆ. ಈ ನಿಟ್ಟಿನಲ್ಲಿ ನಮ್ಮ ಹತ್ತನೆಯ ತರಗತಿಯ ಸಮಾಜ ವಿಜ್ಞಾನ ಪುಸ್ತಕವನ್ನು ರಾಷ್ಟ್ರೀಯ ಪಠ್ಯಕ್ರಮ ನೆಲೆಗಟ್ಟು 2005ರ ಹಿನ್ನೆಲೆಯಲ್ಲಿ ವಿಸ್ತೃತ ಹಾಗೂ ಸರಳವಾಗಿ ರಚಿಸಲು ಯತ್ನಿಸಿದ್ದೇವೆ. ಈ ಪ್ರೌಢಶಾಲಾ ಮಟ್ಟದ ವಿದ್ಯಾರ್ಥಿಗಳು ಕೃಷಿ, ಸ್ವ ಉದ್ಯೋಗ, ವ್ಯಾಪಾರ ಮುಂತಾದ ಹತ್ತು ಹಲವು ಔದ್ಯೋಗಿಕ ಕವಲುಗಳಲ್ಲಿ ತಮ್ಮನ್ನು ತೊಡಗಿಸಿಕೊಳ್ಳುತ್ತಾರೆ. ಅದೇ ರೀತಿ ವಿಜ್ಞಾನ, ತಾಂತ್ರಿಕ ಶಿಕ್ಷಣ, ವೈದ್ಯಕೀಯ ಇಂತಹ ಕ್ಷೇತ್ರಗಳಲ್ಲಿ ಪರಿಣತಿಗಾಗಿಯೂ ತೆರಳಲು ಸಾಕಷ್ಟು ವಿದ್ಯಾರ್ಥಿಗಳು ಮುಂದಾಗುತ್ತಾರೆ. ಇವರೆಲ್ಲರಿಗೂ ಸಮಾಜ ವಿಜ್ಞಾನದ ಪರಿಚಯವನ್ನು ಸಾಕಷ್ಟು ಪರಿಣಾಮಕಾರಿಯಾಗಿ ನೀಡುವ ಪ್ರಾಮಾಣಿಕ ಪ್ರಯತ್ನವನ್ನು ಈ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕದಲ್ಲಿ ಮಾಡಲಾಗಿದೆ. ಅದೇ ರೀತಿ ಇತಿಹಾಸ, ರಾಜ್ಯಶಾಸ್ತ್ರ, ಅರ್ಥಶಾಸ್ತ್ರ, ಭೂಗೋಳ, ಸಮಾಜಶಾಸ್ತ್ರ, ಹಾಗೂ ವ್ಯವಹಾರ ಅಧ್ಯಯನದ ಬಗೆಗೆ ರಾಷ್ಟ್ರೀಯ ಹಾಗೂ ಅಂತರರಾಷ್ಟ್ರೀಯ ಮಹತ್ವದ ಅಂಶಗಳನ್ನು ಸಮಕಾಲೀನ ವಿಚಾರಧಾರೆಯೊಂದಿಗೆ ಸಂಗ್ರಾಹ್ಯವಾಗಿ ವಿದ್ಯಾರ್ಥಿಗಳಿಗೆ ನೀಡಲು ಯತ್ನಿಸಿದ್ದೇವೆ. ಸರಳ ನಿರೂಪಣೆ, ಅಚ್ಚುಕಟ್ಟಾದ ಒಕ್ಕಣೆ, ವಿಶೇಷ ಮಾಹಿತಿಗಳ ಜೋಡಣೆ, ಅವಶ್ಯಕ ಭೂಪಟ, ಸೂಕ್ತ ಕೋಷ್ಟಕ ಮತ್ತು ಚಿತ್ರಗಳೊಂದಿಗೆ ಪಠ್ಯವನ್ನು ನೀಡುವ ಪ್ರಯತ್ನ ಮಾಡಲಾಗಿದೆ.

ಈ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕವನ್ನು ಕ್ರಮಬದ್ಧವಾಗಿ ಹೊರತರಲು ಸಹಕರಿಸಿದ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕ ರಚನಾ ಸಮಿತಿಯ ಸದಸ್ಯರಿಗೆ, ಪರಿಶೀಲನಾ ಸಮಿತಿ, ಸಂಪಾದಕ ಮಂಡಳಿ, ಅನುವಾದಕರಿಗೆ ಹಾಗೂ ಸಲಹೆಗಾರರಿಗೆ ನಮ್ಮ ಕೃತಜ್ಞತೆಗಳು.

ಅದೇ ರೀತಿ ಈ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕ ರಚನೆಗೆ ಆರಂಭದಿಂದಲೂ ಮಾರ್ಗದರ್ಶನವಿತ್ತ ಮುಖ್ಯಸಂಯೋಜಕರಾದ ಡಾ.ಜಿ.ಎಸ್. ಮುಡಂಬಡಿತ್ತಾಯರಿಗೆ ಹಾಗೂ ಎಲ್ಲಾ ರೀತಿಯ ಸಹಕಾರ ನೀಡಿದ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕ ಸಂಘದ ಅಧಿಕಾರಿಗಳಿಗೆ ನಮ್ಮ ಕೃತಜ್ಞತೆಗಳು.

ಡಾ. ಎಂ. ಶಶಿಧರ್
ಡಾ. ಪಿ. ಅನಂತಕೃಷ್ಣ ಭಟ್
ಅಧ್ಯಕ್ಷರು, ಪಠ್ಯಪುಸ್ತಕ ರಚನಾ ಸಮಿತಿ.

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

ರಚನಾ ಸಮಿತಿ

ಅಧ್ಯಕ್ಷರು

ಡಾ. ಎಂ. ಶಶಿಧರ್, ಸಹ ಪ್ರಾಧ್ಯಾಪಕರು, ಇತಿಹಾಸ ವಿಭಾಗ, ಬೆಂಗಳೂರು ವಿಶ್ವವಿದ್ಯಾನಿಲಯ, ಬೆಂಗಳೂರು.

ಡಾ. ಪಿ. ಅನಂತಕೃಷ್ಣ ಭಟ್, ನಿವೃತ್ತ ಪ್ರಾಧ್ಯಾಪಕರು, ರಾಜ್ಯಶಾಸ್ತ್ರ ವಿಭಾಗ, ಕೆನರಾ ಕಾಲೇಜು, ಮಂಗಳೂರು.

ಸದಸ್ಯರು

ಶ್ರೀ ರಾಮ್‌ಪ್ರಸಾದ್, ನಿವೃತ್ತ ಪ್ರಾಂಶುಪಾಲರು, ಶ್ರೀ ಎ.ಆರ್.ಎಸ್. ಪ.ಪೂರ್ವ ಕಾಲೇಜು, ಹರಿಹರಪುರ, ಚಿಕ್ಕಮಗಳೂರು ಜಿಲ್ಲೆ

ಶ್ರೀ ಎನ್. ಸತ್ಯಪ್ರಕಾಶ್, ನಿ॥ ಮುಖ್ಯಶಿಕ್ಷಕರು, ವಿದ್ಯಾವರ್ಧಕ ಸಂಘ ಪ್ರೌಢಶಾಲೆ, ರಾಜಾಜಿನಗರ, 1ನೇ ಬ್ಲಾಕ್ ಬೆಂಗಳೂರು.

ಶ್ರೀಮತಿ ಸರಸ್ವತಿ ಹೆಗಡೆ, ಸಹಶಿಕ್ಷಕರು, ಸರ್ಕಾರಿ ಪ್ರೌಢಶಾಲೆ, ಪೀಣ್ಯ, ಬೆಂಗಳೂರು.

ಶ್ರೀ ಬಿ.ಎಚ್. ಹನುಮಂತಯ್ಯ, ಸಹಾಯಕ ಪ್ರಾಧ್ಯಾಪಕರು, ಸಮಾಜಶಾಸ್ತ್ರ ವಿಭಾಗ, ಸರ್ಕಾರಿ ಪ್ರಥಮ ದರ್ಜೆ ಕಾಲೇಜು, ಉದಯಪುರ, ಚನ್ನರಾಯಪಟ್ಟಣ ತಾ॥ ಹಾಸನ ಜಿಲ್ಲೆ.

ಡಾ. ಮಲ್ಲಿಕಾರ್ಜುನ.ಎಸ್.ಬಾಗೇವಾಡಿ, ಪ್ರಾಧ್ಯಾಪಕರು ಮತ್ತು ಮುಖ್ಯಸ್ಥರು, ಭೂಗೋಳಶಾಸ್ತ್ರ ವಿಭಾಗ, ಎ.ಜಿ.ಕಲಾ ಹಾಗೂ ವಾಣಿಜ್ಯ ಮಹಾವಿದ್ಯಾಲಯ, ಮುನವಳ್ಳಿ, ಸವದತ್ತಿ ತಾ॥ ಬೆಳಗಾವಿ ಜಿಲ್ಲೆ.

ಶ್ರೀ ಜಿ.ಎನ್. ಕೆಂಪಯ್ಯ, ಉಪನ್ಯಾಸಕರು, ಸರ್ಕಾರಿ ಪದವಿ ಪೂರ್ವಕಾಲೇಜು, ಮಸ್ಕಲ್ ತುಮಕೂರು ತಾಲ್ಲೂಕು.

ಶ್ರೀ ಎ.ಎಸ್. ದೀಕ್ಷಿತ್, ನಿವೃತ್ತ ಪ್ರಾಂಶುಪಾಲರು, ವಾಣಿ ವಿದ್ಯಾಕೇಂದ್ರ, ಬಸವೇಶ್ವರನಗರ, ಬೆಂಗಳೂರು.

ಪ್ರೊ. ದೊರೈರಾಜ್ ಎಸ್.ಎನ್, ಪ್ರಾಂಶುಪಾಲರು, ಶೇಷಾದ್ರಿಪುರಂ ಇನ್ಸ್ಟಿಟ್ಯೂಟ್ ಆಫ್ ಕಾಮರ್ಸ್ ಅಂಡ್ ಮ್ಯಾನೇಜ್‌ಮೆಂಟ್, ಬೆಂಗಳೂರು.

ಶ್ರೀ ಪಿ. ಪ್ರಸಾದ್, ಚಿತ್ರಕಲಾ ಶಿಕ್ಷಕರು, ಶ್ರೀ ಭೈರವೇಶ್ವರ ಪ್ರೌಢಶಾಲೆ, ತುಮಕೂರು.

ಪರಿಶೀಲಕರು

ಡಾ. ವಿಜಯ್ ಪೂಣಚ್ಚ ತಂಬಂಡ, ಪ್ರಾಧ್ಯಾಪಕರು, ಇತಿಹಾಸ ವಿಭಾಗ, ಕನ್ನಡ ವಿಶ್ವವಿದ್ಯಾನಿಲಯ, ಹಂಪಿ, ವಿದ್ಯಾರಣ್ಯ, ಬಳ್ಳಾರಿ.

ಡಾ. ಟಿ.ಡಿ. ದೇವೇಗೌಡ, ಪ್ರಾಧ್ಯಾಪಕರು, ರಾಜ್ಯಶಾಸ್ತ್ರ ವಿಭಾಗ, ಡೀನ್ (ಅಧ್ಯಯನ ಕೇಂದ್ರಗಳು), ಕರ್ನಾಟಕ ರಾಜ್ಯ ಮುಕ್ತ ವಿಶ್ವವಿದ್ಯಾನಿಲಯ, ಮೈಸೂರು.

ಶ್ರೀ ಚ.ನ. ಶಂಕರ್‌ರಾವ್, ನಿವೃತ್ತ ಉಪನ್ಯಾಸಕರು, ಕೆನರಾ ಪದವಿ ಪೂರ್ವ ಕಾಲೇಜು, ಮಂಗಳೂರು.

ಡಾ. ರಂಗನಾಥ, ಪ್ರಾಧ್ಯಾಪಕರು ಮತ್ತು ಮುಖ್ಯಸ್ಥರು, ಸ್ನಾತಕೋತ್ತರ ಭೂಗೋಳಶಾಸ್ತ್ರ ವಿಭಾಗ, ಮಹಾರಾಣಿ ಮಹಿಳಾ ಕಲಾ ಮತ್ತು ವಾಣಿಜ್ಯ ಕಾಲೇಜು, ಮೈಸೂರು.

ಡಾ. ಎಸ್.ಆರ್. ಕೇಶವ, ಸಹ ಪ್ರಾಧ್ಯಾಪಕರು, ಅರ್ಥಶಾಸ್ತ್ರ ವಿಭಾಗ, ಬೆಂಗಳೂರು ವಿಶ್ವವಿದ್ಯಾನಿಲಯ, ಬೆಂಗಳೂರು.

ಡಾ. ನೂರ್ ಅಫ್ಜ್, ಪ್ರಾಧ್ಯಾಪಕರು, ವಾಣಿಜ್ಯ ಮತ್ತು ವ್ಯವಹಾರ ಅಧ್ಯಯನ ವಿಭಾಗ, ತುಮಕೂರು ವಿಶ್ವವಿದ್ಯಾನಿಲಯ, ತುಮಕೂರು.

ಸಂಪಾದಕ ಮಂಡಳಿ

ಡಾ. ಎಂ.ವಿ. ಶ್ರೀನಿವಾಸ್, ನಿವೃತ್ತ ಪ್ರಾಧ್ಯಾಪಕರು, ಇತಿಹಾಸ ವಿಭಾಗ, ಮೈಸೂರು ವಿಶ್ವವಿದ್ಯಾನಿಲಯ, ಮೈಸೂರು.

ಡಾ. ಆರ್.ಎಲ್.ಎಂ. ಪಾಟೀಲ್, ನಿವೃತ್ತ ಪ್ರಾಧ್ಯಾಪಕರು, ರಾಜ್ಯಶಾಸ್ತ್ರ ವಿಭಾಗ, ಬೆಂಗಳೂರು ವಿಶ್ವವಿದ್ಯಾನಿಲಯ, ಬೆಂಗಳೂರು.

ಡಾ. ಈಶ್ವರಪ್ಪ, ಪ್ರಾಧ್ಯಾಪಕರು, ಭೂಗೋಳಶಾಸ್ತ್ರ ವಿಭಾಗ, ಬೆಂಗಳೂರು ವಿಶ್ವವಿದ್ಯಾನಿಲಯ, ಬೆಂಗಳೂರು.

ಮುಖ್ಯ ಸಂಯೋಜಕರು

ಡಾ. ಜಿ. ಎಸ್. ಮುಡಂಬಡಿತ್ತಾಯ, ಪಠ್ಯಕ್ರಮ ಪರಿಷ್ಕರಣೆ ಮತ್ತು ಪಠ್ಯಪುಸ್ತಕ ರಚನೆ, ಕರ್ನಾಟಕ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕ ಸಂಘ, ಬೆಂಗಳೂರು.

ಮುಖ್ಯಸಲಹೆಗಾರರು

ಶ್ರೀ ನಾಗೇಂದ್ರ ಕುಮಾರ್, ವ್ಯವಸ್ಥಾಪಕ ನಿರ್ದೇಶಕರು, ಕರ್ನಾಟಕ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕ ಸಂಘ, ಬೆಂಗಳೂರು.

ಶ್ರೀ ಪಾಂಡುರಂಗ, ಉಪನಿರ್ದೇಶಕರು (ಪ್ರಭಾರಿ), ಕರ್ನಾಟಕ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕ ಸಂಘ, ಬೆಂಗಳೂರು.

ಕಾರ್ಯಕ್ರಮ ಸಂಯೋಜಕರು :

ಶ್ರೀ ಎ.ಟಿ. ರಂಗದಾಸಪ್ಪ, ಹಿರಿಯ ಸಹಾಯಕ ನಿರ್ದೇಶಕರು, ಕರ್ನಾಟಕ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕ ಸಂಘ, ಬೆಂಗಳೂರು.

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

ಪರಿಷ್ಕರಣೆ ಕುರಿತು

ಒಂದರಿಂದ ಹತ್ತನೇ ತರಗತಿಯ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳ ಬಗ್ಗೆ ಪ್ರಕಟಗೊಂಡ ಸಾರ್ವಜನಿಕ ಅಭಿಪ್ರಾಯಗಳನ್ನು ಗಮನಿಸಿ ಮಾನ್ಯ ಮುಖ್ಯಮಂತ್ರಿಯವರೂ, ಅರ್ಥಸಚಿವರೂ ಆಗಿರುವ ಶ್ರೀ ಸಿದ್ದರಾಮಯ್ಯನವರು ತಮ್ಮ 2014–15 ರ ಬಜೆಟ್‌ನಲ್ಲಿ ತಜ್ಞರ ಸಮಿತಿಯನ್ನು ರಚಿಸುವ ಘೋಷಣೆ ಮಾಡಿದರು. ತಜ್ಞರು ಅನುಸರಿಸಬೇಕಾದ ಮೂಲ ಆಶಯವನ್ನು ಹೀಗೆ ಹೇಳಿದರು: "ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳನ್ನು ಸಾಮಾಜಿಕ ಸಾಮರಸ್ಯ, ನೈತಿಕಮೌಲ್ಯಗಳು, ವ್ಯಕ್ತಿತ್ವವಿಕಸನ, ವೈಜ್ಞಾನಿಕ ಮತ್ತು ವೈಚಾರಿಕ ಮನೋಭಾವ, ಜಾತ್ಯತೀತತೆ ಮತ್ತು ರಾಷ್ಟ್ರೀಯ ಬದ್ಧತೆಗಳಿಗೆ ಅನುವಾಗುವಂತೆ ತಜ್ಞರ ಸಮಿತಿಯನ್ನು ಪುನರ್ ರಚಿಸಲಾಗುವುದು" – ಇದು ಬಜೆಟ್ ಭಾಷಣದಲ್ಲಿ ಸಾದರಪಡಿಸಿದ ಆಶಯ.

ಆನಂತರ ಶಿಕ್ಷಣ ಇಲಾಖೆಯು ಒಂದರಿಂದ ಹತ್ತನೇ ತರಗತಿಯವರೆಗಿನ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳ ಪರಿಷ್ಕರಣೆಗಾಗಿ 27 ಸಮಿತಿಗಳನ್ನು ರಚಿಸಿ ದಿನಾಂಕ: 24.11.2014 ರಂದು ಆದೇಶ ಹೊರಡಿಸಿತು. ಈ ಸಮಿತಿಗಳು ವಿಷಯವಾರು ಮತ್ತು ತರಗತಿವಾರು ಮಾನದಂಡಕ್ಕನುಗುಣವಾಗಿ ರಚಿತವಾದವು. ವಿವಿಧ ಪಠ್ಯವಿಷಯಗಳಿಗೆ ಸಂಬಂಧಿಸಿದ ತಜ್ಞರು, ಅಧ್ಯಾಪಕರು ಈ ಸಮಿತಿಗಳಲ್ಲಿದ್ದಾರೆ. ಈಗಾಗಲೇ ಲಿಖಿತವಾಗಿ ಬಂದಿರುವ ಅನೇಕ ಆಕ್ಷೇಪಗಳು ಮತ್ತು ವಿಶ್ಲೇಷಣೆಗಳನ್ನು ಪರಿಶೀಲಿಸಿ, ತಪ್ಪು ಒಪ್ಪುಗಳ ಬಗ್ಗೆ ನಿರ್ಣಯಿಸಿ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳನ್ನು ಪರಿಷ್ಕರಿಸುವ ಹೊಣೆಹೊತ್ತ ಈ ಸಮಿತಿಗಳಿಗೆ 'ಅಗತ್ಯವಿದ್ದಲ್ಲಿ ಪಠ್ಯವಸ್ತುವನ್ನು ಪರಿಷ್ಕರಿಸಿ ನಂತರ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳನ್ನು ಪರಿಷ್ಕರಿಸುವ' ಸ್ವಾತಂತ್ರ್ಯವನ್ನು 24.11.2014ರ ಆದೇಶದಲ್ಲೇ ನೀಡಲಾಗಿತ್ತು. ಆನಂತರ 19.09.2015 ರಂದು ಹೊಸ ಆದೇಶ ಹೊರಡಿಸಿ 'ಅಗತ್ಯವಿದ್ದಲ್ಲಿ ಪುನರ್ ರಚಿಸುವ' ಸ್ವಾತಂತ್ರ್ಯವನ್ನು ನೀಡಲಾಯಿತು. ಹೀಗೆ ಸಮಗ್ರ ಪರಿಷ್ಕರಣೆಗೊಂಡ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳನ್ನು 2016–17 ರ ಬದಲು 2017–18ನೇ ಶೈಕ್ಷಣಿಕ ವರ್ಷದಲ್ಲಿ ಜಾರಿಗೊಳಿಸಲಾಗುವುದೆಂದು ಇದೇ ಆದೇಶದಲ್ಲಿ ತಿಳಿಸಲಾಯಿತು.

ಅನೇಕ ವ್ಯಕ್ತಿಗಳೂ ಸಂಘಟನೆಗಳೂ ಸ್ವಯಂಪ್ರೇರಿತರಾಗಿ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳ ಮಾಹಿತಿದೋಷ, ಆಶಯದೋಷಗಳನ್ನು ಪಟ್ಟಿಮಾಡಿ ಶಿಕ್ಷಣ ಸಚಿವರಿಗೆ, ಪಠ್ಯಪುಸ್ತಕ ಸಂಘಕ್ಕೆ ಕಳುಹಿಸಿದ್ದರು. ಅವುಗಳ ಪರಿಶೀಲನೆ ಮಾಡಿದ್ದಲ್ಲದೆ, ಸಮಿತಿಗಳಾಚೆಗೆ ಅನೇಕ ಸಂವಾದಗಳನ್ನು ಏರ್ಪಡಿಸಿ ವಿಚಾರ ವಿನಿಮಯ ಮಾಡಿಕೊಂಡಿದ್ದೇವೆ. ಪ್ರಾಥಮಿಕ ಮತ್ತು ಪ್ರೌಢಶಾಲಾ ಅಧ್ಯಾಪಕರ ಸಂಘಗಳ ಜೊತೆ ಚರ್ಚಿಸಿದ್ದಲ್ಲದೆ ಪ್ರಶ್ನಾವಳಿ ಸಿದ್ಧಪಡಿಸಿ ಅಧ್ಯಾಪಕರಿಗೆ ಕಳಿಸಿ ಅಭಿಪ್ರಾಯಗಳನ್ನು ಸಂಗ್ರಹಿಸಲಾಗಿದೆ. ಅಧ್ಯಾಪಕರು, ವಿಷಯ ಪರಿವೀಕ್ಷಕರು ಮತ್ತು ಡಯಟ್ ಪ್ರಾಂಶುಪಾಲರ ಪ್ರತ್ಯೇಕ ಸಭೆಗಳನ್ನು ನಡೆಸಿ ವಿಶ್ಲೇಷಣಾತ್ಮಕ ಅಭಿಮತಗಳನ್ನು ಪಡೆಯಲಾಗಿದೆ. ವಿಜ್ಞಾನ, ಸಮಾಜವಿಜ್ಞಾನ, ಗಣಿತ, ಭಾಷೆ ಸಾಹಿತ್ಯಗಳಿಗೆ ಸಂಬಂಧಿಸಿದ ತಜ್ಞರಿಗೆ ಮೊದಲೇ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳನ್ನು ಕಳುಹಿಸಿ ಆನಂತರ ಸಭೆ ನಡೆಸಿ ಚರ್ಚಿಸಲಾಗಿದೆ. ಮಹಿಳಾ ಸಂಘಟನೆ ಹಾಗೂ ವಿಜ್ಞಾನ ಸಂಬಂಧಿ ಸಂಸ್ಥೆಗಳನ್ನು ಆಹ್ವಾನಿಸಿ ಚಿಂತನೆ ನಡೆಸಲಾಗಿದೆ. ಹೀಗೆ ಎಲ್ಲಾ ಮೂಲಗಳಿಂದ ಪಡೆದ ಅರಿವಿನ ಆಧಾರದ ಮೇಲೆ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳನ್ನು ಅಗತ್ಯವಿದ್ದಕಡೆ ಪರಿಷ್ಕರಿಸಲಾಗಿದೆ.

ಬಹುಮುಖ್ಯವಾದ ಇನ್ನೊಂದು ಸಂಗತಿಯನ್ನು ಇಲ್ಲಿ ಹೇಳಬೇಕು. ಕೇಂದ್ರೀಯ ಶಾಲಾ (NCERT) ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳ ಜೊತೆ ರಾಜ್ಯದ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳನ್ನು ತೌಲನಿಕವಾಗಿ ಅಧ್ಯಯನ ಮಾಡಿ ಸಲಹೆಗಳನ್ನು ನೀಡಲು ವಿಜ್ಞಾನ, ಗಣಿತ ಮತ್ತು ಸಮಾಜ ವಿಜ್ಞಾನಕ್ಕೆ ಸಂಬಂಧಿಸಿದಂತೆ ತಜ್ಞರ ಮೂರು ಸಮಿತಿಗಳನ್ನು

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

ರಚಿಸಲಾಯಿತು. ಈ ಸಮಿತಿಗಳು ನೀಡಿದ ತೌಲನಿಕ ವಿಶ್ಲೇಷಣೆ ಮತ್ತು ಸಲಹೆಗಳನ್ನು ಆಧರಿಸಿ ರಾಜ್ಯ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳ ಗುಣಮಟ್ಟವನ್ನು ಹೆಚ್ಚಿಸಲಾಗಿದೆ. ಕೇಂದ್ರೀಯ ಶಾಲಾ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳಿಗಿಂತ ನಮ್ಮ ರಾಜ್ಯದ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳ ಗುಣಮಟ್ಟ ಕಡಿಮೆಯಾಗದಂತೆ ಕಾಯ್ದುಕೊಳ್ಳಲಾಗಿದೆ. ಜೊತೆಗೆ ಆಂಧ್ರ, ತಮಿಳುನಾಡು, ಮಹಾರಾಷ್ಟ್ರಗಳ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳ ಜೊತೆ ನಮ್ಮ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳನ್ನು ಪರಿಶೀಲಿಸಲಾಗಿದೆ.

ಇನ್ನೊಂದು ಸ್ಪಷ್ಟನೆಯನ್ನು ನೀಡಲು ಬಯಸುತ್ತೇನೆ. ನಮ್ಮ ಸಮಿತಿಗಳು ಮಾಡಿರುವುದು ಪರಿಷ್ಕರಣೆಯೇ ಹೊರತು ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳ ಸಮಗ್ರ ರಚನೆಯಲ್ಲ. ಆದ್ದರಿಂದ ಈಗಾಗಲೇ ರಚಿತವಾಗಿರುವ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳ ಸ್ವರೂಪಕ್ಕೆ ಎಲ್ಲಿಯೂ ಧಕ್ಕೆಯುಂಟುಮಾಡಿಲ್ಲ. ಲಿಂಗತ್ವ ಸಮಾನತೆ, ಪ್ರಾದೇಶಿಕ ಪ್ರಾತಿನಿಧ್ಯ, ರಾಷ್ಟ್ರೀಯ ಸಮಗ್ರತೆ, ಸಮಾನತೆ, ಸಾಮಾಜಿಕ ಸಾಮರಸ್ಯಗಳ ಹಿನ್ನೆಲೆಯಲ್ಲಿ ಕೆಲವು ಪರಿಷ್ಕರಣೆಗಳು ನಡೆದಿವೆ. ಹೀಗೆ ಪರಿಷ್ಕರಿಸುವಾಗ ರಾಷ್ಟ್ರೀಯ ಪಠ್ಯಕ್ರಮ ಚೌಕಟ್ಟು ಮತ್ತು ರಾಜ್ಯ ಪಠ್ಯಕ್ರಮ ಚೌಕಟ್ಟುಗಳನ್ನು ಮೀರಿಲ್ಲವೆಂದು ತಿಳಿಸಬಯಸುತ್ತೇನೆ: ಜೊತೆಗೆ ನಮ್ಮ ಸಂವಿಧಾನದ ಆಶಯಗಳನ್ನು ಅನುಸರಿಸಲಾಗಿದೆ. ಸಮಿತಿಗಳು ಮಾಡಿದ ಪರಿಷ್ಕರಣೆಯನ್ನು ಮತ್ತೊಮ್ಮೆ ಪರಿಶೀಲಿಸಲು ವಿಷಯವಾರು ಉನ್ನತ ಪರಿಶೀಲನ ಸಮಿತಿಗಳನ್ನು ರಚಿಸಿ ಅಭಿಪ್ರಾಯಪಡೆದು ಅಳವಡಿಸಲಾಗಿದೆ.

ಹೀಗೆ ಕ್ರಮಬದ್ಧವಾಗಿ ನಡೆದ ಕೆಲಸಕ್ಕೆ ತಮ್ಮನ್ನು ತಾವು ಸಂಪೂರ್ಣ ತೊಡಗಿಸಿಕೊಂಡ 27 ಸಮಿತಿಗಳ ಅಧ್ಯಕ್ಷರು ಮತ್ತು ಸದಸ್ಯರನ್ನು ಹಾಗೂ ಉನ್ನತ ಪರಿಶೀಲನಾ ಸಮಿತಿಯ ಸಮಸ್ತರನ್ನು ಮತ್ತು ಪರಿಷ್ಕೃತ ಪಾಠಗಳ ರಚನೆ ಮಾಡಿದ ತಜ್ಞರನ್ನು ಕೃತಜ್ಞತೆಯಿಂದ ನೆನೆಯುತ್ತೇವೆ. ಅಂತೆಯೇ ಸಮಿತಿಗಳ ಕೆಲಸ ಸುಗಮವಾಗಿ ನಡೆಯುವಂತೆ ವ್ಯವಸ್ಥೆಮಾಡಲು ಕಾರ್ಯಕ್ರಮ ಅಧಿಕಾರಿಗಳಾಗಿ ನಿಷ್ಠೆಯಿಂದ ದುಡಿದ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕ ಸಂಘದ ಎಲ್ಲಾ ಅಧಿಕಾರಿಗಳನ್ನೂ ನೆನೆಯುತ್ತೇವೆ. ಸಹಕರಿಸಿದ ಸಿಬ್ಬಂದಿಗೂ ನಮ್ಮ ವಂದನೆಗಳು. ಅಭಿಪ್ರಾಯ ನೀಡಿ ಸಹಕರಿಸಿದ ಸರ್ವ ಸಂಘಟನೆಗಳು ಮತ್ತು ತಜ್ಞರಿಗೆ ಧನ್ಯವಾದಗಳು.

ನರಸಿಂಹಯ್ಯ
ವ್ಯವಸ್ಥಾಪಕ ನಿರ್ದೇಶಕರು
ಕರ್ನಾಟಕ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕ ಸಂಘ (ರಿ)
ಬೆಂಗಳೂರು–85

ಪ್ರೊ. ಬರಗೂರು ರಾಮಚಂದ್ರಪ್ಪ
ಸರ್ವಾಧ್ಯಕ್ಷರು
ಪಠ್ಯಪುಸ್ತಕ ಪರಿಷ್ಕರಣ ಸಮಿತಿ
ಕರ್ನಾಟಕ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕ ಸಂಘ (ರಿ)
ಬೆಂಗಳೂರು–85

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳ ಪರಿಷ್ಕರಣ ಸಮಿತಿ

ಸರ್ವಾಧ್ಯಕ್ಷರು

ಪ್ರೊ. ಬರಗೂರು ರಾಮಚಂದ್ರಪ್ಪ, ಅಧ್ಯಕ್ಷರು, ರಾಜ್ಯ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕ ಪರಿಷ್ಕರಣ ಸಮಿತಿ, ಕರ್ನಾಟಕ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕ ಸಂಘ, ಬೆಂಗಳೂರು.

ಅಧ್ಯಕ್ಷರು

ಡಾ. ಅಶ್ವತ್ಥ ನಾರಾಯಣ, ಪ್ರಾಧ್ಯಾಪಕರು, ಇತಿಹಾಸ ವಿಭಾಗ, ಮೈಸೂರು ವಿಶ್ವವಿದ್ಯಾನಿಲಯ, ಮಾನಸ ಗಂಗೋತ್ರಿ ಮೈಸೂರು.

ಸದಸ್ಯರು

ಡಾ. ಅಶ್ವತ್ಥ ನಾರಾಯಣ, ಪ್ರಾಧ್ಯಾಪಕರು, ಇತಿಹಾಸ ವಿಭಾಗ, ಬೆಂಗಳೂರು ವಿಶ್ವವಿದ್ಯಾನಿಲಯ, ಬೆಂಗಳೂರು.
ಡಾ. ಜೆ. ಸೋಮಶೇಖರ್, ಪ್ರಾಧ್ಯಾಪಕರು, ರಾಜ್ಯಶಾಸ್ತ್ರ ವಿಭಾಗ, ವಿಜಯನಗರ ಶ್ರೀ ಕೃಷ್ಣದೇವರಾಯ ವಿಶ್ವವಿದ್ಯಾನಿಲಯ, ಬಳ್ಳಾರಿ.
ಡಾ. ಎಚ್.ಡಿ. ಪ್ರಶಾಂತ್, ಪ್ರಾಧ್ಯಾಪಕರು, ಅಭಿವೃದ್ಧಿ ಅಧ್ಯಯನ ವಿಭಾಗ, ಕನ್ನಡ ವಿಶ್ವವಿದ್ಯಾಲಯ, ಹಂಪಿ, ವಿದ್ಯಾರಣ್ಯ.
ಪ್ರೊ. ಎಸ್.ಟಿ. ಬಾಗಲಕೋಟಿ, ಪ್ರಾಧ್ಯಾಪಕರು, ಅರ್ಥಶಾಸ್ತ್ರ ವಿಭಾಗ, ಕರ್ನಾಟಕ ವಿಶ್ವವಿದ್ಯಾಲಯ, ಧಾರವಾಡ.
ಪ್ರೊ. ಪಿ ಮಲ್ಲಪ್ಪ, ನಿವೃತ್ತ ಪ್ರಾಧ್ಯಾಪಕರು, ಭೂಗೋಳಶಾಸ್ತ್ರ ವಿಭಾಗ, ಜೆ.ಎಸ್.ಎಸ್. ಮಹಾವಿದ್ಯಾಲಯ, ಮೈಸೂರು.
ಡಾ. ಬಿ. ಶೇಖರ್, ಪ್ರಾಧ್ಯಾಪಕರು, ವಾಣಿಜ್ಯಶಾಸ್ತ್ರ ವಿಭಾಗ, ತುಮಕೂರು ವಿಶ್ವವಿದ್ಯಾನಿಲಯ, ತುಮಕೂರು.
ಶ್ರೀ. ಎ.ಎಸ್. ದೀಕ್ಷಿತ್, ನಿವೃತ್ತ ಪ್ರಾಂಶುಪಾಲರು, ವಾಣಿ ವಿದ್ಯಾಸಂಸ್ಥೆ, ಬಸವೇಶ್ವರನಗರ, ಬೆಂಗಳೂರು.
ಶ್ರೀ. ಈರಣ್ಣ. ಎಂ. ಅಂಬಿ, ಸಹ ಶಿಕ್ಷಕರು, ಸರ್ಕಾರಿ ಪ್ರೌಢಶಾಲೆ, ತಡಕೊಡು, ಧಾರವಾಡ ತಾ. ಮತ್ತು ಜಿಲ್ಲೆ.
ಶ್ರೀ. ಡಿ.ಎನ್. ವೆಂಕಟೇಶ್, ಚಿತ್ರಕಲಾ ಶಿಕ್ಷಕರು, ಸರ್ಕಾರಿ ಪ್ರೌಢಶಾಲೆ, ಉರಮಾರಕಸಲಗೆರೆ, ಮಂಡ್ಯ ತಾ. ಮತ್ತು ಜಿಲ್ಲೆ.

ಉನ್ನತ ಪರಿಶೀಲನಾ ಸಮಿತಿ

ಶ್ರೀಮತಿ ಡಿ.ಡಿ. ಭೋಸಲೆ, ಸಹಾಯಕ ಶಿಕ್ಷಕಿ, ಶ್ರೀ ಹರಿ ವಿದ್ಯಲಯ ಉಗರ. ಖುರ್ದ ತಾ. ಆಥಣಿ ಜಿ. ಬೆಳಗಾವಿ.
ಶ್ರೀ ಎಸ್. ಆರ್. ದಾಣಿ, ಸಹಾಯಕ ಶಿಕ್ಷಕ, ಶ್ರೀ ಹರಿ ವಿದ್ಯಲಯ ಉಗರ. ಖುರ್ದ ತಾ. ಆಥಣಿ ಜಿ. ಬೆಳಗಾವಿ.
ಶ್ರೀ ಆರ್.ಎ. ಮಿರಜಿ, ಸಹಾಯಕ ಶಿಕ್ಷಕ, ಶ್ರೀ ಹರಿ ವಿದ್ಯಲಯ ಉಗರ. ಖುರ್ದ ತಾ. ಆಥಣಿ ಜಿ. ಬೆಳಗಾವಿ.
ಡಾ. ದಶರಥ್ ನಾಯಕ್, ಪ್ರಾಧ್ಯಾಪಕರು, ಅರ್ಥಶಾಸ್ತ್ರ ವಿಭಾಗ, ಗುಲ್ಬರ್ಗಾ ವಿಶ್ವವಿದ್ಯಾನಿಲಯ, ಕಲಬುರಗಿ.
ಡಾ. ಹಸೀನ್ ತಾಜ್, ಪ್ರಾಧ್ಯಾಪಕರು, ಶಿಕ್ಷಣ ವಿಭಾಗ, ಬೆಂಗಳೂರು ವಿಶ್ವವಿದ್ಯಾನಿಲಯ, ಬೆಂಗಳೂರು.

ಅನುವಾದಕರು

ಶ್ರೀಮತಿ ಡಿ.ಡಿ. ಭೋಸಲೆ, ಸಹಾಯಕ ಶಿಕ್ಷಕಿ, ಶ್ರೀ ಹರಿ ವಿದ್ಯಲಯ ಉಗಾರ. ಖುರ್ದ ತಾ. ಆಥಣಿ ಜಿ. ಬೆಳಗಾವಿ.
ಶ್ರೀ ಎಸ್. ಆರ್. ದಾಣಿ, ಸಹಾಯಕ ಶಿಕ್ಷಕ, ಶ್ರೀ ಹರಿ ವಿದ್ಯಲಯ ಉಗಾರ. ಖುರ್ದ ತಾ. ಆಥಣಿ ಜಿ. ಬೆಳಗಾವಿ.
ಶ್ರೀ ಆರ್.ಎ. ಮಿರಜೆ, ಸಹಾಯಕ ಶಿಕ್ಷಕ, ಶ್ರೀ ಹರಿ ವಿದ್ಯಲಯ ಉಗಾರ. ಖುರ್ದ ತಾ. ಆಥಣಿ ಜಿ. ಬೆಳಗಾವಿ.

ಸಲಹೆಗಾರರು

ಶ್ರೀ. ನರಸಿಂಹಯ್ಯ, ವ್ಯವಸ್ಥಾಪಕ ನಿರ್ದೇಶಕರು, ಕರ್ನಾಟಕ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕ ಸಂಘ, ಬೆಂಗಳೂರು.
ಶ್ರೀಮತಿ. ನಾಗಮಣಿ ಸಿ., ಉಪನಿರ್ದೇಶಕರು, ಕರ್ನಾಟಕ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕ ಸಂಘ, ಬೆಂಗಳೂರು.

ಕಾರ್ಯಕ್ರಮ ಸಂಯೋಜಕರು

ಶ್ರೀ. ಸಿದ್ದಯ್ಯ ಟಿ.ಜಿ, ಹಿರಿಯ ಸಹಾಯಕ ನಿರ್ದೇಶಕರು, ಕರ್ನಾಟಕ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕ ಸಂಘ, ಬೆಂಗಳೂರು.

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

अनुक्रमणिका

पा.क्र	पाठ	पृष्ठ संख्या
	इतिहास	
1.	युरोपियनांचे भारतात आगमन	1
2.	ब्रिटिश सत्तेचा विस्तार	12
3.	भारतावरील ब्रिटिश सत्तेचे परिणाम	17
4.	ब्रिटिश सत्तेला कर्नाटकातून झालेला विरोध	31
5.	सामाजिक व धार्मिक सुधारणांची चळवळ	43
6.	भारतीय स्वातंत्र्याचे पहिले युद्ध	56
	राज्यशास्त्र	
1.	भारतासमोरील आव्हाने व त्यावरील उपाययोजना	60
2.	भारताचे परराष्ट्र धोरण	68
3.	भारत आणि इतर राष्ट्रांचे नातेसंबंध	72
	समाजशास्त्र	
1.	सामाजिक स्तर	75
2.	श्रम	81
	भूगोलशास्त्र	
1.	भारताचे स्थान आणि विस्तार	90
2.	भारताची प्राकृतिक वैशिष्ट्ये	94
3.	भारताचे हवामान	103
4.	भारतातील माती	107
5.	भारतातील अरण्यसंपत्ती	112
6.	भारतातील जलसाधनसंपत्ती	118
7.	भारतातील भूमी संसाधन	127
	अर्थशास्त्र	
1.	विकास (प्रगती)	137
2.	ग्रामीण विकास	146
	व्यवहार अध्ययन	
1.	बँकेचे व्यवहार	152
2.	उद्योजकता (Entre preneurship)	161

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

इतिहास

प्रकरण - 1

युरोपियनांचे भारतात आगमन

या पाठात आपण खालील घटकांचा अभ्यास करूया.

- **भारताचे युरोपियनांशी व्यापारी संबंध**
- **युरोपियनांचे व्यापारासाठी भारतात आगमन**
- **युरोपियनांच्या राजकीय विकासापूर्वीची कार्नाटिक युद्धे**
- **प्लासीची लढाई, बक्सारची लढाई, दुहेरी राज्यपद्धत**
- **ब्रिटीशांचे आक्रमक धोरण**

भारत आणि युरोपियन यांच्यात प्राचीन काळापासून व्यापारी संबंध होते. युरोपम ध्ये भारतातील जिरे, मिरी, लवंग, दालचिनी, वेलदोडे, सुंठ या सारख्या मसाल्याच्या पदार्थांना प्रचंड मागणी होती. मध्ययुगापर्यंत युरोप, भारत आणि इतर आशियायी देशांमधील व्यापारी संबंध असेच चालू राहिले. अरबी व्यापारी आशियातील विक्रीचा माल पूर्व रोमन साम्राज्याची (बायझंटाईन) राजधानी 'कॉन्स्टॅन्टिनोपल' येथे पोहोचवत असत. तेथून इटलीचे (रोमन साम्राज्याचाभाग) व्यापारी तो माल खरेदी करून युरोपियन राष्ट्रांना विकत असत. अशाप्रकारे कॉन्स्टॅन्टिनोपल हे आंतरराष्ट्रीय वस्तू विनिमयाचे प्रमुख केंद्र बनले. तसेच 'युरोपियन व्यापाराचे महाद्वार' म्हणून ओळखले जाऊ लागले. आशियातील व्यापारावर अरब लोकांची मक्तेदारी होती; तर युरोपियन व्यापारावर इटलीच्या व्यापाऱ्यांची मक्तेदारी होती. आशियातील वस्तूंच्या विक्रीमुळे इटलीच्या व्यापाऱ्यांना पुष्कळ फायदा मिळत असे.

कॉन्स्टॅन्टिनोपलचा पाडाव :

आशिया आणि युरोपमधील, व्यापारी व वाणिज्य व्यवहार, कॉन्स्टॅन्टिनोपल या शहराच्या माध्यमातून होत असत. 1453 मध्ये ॲटोमन तुर्कांनी कॉन्स्टॅन्टिनोपल काबीज केले. अशा रीतीने कॉन्स्टॅन्टिनोपलला जोडणारे सर्व व्यापारी मार्ग तुर्कांच्या नियंत्रणाखाली आले. या नव्या संधीचा फायदा घेऊन तुर्कांनी या मार्गावरून नेण्यात येणाऱ्या व्यापारी वस्तूंवर भरम साट कर लादण्यास प्रारंभ केला. परिणामतः व्यापाऱ्यांना या मार्गावरील व्यापार फायदेशीर वाटेनासा झाला. त्याच दरम्यान इटालियन व्यापाऱ्यांची मक्तेदारी मोडून काढण्यास स्पेन, पोर्तुगाल इ. युरोपियन देशाच्या राजांनी धाडसी खलाशांना भारताकडे जाणारा नवीन सागरी मार्ग शोधण्यास उत्तेजन देण्यास सुरुवात केली. होकायंत्र, बंदुकीची दारू, ॲस्ट्रोलॅब (ग्रहोन्नतीमापक), ॲटलास, नकाशे या सारख्या शास्त्रीय शोधांमुळे खलाशांना मदत झाली.

www.textbookpdf.in

भारताकडे येणारा नवीन जलमार्ग :

लिस्बन बंदरातून निघालेला पोर्तुगीज खलाशी वास्को-द-गामा 1498 मध्ये भारताच्या पश्चिम किनारपट्टीवरील कालिकतजवळील 'काप्पडू' येथे येऊन पोहोचला. अशा प्रकारे भारत आणि युरोपमधील नवीन जलमार्ग शोधून काढण्यात तो यशस्वी झाला. वास्को-द-गामाने शोधलेला हा जलमार्ग पुढे कित्येक वर्षे भारत आणि युरोपातील व्यापारीमार्ग बनून राहिला अशाप्रकारे भारताबरोबर युरोपचे व्यापारी संबंध पुनर्स्थापित करणारे पोर्तुगीज हे प्रथम व्यापारी ठरले.

तुम्हाला माहिती असू दे : 1869 मध्ये तांबडा समुद्र आणि भूमध्य समुद्र (मेडिटेरियन) यांना जोडणारा मोठा कालवा, जहाजे येण्या जाण्यासाठी इजिप्तच्या भूप्रदेशात तयार करण्यात आला त्यालाच 'सुवेझ कालवा' म्हणतात. सुवेझ कालव्याच्या निर्मितीपूर्वी वास्को-द गामाने शोधलेला जलमार्गचं युरोप आणि भारतातील एकमेव व्यापारीमार्ग होता. कारण की वास्को-द-गामाच्या मार्गाने जाणाऱ्या जहाजांना आफ्रिकेच्या दक्षिण टोकाला म्हणजे 'केप ऑफ गुड होपला' वळसा घालून जावे लागे. या मार्गाला 'केप मार्ग' म्हणतात. मुंबई ते लंडन यामधील केप ऑफ गुड होपच्या मार्गाने अंतर 10800 नॉटिकल मैल (1 नॉटिकल मैल = 1.85 कि.मी.) तर सुवेझ कालव्याद्वारे हेच अंतर 6200 नॉटिकल मैल इतके होते. म्हणजेच या कालव्यामुळे हे अंतर निम्म्यापेक्षा कमी झाले.

युरोपियन व्यापारी कंपन्या

पोर्तुगीजांच्या यशस्वी प्रयत्नांपासून प्रेरणा घेऊन इतर युरोपियन डच, इंग्रज आणि फ्रेंच व्यापारी कंपन्या भारतात आल्या. या विकासामुळे फक्त भारताच्या इतिहासातच नव्हे तर युरोपियन देशांच्या इतिहासातही आमूलाग्र बदल घडून आला.

पोर्तुगीज :

जलमार्गाद्वारे व्यापारासाठी भारतात सर्वात प्रथम आलेले युरोपियन म्हणजे पोर्तुगीज आणि सगळ्यात शेवटी भारत सोडून जाणारेही पोर्तुगीजच होते. वास्को-द-गामाच्या नंतर पोर्तुगीजांचा पहिला व्हॉईसरॉय 'फ्रान्सिस्को-द-अलमिडा' हा भारतामध्ये आला. त्याने जमिनीवर अधिपत्य स्थापन करण्याऐवजी सागरी मार्गावर मक्तेदारी निर्माण करण्यासाठी आपले आरमार प्रबळ बनविले. याकरिता त्याने 'निळ्या पाण्याचे धोरण' (Blue water policy) अंमलात आणले. अल्मेडाच्या नंतर आलेला 'अल्फान्सो अल्बुकर्क' हा भारतातील पोर्तुगीज साम्राज्याचा खरा शिल्पकार म्हणून प्रसिद्धीस आला. त्याने 1510 मध्ये विजापूरच्या सुलतानाकडून गोवा जिंकून घेतले आणि तेच राज्यकारभाराचे प्रमुख केंद्र बनविले. जवळजवळ

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

एक शतकापर्यंत भारतातील व्यापारावर पोर्तुगीजांची असलेली मक्तेदारी डच व इंग्रज यांच्या आगमनामुळे संपुष्टात आली.

डच :

डच हे हॉलंड किंवा नेदरलँड देशाचे रहिवासी होते. 1602 मध्ये 'युनायटेड ईस्ट इंडिया कंपनी'ची स्थापना करून भारत आणि जावा, सुमात्रा, इंडोनेशिया वगैरे मसाल्यांच्या बेटांम ध्ये त्यांनी प्रवेश मिळविला. भारतामध्ये सुरत, भरूच, कँम्बे (खंभात), कोचीन, नागपट्टण मच्छलीपट्टण, चिन्सुरा वगैरे ठिकाणी त्यांनी आपल्या वखारी स्थापन केल्या. याद्वारे त्यांनी पोर्तुगीजांची मक्तेदारी संपुष्टात आणली.

पुढे भारतात आलेल्या इंग्रज व फ्रेंच यांच्या बरोबरच्या स्पर्धेत ते टिकू शकले नाहीत व त्यांनी आपले संपूर्ण लक्ष मसाल्याच्या बेटांवर केंद्रित केले..

तुम्हाला माहिती असूदे : 'वखारी' म्हणजे व्यापारीमाल, धान्याची कोठारे (गोदामे) असून संरक्षणासाठी त्याच्या भोवताली तटबंदी बांधलेली असे.

इंग्रज :

इंग्लंडच्या एलिझाबेथ राणीने 31 डिसेंबर 1600 मध्ये ईस्ट इंडिया कंपनीला पूर्वेकडील देशांशी व्यापार करण्यासाठी 15 वर्षाच्या कालावधीकरिता सनद दिली. या कंपनीने 1613 मध्ये औपचारिकपणे व्यापारास प्रारंभ केला. मोंगल सम्राट जहांगीरने या कंपनीला सुरतमध्ये पहिली वखार (व्यापारीकेंद्र) स्थापन करण्यास परवानगी दिली. 1617 मध्ये इंग्लंडचा राजा पहिला जेम्स याचा राजप्रतिनिधी म्हणून सर थॉमस रो जहांगीरच्या दरबारात आला. त्याने जहाँगीरकडून मोंगल साम्राज्याच्या काही भागात वखारी स्थापन करण्यासाठी परवानगी मिळविली. त्यानुसार इंग्रजांनी आग्रा, अहमदाबाद आणि भरूचमध्ये वखारींची स्थापना केली. इंग्रजांनी 1639 मध्ये चंद्रगिरीच्या राजाकडून मद्रासमध्ये जमीन मिळवून तेथे 'सेंट जॉर्ज फोर्ट' हा मजबूत किल्ला बांधवला. पुढे इंग्लंडचा राजपुत्र दुसरा चार्ल्स याने मुंबई बेट 1668 मध्ये कंपनीला वार्षिक 10 पौंड भाडेपट्टीने दिले. ब्रिटीशांनी 1690 च्या दशकात बंगालच्या राज्यपालाकडून हुगळी नदीच्या काठावरील सुतनुती, कलिकट आणि गोविंदपूर अशी तीन खेडी खरेदी करून तेथे 'फोर्ट विल्यम' नावाचा किल्ला बांधला. याच्या भोवतीच कलकत्ता या शहराची वाढ झाली. 17 व्या शतकाच्या अखेरीस इंग्रजांनी मद्रास, बॉम्बे, व कलकत्ता येथे त्यांची प्रेसिडेन्सी केंद्रे निर्माण केली. 18 व्या शतकाच्या उत्तरार्धात इंग्रजांनी कलकत्ता ही त्यांची राजधानी बनविली. त्यांच्या ताब्यातील प्रदेशात त्यांचेच नागरी आणि गुन्हेगारी कायदे (Civil and Criminal Procedure) त्यांनी अंमलात आणले.

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

फ्रेंच :

फ्रेंच ईस्ट इंडिया कंपनी ही 1664 मध्ये सरकारी मालकीची कंपनी म्हणून सुरु झाली. त्यांनी 1668 मध्ये त्यांची सर्वात पहिली वखार (व्यापारी केंद्र) सुरतमध्ये सुरु केली. त्यानंतर मच्छलीपट्टण, चंद्रनगर, माहे, करैकल, कासीमबझार, बालासोर येथे त्यांची केंद्रे स्थापन झाली. फ्रेंचांनी 1674 मध्ये 'वालिकोंडपुरम' येथील मुस्लीम अधिकाऱ्याकडून एक खेडे मिळविले. कालांतराने हेच मोठे व्यापारी केंद्र म्हणून भरभराटीस येऊन त्यालाच त्यांची राजधानी बनविली. तेच सध्याचे 'पुदुच्चेरी' किंवा 'पाँडिचेरी' होय. फ्रेंच भारत सोडून जाईपर्यंत हीच त्यांची राजधानी होती. 1746 मध्ये पाँडिचेरीचा गव्हर्नर म्हणून आलेल्या डुप्ले या महत्त्वाकांक्षी अधिकाऱ्याने दक्षिण भारतात फ्रेंचांचे अधिपत्य स्थापण्याचे ठरविले हेच इंग्रजांच्या बरोबर संघर्ष निर्माण होण्याचे आणि कार्नाटिक युद्धाचे कारण ठरले.



©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

ब्रिटीश आणि फ्रेंच यांच्यातील स्पर्धा :

पोर्तुगीज आणि डच हे 18 व्या शतकाच्या मध्यापर्यंतच्या काळात ब्रिटीश आणि फ्रेंचांबरोबरच्या स्पर्धेत टिकू शकले नाहीत. त्यामुळे भारतातील राजकीय स्पर्धेतून त्यांनी माघार घेतली. अंतिमतः ब्रिटीश व फ्रेंच हे भारतात आपला राजकीय प्रभाव टिकविण्यासाठी शक्तीप्रदर्शन करू लागले. याच संदर्भात हैद्राबाद संस्थान व कार्नाटिक प्रांतातील (तमिळनाडूचा पूर्व भाग) राजकीय अस्थिरतेचा फायदा उठविण्यासाठी ब्रिटीश व फ्रेंच प्रयत्न करू लागले. याचाच परिणाम म्हणून तीन कार्नाटिक युद्धे घडून आली.

तुम्हाला माहिती असूदे : 1724 मध्ये हैद्राबाद संस्थानची स्थापना 'आसफ झा' यांनी केली. त्याचा मांडलिक असलेला कार्नाटिक प्रांताचा राज्यकर्ता 'दोस्तअली' हा 'आसफ झा' याच्याशी एकनिष्ठ नव्हता. 1740 मध्ये मराठ्यांनी कार्नाटिक प्रांत लुटून दोस्त अलीला ठार केले व त्याचा जावई चंदासाहेब याला साताऱ्याच्या तुरुंगात ठेवले. यावेळी 'आसफ झा' याने विश्वासू व्यक्ती अन्वरुद्दीनची कार्नाटिक प्रांताचा नबाब म्हणून नेमणूक केली.

पहिले कार्नाटिक युद्ध (1746 ते 1748)

डुप्लेच्या विनंतीनुसार लाबोर्डिन नावाचा फ्रेंच सेनापती मॉरिशसहून आला आणि त्याने ब्रिटीशांकडून मद्रास काबीज केले. यामुळे हतबल झालेल्या ब्रिटीशांनी कार्नाटिकचा नबाब अन्वरुद्दिन याच्याकडे मदतीसाठी याचना केली. अन्वरुद्दीनने आपले सैन्य मद्रास परत मिळविण्यासाठी पाठविले. परंतु अन्वरुद्दीनच्या सैन्याला पराभूत व्हावे लागले. अखेरीस लाबोर्डीनने डुप्लेला न सांगता मद्रास प्रांत ब्रिटीशांना विकून तो मॉरिशसला निघून गेला.

डुप्लेला याचा भरपूर राग आला. मद्रास परत मिळविण्यास त्यांनी खूप प्रयत्न केले पण ते असफल झाले. या युद्धाचा शेवट युरोपमध्ये प्रिन्स व इंग्लंड यांच्यातील 'एक्स - ला - चापेल' कराराने झाला.

तुम्हाला माहिती असूदे : हैद्राबाद संस्थानचा निजाम 'आसफ झा' याचा 1748 मध्ये मृत्यू झाला. वारसाहक्कासाठी त्याचा मुलगा नासीरजंग व मुलीचा मुलगा मुझफ्फरजंग यांच्याम ध्ये कलह निर्माण झाला. याचवेळी कार्नाटिकमध्ये (मराठ्यांच्या कैदेतून सुटका झालेला) चंदासाहेब व अन्वरुद्दीन यांच्यात सत्ता मिळविण्यासाठी स्पर्धा सुरु होती. याचवेळी फ्रेंचांनी हैद्राबादमध्ये मुझफ्फरजंगला व कार्नाटिकमध्ये चंदासाहेबाला पाठिंबा दिला. तर इंग्रजांनी नासीरजंग व अन्वरुद्दीनला पाठिंबा दिला.

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

1749 मध्ये चंदासाहेब, मुझफ्फरजंग व फ्रेंच सैन्य एकत्रित येऊन त्यांनी अन्वरुद्दीनला 'अंबूर' युद्धात ठार केले. याचा परिणाम म्हणून चंदासाहेब कार्नाटिकचा नबाब झाला. व अन्वरुद्दीनचा मुलगा महंम्मद अली ब्रिटीशांच्या सहाय्याने त्रिचनापल्लीमधील किल्याच्या आश्रयाला गेला. इकडे हैद्राबादमध्ये मुझफ्फरजंग याने चंदासाहेब व फ्रेंचांच्या मदतीने नासीरजंगचा वध करून तो हैद्राबादचा निजाम बनला. परंतु थोड्याच दिवसात मुझफ्फरजंगचाही वध झाला. त्याच्या जागी फ्रेंचांनी 'असफ झा' च्या दुसऱ्या एका मुलाला सलाबतजंगला निजाम म्हणून घोषित केले.

दुसरे कार्नाटिक युद्ध (1749 ते 1754)

बदलत्या परिस्थितीनुसार फ्रेंचांनी 'असफ झा' च्या दुसऱ्या मुलास सलाबतजंगला हैद्राबादचा निजाम म्हणून घोषित केले. त्याच्या रक्षणासाठी फ्रेंच्यांनी त्याच्या दरबारात आपले सैन्य ठेवले आणि कॅप्टन बुसी याची नेमणूक केली. दुसरीकडे फ्रेंचांच्या पाठिंब्याने चंदासाहेब हा कार्नाटिकचा नबाब झाला. इंग्लिश ईस्ट इंडिया कंपनीचा अधिकारी रॉबर्ट क्लाईव्ह याने कार्नाटिकची राजधानी अर्काटवर आक्रमण करून फ्रेंचांचा व चंदासाहेबाचा पराभव केला. शेवटी या युद्धात चंदासाहेबाला अटक करून त्याची हत्या करण्यात आली. व त्याच्या जागेवर ब्रिटीशांनी अन्वरुद्दीनचा मुलगा, महंम्मद अली याची नबाब म्हणून नेमणूक केली शेवटी पाँडिचेरीच्या करारानुसार दुसऱ्या कार्नाटिक युद्धाचा शेवट झाला. फ्रेंचांनी डुप्लेला फ्रान्सला परत बोलावून घेतले. या युद्धामुळे फ्रेंचांचे राजकीय वर्चस्व कमी होऊन ब्रिटीशांची प्रतिष्ठा वाढली.

तिसरे कार्नाटिक युद्ध (1756 ते 1763)

फ्रेंचांचा सेनापती काऊंट-द-लाली याने वाँदिवॉशच्या किल्याला वेढा घालण्याचा प्रयत्न केला. या वाँदिवॉशच्या युद्धात ब्रिटीश सेनाधिकारी सर आयर कूट याने फ्रेंचांचा दारूण पराभव केला व कॅप्टन बुसीला अटक केली. लाली पळून गेला आणि पाँडिचेरी मध्ये लपून बसला शेवटी सर आयरकूटने पाँडिचेरीलाही वेढा घातला. लालीने 1761 मध्ये बिनशर्त शरणागती पत्करली.

या सर्व कार्नाटिक युद्धांचा परिणाम म्हणून फ्रेंचांचे भारतातील राजकीय वर्चस्व संपुष्टात आले. तरीसुद्धा 1763 च्या पॅरिसच्या करारानुसार पाँडिचेरी फ्रेंचांच्या ताब्यात परत देण्यात आले.

परिणामत: दक्षिण भारतातील फ्रेंचांचे अस्तित्व संपूर्णपणे नष्ट झाले. आणि ब्रिटीश युरोपियन प्रतिस्पर्ध्यांचा नाश करून संपूर्ण दक्षिण भारत आपल्या अंकित आणण्याच्या प्रयत्नात गुंतले.

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

हे तुम्हाला माहित असू दे :

रॉबर्ट क्लाईव्ह : भारतात ब्रिटीश सत्तेचा पाया घालण्यास रॉबर्ट क्लाईव्ह कारणीभूत ठरला. रॉबर्ट क्लाईव्ह ईस्ट - इंडिया कंपनीत कारकून म्हणून रुजू झाला. आर्काटवर हल्ला करण्यात त्याची भूमिका महत्त्वाची होती, त्यामुळेच कार्नाटिक युद्धात ब्रिटीशांना विजय प्राप्त झाला. त्याच्यामुळेच दक्षिणेत आपले वर्चस्व स्थापण्याबरोबरच इंग्रजांना बंगालमध्ये पाय रोवण्यास मदत झाली. 1757 मध्ये झालेल्या प्लासीच्या लढाईमुळे त्याने बंगालच्या नबाबावर नियंत्रण प्राप्त केले. त्यामुळे रॉबर्टक्लाईव्हला आणि ब्रिटीश ईस्ट इंडिया कंपनीस प्रचंड संपत्ती मिळाली. जेव्हा क्लाईव्ह इंग्लंडला परतला तेंव्हा तो एक अत्यंत श्रीमंत माणूस म्हणून परतला होता. त्याला इंग्लंडच्या संसदेचे सदस्यत्व देण्यात आले. क्लाईव्ह इंग्लंडला परतल्यावर ब्रिटीश ईस्ट इंडिया कंपनीला प्रचंड आर्थिक तोटा झाला. रॉबर्ट क्लईव्हवर अनेक आरोप असून देखील गेलेली पत परत मिळविण्यासाठी इंग्रज सरकारला क्लाईव्ह याला पुन्हा भारताचा गव्हर्नर म्हणून परत पाठविणे भाग पडले. बक्सारच्या लढाईत इंग्रजांना विजय प्राप्त करून देऊन क्लाईव्हने इंग्रजांना बंगाल, बिहार आणि ओरिसा प्रांतातील दिवाणी अधिकार मिळवून दिले. अशारीतीने ईस्ट इंडिया कंपनीला फायदा मिळवून देण्यास रॉबर्ट क्लाईव्हने सहाय्य केले आणि 1767 मध्ये एक गर्भश्रीमंत व्यक्ती म्हणून तो इंग्लंडला परतला.

डुप्ले: 1742 मध्ये फ्रेंच वसाहतींचा गव्हर्नर म्हणून डुप्लेची नेमणूक करण्यात आली. त्याने भारतावर वर्चस्व निर्माण करण्यासाठी अनेक स्थानिक राज्यकर्त्यांशी करार केले. हैदर अलीने आपल्या सैन्याला फ्रेंचमार्फत युद्धकौशल्याचे प्रशिक्षण दिले. डुप्ले हा ब्रिटीशांच्या वर्चस्वाला मोठे आव्हान होता. कर्नाटक व दक्षिणेवर वर्चस्व मिळविण्यासाठी इंग्रज व फ्रेंच यांच्यात अनेक लढाया लढल्या गेल्या. 1746 च्या मद्रास युद्धात डुप्लेने महत्त्वाची भूमिका बजावली व युद्धात विजय प्राप्त केला. 1754 पर्यंत इंग्रज व फ्रेंच यांच्यात नेहमी संघर्ष होत असे. पुढे शांतता राखण्याच्या हेतूने फ्रेंच सरकारने डुप्ले याला माघारी बोलावून घेतले.

भारतामध्ये ब्रिटीशांची राजवट

दक्षिण भारतावर संपूर्ण राजकीय वर्चस्व प्रस्थापित केल्यावर 18 व्या शतकाच्या उत्तरार्धात समृद्ध अशा बंगाल प्रांतावर पूर्ण नियंत्रण मिळविण्यासाठी ब्रिटीश पुढे सरसावले. कृषी, व्यापार आणि औद्योगिक क्षेत्रात बंगाल प्रांताचा मोठ्या प्रमाणात विकास झाला होता. इंग्लिश ईस्ट इंडिया कंपनीला या प्रांतातून पुष्कळ नफा मिळत होता. 1717 मध्ये मोंगल सम्राट फरूख सियार याने दिलेल्या दस्तक (मुक्त व्यापार करण्याचे परवानापत्र) देण्याच्या सवलतीमुळे हा नफा होऊ लागला. परंतु ईस्ट इंडिया कंपनीचे नोकर स्वतःच्या खाजगी व्यापारासाठी या दस्तकाचा गैरवापर करू लागले. त्यामुळे बंगाल सरकारला भरपूर आर्थिक नुकसान सोसावे लागले. म्हणून मुर्शिद अलिखानापासून; अलिवर्दीखानापर्यंतच्या सर्व नबाबांनी दस्तकाच्या या

www.textbookpdf.in

गैरवापरास विरोध केला. पुढे याच विचारांमुळे नबाब व कंपनी यांच्यात संघर्ष निर्माण झाला. याचा परिणाम म्हणून भारताच्या इतिहासाला कलाटणी देणारी दोन महत्त्वपूर्ण युद्धे झाली ती युद्धे म्हणजे प्लासीची लढाई आणि बक्सारची लढाई होय.

हे तुम्हाला माहित असू द्या :

दस्तक : कोणताही कर न आकारता वस्तूंची आयात व निर्यात करणे; तसेच वस्तूंची ने आण करण्यास दिलेले परवानापत्र.

प्लासीची लढाई (1757) :

बंगालचा नबाब अलिवर्दीखान याचा 1756 मध्ये मृत्यू झाला. त्याच्यानंतर त्याचा नातू सिराजउद्दौला हा सत्तेवर आला. सिराजउद्दौला हा तरूण नबाब होता. सिराजउद्दौला व ब्रिटीश यांच्यामध्ये 1757 मध्ये इतिहास प्रसिद्ध अशी प्लासीची लढाई झाली.

कारणे :

1) **दस्तकाचा गैरवापर :** ईस्ट इंडिया कंपनीच्या व्यापारासाठी दिलेल्या दस्तक अधिकाराचा गैरवापर ब्रिटीश नोकर करू लागले. त्यामुळे राज्याच्या खजिन्याला आर्थिक नुकसानीला तोंड द्यावे लागले. याची सिराज उद्दौलाला चीड आली.

2) **विनापरवाना किल्ल्याची दुरुस्ती :** फ्रेंचांच्या भीतीने ब्रिटीशांनी कलकत्त्याच्या किल्ल्याची तटबंदी भक्कम करण्यास सुरुवात केली. आणि तेथे फिरंगी तोफा ठेवल्या. नबाबाची परवानगी न घेता किल्ल्याची दुरुस्ती केल्यामुळे व तोफा हटविण्याची नबाबाची मागणी ब्रिटीशांनी धुडकावून लावल्यामुळे सिराजउद्दौला संतापला.

3) **कृष्णरंध्रशोकांतिका :** सिराजउद्दौलाने फोर्ट विल्यम किल्ला सहजपणे काबीज केला आणि इंग्रजी सैनिकांना बंदी बनविले. बंदी बनवलेल्या ब्रिटीशांना सिराज उद्दौलाने एका छोटया खोलीत डांबले. 146 कैद्यांपैकी 123 जणांचा त्या खोलीतील उष्णतेने गुदमरुन मृत्यू झाला यालाच 'कृष्णरंध्र शोकांतिका' असे म्हटले जाते. ही बातमी ऐकून रॉबर्ट क्लाईव्ह भडकला व तो अफाट सैन्य घेऊन बंगालला आला.

पहिल्या नबाबाच्या वेळचे बंडखोर माणिकचंद, ओमीचांदा व सावकार जगतसेठ वगैरे श्रीमंत लोकांना त्याने आपल्या बाजूने वळविले. नंतर सिराजउद्दौलाचा सेनापती मीरजाफरला नबाबपदाचे आमीष दाखवून युद्धात तटस्थ राहण्याची सूचना केली. यामुळे मनोबल वाढलेल्या रॉबर्ट क्लाईव्हने 23 जून 1757 रोजी सिराज उद्दौलावर हल्ला केला. प्लासी या ठिकाणी झालेल्या या लढाईत रॉबर्ट क्लाईव्हने ठरविलेल्या योजनेनुसार सर्व घटना घडल्या. युद्धभूमीवरून पळून जाणाऱ्या सिराज उद्दौलाला पकडून ठार मारण्यात आले.

www.textbookpdf.in

परिणाम :

1. या युद्धामुळे भारतीयांच्यात एकी नाही, संघटना नाही, तसेच त्यावेळचे व्यापारी लोभीवृत्तीचे होते हे दिसून आले.
2. मीरजाफर बंगालचा नबाब बनला.
3. ईस्ट इंडिया कंपनीस बंगाल बरोबर व्यापार करण्यासाठी अनियंत्रित अधिकार प्राप्त झाले.
4. सिराज उद्दौलाने कलकत्त्यावर केलेल्या आक्रमणाची नुकसानभरपाई म्हणून मीरजाफरने कंपनीला सतरा कोटी सत्तर लाख रुपये दिले.

एकूण मीरजाफर हा कंपनी व ब्रिटीश नोकरांच्या हातातले कळसूत्री बाहुले बनला होता. त्याची वरचेवर पिळवणूक होऊ लागली. राज्याचा खजिना रिकामा होऊ लागला. परंतु धनलोभी ब्रिटीश अधिकाऱ्यांची तहान काही भागली नाही. ब्रिटीशांनी मीरजाफरला असमर्थ नबाब असे बिंबवून त्याला पदच्युत करून त्याचा जावई मीरकासीमची बंगालचा नबाब म्हणून नेमणूक केली.

बक्सारची लढाई (1764)

मीरकासीम हा कुशल प्रशासक होता हा सुद्धा प्रारंभी कंपनीशी एकनिष्ठ राहिला. दोन लाख पौंड रक्कम व काही प्रदेश त्याने कंपनीला बहाल केले. लवकरच मीरकासीमने स्वतः ला स्वतंत्र नबाब म्हणून घोषित केले. दस्तकाच्या गैरवापरास आळा घालून त्याने भारतीय व्यापाऱ्यांना ही करमुक्त व्यापार करण्याची सवलत दिली आणि त्यामुळे ब्रिटीशांबरोबर त्यांची थेट स्पर्धासुरु झाली. याचा परिणाम असा झाला की ब्रिटीश व्यापाऱ्यांचे फार मोठे नुकसान झाले. ब्रिटीशांना नबाबाविरोधात इतके कारण पुरेसे होते. म्हणून त्यांनी मीरकासीमला पदच्युत करून पुन्हा मीरजाफरला नबाब बनविले. ब्रिटीशांचे कुटील धोरण मीरकासीम ओळखून होता त्याने ब्रिटीशांविरुद्ध संघटितपणे लढाईची योजना आखली. भारतीय व्यापारी व इतर सर्व कारागीर यांनी त्याला पाठिंबा दर्शविला. मीरकासीमने मोंगल सम्राट दुसरा शाह आलम व अवधचा (अयोध्या) नबाब शुजाउद्दौला यांच्याशी करार केला. याचा परिणाम म्हणून मीरकासीमच्या नेतृत्वाखाली असलेल्या त्रिकूट सैन्याची व हेक्टर मन्रोच्या नेतृत्वाखाली असलेल्या ब्रिटीश सैन्याची 1764 मध्ये 'बक्सार' येथे गाठ पडली. या युद्धात मीरकासीमचा पराभव झाला व तो पळून गेला शाह आलम हा शरण आला. ब्रिटीशांच्या प्रबळ शक्तीला थोपविण्यासाठी केलेला हा संघटित प्रयत्न अयशस्वी झाला.

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

परिणाम :

1. ईस्ट इंडिया कंपनीला बंगालमधील दिवाणीचे हक्क (जमीनमहसूल गोळा करणे) दुसऱ्या शाह आलमकडून मिळाले.
2. शाह आलमला वार्षिक 26 लाख रू. घेऊन बंगाल वरील सर्व हक्क सोडून द्यावे लागले.
3. अवधचा नबाब शुजा उद्दौला याला युद्धाची नुकसान भरपाई म्हणून 50 लाख रू. द्यावे लागले.
4. मीरजाफरचा मृत्यू झाल्यामुळे त्याच्या मुलास मासिक निवृत्तीवेतन दिले. आणि बंगालचा पूर्ण कारभार कंपनी पाहू लागली.

शेवटी बक्सारच्या लढाईमुळे बंगाल, बिहार व ओरिसा या प्रांताची संपूर्ण मालकी ब्रिटीशांकडे आली. व औंध प्रांतही त्यांच्या अंमलाखाली राहिला. 1765 मध्ये रॉबर्ट क्लाईव्हने बंगालमध्ये 'दुहेरी राज्यव्यवस्था' अंमलात आणली. या पद्धतीनुसार ब्रिटीशांना जमीन महसूल गोळा करण्याचा हक्क प्राप्त झाला. परंतु न्यायदान, दैनंदिन राज्यकारभार आणि प्रशासकीय कामकाज नबाबाकडेच राहिले. याप्रमाणे ब्रिटीशांनी व्यापारातील फायदा मिळविण्यासाठी राजकीय चातुर्याच्या वापर करून भारतावर आपले वर्चस्व निर्माण केले.

हे तुम्हाला माहित असू दे :
'दिवाणी हक्क' म्हणजे जमीन महसूल वसूल करण्याचा हक्क.

हे तुम्हाला माहित असू दे :

1600 : ब्रिटीश ईस्ट इंडिया कंपनीची इंग्लंड येथे स्थापना.

1602 : युनायटेड ईस्ट इंडिया कंपनीची 'नेदरलँड' येथे स्थापना.

1619 : मोंगल सम्राट जहांगीर याने ईस्ट इंडिया कंपनीला पश्चिम किनारपट्टीवरील सुरत आणि पूर्व किनारपट्टीवरील हुगळी येथे व्यापारासाठी परवानगी दिली.

1639 : इंग्रजांनी मद्रास येथे आपली पहिली वखार स्थापन केली.

1664 : फ्रान्समध्ये फ्रेंच ईस्ट इंडिया कंपनीची स्थापना झाली.

स्वाध्याय

I) खालील रिकाम्या जागा योग्य पदांनी भरा.

1. 1453 मध्ये ॲटोमन तुर्कांनी _____ शहर काबीज केले.
2. भारत व युरोपमधील नवीन जलमार्ग _____ याने शोधून काढला.

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

3. भारतामधील फ्रेंचांची राजधानी _____ ही होती.

4. 1757 मध्ये रॉबर्ट क्लाईव्ह याने सिराज उद्दौला बरोबर _____ येथे लढाई केली.

5. ईस्ट इंडिया कंपनीला बंगालमधील दिवाणी हक्क _____ याने दिले.

6. बंगालमध्ये _____ याने दुहेरी राज्यव्यवस्था सुरू केली.

II) खालील प्रश्नांची उत्तरे समूहामध्ये चर्चा करून लिहा.

1. मध्ययुगात भारत व युरोप यांच्यातील व्यापार कसा चालत असे?

2. भारताकडे येणारा नवीन जलमार्ग का शोधावा लागला याबद्दल चर्चा करा.

3. भारत देशात व्यापारासाठी आलेल्या युरोपियनांची यादी करा.

4. दुसऱ्या कार्नाटिक युद्धाचे वर्णन करा.

5. प्लासीच्या लढाईची कारणे व परिणाम लिहा.

6. बक्सारच्या लढाईचे कोणते परिणाम झाले?

उपक्रम :

1. ब्रिटीशांनी निर्माण केलेल्या प्रेसिडेन्सी शहरांबद्दल माहिती संग्रहित करा.

***

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

प्रकरण - 2

ब्रिटीश सत्तेचा विस्तार

या पाठात आपण खालील घटकांचा अभ्यास करूया.

- **अँग्लो - मराठा युद्धे**
- **ब्रिटीश सत्तेचे एकत्रीकरण**
- **दत्तक वारसा नामंजूर (Doctrine of Lapse)**
- **सहाय्यक सैन्य पद्धती**
- **अँग्लो - शीख युद्धे**

कार्नाटिक युद्धाद्वारे इतर कोणत्याही युरोपियन राष्ट्रांनी भारतात इंग्रजांना आव्हान देवू नये याचा ब्रिटीशांनी पूर्ण बंदोबस्त केला. प्लासी व बक्सारच्या लढायांमुळे बंगाल हा प्रांत पूर्णपणे ब्रिटीशांच्या नियंत्रणाखाली आला. 1765 च्या दरम्यान पूर्व भारताचा बहुतांश भाग ब्रिटीशांच्या अधिपत्याखाली आला परंतु पश्चिम भारतात मराठे व दक्षिणेकडे म्हैसूरमध्ये प्रबळ सत्ता असल्याकारणाने ब्रिटीशांचा अंमल फक्त बंगाल व मुंबई प्रांतापुरताच मर्यादित राहिला.

ब्रिटीशांच्या या विस्तारीकरणाच्या मार्गात पेशव्यांसह म्हैसूरचा हैदर अली व त्याचा मुलगा टिपू सुलतान हे महत्त्वाचे अडसर होते. या व्यतिरिक्त वायव्येकडील शीखसुद्धा प्रखर विरोधक होते. 19 व्या शतकाच्या प्रारंभी रणजितसिंगने ब्रिटीशांना प्रचंड विरोध केला. शीखांना संघटित करण्यात तो प्रचंड यशस्वी झाला.

ब्रिटीशांनी भारतात आपल्या साम्राज्याचा विस्तार करण्यासाठी अठराव्या शतकाच्या मध्यापासून ते एकोणीसाव्या शतकाच्या मध्यापर्यंत वारंवार अनेक युद्धे केली. याव्यतिरिक्त सहाय्यक सैन्य पद्धती, दत्तक वारसा नामंजूर यासारख्या कुटील नीतीचा वापर करून अनेक राज्ये बळकावली या काळात ब्रिटीशांनी तीन अँग्लो - मराठा युद्धे, चार अँग्लो - म्हैसूर युद्धे आणि दोन अँग्लों-शीख युद्धे केली. अँग्लो म्हैसूर युद्धा बद्दलची सविस्तर माहिती चौथ्या प्रकरणात असल्यामुळे आपण इथे फक्त अँग्लो - मराठा व अँग्लो - शीख युद्धाबद्धलच माहिती घेवूया.

अँग्लो - मराठा युद्धे

पहिले अँग्लो - मराठा युद्ध (1775-1782) : बक्सारच्या लढाईत पराभूत होवून ब्रिटीशांच्या आश्रयाला आलेल्या दुसऱ्या शाह आलमशी मराठ्यानी हातमिळवणी केली आणि त्याला दिल्लीच्या तख्तावर बसविले. इंग्रजांच्या ताब्यात असलेले कोरा आणि अलाहाबाद हे प्रांत शाह आलमने मराठ्यांना दिले यामुळे इंग्रज व मराठ्यांमध्ये वैर निर्माण झाले. याचदरम्यान

www.textbookpdf.in

माधवराव पेशवे या शूर व बलाढ्य योद्धयाच्या मृत्यूने मराठ्यांना जबरदस्त फटका बसला. नंतर त्यांचे बंधू नारायणराव सत्तेवर आले. परंतु त्यांचे काका राघोबानी त्यांचा वध केला यामुळे पेशवे पदासाठी त्याच्यामध्ये अंतर्गत कलह सुरु झाले. नाना फडणवीसांच्या नेतृत्वाखाली राघोबादादांऐवजी नारायणरावांचा मुलगा दुसरा माधवराव याला पेशवेपद देण्यात आले. यामुळे निराश झालेला राघोबा ब्रिटीशांच्या आश्रयाला गेला. या संधीचा आपल्याला पुरेपूर फायदा घेता येईल असा ब्रिटीशांचा अंदाज होता. 1775 ते 1782 दरम्यान मराठे व ब्रिटीशांम ध्ये प्रदीर्घ युद्ध झाले. सुरवातीस मराठ्यांना यश आले. परंतु नंतर त्यांना अलाहाबाद ब्रिटीशांना देणे भाग पडले. ब्रिटीशांपुढे मराठ्यांचा टिकाव लागला नाही. त्यामुळे त्यांना 'साल्बाईचा (सालप्याचा) करार करणे भाग पडले आणि हे युद्ध संपुष्टात आले. दुसऱ्या माधवरावाला (सवाई माधवाराव) 'पेशवा' म्हणून घोषित करण्यात आले.

लॉर्ड वेलस्ली (1798-1805) आणि सहाय्यक सैन्य पद्धती : लॉर्ड वेलस्ली भारतात गव्हर्नर जनरल म्हणून आल्यानंतर ब्रिटीश साम्राज्याचा विस्तार फार मोठ्या प्रमाणात झाला. यादरम्यान मराठा व म्हैसूरची बलाढ्य राज्ये दुर्बल झाली होती. त्यामुळे आपल्या साम्राज्याचा विस्तार करणे ब्रिटीशांना सोपे झाले. हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी वेलस्लीने तीन धोरणांचा अवलंब केला. 1. सहाय्यक सैन्य पद्धती 2. नवीन राज्यांशी युद्ध पुकारणे. 3. ब्रिटीशांच्या अधिपत्याखाली असणाऱ्या राज्यांचा राज्यकारभार थेट पहाणे.

1. सहाय्यक सैन्य पद्धती : भारतातील राज्यांना स्वतःच्या नियंत्रणाखाली आणण्यासाठी 1798 मध्ये लॉर्ड वेलस्ली यांने 'सहाय्यक सैन्य पद्धती' अंमलात आणली हा भारत व ईस्ट इंडिया कंपनी यामधील एक लष्करी करार होता.

सहाय्यक सैन्य पद्धतीतील अटी

1. सहाय्यक सैन्य पद्धती स्वीकारणाऱ्या राज्यकर्त्यानी इंग्रजांची एक मोठी फौज आपल्या राज्यात ठेवून घेवून तिच्या खर्चाची तरतूद करावयाची. तसेच सैनिकांना वेतन देवून जमिनीवर कांही प्रमाणात महसूलही द्यावयाचा.
2. राज्यकर्त्यांनी इतर राज्यांशी तसेच इतर संस्थानांशी स्वतंत्र करार करावयाचे नाहीत. त्यासाठी त्यांना गव्हर्नरची परवानगी घेणे बंधनकारक राहील.
3. राज्यकर्त्यांना इंग्रजांचा वकील आपल्या दरबारी ठेवावा लागेल.
4. इंग्रजांच्या परवानगीशिवाय इतर कोणत्याही युरोपियनांची नेमणूक करता येणार नाही.
5. वरील सर्व सेवांच्या बदल्यात त्या राज्यकर्त्याला ईस्ट इंडिया कंपनी कडून अंतर्बाह्य संपूर्ण संरक्षण मिळेल.

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

यामुळे इंग्रजांना स्थानिक राज्यकर्त्यांच्या अंतर्गत व्यवहारांवर नियंत्रण ठेवणे सहज शक्य झाले. तसेच सैन्याची तैनात करणेही सुलभ झाले. यामुळे भारतीय राज्यकर्त्यांचे तीव्र शोषण होऊ लागले हैदराबादचा निजाम हा ही पद्धती स्वीकारणारा पहिला राजा होय. यापाठोपाठ म्हैसूर, (औंध) अयोध्या, तंजावर, मराठे, अर्काट, पुणे, बिरार, ग्वालियर आणि इतर कांही राज्यांनी या पद्धतीचा स्वीकार केला.

दुसरे अँग्लो - मराठा युद्ध (1803-1805)

मराठ्यांमधील अंतर्गत संघर्ष हेच या युद्धाचे मूळ कारण ठरले पेशवेपदासाठी इंदूरचे यशवंतराव होळकर व ग्वाल्हेरचे दौलतराव शिंदे यांच्यात स्पर्धा सुरू झाली. दुसऱ्या बाजीराव पेशव्यांचा दौलतराव शिंदेना पाठिंबा होता. 1802 मध्ये होळकारांनी शिंदे (सिंदिया) व पेशव्यांचा पराभव केला. अशा बिकट परिस्थितीत पेशव्यांनी वसईच्या तहाद्वारे सहाय्यक सैन्य पद्धती स्वीकारली आणि याबरोबरच लॉर्ड वेलस्लीला मराठा साम्राज्यामध्ये चंचूप्रवेश करण्याची संधी आपोआपच मिळाली. या कराराबरोबरच पेशव्यांना विरोध करण्यासाठी शिंदे, होळकर व भोसले ही मराठा घराणी एकत्र आली, आणि त्यांनी इंग्रजांविरुद्ध युद्ध घोषित केले. 1803 ते 1805 दरम्यान लॉर्ड वेलस्लीने अनेक मराठा घराण्यांचा पराभव केला. परंतु त्यांच्या या युद्ध-धोरणामुळे कंपनी वरील आर्थिक बोजा वाढला. यावरून त्याच्यावर कडक टीका झाली आणि आपल्या पदाचा राजीनामा देवून तो इंग्लंडला परत गेला. परिणामतः सर्व राज्यामध्ये तत्कालिक शांतता प्रस्थापित झाली.

तिसरे अँग्लो - मराठा युद्ध (1817-18)

स्वतःची पत व स्वातंत्र्य अबाधित ठेवण्यासाठी मराठा घराण्यांनी शर्थीचे प्रयत्न केले. ईस्ट इंडिया कंपनीच्या कचाट्यातून सुटका करून घेण्यासाठी पेशव्यांनीसुद्धा आटोकाट प्रयत्न केले. 1817 साली पेशव्यांनी पुण्यातील इंग्रजांच्या रेसिडेन्सीवर हल्ला चढवून तेथे जाळपोळ करण्याचा प्रयत्न केला. नागपूरच्या आप्पासाहेबांनी व मल्हारराव होळकरांनी इंग्रजांविरुद्ध बंड पुकारले व ते पराभूत झाले. शेवटी दुसऱ्या बाजीराव पेशव्यांने ब्रिटीशांविरुद्ध कोरेगांव व अष्टी येथे 1818 मध्ये युद्ध केले आणि ते ब्रिटीशांना शरण आले. इंग्रजानी पेशवा हे पद रद्द करून बाजीरावला निवृत्तीवेतन दिले. छत्रपती शिवाजीचा वंशज प्रतापसिंह याला साताऱ्याच्या गादीवर बसविले आणि त्याला मराठ्यांचा वारसदार म्हणून घोषित केले अशारीतीने त्यांनी मराठ्यांचा विरोध पूर्णपणे दडपून टाकला आणि इंग्रजांचे साम्राज्य भारतभर पसरले.

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

ब्रिटीश सत्तेचे एकत्रीकरण (1818-1857)

1818 ते 1857 पर्यंत इंग्रजांनी संपूर्ण भारतावर अधिराज्य केले. सिंध, अयोध्या यासारख्या प्रमुख राज्यांबरोबरच आणखी कांही छोटी राज्येही त्यांनी काबीज केली.

अँग्लो - शीख युद्धे

1839 मध्ये 'पंजाबचा सिंह' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या रणाजितसिंह या राजाच्या निधनामुळे तेथे राजकीय अराजकता माजली. 1809 च्या कायमस्वरूपी मैत्री कराराचे उल्लंघन करून पंजाब प्रांत काबीज करण्यासाठी इंग्रजांनी कट रचला. डिसेंबर 1845 मध्ये इंग्रज व पंजाबी सैन्यामध्ये लढाई सुरू झाली. परकीयांकडून होणारा धोका वेळीच ओळखून हिंदू, मुसलमान व शीख एकत्र आले. व इंग्रजांना पराभूत करण्यासाठी ते त्वेषाने लढले परंतु कांही देशद्रोही फितुर नेत्यांमुळे त्यांना पराभव पत्करावा लागला आणि सा.श. 1846 मध्ये त्यांना आपमानास्पदरित्या लाहोर करारावर स्वाक्षरी करावी लागली पंजाबवर ब्रिटीशांची सत्ता आली. अशारीतीने पंजाब प्रांत संपूर्णपणे ईस्ट इंडिया कंपनीच्या अधिपत्याखाली आला.

पंजाबवर स्वतः थेट राज्य कारभार करण्यासाठी शिखांनी 1848 मध्ये ब्रिटीशांना कडाडून विरोध केला. या बंडाचे नेतृत्व लाहोरमध्ये चत्तार सिंग अट्टारिवाल याने तर मुलतानमध्ये मूलराजने केले होते. परंतु पुन्हा पंजाबचा पराभव झाला. शेवटी लॉर्ड डलहौसीने पंजाब प्रांत ब्रिटीश साम्राज्यात विलीन केला.

डलहौसी आणि खालसाधोरण (दत्तक वारसा नामंजूर)

1848 मध्ये डलहौसी 'गव्हर्नर जनरल' बनून भारतात आला. त्यांने भारतातील सर्व संस्थाने ब्रिटीश साम्राज्यामध्ये विलीन करून घेण्यासाठी प्रयत्न चालू केले. त्यांनी 'खालसाधोरण' म्हणजेच 'दत्तकवारसा नामंजूर' हे धोरण अवलंबिले ज्याद्वारे दत्तक घेतलेल्या राजांच्या मुलांना वारसाहक्क नाकारण्यात आला. यानुसार जर एखाद्या निपुत्रिक राजाचा मृत्यू झाला तर त्याच्या दत्तक पुत्रांना गादीवर बसण्याचा कायदेशीर हक्क नव्हता आणि असे राज्य आपोआपच ब्रिटीश साम्राज्यामध्ये विलीन केले जात असे. या धोरणा अंतर्गत सातारा, नागपूर, संबलपूर, उदयपूर, जयपूर, झाशी यासारखी अनेक संस्थाने खालसा करण्यात आली. गव्हर्नर जनरलचा या धोरणाबद्दल सखोल अभ्यास असल्या कारणांने याचा वापर त्यांने राजकीय अस्त्राप्रमाणे केला.

हे धोरण काटेकोरपणे तसेच अत्यंत कठोरपणे अवलंबल्यामुळे फक्त संस्थानेच नव्हे तर ब्रिटीशांबद्दल सहानुभूती असणारी छोटीमोठी राजघराणीसुद्धा 'ईस्ट इंडिया कंपनी' विरुद्ध पेटून उठली. आपापल्या राजाप्रती असलेल्या प्रेमाखातर आणि निष्ठेखातर या विरोधाने जोर धरला आणि 1857 च्या बंडाला सुरूवात झाली.

www.textbookpdf.in

हे तुम्हांला माहित आहे कां?

रणजितसिंह : रणजितसिंह याचा जन्म 1780 मध्ये पंजाब प्रांतात झाला. 'सुखरचाकिया' या मिस्लचा (तालुका) राजा असणाऱ्या महानसिंहचा तो पुत्र होता. पंजाबमध्ये एकूण 12 मिस्ल होते. वयाच्या 10 व्या वर्षीच त्याच्या पित्याचे निधन झाले. जेंव्हा काबूलचा जमानशहा भारतात आला तेंव्हा रणजितसिंहने त्याला मदतीचा हात दिला. जमानशहाने त्याला लाहोरचा गव्हर्नर बनविले व 'राजा' ही पदवीदेखील बहाल केली. यावेळी त्याचे वय अवघे 19 वर्षांचे होते. यानंतर त्याच्या जीवनाला आश्चर्यकारकरित्या कलाटणी मिळाली. सर्व शिखांवर अधिराज्य करण्याची त्याची महत्वाकांक्षा होती त्यांने पाश्चिमेकडील सतलज प्रांतातील सर्व शिखांवर ताबा मिळवून स्वतःचे शीख साम्राज्य निर्माण केले. त्यांने 1809 मध्ये अमृतसर येथे ब्रिटीशांशी 'अमृतसर करार' केला त्याने आपले सैन्य ब्रिटीशांच्या सैन्यात समाविष्ट केले. त्याच्या सैन्यात गुरखा, बिहारी, पठाण आणि कांही मुस्लीमांचाही समावेश होता. त्यांने लाहोरमध्ये तोफ कारखाना सुरू केला. त्याकाळातील 'एक सर्वश्रेष्ठ सैन्य' अशी रणजितसिंहच्या सैन्याची गणना केली जात असे. तो निधर्मी वृत्तीचा होता. हिंदू व मुस्लीम संतांना समान समजून त्यांचा आदर करत असे. त्याच्या कारकीर्दीत सर्व धर्माच्या लोकांनी आपापल्या धर्माची केंद्रे स्थापन केली होती. ब्रिटीशांशी त्याचे मैत्रीपूर्ण संबंध असल्याने आपले राज्य तो शाबूत राखू शकला. वायव्येकडील घुसखोरी रोखण्यासाठी इंग्रजांनाही अशा भक्कम आणि प्रतिबंधात्मक राज्याची गरज होतीच थोडक्यात सांगायचे म्हणजे रणजितसिंहने शिखांचे स्वतंत्रसाम्राज्य स्थापन करून 1839 पर्यंत म्हणजेच त्याच्या मृत्यूपर्यंत स्वतंत्रपणे राज्य केले.

स्वाध्याय

I) खालील रिकाम्या जागा योग्य पदांनी भरा.

1. पहिल्या अँग्लो-मराठा युद्धाच्या शेवटी ब्रिटीश व मराठ्यांमध्ये ___ हा करार झाला.
2. 'सहाय्यक सैन्य पद्धती' _____ यांने अंमलात आणली.
3. 'खालसा धोरण' (दत्तक वारसा नामंजूर) ___ या साली अंमलात आणले गेले.
4. 'खालसा धोरण' (दत्तक वारसा नामंजूर) _____ यांने अवलंबिले

II) समूहात चर्चा करून खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.

1. पहिल्या अँग्लो - मराठा युद्धाची कारणे द्या.
2. सहाय्यक सैन्यपद्धतीमधील अटी सविस्तरपणे लिहा.
3. तिसऱ्या अँग्लो - मराठा युद्धाचे वर्णन करा.
4. खालसा धोरण (दत्तकवारसा नामंजूर) भारतातील ब्रिटीश साम्राज्याच्या विस्ताराला कसे पूरक ठरले?
5. खालसा धोरणांतर्गत कोणकोणती संस्थाने विलीन झाली?

III) उपक्रम :

1. भारतामध्ये आपल्या साम्राज्याचा विस्तार करण्यासाठी ब्रिटीशांनी कोणकोणती धोरणे अवलंबिली याचे विश्लेषण करून थोडक्यात निबंध लिहा.

***

©KTBS Not to be republished
www.textbookpdf.in

प्रकरण - 3

भारतावरील ब्रिटीश सत्तेचे परिणाम

या पाठात आपण खालील घटकांचा अभ्यास करूया.

- **प्रशासकीय आणि न्यालयीन पद्धत - नागरी सेवा, न्यायालयीन पद्धत, पोलीस खाते, लष्करी खाते.**
- **जमीन महसूल व्यवस्था - जमीनदारी पद्धत, महलवारी पद्धत, रयतवारी पद्धत.**
- **आधुनिक शिक्षणपद्धती - लॉर्ड मॅकॉले, वुडस्न कमिशन (1854)**
- **ब्रिटीशकालीन कायदे - रेग्युलेटिंग ॲक्ट, पिट्स इंडिया ॲक्ट, चार्टर लॉज (ॲक्टस्)**

ब्रिटीश ईस्ट इंडिया कंपनीने सुरवातीला एक सर्वसामान्य व्यापारी कंपनी म्हणून भारतात शिरकाव करून आपल्या व्यावसायिक गरजांची पूर्तता करून घेतली. भारतभर विखुरलेल्या राज्यव्यवस्थेचा त्यांनी अभ्यास केला आणि स्वतःचे राजकीय वर्चस्व प्रस्थापित करण्याचे प्रयत्न सुरू केले. भारतातील अनेक राज्यकर्ते एकमेकांशी स्पर्धा करून आपापले साम्राज्य वाढविण्यासाठी भांडणतंटे करण्यात मग्न झाले होते. याच संधीचा फायदा घेवून ब्रिटीशांनी 'फोडा आणि राज्य करा' या नीतीचा अवलंब करून बऱ्याच राजांना वश करून घेतले. भारतावर संपूर्णपणे आपले वर्चस्व प्रस्थापित करण्यासाठी त्यांनी युद्ध व मैत्री या धोरणांचा शिताफीने वापर केला.

तऱ्हतऱ्हेच्या धूर्त व कावेबाज धोरणांद्वारे जवळजवळ संपूर्ण भारत इंग्रजांच्या अधिपत्याखाली आला. परंतु भारतावर कायमचे वर्चस्व गाजविण्यासाठी ब्रिटीशांचे प्रयत्न सुरू झाले. त्यावेळी भारतीयांच्या मनामध्ये 'एक संघराज्य' ही संकल्पना अजूनी निर्माण झाली नव्हती. भारतातील राज्ये छोट्या - मोठ्या संस्थानांमध्ये विखुरलेली होती. म्हणून भारतामध्ये एकसूत्री शासनव्यवस्था समान कायदेव्यवस्था, शिक्षणपद्धती, न्यायव्यवस्था, महसूलपद्धती, शेती या व इतर क्षेत्रामध्येही ब्रिटीशांनी आपला अंमल सुरू केला. परिणामतः भारतात शांतता, समानता आणि सुव्यवस्था दिसून आली या सर्वांची अंमलबजावणी करीत असतांना ब्रिटीश ईस्ट इंडिया कंपनीच्या आर्थिक नफ्याकडे त्यांनी कधीही दुर्लक्ष केले नाही. भारतामध्ये सुव्यवस्था निर्माण करण्यासाठी कंपनीने विविध प्रशासकीय प्रयोग करून पाहिले.

प्रशासकीय आणि न्यायव्यवस्था

नागरी सेवा

लॉर्ड कॉर्नवालिसने भारतामध्ये नागरी सेवा सुरू केल्या. भारतामध्ये व्यवसाय करण्यासाठी ईस्ट इंडिया कंपनी अनेक लोकांची भाडेतत्वावर नेमणूक करत असे. परंतु त्या लोकांना

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

अत्यंत कमी वेतन दिले जात असे पण त्यांना खाजगी स्तरावर व्यावसायिक उलाढाली करण्याची परवानगी असे, या संधीचा फायदा घेवून अनेकांनी अनैतिक व्यवहारांद्वारे प्रचंड फायदा मिळविला. व ते अतिशय भ्रष्टचारी बनले. हा प्रश्न सोडविण्यासाठी कंपनीने 1773 मध्ये रेग्युलेटिंग ॲक्ट भारतामध्ये लागू केला. भ्रष्टाचारी नोकरवर्गाला रोखणे हेच या कायद्याचे प्रमुख उद्दिष्ट होते.

1800 मध्ये लॉर्ड कॉर्नवालिसने लोकांना नागरी सेवेत समाविष्ट होण्यासाठी; प्रोत्साहित करण्यासाठी कलकत्त्यामध्ये 'फोर्ट विल्यम कॉलेज' सुरू केले परंतु ईस्ट इंडिया कंपनीच्या संचालकांकडून याला फारसा पाठिंबा मिळाला नाही. 1853 पर्यंत सर्व नेमणूका कंपनीच्या संचालकांकडूनच होत असत. 1853 नंतर मात्र नागरी सेवांतर्गत नेमणूका करण्यासाठी स्पर्धा परिक्षांचे आयोजन करण्यात येवू लागले. सुरवातीला भारतीयाना याचा फारसा फायदा झाला नाही. ब्रिटीशांच्या मनात अद्याप भारतीयांच्या क्षमतेविषयी संशय होता. 'सर्व भारतीय लोक भ्रष्टाचारी आहेत' असा आरोप लॉर्ड कॉर्नवालिसने केला. म्हणून भारतीयांना खालच्या दर्जाच्या नोकऱ्या दिल्या जावू लागल्या.

न्यायव्यवस्था

मोंगलांकडून ब्रिटीशांना टप्प्याटप्प्याने अधिकारांचे हस्तांतर करण्यात येवू लागले. त्यावेळी भारतात न्यायव्यवस्थेची सुरवात झाली होती. 1764 च्या बक्सारच्या लढाई नंतर मोंगल सम्राट शाहने 'दिवाणी हक्क' नावाचा महसूल वसुलीचा हक्क ब्रिटीशांना दिला. बंगालच्या प्रांतात दुहेरी राज्यव्यवस्था अंमलात आली. या व्यवस्थेमध्ये महसूल वसूल करणे, दिवाणी व फौजदारी न्यायव्यवस्थापनाचे अधिकार भारतीय अधिकाऱ्यांना दिले गेले. यारीतीने वसूल झालेला सर्व महसूल ब्रिटीशांनी आपल्याकडे जमा करून घेतला. ब्रिटीशांनी टप्प्याटप्याने केंद्रीकृत न्यायव्यवस्था अंमलात आणण्याचा निश्चय केला परिणामतः ब्रिटीशांनी मोंगलांचा अधिकार काढून घेतला. आणि आपणच सार्वभौम बनले. नवीन न्यायव्यवस्था अंमलात आणल्यामुळेच त्यांना हे शक्य झाले.

1772 मध्ये गव्हर्नर पदावर असणाऱ्या वॉरन हेस्टींग्जने नवीन योजना अंमलात आणली. या योजनेनुसार प्रत्येक जिल्ह्यात दोन प्रकारची न्यायालये असणे सक्तीचे होते. ती म्हणजे - 'दिवाणी अदालत' म्हणजेच नागरी न्यायालय व 'फौजदारी अदालत' म्हणजेच गुन्हेगारी न्यायालय. येथे हिंदूना हिंदू धर्मग्रंथाप्रमाणे व मुस्लीमांना शरीयत प्रमाणे न्याय देण्याची पद्धत होती. गुन्हेगारी प्रकरणात सर्वांची चौकशी इस्लाम कायद्याप्रमाणे केली जात होती. नंतर ब्रिटीश कायदे अंमलात आणून गुन्हेगारी कायद्यात आवश्यक ते बदल करण्यात आले.

www.textbookpdf.in

©KTBS Not to be republished

दिवाणी न्यायालय हे युरोपियन जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली कार्यरत होते. फौजदारी न्यायालय हे काझींच्या आधीन असले तरी युरोपियनांच्या नियंत्रणाखालीच कार्यरत होते.

पोलीस व्यवस्था

अंतर्गत कायदे व सुव्यवस्थेवर नियंत्रण ठेवणे हे पोलिसांचे महत्त्वाचे काम होते. लॉर्ड कॉर्नवॉलिसने भारतात प्रथमच अत्यंत प्रभावी पोलीस यंत्रणा राबविली. त्यांनी पोलीस अधीक्षक (Superintendent of Police) हे नवीन पद निर्माण केले. त्यांने 1793 मध्ये प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी अनेक पोलीस ठाणी निर्माण केली व प्रत्येक ठाण्यावर 'कोतवालाची' नेमणूक केली. त्याचप्रमाणे प्रत्येक खेड्यात एका चौकीदाराची नेमणूक केली. खेड्यातील गुन्हे, दरोडे, आणि कायद्याचे उल्लंघन याबाबतचे कामकाज कोतवालाशी संबंधित असे.

1770 च्या भीषण दुष्काळामुळे कायदा व सुव्यवस्था डळमळीत झाली. म्हणून संपूर्ण पोलीस खाते ब्रिटीश अधिकाऱ्यांच्या अंमलाखाली आणण्यात आले. 1781 मध्ये ब्रिटीश दंडाधिकारी नेमण्याची पद्धत सुरू झाली पोलीस अधिकारी या दंडाधिकाऱ्याच्या अधिपत्याखाली कार्यरत असत. अशारीतीने पोलीस व्यवस्थेमध्ये सतत बदल घडत होते. यासाठी स्वतंत्र पोलीस कायदापण अंमलात आणला गेला. हा कायदा एक उत्तम प्रशासनाचा व कायद्याचा मूलभूत पाया होता. परंतु अजूनही भारतीयांची अधिकारीपदावर नेमणूक केली जात नसे. 1902 मध्ये पोलिस कमीशन कायद्यान्वये योग्य शैक्षणिक अर्हतेनुसार पोलीस अधिकाऱ्यांची नेमणूक करण्यास परवानगी देण्यात आली. या सर्व बाबींखेरीजही ब्रिटीशांच्या मनातील भारतीयांबद्दल असणारा भेदभाव यत्किंचितही कमी झाला नव्हता.

लष्करी व्यवस्था

लष्कर हा ब्रिटीश सत्तेचा व प्रशासनाचा मूळ पाया होता. ब्रिटीशांनी बऱ्याच भारतीयांना लष्करी सेवेत सामावून घेतले आणि लष्कराच्या मदतीने संपूर्ण भारतावर स्वतःचा अंमल सुरू केला. लष्कराच्या सहाय्याने ते भारतातील तसेच भारताबाहेरील शक्तींना आव्हान देवू लागले. पुन्हा इथेही अधिकारी पदावर ब्रिटीशांचीच नेमणूक केली गेली. बऱ्यापैकी भारतीय हे मजूर किंवा जवान म्हणून कार्यरत होते. 1857 मध्ये ब्रिटीश सरकारने पीलच्या नेतृत्त्वाखाली एका समितीची शिफारस केली. या शिफारशींच्या आधारे लष्करी व्यवस्थेची पुर्नरचना करण्यात आली.

www.textbookpdf.in

जमीनमहसूल व्यवस्था

बंगाल प्रांतावरील अंमलासाठी ईस्ट इंडिया कंपनीला ब्रिटीश सरकारला 4 लाख पौंड द्यावे लागत. याची पूर्तता करण्यासाठी कंपनीला आर्थिक नफ्याचे नियोजन अत्यंत सुव्यवस्थितपणे व सुरक्षितपणे करावे लागे. म्हणून कंपनीने जमीनीवर विविध प्रकारचे नवनवीन कर लादले.

(कायमधारा) जमीनदारी पद्धती

1793 मध्ये कॉर्नवालिसने नवीन पद्धत सुरू केली. याला (कायमधारा) जमीनदारी पद्धत असे म्हटले जात असे. जमीनदार कराची रक्कम दरवर्षी ठराविक मुदतीत कंपनीकडे जमा करीत. या पद्धतीमध्ये करवसुली करणाऱ्यांना जमीनीचे मालकी हक्क देण्यात आले. व त्यांच्यामार्फत सरकारने निश्चित केलेली कराची रक्कम वसूल करण्याची व्यवस्था केली गेली. हे जमीनदार शेतकऱ्यांकडून निश्चित केलेल्या करापेक्षा जादा रक्कम वसूल करीत आणि स्वतः ऐषआरामाचे, सुखाचे जीवन व्यतीत करीत. यामुळे जमीनदार गबर झाले. महापूर व दुष्काळ यासारख्या नैसर्गिक आपत्तींमुळे जर शेतकरी कर भरण्यास असमर्थ ठरले; तर त्यांच्या जमीनीचा मालकीहक्क सरळ कंपनीकडे जात असे. कंपनी व जमीनदार दोघांचाही फायदा होत असे परंतु शेतकरीमात्र पूर्णपणे जमीनदोस्त होत असे. शेतकरी व शेतमजुरांना कामाच्या संधी ही खूपच कमी मिळत असत. मात्र सरकारी खजिन्यामध्ये पुरेसा पैसा येवू लागला. गरीब शेतकऱ्यांचे शोषण होवून त्यांच्या यातनेत आणखीनच भर पडली. नंतर ही पद्धत बिहार, ओरिसा, आंध्र आणि वाराणसीमध्येही लागू करण्यात आली. चार्लस मेटकॉफच्या मते ''भारतीय शेतकरी कर्जातच जन्मत असत, कर्जातच रहात असत आणि कर्जातच मरत असत.''

महलवारी पद्धत

या पद्धतीनुसार कंपनी सरकारने जमीनमहसूलाबाबत महलदारांबरोबर एक विशिष्ट करार केला. याची सुरुवात उत्तर प्रदेश, मध्य प्रदेशातील बराचसा भाग, पंजाब आणि दिल्ली येथे झाली. 'महल' म्हणजे तालुका या पद्धतीची सुरुवात आर.एम. बेऊर्ड आणि जेम्स थॉम्सनने केली. याची अंमलबजावणीही वेगवेगळ्या भागात वेगवेगळ्या पद्धतीने होत होती. यामध्ये छोट्या - मोठ्या जमीनदारांचाही समावेश असे. येथे उत्पादनाच्या आधारावर करआकारणी केली जात असे. कंपनीचे अधिकारी अपेक्षित उत्पादनापेक्षा जादा कर लादत असत. त्यामुळे बऱ्याच जमीनदारांना आपल्या जमीनीचा ताबा सोडावा लागत असे. जे किरकोळ शेतकरी व शेतमजूर या जमीनदारांवर अवलंबून असत ते या पद्धतीत भरडून निघत असत.

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

रयतवारी पद्धत

1792 मध्ये अलेक्झांडर रीडने या पद्धतीची सुरूवात पहिल्यांदा बारामहल प्रांतामध्ये केली. 1801 मध्ये थॉमस मन्रोने ही पद्धत मद्रास व म्हैसूर प्रांतात तशीच चालू ठेवली. या प्रांतातील बराचसा भाग ब्रिटीशांच्या अंमलाखाली होता. यामध्ये शेतकरी व कंपनीचा एकमेकांशी थेट संबंध असे. जो जमीन कसत असे तोच जमीनीचा मालक म्हणून ओळखला जात असे. उत्पादनाच्या 50% रक्कम मालकाला कराच्या स्वरूपात कंपनीला द्यावी लागे या जमीनमहसूलाला 30 वर्षाची मुदत असे. या मुदतीनंतर कर आकारणीमध्ये बदल केला जावू शकत असे.

जरी जमीन कसणाऱ्या शेतकऱ्यांना जमीनीचा मालकी हक्क दिला तरी भरमसाट करामुळे त्यांना ते परवडत नसे. करवसुलीसाठी अधिकारी दंडात्मक कारवाई करीत. जरी जास्त पीक पिकले नसले तरी कर भरावाच लागे. म्हणून शेतकऱ्यांना सावकारी कर्ज काढावे लागे. कर्जाची रक्कम फेडता आली नाही तर त्यांना आपली जमीन विकावी लागे. असे असूनही नवीन करपद्धती शेतकऱ्यांसाठी हितावह आहे; असा कंपनी दावा करीत असे. वास्तव असे होते की या पद्धतीमध्ये बऱ्याच शेतकऱ्यांना आपली जमीन विकावी लागे.

ब्रिटीश जमीन महसूल पद्धतीचे परिणाम

1. शेतकऱ्यांचे शोषण करणारा नवीन जमीनदार वर्ग निर्माण झाला.
2. जमीनदारांकडून शोषित शेतकरी, हळू हळू भूमीहीन झाले.
3. जमीन म्हणजे एक वस्तू समजली जाऊ लागली - जमिनी गहाण ठेवून कर्ज उपलब्ध होऊ लागले. कर भरण्यास बरेच जमिनदार जमिनी गहाण ठेवू लागले.
4. कृषी क्षेत्र हे इंग्लंडमधील कारखान्यांना लागणाऱ्या कच्या मालाचे उत्पादन करणारे व्यावसायिक क्षेत्र बनले.
5. सावकार लोक गबर झाले.

आधुनिक शिक्षण पद्धती

भारतामध्ये पारंपारिक शिक्षण पद्धती सुरु होती. मध्ययुगीन काळात मुस्लीम राजवटीमध्ये या पद्धतीमध्ये थोडासा बदल झाला 18 व्या शतकात ब्रिटीश काळात कांही नवनवीन बदल घडून आले. भारतात राहणाऱ्या ब्रिटीश व युरोपियनांच्या मुलांसाठी नवीन शाळा सुरू करण्यात आल्या. परंतु या सुविधा स्थानिक लोकांसाठी नसल्यामुळे त्यांना कांहीच

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

फायदा नव्हता. वॉरन हेस्टींग्जने आधुनिक शिक्षण पद्धतीचा विस्तार करून भारतीयांना या सुविधा उपलब्ध करून दिल्या 1781 मध्ये 'कलकत्ता मदरसा' ची स्थापना झाली. 1792 मध्ये जोनाथन डंकन या ब्रिटीश व्यक्तीने बनारसमध्ये संस्कृत कॉलेज सुरु केले परंतु भारताम ध्ये ब्रिटीश शिक्षणाचे सार्वत्रीकीकरण मात्र चार्लस् ग्रँटनी केले.

विल्यम बेंटिंग जेंव्हा भारताचे गव्हर्नर झाले; तेव्हा खऱ्या अर्थाने ब्रिटीश शिक्षण पद्धतीचा भारतात विस्तार झाला. बेंटिंग यांनी मेकॉले यांची गव्हर्नरांच्या कार्यकारी समितीचे सदस्य म्हणून नेमणूक केली. तसेच शिक्षण समितीचे अध्यक्ष म्हणूनही त्यांना नेमले. 1835 मध्ये मेकॉले यांनी सादर केलेला अहवाल भारतीय आधुनिक शिक्षण पद्धतीचा मूलभूत पाया ठरला. या समितीचे उद्दिष्ट होते,'' असा एक नवीन वर्ग निर्माण करणे जो जन्माने भारतीय असेल पण बुद्धीने आणि विचाराने मात्र ब्रिटीश असेल''. 1830 नंतर भारतात इंग्रजी माध्यमाचा प्रारंभ झाला.

भारतामध्ये विश्वविद्यालयाची स्थापना हे शिक्षणाच्या प्रगतीचे अत्यंत महत्वाचे असे पाऊल होते. चार्लस वुड आयोगाच्या (1854) शिफारसीनुसार गव्हर्नर जनरल लॉर्ड डलहौसीने 1857 मध्ये कलकत्ता, बॉंबे आणि मद्रास येथे विद्यापीठाची स्थापना केली. यानंतर भारतात शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण सुरू झाले.

भारतावर झालेले ब्रिटीश शिक्षण पद्धतीचे परिणाम :

1. भारतीयांमध्ये राष्ट्रीयत्वाबरोबरच आधुनिकता, निधर्मीपणा, लोकशाहीवृत्ती आणि विवेकबुद्धी जागृत झाली.
2. स्थानिक साहित्य व भाषांना उत्तेजन मिळाले. यामुळे सुशिक्षित वर्गात ऐक्याचे विचार निर्माण होण्यास मदत झाली.
3. नियतकालिकांचा उदय झाला. यामुळे सरकारी कामकाजाची व धोरणांची छाननी होऊ लागली आणि भारतीय लोक विविध विषयांवर आपली टीकात्मक मते व्यक्त करू लागले.
4. नवनवीन सामाजिक व धार्मिक चळवळी सुरू झाल्या.
5. जे.एस.मिल, रुसो आणि मॉंटेस्क्यूसारख्यांच्या थोर विचारांमुळे सुशिक्षित भारतीय तरूणांमध्ये नव्या विचारांची उत्पत्ती होवू लागली.
6. जगभरात सुरू असलेल्या स्वातंत्र्य चळवळींचा प्रभाव भारतीयांवरही पडला.
7. भारतीयांमध्ये आपल्या थोर परंपरा समजून घेवून त्यांचे संवर्धन करण्याची जाणीव निर्माण झाली.

www.textbookpdf.in

अशारीतीने ब्रिटीश शिक्षणपद्धतीमुळे निर्माण झालेल्या आधुनिक विचारांमुळे तसेच सांस्कृतिक बोधामुळे भारतीय आधुनिक पिढी तयार झाली.

घटनात्मक विकास

ब्रिटीश प्रशासनाबरोबरच भारतामध्ये कांही समस्यापण निर्माण झाल्या. त्यांचे निवारण करण्यासाठी प्रशासनामध्ये सुधारणा करणे अत्यंत महत्त्वाचे होते. यासाठी भारतीयांच्या गरजा व मागण्या लक्षात घेणे अनिवार्य होते, ब्रिटीशांनी नवनवीन कायद्यांची निर्मिती करून ते कायदे लागू करण्याचा प्रयत्न केला. अशा प्रकारच्या कायद्यांनी भारतीय घटनेच्या उत्क्रांतीला पुष्टी दिली या कायद्याबद्दलची आपण थोडक्यात माहिती घेवूया.

1773 चा रेग्युलेटिंग ॲक्ट

1765 मधील दिवाणी अधिकारांच्या अंमलबजावणीत कंपनीच्या लोभी अधिकाऱ्यांनी याचा गैरवापर केला. भ्रष्टाचाराच्या आधारे ते धनाढय बनले, दिवसें दिवस भ्रष्टाचाराचा हा भस्मासूर वाढतच गेला ब्रिटीश संसदेचे सदस्य एडमंड बर्क यांनी कंपनीतील या भ्रष्टचारावर कडाडून टीका केली कंपनीकडून ब्रिटीश सरकारला मिळणाऱ्या या महसूलाला त्यांनी 'गुन्हेगारी कर' असे संबोधले. कंपनीच्या अधिकाऱ्यांच्या भ्रष्टाचाराबद्दल ब्रिटीश सरकारने मौन पाळल्यामुळेच बर्कना अशी टीका करणे भाग पडले. कंपनीचे बरेच अधिकारी गडगंज श्रीमंत झाले आणि इंग्लंडमधील लोक या राजकीय रचनेला बाधा आणतील म्हणून घाबरू लागले. याच पार्श्वभूमीवर 1773 मध्ये 'रेग्युलेटिंग ॲक्ट हा कायदा लागू करण्यात आला.

या कायद्यातील प्रमुख तरतूदी -

1. या कायद्याच्या अंमलबजावणीपूर्वी बंगाल, मद्रास व बॉंबे या तीन प्रेसिडेन्सीज ब्रिटीशांच्या ताब्यात होत्या. या तिन्ही प्रांतात स्वतंत्र राज्यकारभार चालत असे. रेग्युलेटिंग ॲक्टद्वारे इतर दोन प्रांत बंगाल प्रेसिडेन्सीच्या ताब्यात आले.
2. बंगालचा गव्हर्नर या तिन्ही प्रेसिडेन्सीजचा गव्हर्नर बनला.
3. बॉंबेच्या गव्हर्नरला इतर दोघांवर देखरेख तसेच सल्ला देण्याचे अधिकार देण्यात आले.
4. कंपनीच्या संचालक मंडळाच्या तसेच बंगालच्या गव्हर्नरच्या संमतीशिवाय बॉंबे व मद्रास प्रेसिडेन्सीज युद्ध पुकारु शकत नव्हते. अगदीच आणिबाणीच्या काळात स्वतंत्रपणे वागण्याचा अधिकार त्यांना होता.

www.textbookpdf.in

5. बाँबे व मद्रास सरकारला आपल्या सर्व प्रशासकीय निर्णयांचा अहवाल बंगालच्या गव्हर्नरला तसेच कंपनीच्या संचालक मंडळाला द्यावा लागत असे.

6. गव्हर्नर जनरलच्या कार्यकारी समितीवर चार सदस्यांची 5 वर्षासाठी नेमणूक करण्यात आली. या सदस्यांनी गव्हर्नर जनरलला प्रशासकीय धोरणे ठरविण्यासाठी व कायदे करण्यासाठी मदत करावी. कायम बहुमत विचारत घेतले जात असे.

7. गव्हर्नर जनरलला, भारतातील नागरी व लष्करी कार्यक्षेत्राचा अहवाल संचालक मंडळाला नियमितपणे द्यावा लागे.

8. या कायद्यांतर्गत देशातील सर्व न्यायाधीशांचे असे 'सर्वोच्च न्यायालय' कलकत्ता येथे स्थापन करण्यात आले. या न्यायालयामध्ये एक प्रमुख न्यायाधीश व तीन सामान्य न्यायाधीश असत.

9. कंपनीच्या अधिकाऱ्यांची वेतनवाढ करणे हा सुद्धा या कायद्याचाच एक भाग होता.

अशारीतीने नावाप्रमाणेच कंपनीच्या भारतातील कारभारावर नियंत्रण ठेवणे हेच या कायद्याचे प्रमुख उद्दिष्ट होय.

पिट्स इंडिया ॲक्ट (1784)

1773 च्या रेग्युलेटिंग ॲक्टमध्ये बऱ्याच विसंगत बाबी असल्यामुळे त्या दुरूस्त करण्याकरिता तसेच ईस्ट इंडिया कंपनी व ब्रिटीश सरकारच्या अधिकाऱ्यांच्या कामाची रूपरेषा ठरविण्यासाठी 'पिट्स इंडिया ॲक्ट' लागू करण्यात आला. ब्रिटीश सरकारने ईस्ट इंडिया कंपनीच्या अधिकारांवर मर्यादा आणली. संचालक मंडळाऐवजी सहा सभासदांचे एक नियंत्रण मंडळ (Board of control) स्थापण्यात आले. या मंडळाला लष्करी व नागरी क्षेत्रावर तसेच जमीनमहसूला बाबत कांही बाबींवर नियंत्रण ठेवण्याचे तसेच, सल्ला देण्याचे अधिकार प्रदान करण्यात आले. असे असूनही इंग्लंडमध्ये संचालक मंडळ व नियंत्रण मंडळ ही दोन्ही मंडळे कार्यरत होती.

हा कायदा असे जाहीर करतो की भारतीयांना हे श्रेष्ठ अधिकार केवळ ब्रिटीश साम्राज्यामुळेच प्राप्त झाले आहेत, त्यांच्या स्वकर्तृत्त्वामुळे नव्हे. म्हणूनच त्यांचे राजकीय हक्क कमी केलेले आहेत. तसेच भारताचा जो भाग ईस्ट इंडिया कंपनीच्या ताब्यात आहे. तो ब्रिटीश साम्राज्याचाच भाग आहे. म्हणूनच इंग्लंड भारताचा अधिकृत व मूलभूत राज्यकर्ता आहे.

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

चार्टर ॲक्टस्

ईस्ट इंडिया कंपनीला ब्रिटीश सरकारकडून भारतात व्यापार करण्यासाठी मिळालेल्या सनदेचे ठराविक काळानंतर नूतनीकरण करावे लागे. 1793, 1813, 1833 आणि 1853 चे चार्टर कायदे हे उद्दिष्ट गाठण्यासाठीच अंमलात आणले गेले. 20 वर्षातून एकदा चार्टर ॲक्ट अंमलात आणतांना ब्रिटीश सरकार यामध्ये नवीन कायदेकानूनांचा समावेश करीत असे. यापैकी 1813 व 1833 चे चार्टर कायदे अत्यंत महत्त्वाचे आहेत.

1813 चा चार्टर कायदा :

1. या कायद्याअंतर्गत ईस्ट इंडिया कंपनीला आणखी 20 वर्षे भारतात राहून व्यापार करण्याचा परवाना देण्यात आला. हा कायदा अंमलात आणण्यापूर्वी भारतामध्ये व्यापारासाठी इच्छुक असणाऱ्या कुणालाही परवानगी दिली जावी-अशी मागणी होती परंतु परवानगी दिली जात नव्हती. या कायद्यान्वये ती परवानगी देण्यात आली आणि भारतात मुक्त व्यापाराचे एक नवे पर्व सुरू झाले.
2. अधिकृत परवानगी व परवान्याचे युग सुरू झाले.
3. संचालक मंडळ गव्हर्नर जनरल व सरसेनापतींची (commandar-in-chief) नेमणूक करीत असे.
4. भारतात मिशनऱ्यांना अधिकृतरित्या प्रवेश दिला गेला. ख्रिश्चन मिशनरीजना भारतीयांना ज्ञानसमृद्ध बनवून त्यांचे नैतिक व धार्मिक जीवन वृद्धिंगत करण्याचे आदेश दिले गेले. या कायद्याच्या अंमलबजावणीनंतर बऱ्याच मिशनरीजनी भारतात येण्यास सुरवात केली. यानंतर ख्रिस्ती धर्माचा व इंग्रजी शिक्षणाचा विस्तार व प्रसार होण्यास सुरूवात झाली.

वरील सर्व सुधारणांमुळे 1813 चा चार्टर ॲक्ट हा एक ऐतिहासिक कायदा म्हणून ओळखला जातो.

1833 चा चार्टर ॲक्ट:

भारतातील परिस्थिती सुधारणे हे या कायद्याचे प्रमुख उद्दिष्ट होते. या कायद्यांतर्गतसुद्धा ईस्ट इंडिया कंपनीला आणखी 20 वर्षे भारतात राहून व्यापार करण्याचा परवाना देण्यात आला. या कायद्यातील प्रमुख तरतूदी खालीलप्रमाणे -

1. बंगालच्या गव्हर्नर जनरलला भारताचा गव्हर्नर जनरल असे संबोधण्यात येवू लागले.

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

2. गव्हर्नर जनरलला भारतातील सर्व व्यापारावर नियंत्रण ठेवण्याचे, देखरेख करण्याचे व सल्ला देण्याचे अधिकार देण्यात आले.
3. भारतातील संस्थानांशी युद्ध, शांतता किंवा परराष्ट्रविषयक धोरणे ठरविण्याचे संपूर्ण अधिकार बंगालच्या केंद्र सरकारला होते.
4. जेंव्हा गव्हर्नर जनरलचे मत कार्यकारी समितीतील सदस्यांच्या बहुमताशी जुळत नसे, तेंव्हा त्याला स्वतःचे मत लेखी स्वरूपात देणे बंधनकारक होते.
5. या कायद्यानुसार धर्म, जात व वर्णभेदावर बंदी होती.
6. गव्हर्नर जनरलच्या सल्लागार मंडळात (कार्यकारी समिती) एका कायदेपंडिताची नेमणूक करणे बंधनकारक होते.
7. सर्व ब्रिटीश कंपन्यांना भारताशी व्यापारी संबंध ठेवण्याची मुभा होती.

1833 चा चार्टर कायदा भारतातील अंतर्गत परिस्थितीवर प्रकाश टाकतो. तसेच 1830 च्या दरम्यान इंग्लंडमध्ये असलेल्या विविध राजकीय सुधारणांवरही भर देतो.

ब्रिटिशांच्या राजवटीत अंमलात आणलेले कायदे (1858-1947)

ईस्ट इंडिया कंपनीच्या दुराग्रही प्रशासन व भारतविरोधी कायद्यांमुळे 1857 मध्ये 'शिपायांचे बंड' घडून आले. यामुळे कंपनीचा राज्यकारभार ब्रिटनच्या राणीकडे हस्तांतरित करण्यात आला. या कालावधीत अंमलात आणलेले प्रमुख कायदे म्हणजे भारत सरकारचा कायदा 1858, 1861, 1892, 1909, 1919 व 1935. भारतात विविध कालखंडात घडलेल्या राजकीय घडामोडीवर प्रभाव टाकणारे हे कायदे इतिहासामध्ये अतिशय महत्वाचे ठरतात.

भारत सरकारचा कायदा 1858

1857 च्या शिपाई व नागरिकांच्या क्रांतीचा परिणाम म्हणून हा कायदा अस्तित्वात आला. त्यामुळे प्रत्यक्षरित्या भारत ब्रिटिशांच्या अंमलाखाली आला. 1 नोव्हेंबर 1858 रोजी ब्रिटनच्या व्हिक्टोरीया राणीने भारतातील सर्व प्रदेशांचा विकास करण्यात येईल. अशी घोषणा केली. या कायद्याच्या प्रमुख तरतुदी.

1. ईस्ट इंडिया कंपनीची मान्यता रद्द करण्यात आली व भारत देशावर राणीचा राज्यकारभार सुरु झाला.
2. गव्हर्नर जनरल या हुद्दयाचे नाव बदलून त्याला 'व्हाईसरॉय' असे संबोधण्यात आले. व्हाईसरॉय म्हणून लॉर्ड कॅनिंग यांची नेमणूक झाली.

www.textbookpdf.in

3. 'सेक्रेटरी ऑफ स्टेट' फॉर इंडिया (राज्यसचिव) हे नवीन पद निर्माण करण्यात आले. ब्रिटीश मंत्रिमंडळाचा सदस्य असलेल्या यांच्याकडे भारताचा राज्यकारभार पाहण्याची जबाबदारी सोपविण्यात आली.
4. या अधिकाऱ्यांना मदत करण्यासाठी 15 सदस्य असलेले एक भारत मंडळ (Council of India) अस्तित्वात आले.

1861 चा भारतीय शासनाचा कायदा (The Indian Council Act of 1861)

1857 च्या घटनेनंतर अंमलात आलेला हा प्रमुख कायदा आहे. या कायद्यानुसार कायदा तयार करण्याच्या समितीमध्ये भारतीयांची नेमणूक करण्याची तरतूद करण्यात आली. ब्रिटिशांबद्दल भारतीयांच्या मनात असलेला अभिप्राय समजून घेण्यासाठी भारतीयांना योग्य प्रतिनिधीत्व देण्यात आले. याला इंग्लिशमध्ये Policy of Association असे म्हणतात.

या कायद्यातील प्रमुख तरतूदी

1. व्हाईसरॉयच्या कायदेमंडळात भारतीयांची अधिकृत सदस्य म्हणून नेमणूक करण्यात आली.
2. आणीबाणीच्या काळात तातडीचा आदेश काढण्यासाठी गव्हर्नर जनरल यांना संपूर्ण अधिकार देण्यात आले.

1892 चा भारतीय शासनाचा कायदा

1861 च्या कायद्याचा हा पुढील भाग आहे. 1892 च्या कायद्यात भारतीयांना दिलेल्या कायदेमंडळातील निवड प्रक्रियेमधील प्रतिनिधीत्त्वा मध्ये वाढ करण्यात आली. ब्रिटिश राजवटीविरुद्ध काँग्रेस संघटनेतील असंतोष दूर करण्यासाठी भारतीय सभासदांचे प्रतिनिधीत्व वाढविण्यात आले.

या कायद्यातील प्रमुख तरतुदी

1. केंद्र व प्रांतीय कायदेमंडळातील सदस्याची संख्या वाढविण्यात आली
2. कायदेमंडळाचे (legislative council) अधिकार वाढविण्यात आले व त्याला अंदाजपत्रकावर (बजेट) चर्चा करण्याचा अधिकार देण्यात आला.
3. सहा दिवसांची पूर्व सूचना देऊन सार्वजनिक हितरक्षणाबद्दलचे प्रश्न सरकारला विचारण्याचा हक्क देण्यात आला.

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

1909 चा भारतीय शासनाचा कायदा (Indian Council Act)

या कायद्याला 'मिंटो मोर्ले सुधारणा ॲक्ट' असेही म्हणतात. लॉर्ड मिंटो हे भारताचे व्हाईसरॉय होते व लॉर्ड मोर्ले हे भारताचे सेक्रेटरी ऑफ स्टेट (राज्यसचीव) म्हणून कार्य पहात होते. भारतीयांमध्ये फूट पाडून राज्यकारभार करण्यासाठी 'फोडा व राज्य करा' या ब्रिटिश धोरणान्वये हा कायदा अंमलात आणला गेला.

या कायद्यातील प्रमुख तरतूदी

1. केंद्रीय कायदेमंडळामधील सदस्यांची संख्या 16 वरून 60 करण्यात आली.
2. प्रांतीय कायदेमंडळामध्ये पण सदस्यांची संख्या वाढविण्यात आली.
3. निवडणुकीतून कायदेमंडळावर निवडून येण्याची संधी देण्यात आली
4. मुसलमान धर्मीयांना राजकीय क्षेत्रात विशेष प्रतिनिधीत्व दिले गेले. त्यांच्यासाठी स्वतंत्र मतदारसंघ निर्माण करण्यात आले.

1919 चा भारतीय शासनाचा कायदा

या कायद्याला 'मॉंटेग्यू चेम्सफोर्ड सुधारणा कायदा' असेही म्हणतात. पहिल्या महायुद्धात (1914-1918) भारतीयांना ब्रिटिशांच्या बाजूने युद्धात भाग घेण्यास प्रेरित करण्यासाठी हा कायदा लागू करण्यात आला. सेक्रेटरी ऑफ स्टेटस मॉंटेग्यू यांनी 20-8-1917 रोजी ब्रिटनच्या संसदेमध्ये केलेल्या घोषणेनुसार हा कायदा अंमलात आला.

भारतीयांना टप्प्याटप्प्याने सरकारची जबाबदारी सोपविण्याचा उद्देश ब्रिटिश सरकारचा आहे. अशी त्यांनी घोषणा केली भारताचे व्हाईसरॉय चेम्सफोर्ड यांनी याला दुजोरा दिला-याचा परिणाम म्हणून 1919 चा कायदा अंमलात आला.

या कायद्यातील प्रमुख तरतुदी

1. केंद्रात दोन गृहांचे सरकार (Bi cameral) स्थापण्याची पद्धत सुरू झाली त्यांना वरचे सभागृह व खालचे सभागृह असे म्हणतात.
2. प्रांतामध्ये पण केंद्राप्रमाणेच दोन गृहे निर्माण करण्यात आली.
3. भारत देशामध्ये एका उच्चायुक्तांची नेमणूक करण्यात आली.
4. स्थानिक संस्थांचा विकास करण्याची हमी देण्यात आली.

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

5. खात्यांची केंद्रीय खाती व प्रांतीय खाती अशी दोन भागात विभागणी करण्यात आली.

6. मुसलमान, शीख, अँग्लो इंडियन, व युरोपियन यांच्यासाठी स्वतंत्र मतदार संघ सुरु करण्यात आले.

1935 चा भारत सरकारचा कायदा

भारताच्या संविधान रचनेच्या दृष्टीने हा कायदा मूळ पाया ठरला आहे. 1928 मध्ये मोतीलाल नेहरू यांच्या अध्यक्षतेखाली दिलेल्या अहवालाच्या आधारे हा कायदा तयार झाला आहे. आपल्या घटनेतील बरेचसे अंश या कायद्यावर आधारित आहेत. या कायद्यान्वये भारताला एक जबाबदार सरकारची रचना करण्याची संधी मिळाली. हा कायदा फक्त भारतातील ब्रिटीश प्रांतापुरता मर्यादित नसून स्थानिक संस्थानांना पण तो लागू होणार होता.

या कायद्यातील प्रमुख तरतुदी

1. ब्रिटिश प्रांत, स्थानिक संस्थाने व मांडलिक राजे मिळून भारतीय संघ राज्याची कल्पना मांडण्यात आली.
2. केंद्रामध्ये दुहेरी राज्यव्यवस्था (Dyarchy) स्थापन करण्यात आली.
3. भारतीय रिझर्व बँकेची स्थापन करण्यास परवानगी मिळाली.
4. प्रांतातील दोन गृहांचे सरकार रद्द करून त्यांना संपूर्ण स्वायत्तता देण्यात आली.
5. भारतात संघराज्य न्यायालय (Federal Court) स्थापन करण्यात आले.

वरील सर्व कायदे भारतीय घटनेच्या विकासाला पूरक ठरलेले आहेत हे कायदे म्हणजे भारतीयांनी वेळोवेळी केलेल्या संघर्षाचा परिणामच होय. भारतीयांच्या संघर्षाचे फलित स्वरूप म्हणजे हे कायदे होत. ब्रिटिशांच्या वसाहतशाही राजवटीत हे कायदे अंमलात आले असल्याने ब्रिटिशांनी जरी स्वतःचे हित जोपासले असले तरी भारतीयांना दुर्लक्षून आपल्याला शासन चालविता येणार नाही याची जाणीव त्यांना झाली ही लक्षात ठेवण्यासारखी बाब आहे.

स्वाध्याय

I. रिकाम्या जागी योग्य शब्द भरा.

1. दिवाणी अदालत (नागरी कोर्ट) ची स्थापना _____ कडून झाली.
2. पोलिस अधीक्षकाचे पद _____ कडून निर्माण केले गेले.
3. बंगाल व बिहारमध्ये (कायमधारा) जमीनदारी पद्धती _____ मध्ये सुरु करण्यात आली.

www.textbookpdf.in

©KTBS Not to be republished

4. अलेक्झांडर रीडने सुरू केलेली जमीन महसूल पद्धत _____ होय.
5. भारतामध्ये आधुनिक शिक्षण पद्धती पुरस्कृत करणारा ब्रिटीश अधिकारी _____ होय.
6. 'रेग्युलेटिंग ॲक्टची अंमलबजावणी _____ मध्ये झाली.

II. खालील प्रश्नांची उत्तरे समूहात चर्चा करून लिहा.

1. ईस्ट इंडिया कंपनीद्वारे ब्रिटीशांनी भारतामध्ये सुरू केलेल्या न्यायव्यवस्थेबद्दल चर्चा करून माहिती लिहा.
2. भारतामध्ये ब्रिटीश राजवटीदरम्यान पोलीस व्यवस्थेमध्ये कोणकोणत्या सुधारणा करण्यात आल्या?
3. (कायमधारा) जमीनदारी पद्धतीने भारतीय शेतकऱ्यांना कर्जात जन्मण्यास कर्जात जगण्यास व कर्जातच मरण्यास कसे भाग पाडले. ते स्पष्ट करा.
4. रयतवारी पद्धतीची प्रमुख वैशिष्ट्ये कोणती?
5. ब्रिटीशांच्या जमीन महसूल पद्धतीचे परिणाम कोणते?
6. भारतामध्ये आधुनिक शिक्षणपद्धतीमुळे झालेल्या परिणामांची माहिती लिहा.
7. 'रेग्युलेटिंग ॲक्ट' मधील तरतूदी कोणत्या?
8. 1858 च्या भारत सरकारच्या कायद्यातील प्रमुख तरतूदी कोणत्या?
9. '1935 चा भारत सरकारचा कायदा म्हणजे भारतीय संविधानाचा मूळ पाया होय' याचे समर्थन करा.
10. 1919 च्या कायद्यातील प्रमुख तरतूदी कोणत्या?

III. उपक्रम

1. भारतामध्ये प्रशासकीय सुधारणा घडवून ब्रिटीशांनी स्वत:साठी मैत्रीचे वातावरण निर्माण केले - या विषयावर वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करा.
2. तुमच्या शिक्षकांच्या सहाय्याने या पाठात नमूद केलेल्या कायद्याव्यतिरिक्त अन्य कोणकोणते कायदे ब्रिटीशांनी अंमलात आणले त्याबद्दल चर्चा करा.

***

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

प्रकरण - 4

ब्रिटीश सत्तेला कर्नाटकातून झालेला विरोध

या पाठात आपण खालील घटकांचा अभ्यास करूया.

- **हैदर अली आणि टिपू सुलतान**
- **धोंडियावाघ**
- **अमर सुळ्याचे बंड**
- **हलगलीच्या बेरडांचे बंड**
- **अँग्लो - म्हैसूर युद्धे**
- **कित्तूरचे बंड - राणी चन्नम्मा व संगोळ्ळी रायण्णा**
- **सुरपूरचे बंड**

सध्याचे कर्नाटक राज्य एकत्रीकरणापूर्वी वेगवेगळ्या सत्ताधाऱ्यांमध्ये विखुरलेले होते. 18 व्या शतकाच्या उत्तरार्धात ब्रिटीशांची राजकीय सत्ता स्थिरस्थावर झाली. यानंतर स्वतः च्या फायद्यासाठी त्यांनी शेतकरी व व्यापाऱ्यांची पिळवणूक करण्यास सुरवात केली. यामुळे संपूर्ण कर्नाटकात अस्थिरता निर्माण झाली. स्थानिक राज्यकर्त्यांना असुरक्षित वाटू लागले. परिणामतः कर्नाटकातील बऱ्याचशा भागात ब्रिटीशांविरुद्ध बंडाळी माजली. प्रारंभी राज्यकर्ते व जमीनदार ब्रिटीशांविरुद्ध स्वतंत्रपणे लढले. म्हैसूर संस्थानाच्या सहाय्याने हैदर अली व त्याचा मुलगा टिपू सुलतान यांनी ब्रिटीशांना कडाडून विरोध केला. 1761 ते 1799 दरम्यान झालेला राजकीय विकास हा एक अत्यंत महत्त्वाचा भाग होता. भारताच्या इतिहासात या विरोधाला अनन्यसाधारण असे महत्त्व आहे.

हैदर अली व टिपू सुलतान

भारताच्या इतिहासात 18 व्या शतकाला 'राजकीय समस्यांचे शतक' असे संबोधले जाते. याला अनेक कारणे आहेत 1707 मध्ये सम्राट औरंगजेबाचा मृत्यू झाला. हे याचे प्रमुख कारण आहे. त्याच्या मृत्युमुळे मोंगलांचे सार्वभौमत्व संपुष्टात आले. दक्षिण भारतातील त्यांचे वर्चस्व कमी झाले 'कार्नाटिक' प्रदेशात अधिकार मिळविण्यासाठी संघर्ष सुरु झाले. यापूर्वी 1704 मध्ये चिक्कदेवराज वडेयर यांच्या निधनाने म्हैसूरच्या राजकीय व्यवस्थेवर दुष्परिणाम झाला. चिक्कदेवराज यांच्या मृत्यूनंतर उत्तराधिकारी कोण? याबद्दल समस्या निर्माण झाली व त्याबरोबरच शासनव्यवस्था ढासळली. म्हैसूरचा राजकीय प्रभाव कमी झाला. या अनियंत्रित परिस्थितीत म्हैसूर व कर्नाटकच्या कांही प्रदेशात हैदरअलीने राजकीय महत्व प्राप्त केले.

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

हैदर अली


हैदर अली

हैदर अली हा म्हैसूरच्या सैन्यामध्ये एक साधा शिपाई म्हणून रुजू झाला. परंतु अल्पावधीतच आपल्या राजकीय मुत्सद्देगिरी विषयी तो सर्वपरिचित झाला. म्हैसूरच्या राजकीय विकासाचा तो बारकाईने अभ्यास करत होता निजामाविरुद्ध अर्काटच्या लष्करी कारवायामुळे आणि देवनहळ्ळीच्या वेढ्यामुळे तो प्रकाशझोतात आला. त्यांने सर्व सैनिकांची मने जिंकली. अल्पावधीतच तो 'नबाब हैदर अली' म्हणून प्रसिद्धीस आला. नवनवीन शस्त्रास्त्रांच्या वापराबद्दलही त्याची ख्याती होती. आपल्या चतुर चालींनी त्यांने दळवायांची ताकद कमी केली. तसेच कृष्णदेवराय वडेयर यांनाही मागे टाकून आपले प्रशासकीय वर्चस्व प्रस्थापित केले. अर्काटचा नबाब, मराठे आणि हैदराबादाचे निजाम आपले राजकीय वर्चस्व सिद्ध करण्यासाठी आपापसात भांडत होते. फ्रेंच आणि ब्रिटीश स्वतः च्या स्वार्थासाठी या भागाचे शोषण करण्याचा प्रयत्न करीत होते. या पार्श्वभूमीवरच आपण हैदर अली व टिपू सुलतानाच्या कारकिर्दीत झालेल्या अँग्लो - म्हैसूर युद्धांबद्दल अधिक माहिती घेवू.

पहिले अँग्लो - म्हैसूर युद्ध (1767-1769)

दक्षिणेतील हैदर अलीचे वर्चस्व ब्रिटीश, मराठे व निजामांना रूचले नाही. हैदर अलीला पराभूत करून आपले साम्राज्य विस्तारित करण्यासाठी ब्रिटीशांनी आपल्या युक्तीचा वापर करण्यास सुरवात केली. जरी मराठ्यांच्या कुरापतींमुळे हैदर अली वैतागला होता, तरी त्यांना व निजामांना आपल्यात सामावून घेण्यासाठी तो धडपडत होता. ब्रिटीशांनी हैदर अलीच्या विरोधात मराठे व निजामांबरोबर एक करार केला आणि त्रिकूट युतीचा उदय झाला. परंतु आपल्या स्वार्थी व धूर्त युक्त्या लढवून ही युती तोडण्यात हैदर अली यशस्वी झाला तसेच त्यांने ब्रिटीश, निजाम व मराठे यांच्यात परस्परांविरुद्ध अविश्वास आणि वैमनस्य निर्माण केले.

त्याचदरम्यान अर्काटमध्ये राजकीय अराजक माजले. 1767 मध्ये हैदर अली आणि हैदराबादच्या निजामांनी अर्काटवर स्वारी केली. परंतु अर्काटच्या राजाचे व ब्रिटीशांचे मैत्रीपूर्ण संबंध होते. अशा परिस्थितीतच हे युद्ध सुरू झाले. या लढाया त्रिचनापल्ली, तिरुवन्नमलाई, अंबूर आणि इतर कांही भागात झाल्या. हैदरअलीने निकराचे हल्ले चढवले. ब्रिटीशांनी अनेक ठिकाणे काबीज केली. हैदरला तात्पुरती माघार घ्यावी लागली. मुंबईच्या ब्रिटीश सैन्याने या युद्धात भाग घेतला. हैदरने आपली प्रतिष्ठा जपण्यासाठी युद्ध चालूच ठेवले. 1769 मध्ये त्याच्या सैन्याने मद्रासपर्यंत थेट धडक मारली. त्यामुळे ब्रिटीशांचा थरकाप

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

उडाला. ब्रिटीशांपुढे पर्याय नसल्याने त्यांनी हैदरशी मद्रासचा तह केला. मद्रास तहावर स्वाक्षरी होऊन या युद्धाचा शेवट झाला.

दुसरे अँग्लो म्हैसूर युद्ध (1780-1784)

त्रावणकोर व तंजावर या राज्यातील राजकीय घडामोडीमुळे हे युद्ध झाले. मद्रासच्या तहामुळे दक्षिण भारतातील राजकीय विकास तात्पुरता खुंटला होता. ब्रिटीशांनी मद्रास तहातील अटींचे उल्लंघन केले. मराठ्यांनी माधवराव पेशवेंच्या नेतृत्वाखाली श्रीरंगपट्टणकडे कूचकेले. हैदरने ब्रिटीशांची मदत मागितली ब्रिटिशानी हैदरअलीला पाठिंबा देणे अपेक्षित होते. परंतु ब्रिटीशांनी हैदरअलीची विनंती झिडकारून मद्रासचा तह मोडला. 'माहे' ही फ्रेंच वसाहत हैदर अलीच्या ताब्यात होती. ब्रिटीशांनी माहेवर हल्ला चढवून त्यावर आपला ताबा मिळविला आणि हेच दुसऱ्या अँग्लो -म्हैसूर युद्धाचे प्रमुख कारण ठरले.

1780 मध्ये सुरू झाले. सुरुवातीस हैदर अलीने आपले वर्चस्व प्रस्थापित केले. कर्नाटकातील बरेच किल्ले त्याने काबीज केले. कांचीपुरमदेखील जिंकून म्हैसूरचे सैन्य कोरमंडलच्या किनाऱ्यापर्यंत पोहोचले. यामुळे ब्रिटीश अधिकारी चिंतातूर झाले. हैदरअलीने अर्काट पण जिंकले. त्याने वाँदिवॉश व वेल्लोरवरही हल्ला चढविण्याची धमकी दिली. सर आयरेकूट या अधिकाऱ्याच्या नेतृत्वाखाली ब्रिटीशांनी एक सैन्याची तुकडी तैनातीत ठेवली. त्यांने हैदर अलीच्या सैन्याचा पाँडिचेरीपर्यंत पाठलाग केला. फ्रेंचानी हैदरअलीला ब्रिटीशांविरुद्ध पाठिंबा देण्यास नकार दिला. यानंतर हैदरअलींने आपली युद्धनीती बदलली. त्यांने ब्रिटीशांच्या अधिपत्याखालील प्रदेशावर हल्ला चढविला आणि अपार संपत्ती व शस्त्रास्त्रांची लुटालूट केली.

1781 मध्ये पोर्तोनोव्हो येथील युद्धात ब्रिटीशांनी हैदर अलीचा पराभव केला. यामुळे ब्रिटीशांचा आत्मविश्वास वाढला व त्यांच्या युद्धाची दिशाही बदलली. परंतु पुलिकत आणि सोलिंगूर येथे त्यांना जबरदस्त आर्थिक फटका बसला. त्यादरम्यान साल्बाईच्या तहानुसार मराठे व निजामांना आपल्यात सामावून घेण्यात ब्रिटीश यशस्वी ठरले. या युद्धादरम्यान हैदर अलीचा 1782 मध्ये मृत्यू झाला. त्याच्या मृत्यूनंतर त्याचा मुलगा टिपू यांने हे युद्ध सुरू ठेवले.

हैदरअलीच्या मृत्यूसमयी टिपू मलबार प्रांतातील युद्धांमध्ये गुंतलेला होता. हैदर अलीच्या मृत्यूचा फायदा घेत ब्रिटीशांनी मंगलोर व बिदनूर प्रांत काबीज करण्याचा प्रयत्न केला. त्यांनी टिपू सुलतानविरुद्ध कालिकत व मलबारच्या राज्यकर्त्यांना प्रोत्साहन दिले. या सर्व बाबी लक्षात घेवून टिपूने मंगलोर व कोंकण किनारपट्टीचे संरक्षण करण्याचे ठरविले. त्यांने ब्रिटीशांचा पराभव केला. परंतु 1784 मध्ये 'मंगलोरचा तह' झाला आणि दुसरे अँग्लो-म्हैसूर युद्ध संपुष्टात आले.

www.textbookpdf.in

टिपू सुलतान

टिपू सुलतान

टिपूला आपल्या राज्यविस्तारामध्ये इंग्रज हे अडथळा निर्माण करणारे शत्रू आहेत असे वाटले व त्यांना हाकलून काढण्यासाठी त्याने आटोकाट प्रयत्न केले. हैदरअलीच्या मृत्यूनंतर तो म्हैसूरचा राजा बनला. त्याला ब्रिटीशांच्या कुटील नीतीचा अंदाज आला. ब्रिटीशांना भारतातून हाकलून देणे हे आपले आद्यकर्तव्य आहे असे त्याचे मत होते. आपल्या 17 वर्षाच्या कारकिर्दीमध्ये त्यांने ब्रिटीशांविरुद्ध अनेक युद्धे केली. त्याला ब्रिटीशांच्या कुटील कारस्थानांची, धूर्त डावपेचांची व लष्करी कारवायांची पूर्ण कल्पना होती. ब्रिटीशांच्या व्यापारविषयक धोरणांना धक्का पोहोचविल्यास त्यांची राजकीय ताकद कमी होऊ शकते याची त्याला जाणीव होती. म्हणून ब्रिटीशांच्या शत्रूपक्षांना संघटित करण्यासाठी त्यांने प्रयत्न सुरू केले. यामुळे चिडलेल्या ब्रिटीशांचा टिपूवरील रोष आणखीनच वाढला.

हे तुम्हांला माहित आहे का?

18 व्या शतकात ब्रिटीशांना थोपविण्याच्या सर्व प्रयत्नांपैकी हैदरअली व टिपू सुलतानद्वारे केल्या गेलेल्या प्रयत्नांना अनन्यसाधारण असे महत्त्व आहे. आपल्याकडे असणाऱ्या पारंपारिक शस्त्रास्त्रांच्या आधारे ब्रिटीशांना आपण पराभूत करू शकत नाही याची त्यांना पूर्ण कल्पना होती. म्हणून त्यांनी आधुनिक शस्त्रास्त्रांचा वापर केला. म्हैसूरचे जवान युरोपियन जवानांप्रमाणेच आधुनिक शस्त्रास्त्रे हाताळू शकत होते. हैदर अली आणि टिपू सुलतानने भारतात युद्धामध्ये प्रथमच रॉकेट्सचा वापर केला. आधुनिक शस्त्र-साठ्याबरोबरच युद्धासाठी आपल्या खजिन्यात पैशाचीपण तितकीच आवश्यकता आहे हे त्यांना माहित होते. ब्रिटीशांशी लढताना अनेक नबाब दिवाळखोर झालेल्या घटनांचा हैदर अली हा साक्षीदार होता. म्हणून आपली आर्थिक बाजू भक्कम करण्यासाठी त्या दोघांनीही अनेक तह व व्यापारी करार केले. तंबाखू व चंदनाचा त्यांनी राष्ट्रीय व्यापारात समावेश केला. म्हैसूर मधील पारंपारिक हस्तकला वस्तूंचा दर्जा सुधारण्यासाठी फ्रेंच तज्ज्ञांना आमंत्रित करून सल्लामसलत केली. व या वस्तूद्वारे आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत आपले स्थान उंचावण्यासाठी प्रयत्न केले.

तिसरे अँग्लो - म्हैसूर युद्ध -

त्रावणकोरचे राजकारण हेच या युद्धाचे मूळ कारण होय. त्रावणकोरच्या राजांने ब्रिटीशांच्या सहाय्याने कोचीनमध्ये एक किल्ला बांधला. तसेच डचांकडून आयकोटा आणि कांगनूर हे किल्ले काबीज केले. मंगलोरचा तह मोडल्यामुळे या सर्व घटना घडल्या. जनरल मोडोसनच्या नेतृत्वाखाली ब्रिटीशांनी कारवार, कोईमतूर, दिंदिगल आणि इतर कांही प्रांत

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

आपल्या ताब्यात घेतले. टिपू सुलतान बारामहल प्रांतात शिरला आणि त्यांने त्रिचनापल्ली जिंकण्याचा प्रयत्न केला परंतु तो अयशस्वी झाला. यादरम्यान लॉर्ड कॉर्नवालिसने ब्रिटीश सैन्याचे नेतृत्व स्वीकारले आणि यामुळे युद्धाची दिशाच बदलली.

कॉर्नवालिसच्या नेतृत्वाखाली ब्रिटीश सैन्यांने कोलार व होसकोटे काबीज करून आपला मोर्चा बेंगलोरकडे वळविला. बेंगलोर काबीज करून तेथील किल्ला उध्वस्त केला. यानंतर टिपूला नामोहरम करण्यासाठी कॉर्नवालिसने मराठे व हैदराबादच्या निजामांची मदत मागितली मराठ्यांशी व निजामाशी हातमिळवणी केल्यानंतर हे युद्ध ब्रिटीशांसाठी निर्णायक ठरले. मराठ्यानी सावनूर, गजेंद्रगड, लक्ष्मेश्वर, हुबळी आणि इतर कांही प्रांत काबीज केले.

असेच एकामागून एक किल्ले काबीज करीत हे त्रिकूट श्रीरंगपट्टणकडे वळले. एका रात्रीत हा किल्ला उध्वस्त करण्यात आला. (1792) यामुळे टिपू हतबल झाला आणि त्यांने ब्रिटीशांशी तह केला. या तहातील अटी जाचक असूनसुद्धा त्यांने श्रीरंगपट्टणच्या तहावर स्वाक्षरी केली. असे करणे त्याला अपरिहार्यच होते. याबरोबरच तिसरे अँग्लो - म्हैसूर युद्ध संपुष्टात आले.

तहामध्ये जाचक अटी लादून टिपूला दुर्बल बनविण्यात ब्रिटीश यशस्वी झाले. आपले अर्धे राज्य ब्रिटीशांना देणे, युद्धाची नुकसानभरपाई म्हणून तीन कोटी रूपये देणे आणि या पैशाच्या बदल्यात जामीन म्हणून आपले दोन पुत्र ब्रिटीशांकडे ओलीस ठेवणे, आपल्या ताब्यात असणाऱ्या ब्रिटीश सैन्याची तुरूंगातून सुटका करणे इ. तहातील कांही अटी होत्या या तहानंतरच ब्रिटीशांनी श्रीरंगपट्टणचा वेढा काढून घेतला.

चौथे अँग्लो - म्हैसूर युद्ध

तिसऱ्या युद्धात टिपूने आपला वैयक्तिक पराभव स्वीकारला. ठरवलेली सर्व रक्कम भरून त्यांने आपल्या मुलांची सुटका करून घेतली. कबूल केलेला सर्व प्रदेश ब्रिटीशांना देवून टाकला. ब्रिटीशांच्या अधिपत्याखाली असलेल्या मलबार प्रांतावर टिपूने आपला हक्क सांगितला पण ब्रिटीशांनी तो फेटाळून लावला.

1798 मध्ये लॉर्ड वेलस्ली भारताचा गव्हर्नर जनरल बनला. यादरम्यान टिपूविरोधी कारवाया आणखीनच तीव्र करण्यात आल्या. स्थानिक राज्यकर्त्यांचे टिपूशी असणारे मैत्रीपूर्ण संबंध आणि फ्रेंचांशी असणारी जवळीक यामुळे लॉर्ड वेलस्ली आणखीनच चिडला. फ्रेंचांशी मैत्री करण्यासाठी टिपूने आपला राजदूत पाठविला यामूळे ब्रिटीश संतप्त झाले. टिपू आणि फ्रेंचांबरोबर त्याची असणारी मैत्री यामुळे ब्रिटीशांचे भारतातील स्थान डळमळीत होईल की काय अशी भीती त्यांना वाटू लागली. यानंतर अमानवी व अव्यवहारी अटी लादून टिपू सुलतानला आणखी एक करार करण्याची सक्ती करण्यात आली. टिपूने याला कडाडून विरोध केला.

www.textbookpdf.in

यामुळेच चौथे अँग्लो म्हैसूर युद्ध सुरू झाले. हे युद्ध 1799 मध्ये सुरु झाले. ब्रिटिशांनी टिपूचा भक्कम असा किल्ला उध्वस्त केला. 1799 मध्ये या युद्धात लढता लढता टिपूचा मृत्यू झाला. टिपूच्या मृत्यूमुळे जणू कांही सारा भारतच आपल्या अधिपत्याखाली आल्याचा आनंद ब्रिटीशांना झाला. टिपूच्या ताब्यातील बराचसा प्रदेश ब्रिटीशांनी आपल्या ताब्यात घेतला. त्यातील कांही भाग मराठे व निजामांना वाटून दिला. एक छोटासा भाग म्हैसूरच्या प्रतिष्ठित वडेयर राजघराण्याला देण्यात आला. हाच भाग पुढे 'म्हैसूरचे संस्थान' म्हणून ओळखला जाऊ लागला.

टिपूच्या पतनानंतरचे म्हैसूर - 1799



धोंडिया वाघ (1800)

टिपूच्या निधनानंतर कर्नाटकात अनेकांनी ब्रिटीशांविरुद्ध बंड पुकारले. ही सशस्त्र बंडे 19 व्या शतकाच्या पूर्वार्धात पुकारण्यात आली. यापैकी धोंडियावाघाचे बंड हे अत्यंत महत्वाचे मानले जाते.

धोंडियाचा जन्म चेन्नागिरीच्या एका मराठा कुटुंबात झाला. त्याच्या शौर्यामुळे त्याला 'वाघ' असे संबोधले जात असे. त्यांने आपल्या कारकीर्दीची सुरूवात हैदरअलीच्या घोडदळात एक सामान्य शिपाई म्हणून केली. आणि आपल्या पराक्रमाने तो 'लष्कर-प्रमुख' या पदापर्यंत पोहोचला. नंतर आपले स्वतंत्र सैन्य निर्माण करून टिपूच्या सैन्यात सेवा बजावली. टिपूशी लढला, टिपूबरोबर मतभेद झाल्यामुळे त्याला कैद करण्यात आले. चौथ्या अँग्लो - म्हैसूर युद्धानंतर ब्रिटीशांनी त्याची तुरुंगातून सुटका केली. त्याने आपली एक छोटीशी

© MTPS Not to be republished

www.textbookpdf.in

सैन्यतुकडी स्थापन केली आणि कारवाया सुरू केल्या. टिपूच्या सैन्यातील असंतुष्ट सैनिक आणि सत्ता नसलेले जहागीरदार यांना त्यांने आपल्या सैन्यात सामावून घेतले. त्यांने बिदनूर व शिवमोगाचे किल्ले काबीज करून चित्रदुर्गचा किल्ला घेण्याचा अयशस्वी प्रयत्न केला. लॉर्ड वेलस्लीने या बंडांचा बंदोबस्त करण्याचा प्रयत्न केला.

धोंडियाने आपल्या नेतृत्वाखाली शिमोगा, होनाळळी, हरिहर व आणखी कांही भागावर हल्ला चढविला. त्याचा पराभव झाला. शिकारीपूर ताब्यात घेतल्यानंतर धोंडिया निजामांच्या अधिपत्याखाली असलेल्या गुत्ती येथे पळाला. जेंव्हा निजामांनी गुत्तीवर हल्ला चढविला तेंव्हा त्याला मराठ्यांकडे जाणे भाग पडले. मराठ्यांनी त्याच्यावर हल्ला करून त्याचे बरेच घोडे, उंट व शस्त्रे ताब्यात घेतली इतके सारे घडूनसुद्धा त्यांने आपले युद्ध सुरुच ठेवले.

अनेक पाळेगारांनी त्याला प्रोत्साहन दिले. मलबारमधील माहे येथील फ्रेंचांनी त्याला मदतीचा हात दिला. हरिहर, चित्रदुर्ग शिकारीपूर, सावनूर, राणीबेन्नूर, कित्तूर व लोंढा अशा विशाल भूप्रदेशात ब्रिटीश सैन्याने त्याचा पाठलाग केला. शिरहट्टीवर ताबा मिळवून ब्रिटीश सैन्याने धोंडियाच्या अनेक सैनिकांना ठार केले.

धोंडियावाघचा अंत

लॉर्ड वेलस्लीने धोंडियावाघच्या धाडसी कृत्यांचा शेवट करायचे ठरविले. ब्रिटीशांनी स्थानिक लोकांकडे मदत मागितली. धोंडियाने पुन्हा शिकारीपूर काबीज केले परंतु ब्रिटीशांनी त्याला पुन्हा हुसकावून लावले. तुंगभद्रा आणि मलप्रभाच्या मध्ये धोंडियाच्या ताब्यात असणारा प्रदेश जिंकण्याचा प्रयत्न ब्रिटीशांनी केला. त्यांनी धोंडियावर सर्व बाजूनी हल्ला चढविला त्यांने रायचूर सोडले. ब्रिटीशांनी त्याचा पाठलाग केला. जेंव्हा तो मराठे व निजामाच्या सैन्याच्या मधोमध सापडला. तेंव्हा ब्रिटीशांनी यापलपरवी जवळ त्याच्यावर हल्ला केला व कोनगल येथे त्याला ठार केले. सेनापतीच्या मृत्यूनंतर धोंडियाचे सर्व सैन्य इकडे तिकडे विखुरले. ब्रिटीशांनी अपार संपत्ती व शस्त्रास्त्रे बळकावली.

कित्तूरचे बंड-वीर राणी चेन्नम्मा (1824)

मराठे, टिपू व हैदरअलीच्या पराभवानंतर ब्रिटीशांनी प्रशासनामध्ये आमूलाग्र बदल केले. त्यापैकीच एक कायदा म्हणजे 'दत्तकवारसा नामंजूर' हा होय, याला राणी चेन्नम्माने कडाडून विरोध केला व स्वतः युद्धाचे नेतृत्व करून ब्रिटीशांविरुद्ध शौर्याने लढा दिला.

चेन्नम्मा

www.textbookpdf.in

कित्तूर हे गाव बेळगाव व धारवाडच्या मधोमध आहे. मल्लसर्जच्या मृत्यूनंतर चन्नम्माने राज्यकारभारामध्ये लक्ष घालण्यास सुरवात केली. मल्लसर्जच्या मृत्यूनंतर त्याचा ज्येष्ठ पुत्र शिवलिंगरूद्रसर्ज हा गादीवर बसला. त्याच्या तब्येतीच्या तक्रारीमुळे चन्नम्माला राज्यकारभारात लक्ष घालावे लागे. मराठ्यांबरोबरच्या युद्धात शिवलिंगसर्जने ब्रिटीशांना पाठिंबा दिला. परिणामतः ब्रिटीशांनी कित्तूरबरोबर तह केला. व त्यांच्याकडून खंडणी वसूल केली. हा तह थॉमस मन्रोच्या कारकीर्दीत झाला.

शिवलिंगसर्जच्या मृत्यूनंतर चन्नमाने शिवलिंगप्पा या मुलाला दत्तक घेतले आणि स्वतः कित्तूरची राणी बनून राज्यकारभार सुरू केला. त्यावेळी थॅकरे हा धारवाडचा जिल्हाधिकारी तसेच ब्रिटीशांचा राजकीय हस्तक म्हणून काम करीत होता. त्यांने मुंबईच्या गव्हर्नरला एक अहवाल पाठविला आणि 'दत्तकवारसा नामंजूर' या धोरणाअंतर्गत कित्तूरचे संस्थान खालसा करण्याचा प्रयत्न केला. तसेच कित्तूरचा किल्ला व खजीनाही बळकावण्याचा प्रयत्न केला चन्नम्माला युद्ध पुकारणे अनिवार्य होते. तिने युद्धाची तयारी केली. त्यादरम्यान ब्रिटीश सैन्यही युद्धास सज्ज झाले. या युद्धात थॅकरेवर गोळी झाडून त्याला ठार करण्यात आले. बऱ्याच ब्रिटीश सैनिकांना अटक करण्यात आली.

कर्नल डेकच्या नेतृत्वाखाली ब्रिटीशांनी कित्तूरवर पुन्हा. हल्ला चढविला. ब्रिटीश सैन्य त्वेषाने लढले. चन्नम्माने युद्धभूमीवरून पळून जाण्याचा प्रयत्न केला. परंतु ती पकडली गेली. चन्नम्मा व इतर कांही लोकांना बैलहोंगलच्या किल्ल्यात डांबून ठेवण्यात आले. राणी चन्नम्माचा तुरूंगातच मृत्यू झाला. आजही 'एक आदर्श राणी' अशी तिची ख्याती सर्वत्र आहे.

संगोळ्ळी रायण्णा (1829-30)

राणी चन्नम्माबरोबरच संगोळ्ळी रायण्णाचेही नाव प्रसिद्ध आहे. संगोळ्ळी रायण्णा एक शूर शिपाई होता. तो कित्तूरच्या स्वातंत्र्यासाठी लढला. मातृभूमिला मुक्त करणे हे आपले परम कर्तव्य आहे असे तो मानत असे. राणी चन्नम्माबरोबरच तोही ब्रिटीशांविरुद्ध शौर्याने लढला. तिच्याबरोबर त्यालाही कैद करण्यात आले. नंतर ब्रिटीशांनी त्याची सुटका केली रायण्णाबद्दल अनेक मौखिक ऐतिहासिक गोष्टीही उपलब्ध आहेत. सैन्याची जमवाजमव करीत त्याने त्यांच्या मनामध्ये राष्ट्रीयत्वाची भावनाही जागृत केली. कांही संवेदनशील ठिकाणी त्याने गुप्त सभा घेतल्या. त्याने ब्रिटीशांच्या तालुक्याच्या

संगोळ्ळी रायण्णा

www.textbookpdf.in

ठिकाणी असणारे खजीने लुटण्याची योजना आखली होती. त्याच्याकडे पाचशे सैनिकांची तुकडी होती. ब्रिटीशांना मदत करणाऱ्या गावकऱ्यांबद्दल त्याच्या मनात तीव्र संताप होता. रायण्णाला चन्नम्मानेच पढविले आहे अशी ब्रिटीशांची समजूत होती म्हणून त्यांनी चन्नम्माला बैलहोंगलच्या तुरुंगातून कुसुगलच्या तुरुंगात हलविले.

रायण्णाला पकडण्यासाठी ब्रिटीशांनी एक कुटील कारस्थान रचले. राणी चन्नम्माच्या विरोधात असणाऱ्या देसाईंना त्यांनी प्रोत्साहन दिले. कृष्णदेवराय नावाच्या अंमलदाराने ब्रिटीशांशी हातमिळवणी केली. अशाप्रकारे कूटनीतीने रायण्णाला पकडून धारवाडला आणण्यात आले. त्याच्या अटकेनंतर त्याच्या बहुतांश सैनिकांनी शरणागती पत्करली. त्याला दोषी ठरवून 1831 मध्ये नंदगड येथे फाशीची शिक्षा ठोठावण्यात आली. रायण्णाच्या जीवनावर अनेक पोवाडे व लोकगीते गायिली जातात. त्यामुळे आजही तो अमर आहे.

अमरसुळ्याचे बंड

हे प्रामुख्याने शेतकऱ्यांचे बंड होते. तसेच कर्नाटकातील (1835-37 या कालावधीत) कोकणकिनारपट्टीवरील आणि कोडगू प्रदेशातील राजकीय पार्श्वभूमीवर आधारित होते 1834 मध्ये ब्रिटीशांनी कोडगू राज्याच्या हलेरी घराण्यातील चिक्कवीरराजेंद्रला पदच्युत केले. त्यानंतर बेंगलोरवरून वेल्लोरला आणि त्यानंतर काशीला त्याची रवानगी केली. या घटनेमुळे कोडगूमध्ये राजकीय अस्थिरता निर्माण झाली. स्वामी अपरांपर, कल्याणस्वामी आणि पुट्टबसप्पा यांनी याविरोधात सशस्त्र बंड पुकारले. कोडगू राज्यातील हलेरी घराण्याचे वंशज असल्याचा दावा या तिघांनी केला. या बंडाचे नेतृत्व स्वामी अपरांपर यांनी केले. 1835 मध्ये त्याला पकडून बेंगलोरमध्ये ठेवले. त्याचप्रमाणे 1837 मध्ये कल्याणस्वामीला पकडून म्हैसूरच्या तुरुंगात ठेवण्यात आले.

पुट्टबसप्पा

कल्याणस्वामीच्या निधनानंतर कोडगूच्या खालच्या भागातील लोकांनी बंड चालूच ठेवले. सुळ्या, बेल्लारे, पुत्तुर आणि कॅनरातील कांही प्रमुख भाग हे अमरसुळ्यामध्येच मोडत असत. पुट्टबसप्पाच्या एका शेतकऱ्यांने स्वतःच कल्याणस्वामी असल्यांचे भासविले आणि नंतर स्वामी अपरांपरही आपणच असल्याचे सांगितले. यावरून या बंडाचे सामर्थ्य लक्षात येते. या बंडाचे नेतृत्व पुट्टबसप्पा यानेच केले.

हे बंड डोंगराळ भागात सुरू झाले. पुट्टबसप्पा बंडाचे आयोजन करीत असे आणि लोकांना शांत बसवित असे. जर बंडखोर सरकारच्या हाती सत्ता आली तर तंबाखू व मीठावर कर बसविला जाणार नाही. असे त्यांने जाहिर केले. श्रीमंत शेतकरी, जमीनदार व

www.textbookpdf.in

स्थानिक प्रमुखांना याबद्दलची खात्री पटली. वेल्लोरमधील सरकारी कचेरीवर ताबा मिळविणे ही या बंडाची पहिली चाल होती. क्रूरपणाबद्दल प्रसिद्ध असलेल्या एका अंमलदाराला ठार मारल्यांने पुट्टबसप्पाची ख्याती आणखीनच वाढली. या घटनेपासून या बंडाला जास्तच पाठिंबा व प्रसिद्धी मिळाली.

मंगलोर जिंकून घेण्यासाठी बंडखोरानी तिकडे कूच केले. मंगलोरमधील किल्ल्याची बळकटी करण्यामध्ये ब्रिटीश गुंतलेले होते. बंडखोरांनी यानी मंगलोर आणि बंटवाळमार्गे मंगलोरकडे कूच केले. त्यांनी बंटवाळच्या खजिन्याची व तुरुंगाची लुटालूट केली. हे बंड दडपून टाकण्यासाठी ब्रिटीशांनी तल्लिचेरी, कन्नानूर आणि बाँबेचे सैन्य वाढविले. ही बातमी कानावर पडल्यानंतर पुट्टबसप्पा आणि त्याचे सहकारी सुळ्ळयाकडे वळले. कोडगूमधील लोकांच्या सहाय्याने ब्रिटीशांनी त्यांना पकडले. पुट्टबसाप्पा, लक्ष्मप्पा, बंगारप्पा, केंदबाडी रामय्यागौडा आणि गुड्डेमने अप्पय्या यांना फाशी देण्यात आली. जरी हे बंड अयशस्वी झाले; तरी ब्रिटीश विरोधी झालेल्या बंडामध्ये याला अनन्यसाधारण असे स्थान आहे.

सुरपूर आणि कोप्पळचे बंड

सुरपूर : सुरपूर हे सध्याच्या यादगीरपासून 50 कि.मी. वर आहे. मोंगलांच्या राज्यापासूनच हे एक महत्त्वाचे ठिकाण समजले जात होते. हैद्राबादच्या निजामाच्या आणि मराठ्यांच्या कारकीर्दीत ते मांडलिकराज्य बनले. नंतरच्या काळात बराचसा प्रदेश गेला आणि सुरपूर हे एक छोटे राज्य बनून राहिले. वेंकटप्पाच्या कारकीर्दीत त्यांनी ब्रिटीशांविरुद्ध बंड पुकारले.

वेंकटप्पा नायक : वेंकटप्पा, आपले वडील कृष्णा नायकांच्या निधनानंतर गादीवर आला. ख्रि.श. 1834 मध्ये त्याचा जन्म झाला आणि लहान वयातच तो गादीवर बसला. त्याला कृष्णा नायकाचा भाऊ पेद्दनायक याने विरोध केला. त्यामुळे अंतर्गत कलह निर्माण झाले. ब्रिटीशांनी सुरपूरच्या अंतर्गत बाबतीत हस्तक्षेप केला. 1842 मध्ये ब्रिटीशांनी मिडीस टेलर याला राजकीय हस्तक म्हणून नेमले आणि सुरपूरवर अधिपत्य मिळविले.

टेलर एक सुधारक होता. त्याने सुरपूरचा एक संस्थान म्हणून विकास केला. पेद्दनायक याची या राज्याचा दिवाण म्हणून नेमणूक करण्यात आली. टेलरने राज्यातील जमिनीचे मोजमाप केले. टेलरने अंमलात आणलेल्या उपायांमुळे राज्याचा महसूल वाढला त्याने वेंकटप्पा नायकला योग्य शिक्षण देण्यासाठीही अनेक उपाय केले. 1853 मध्ये तो सत्तेवर आला.

सुरपूरचे बंड

1857 मध्ये ब्रिटीश सुरपूरमधील विविध प्रकारच्या सुधारणांवर बारीक लक्ष ठेवून होते. नानासाहेबांचे प्रतिनिधी सुरपूरमध्ये आहेत. हे सरकारच्या लक्षात आले. यामुळे

www.textbookpdf.in

राज्यकर्त्यांच्या मनसुब्याबद्दल त्यांच्या मनात शंका निर्माण झाली. राज्यकर्त्यांच्या हालचाली बद्दल माहिती देण्यासाठी त्यांनी कॅम्पबेल या अधिकाऱ्याची नेमणूक केली. हैद्राबादच्या राजाचे प्रशासन चांगले नसल्याबद्दलचा अहवाल कॅम्पबेलने सरकारला दिला.

वेंकटप्पा नायक हा 1857 च्या बंडातील एक प्रमुख नेता असे इतिहासकारांनी नमूद केले आहे. 1858 मध्ये ब्रिटीशांनी सुरपूर काबीज केले. तेथील राजा हैद्राबादच्या निजामाला आणि ब्रिटीश अधिकाऱ्याला शरण झाला. त्याला अटक करून सिकंदराबादच्या तुरुंगात ठेवण्यात आले. वेंकटप्पा नायकाचा मृत्यू कसा झाला याबद्दल मतभेद आहेत.

कोप्पळचा वीराप्पा :

ब्रिटीश विरोधातील अनेक बंडांपैकी कोप्पळचे बंड एक महत्त्वाचे बंड मानले जाते कोप्पळ आणि त्याच्या आसपासचा भाग हैद्राबादच्या निजामाच्या अधिपत्याखाली होता. तिथे जमिनदारांचे शोषण केले जात होते. त्यामुळे काही जमीनदार संतप्त झाले आणि त्यांनी निजामाविरुद्ध बंड पुकारले. या बंडखोरांपैकी वीराप्पा हा प्रमुख होता.

वीराप्पा या जमिनदाराने ब्रिटीशांविरुद्ध बंड करून कोप्पळच्या किल्ल्याबरोबरच त्या परिसरातील इतर काही किल्ले काबीज केले त्यामुळे इतर बऱ्याच जमिनदारांनी त्याला पाठिंबा दिला. ब्रिटीशांनी निजामांशी हातमिळवणी करून वीराप्पाला नेस्तनाबूत करण्यासाठी आपले सैन्य पाठविले. वीराप्पाचे सैन्यबळ कमी असल्याने लढतालढताच तो मरण पावला. ब्रिटीशानी कोप्पळचा किल्ला पुन्हा आपल्या ताब्यात घेतला. जरी हे बंड छोट्या प्रमाणात असले तरी आपण एक उत्कृष्ट व महान योद्धा असल्याचे वीराप्पाने सिद्ध केले.

हलगलीच्या बेरडांचे बंड :

हलगली हे बागलकोट जिल्ह्यातील मुधोळ तालुक्यामधील एक छोटेसे खेडे. हे मुधोळ संस्थानाच्या अधिपत्याखाली होते. 1857 मध्ये ब्रिटीशांनी शस्त्रास्त्रांच्या वापरावर बंदी घातली. बेरड लोक त्यांच्या परंपरेनुसार आपल्याजवळ सतत बंदुका व काडतुसे बाळगत असत. ते उत्तम शिकारी होते. जेव्हा त्यांना शस्त्रास्त्रे सरकारकडे जमा करण्याचे आदेश देण्यात आले तेंव्हा त्यांनी ब्रिटीशांविरुद्ध बंड पुकारले. मंटूर, बोडणी, अलगुंडी आणि आसपासच्या ठिकाणाचे कांही बेरड लोक हलगलीच्या बेरडांना सामील झाले. हे बंड दडपून टाकण्यासाठी ब्रिटीशांनी हलगली गावात प्रवेश केला. त्यांनी तेथील बेरडांना अमानुषपणे चिरडून टाकले. तसेच बऱ्याच बंडखोरांना फासावर लटकावले व या बंडाचा शेवट झाला.

www.textbookpdf.in

©KTBS Not to be republished

स्वाध्याय

I. खालील रिकाम्या जागा योग्य पदांनी भरा.

1. पहिले अँग्लो-म्हैसूर युद्ध _____ आणि _____ यांच्यामध्ये झाले.
2. दुसऱ्या अँग्लो-म्हैसुर युद्धाचा शेवट _____ च्या तहाने झाला.
3. कित्तूर चन्नम्माने _____ या मुलाला दत्तक घेतले.
4. कित्तूर संस्थानातल्या रायण्णाचे गाव _____ हे होय.
5. सुरपूर हे सध्याच्या _____ या जिल्ह्यात आहे.
6. बागलकोट जिल्ह्यातील _____ गावच्या बेरडांनी ब्रिटीशाविरुद्ध बंड पुकारले.
7. अमरसुळ्याचे बंड हे प्रामुख्याने _____ यांचे बंड होते.

II. समूहात चर्चा करून उत्तरे लिहा.

1. हैदर अली सत्तेवर कसा आला?
2. दुसऱ्या अँग्लो - म्हैसूर युद्धाचे परिणाम कोणते?
3. श्रीरंगपट्टणच्या तहातील अटी कोणत्या?
4. चौथ्या अँग्लो-म्हैसूर युद्धामुळे म्हैसूरमध्ये ब्रिटीशांची सत्ता बळकट कशी झाली?
5. ब्रिटीश सत्तेला विरोध करण्याची धोंडिया वाघ यांने कोणती पद्धत अवलंबिली?
6. रायण्णा ब्रिटीशांविरुद्ध कशा पद्धतीने लढला सविस्तरपणे लिहा?
7. स्वातंत्र्य चळवळीत कोडगूच्या पुट्टबसप्पाचे योगदान कोणते?
8. सुरपूरच्या बंडाची थोडक्यात माहिती लिहा.

उपक्रम :

1. संगोळ्ळी रायण्णाबद्दलची पुस्तके वाचा
2. राणी चेन्नम्माविषयी ऐतिहासिक माहिती गोळा करा.

प्रकल्प :

1. सुरपूर येथे शैक्षणिक सहलीचे आयोजन करून तेथील किल्ल्याचे निरीक्षण करा. तसेच ब्रिटीशकालीन अतिथीगृहांच्या बांधकामाबद्दलचे वैशिष्ट्य समजून घ्या.

***

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

प्रकरण - 5

सामाजिक व धार्मिक सुधारणांची चळवळ

या पाठात आपण खालील घटकांचा अभ्यास करूया.

- **ब्राम्हो समाजाची स्थापना व सुधारणा**
- **आर्य समाजाची स्थापना व सुधारणा**
- **सत्यशोधक समाजाची शिकवण**
- **रामकृष्ण मिशनची शिकवण**
- **नारायण गुरू धर्म परिपालन योगम**
- **तरूण बंगाली चळवळ**
- **प्रार्थना समाजाची सुधारणा**
- **अलिगढ चळवळ**
- **थिऑसॉफिकल सोसायटी**
- **पेरियार**

मानवी मूल्यांपासून अलिप्त व उच्च नीच भेदभाव असणाऱ्या, सामाजिक व्यवस्थेत बदल करून अंधश्रद्धा मुक्त व समतेवर आधारित समाज निर्मिती करण्याचा प्रयत्न म्हणजे 'समाज सुधारणा' होय. प्रत्येक व्यक्तीची प्रतिष्ठा उंचावणे हाच समाज सुधारणेचा मूलभूत घटक आहे.

भारताच्या इतिहासात 19 व्या शतकाला 'समाज सुधारणेचा काळ' व 'पुनरुजीवनाचा कालखंड' म्हटले जाते. ब्रिटीशांनी इंग्रजी शिक्षणाचा प्रारंभ केल्यानंतर भारतात सुशिक्षितांचा बुद्धिजीवी वर्ग निर्माण झाला. लोकशाही, राष्ट्रीयता व समानता या युरोपियन कल्पनांचा भारतीय समाजाला परिचय झाला. इंग्रजी शिक्षण घेतलेले भारतीय आपल्या समाजाच्या हिताबद्दल जागृत झाले. या बरोबर ब्रिटीशांनी सुद्धा समाज सुधारणेमध्ये रस दारवविला. आपण सुजाण नागरिक आहोत, असे सांगत भारतीयाना सुसंस्कृत बनविण्यासाठी आपण इथे आलेले आहोत व भारतीय म्हणजे 'गोऱ्यांवरील असलेला भार' या सिद्धांताचा ते प्रचार करू लागले.

या सिद्धांताच्या आधारे ब्रिटीशांनी आपले आर्थिक, राजकीय हित जपण्याच्या योजना आखल्या. अनेक भारतीयांनी आपल्या रूढी व परंपरांना नव्या दृष्टीने पाहण्यास सुरूवात केली. 'भारतीयता' ही नवीन संकल्पना उदयाला आली.

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

भारतीय समाजामध्ये स्त्रियांना, शूद्र व तळागाळातील लोकांना अनेक हक्कांपासून वंचित रहावे लागले याविरुद्ध विविध कालखंडातील अनेक चळवळी झाल्या. प्राचीन व मध्ययुगीन चळवळीपेक्षा भिन्न अशा या सामाजिक चळवळी ब्रिटीशांच्या कालखंडात जन्माला आल्या जातीयता, लिंगभेद, सती पद्धत, विधवा पुनर्विवाहाला प्रतिबंध, शूद्र व मागासलेल्या लोकांना शिक्षणापासून वंचित ठेवणे अशा अनेक समस्या हाती घेऊन नवीन समाज सुधारण चळवळ आकारास येऊ लागली.

राजाराम मोहनरॉय, दयानंद सरस्वती, म.गो. रानडे, ज्योतिबा फुले, स्वामी विवेकानंद, ॲनी बेझंट, सर सय्यद अहमद खान, पेरियार व नारायण गुरु इ. महान व्यक्तींनी सामाजिक सुधारणा चळवळीत मोलाचे योगदान दिले. या कालखंडातील सुधारणेचा प्रमुख घटक म्हणजे समाजाला हानीकारक असलेल्या पद्धतींचा कायद्यानुसार निषेध करण्याचा प्रयत्न करणे.

ब्राम्हो समाज

आधुनिक कालखंडात राजा राम मोहनरॉय यांनी (1772-1833) भारतामध्ये समाज सुधारणेला चालना दिली. त्यांना संस्कृत, अरेबिक, पर्शियन, इंग्रजी, फ्रेंच, ग्रीक, लॅटिन आणि इतर भाषांचे ज्ञान होते. भारत देशातील इतर धर्मांच्या तत्वांचा तुलनात्मक अभ्यास त्यानी केला. त्यांची ज्ञानलालसा व समाज सुधारणेची तळमळ इतकी होती की त्यांनी बायबलचा मूळ अर्थ समजून घेण्यासाठी हिब्रू व ग्रीक भाषा आत्मसात केल्या.

राजाराम मोहनरॉय

त्यांनी आपल्या मित्रांबरोबर एकत्र येऊन कलकत्ता येथे 'आत्मीयसभा' सुरू केली. या सभेचा प्रमुख उद्देश म्हणजे धार्मिक व सामाजिक अनिष्ट चालीरीतीना बंगालच्या समाजातून हद्दपार करणे 1828 मध्ये त्यांनी 'ब्राम्हो समाजाची' स्थापना केली जातीपद्धती व अंधश्रद्धा यापासून हिंदू धर्माचे शुद्धीकरण करणे हे त्यांचे ध्येय होते. राजाराम मोहनरॉय व त्यांच्या ब्राम्हो समाजातील अनुयायांनी उपनिषदात सांगितलेल्या तात्विक विचारांवर आधारित हिंदू समाजाची पुनर्रचना करण्याचा प्रयत्न केला. याचा परिणाम म्हणून तत्कालीन गव्हर्नर जनरल विल्यम बेंटिंक याने 1829 मध्ये सतीबंदीचा कायदा पास केला वृत्तपत्र लेखनातून जनजागृती करण्याचा त्यांनी प्रयत्न केला. बंगाली भाषेतील 'संवाद कौमुदी' हे वृत्तपत्र सुरू केले.

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

ब्राम्हो समाजाची शिकवण

1. एकेश्वरवादाचे प्रतिपादन केले.
2. अर्थहीन चालीरितींना विरोध केला.
3. सर्वांनी प्रतिष्ठेचे जीवन जगावे व कोणतेही नियम व चालीरिती व्यक्ती प्रतिष्ठेला बाधक ठरू नयेत.
4. बहुपत्नीत्व पद्धतीचा निषेध केला व स्त्रियांच्या समानतेसाठी प्रयत्न केले. विशेषतः विधवा स्त्रियांची दयनीय स्थिती दूर करण्यासाठी त्यांना संपत्तीत वारसा हक्क मिळावा, असे प्रतिपादन केले. ब्राम्हो समाजाने बालविवाहाला विरोध दर्शविला.
5. चांगुलपणा कोठेही असला तरी त्याचा स्वीकार केला पाहिजे. वेदांत व उपनिषदे याच प्रकारचा बोध देतात. पाश्चिमात्य देशात जे चांगले आहे त्याचा स्वीकार करावा. असे त्यांचे मत होते. म्हणून इंग्रजी शिक्षणास त्यांनी महत्व दिले.

याशिवाय राजाराम मोहनरॉय यांनी प्रगत पाश्चिमात्य लोकांच्या विचारसरणीचे भारतीयांनी स्वागत करावे असे सांगितले. यासाठी त्यांनी कलकत्ता येथे वेदांत कॉलेजची स्थापना करण्यास सहकार्य केले.

रविंद्रनाथ टागोर यांनी राजाराम मोहनरॉय यांना 'आधुनिक भारताचे जनक' व 'भारतीय राष्ट्रीयतेचे प्रवर्तक' असे संबोधून राजाराम मोहनरॉय यांच्या कार्याचा गौरव केला आहे.

तरूण बंगाली चळवळ

19 व्या शतकात उत्तर भारतात आधुनिकतेचे वारे वाहू लागले. कलकत्ता शहर हे नवीन विचारसरणीचे केंद्रबिंदू बनले होते. 1820 व 1830 च्या दशकात नवीन चळवळी उदयास येऊ लागल्या. यापूर्वी आपण ब्राम्हो समाजाची माहिती घेतली आहे. याच कालखंडातील आणखी एक चळवळ म्हणजे 'तरूण बंगाली चळवळ'. हेन्री विव्हियन डिरोजियो (1809-1831) यांनी या चळवळीला प्रारंभ केला. त्यांचे वडील पोर्तुगीज व आई भारतीय होती. त्यामुळे डिरोजियो यांना 'अँग्लो इंडियन' असे ही म्हणतात.

1826-1831 या काळात त्यांनी कलकत्ता येथील हिंदू कॉलेजमध्ये प्राध्यापक म्हणून सेवा बजावली. त्यांच्या अध्यापनाने प्रभावित होऊन कित्येक विद्यार्थी त्यांचे निष्ठावंत अनुयायी बनले. युरोपियन पुनरुजीवन उद्दिष्टामुळे प्रभावीत झालेले, हेन्री डिरेजियो यांनी आपल्या विद्यार्थ्यांमध्ये व सहप्राध्यांपकामध्ये वैज्ञानिक विचारसरणी बिंबवण्याचा प्रयत्न केला. नवीन शिक्षणपद्धती अंमलात आणण्यासाठी, आवश्यक पाठ्यपुस्तके तयार करण्यासाठी

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

त्यांनी विशेष परिश्रम घेतले. चिकित्सक वृत्ती व वैज्ञानिक दृष्टीकोन अंगी बाणवण्यासाठी प्रेरणा देणारी पाठ्यपुस्तके बनविली. त्यामुळे तत्कालीन सनातनी लोकांच्या रोषाला त्यांना सामोरे जावे लागले. तरीसुद्धा न डगमगता 'ॲकेडमिक असोसिएशन' (1828) या नावाने चर्चा करण्यासाठी व्यासपीठाची व्यवस्था केली आणि नवीन विचारसरणीला चालना दिली.

तरूण बंगालीच्या चळवळीने निसर्ग, माणुसकी व देव इ. विषयांवर चर्चा व संवादाचे आयोजन केले. अंधश्रध्देने भरलेल्या, सामाजिक आचारविचारांमध्ये बुडालेल्या, समाजात वैज्ञानिक दृष्टिकोन वाढविणे हा एकच मार्ग आहे. यासाठी त्यांनी अपार कष्ट घेतले. स्त्रियांचे हक्क व जातीरहित समाज यावर त्यांनी भर दिला. सनातन कुटुंबातून आलेले अनेक विद्यार्थी त्यांच्या प्रभावाने आकर्षित झाले. चळवळीच्या विकासात हिरीरीने सहभागी झाले. यामुळे ही एक नवीनच चळवळ उदयास आली. परंतु याचा प्रभाव फक्त कलकत्ता व बंगालमधील काही प्रदेशापुरताच मर्यादित होता. नवीन पिढी त्यांच्या प्रभावाला बळी पडून नैतिकतेचे अध:पतन होत आहे, असा आरोप काही सहाध्यापक व अनुयायांनी केला. त्यांच्या दबावाला बळी पडून त्यांनी आपल्या नोकरीचा राजीनामा दिला. डिरेजियो फक्त 22 वर्षे जगले व 1831 मध्ये कॉलरा या भयानक आजाराने मृत्यू पावले.

आर्यसमाज

1875 मध्ये स्वामी दयानंद सरस्वती यांनी आर्य समाजाची स्थापना केली. 'काठेवाड' या प्रांतात याचा प्रारंभ झाला. 19 व्या शतकाच्या शेवटच्या दोन दशकात समाज अत्यंत प्रभावशाली बनला.

दयानंद सरस्वती

1824 मध्ये गुजराथमधील काठेवाड मध्ये त्यांचा जन्म झाला. त्यांचे मूळ नाव 'मूळशंकर'. वडिलांचे नाव 'अंबाशंकर तिवारी' होते. आईचे नाव 'अमृताबाई' होते. इंग्रजी विषयामध्ये विशेष रूची नसलेल्या दयानंदानी संस्कृत भाषेचा अभ्यास केला. वयाच्या 21 व्या वर्षी घर सोडून पुढील 15 वर्षे देशभर संचार केला. दयानंद सरस्वतींनी आपली विचारसरणी 'सत्यार्थ प्रकाश' नावाच्या ग्रंथात लिहून ठेवली. वेदांमध्ये आधुनिक भारताच्या समस्यांवर उपाय आहे हे त्यांना वेदांच्या अध्ययनाने उमगले. 'वेदांकडे परत चला' अशी त्यांनी घोषणा केली. यांना सुधारणावादी म्हणण्याऐवजी पुनरुत्थानवादी म्हटले गेले. त्यांनी 1877 मध्ये आर्यसमाजाचे मुख्य कार्यालय लाहोर येथे सुरु केले. सत्यज्ञानाचा मूलाधार वेद आहेत. वेदच प्रमाण मानावेत असे त्यांनी सागितले.

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

आर्यसमाजाची शिकवण

1. सर्व हिंदूनी निर्गुण, निराकार असलेल्या एकाच ईश्वरावर श्रद्धा ठेवावी
2. जातीपद्धतीचा तिरस्कार करून जन्मतः कोणी शूद्र नाही व कोणी ब्राम्हण नाही असे सांगितले.
3. आंतरजातीय विवाहांना प्रोत्साहन दिले.
4. बहुपत्नीत्व व बालविवाह पध्दतींचा तिरस्कार केला.
5. स्त्री व पुरुष समान आहेत.
6. वेद हे अत्यंत श्रेष्ठ आहेत. प्राचीन, पवित्र ग्रंथाचे अध्ययन करून लोकांना बोध करावा.

आर्य समाजाचे दुसरे कार्य म्हणजे 'शुद्धी चळवळ' होय. त्यांनी हिंदू धर्म सोडून इस्लाम व ख्रिश्चन धर्म स्वीकारलेल्या व्यक्तींना परत हिंदू धर्मामध्ये प्रवेश देण्याचे कार्य केले. गाईंच्या रक्षणासाठी 'गो रक्षण संघाची' स्थापना केली.

आर्यसमाजात 1921 मध्ये जवळ जवळ 5 लाख अनुयायी होते. दयानंद सरस्वतींच्या मृत्यूनंतर 1886 मध्ये सुप्रसिद्ध 'दयानंद अँग्लो वैदिक कॉलेज' सुरु करण्यात आले. तसेच हरिद्वार येथे गुरुकुल विश्वविद्यालय सुरू करण्यात आले. भारताच्या लाला लजपतराय सारख्या जहाल मतवाद्यांनीही आर्य समाजाच्या शिकणुकीपासून प्रेरणा घेतली.

शुद्धीचळवळ

हिंदू धर्मातील जाती व्यवस्था व धार्मिक कर्मकांडे यामुळे काही लोक इतर धर्माकडे आकर्षित झाले. अशा संदिग्ध परिस्थितीतून हिंदू समाजाला एकत्र आणून वेदातील अर्थाचे नव्या पद्धतीने विवेचन केले. लिंगभेद व जातीयता याला त्यांनी विरोध केला. हिंदू धर्मातून इतर धर्मात जाण्यास परवानगी होती. परंतु त्यांना परत हिंदू धर्मात प्रवेश दिला जात नव्हता. धर्मांतरित लोकांना हिंदू धर्मात परत घेण्यासाठी दयानंद सरस्वतींनी 'शुद्धी मोहीम' सुरू केली.

प्रार्थना समाज

ब्राम्हो समाजाची सुधारणा चळवळ बंगाल प्रांताबाहेर पसरू लागली. ब्राम्हो समाजाच्या तात्विक प्रभावाने समाज सुधारणा चळवळीची रुपरेषा आखली गेली. पश्चिम भारतात विशेषतः बॉंबे प्रेसिडेन्सी विभागात ही सुधारणा चळवळ वाढीस लागली.

स्त्रियांच्या समस्येव्यतिरिक्त शूद्र लोकांच्या समस्यांचा उपाय शोधण्यासाठी डॉ. आत्माराम पांडुरंग यांच्या नेतृत्वाखाली 1867 मध्ये मुंबई येथे प्रार्थना समाजाची स्थापना

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

झाली. पाश्चिमात्य आधुनिक विचारसरणीद्वारे हिंदू धर्माचे पुनरुज्जीवन करणे आवश्यक आहे असे या संघटनेने प्रतिपादन केले. समाज सुधारणा म्हणजे फक्त श्रद्धा नसून ती प्रत्यक्ष अंमलात येणे गरजेचे आहे. स्त्री शिक्षण, निराश्रितांना आश्रय, इ. कार्यक्रम या समाजाने राबविले. न्यायमूर्ती म.गो. रानडे, आर.जी. भांडारकर व एन.जी.चंदावरकर हे या समाजाचे इतर नेते होते. रानडे याच्या नेतृत्वामुळे प्रार्थना समाजाच्या सुधारणेची व्याप्ती वाढली. रानडे यांनी बालविवाह पद्धत, विधवांना यातनांतून मुक्त करणे, उच्च जातींमध्ये विधवा पुनर्विवाह प्रतिबंध रोखणे इ. साठी नवीन कायद्यांची जरूरी आहे असे सांगितले यासाठी ब्रिटीश सरकारची मदत घेणे योग्य आहे असे त्यांचे मत होते.

सत्यशोधक समाज


महात्मा ज्योतिबा फुले

महाराष्ट्रात व भारतातील इतर काही भागात जातिभेद व लिंगभेद व्यापक प्रमाणात होता. वसाहतवादी कालखंडात या शोषणाच्या विरुद्ध अनेक चळवळी उदयास आल्या. 1873. मध्ये सत्यशोधक समाजाने ब्राम्हणेतर वर्गास व स्त्रियांना समान हक्क मिळण्यासाठी चळवळ सुरू केली. महात्माज्योतिबा फुलेंनी 'सत्यशोधक समाजाची' स्थापना केली. त्यांनी 'गुलामगिरी' या पुस्तकात वेठबिगारीचे सविस्तर वर्णन केले आहे. 'शेतकऱ्याचा आसूड' हे पुस्तक त्यांनी लिहिले. अनेक शाळांची स्थापना करून शूद्रांना व स्त्रियांना शिक्षण मिळण्याची व्यवस्था केली. माळी समाजात जन्मलेल्या फुलेंनी आपल्या विहिरीतील पाणी अस्पृश्यांना व सर्व जातिधर्मांसाठी खुले केले. त्यांच्या पत्नी सावित्रीबाई फुले यांनीही त्यांच्या कार्यात मोलाचे योगदान दिले. त्यांच्या प्रयत्नाने मुलींच्यासाठी वसतीगृहची स्थापना झाली. आधुनिक कालखंडात समानतेवर आधारित नव समाजनिर्मितीचे प्रयत्न फुले दांपत्याने केले. डॉ.बी.आर. आंबेडकर हे सुद्धा फुलेंच्या तत्वज्ञानाने प्रभावीत झाले.

अलिगढ सुधारणा चळवळ


सर सय्यद अहमद खान

19 व्या शतकाच्या अखेरीस मुस्लीम समाजात नवीन धार्मिक व सामाजिक सुधारणेची लाट आली. 1857 च्या घटनेनंतर मुस्लीम समुदायात ब्रिटीशविरोधी असंतोष व्यापक प्रमाणात वाढीस लागला. याचा परिणाम म्हणून त्यांना इंग्रजी शिक्षणापासून वंचित रहावे लागले. तसेच त्यापासून मिळणाऱ्या फायद्यालाही मुकावे लागले. याचा विचार करून सर सय्यद अहमदखान यांनी याच

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

दरम्यान नवीन चळवळ सुरु करण्याचा प्रयत्न केला. 1863 मध्ये सुरु झालेल्या 'मोहम्मदन लिबर्टी सोसायटीने' धार्मिक सामाजिक व राजकीय विषयाशी संबंधित वादविवाद आणि चर्चासत्रे आयोजित केली. या चर्चेमध्ये उच्च व मध्यमवर्गीय तरुण मुस्लीमांनी भाग घेतला व इंग्रजी शिक्षणाचे महत्त्व समजून घेतले. सर सय्यद अहमदखान यांच्या प्रयत्नाने नवीन विचारांना चालना मिळून त्याचे रूपांतर अलिगढ चळवळीमध्ये झाले.

सर सय्यद अहमदखान यांचा जीवनकाल, 1817 ते 1898 होता. कुराणग्रंथ हा एकमेव प्रमाणग्रंथ आहे. इस्लाम धर्माबद्दल लिहिलेले इतर लेख फक्त अनुषंगिक आहेत असे त्यांनी सांगितले. काळाच्या बदलानुसार धर्माची परिभाषा व अर्थ यांच्यातही बदल झाला पाहिजे. तसे होत नसेल तर धर्माला जडत्व येते असे त्यांनी प्रतिपादन केले. सर सय्यद अहम दखान यांनी जीवनाच्या अखेरपर्यंत अज्ञान, अंधश्रद्धा, सांप्रदायिकता, अवैज्ञानिक चालिरीती याविरुद्ध लढा दिला. माणसाचे मन पारदर्शक असल्याशिवाय कोणताही सामाजिक व बौद्धिक विकास शक्य नाही असे त्यांचे मत होते. मुस्लीम समाजातील पडदा पद्धतीचा त्यांनी निषेध केला. मुस्लीम स्त्रियांनी शिक्षण घेऊन ज्ञानसंपन्न व्हावे असे त्यांनी मत मांडले. बहुपत्नीत्व पद्धतीस त्यांनी जोरदार विरोध केला आपले विचार अंमलात आणण्यासठी 1875 मध्ये त्यांनी 'अंग्लो ओरिएन्टल कॉलेज'ची स्थापना अलिगढ येथे केली. पाश्चिमात्य विज्ञान व संस्कृती याची ओळख होऊन आधुनिक समाजाची निर्मिती व्हावी, यासाठी त्यांनी या कॉलेजचा उपयोग केला. नंतर यालाच 'अलिगढ मुस्लीम युनिव्हर्सिटी' असे नाव देण्यात आले.

सय्यद अहमदखान यांनी धार्मिक सहिष्णुतेचा उपदेश केला. हिंदू व मुसलमान हे समाज एकत्र यावेत अशी त्यांची इच्छा होती अलिगढ कॉलेजची स्थापना करण्यासाठी हिंदू, पारसी, खिश्चन या लोकांनी सढळ हस्ते देणग्या दिल्या. या कॉलेजमध्ये सर्व धर्मीयांना प्रवेश दिला जाई. अलिगढला केंद्रस्थानी मानून सर सय्यद अहमदखान यांनी सुरू केलेल्या या चळवळीला 'अलिगढ चळवळ' असे म्हणतात.

रामकृष्णमिशन (रामकृष्ण मठ)

आधुनिक भारताच्या आध्यात्मिक प्रगती तसेच राष्ट्रीय जागृती व सांस्कृतिक विकासामध्ये रामकृष्ण मिशनचे विशेष योगदान आहे. स्वामी विवेकानंदानी 1897 मध्ये कलकत्यामधील 'बेलूर' येथे रामकृष्ण आश्रमाची स्थापना केली. त्याच प्रमाणे उत्तरांचल मधील अलमोरा जवळील 'मायावती' येथे रामकृष्ण मठाची स्थापना केली.

रामकृष्ण परमहंस

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

रामकृष्ण परमहंस हे त्यांचे गुरू होते. त्यांच्या आदर्श तत्वांचा प्रसार करण्यासाठी विवेकानंदानी रामकृष्ण मठाची स्थापना केली. रामकृष्ण परमहंस (1834-1886) हे कालीमातेचे उपासक व कलकत्यातील कालीमातेचे पुजारी होते. संन्यास, ध्यान व भक्तीद्वारे आध्यात्मिक मुक्ती कशी मिळवावी याचे दर्शन त्यांनी आपल्या जीवनातून लोकांना घडविले. सर्व धर्माचे सार हेच आहे असे त्यांचे मत होते. मुक्ती मिळविण्यासाठी व देवाचा साक्षात्कार होण्यासाठी विविध मार्ग आहेत. असा त्यांचा ठाम विश्वास होता. त्याकरिता मूर्तीपूजा आवश्यक आहे असे त्यांचे मत होते.

स्वामी विवेकानंद

रामकृष्ण परमंहस यांचे चिंतन आणि स्वतःचे सांस्कृतिक व सामाजिक विषय लोकांपर्यंत पोहचविण्यासाठी स्वामी विवेकानंदांनी या संघाची स्थापना केली. स्वामी विवेकानंद (1863-1902) कलकत्त्यातील कायस्थ कुटुंबात जन्मले. भारतीय व पाश्चिमात्य चिंतन विषयांचा अभ्यास केला. भारतीय संस्कृतीचा विविध दृष्टिकोनातून अभ्यास करून त्याचे महत्व भारतीयांना व पाश्चिमात्यांना समजावून सांगण्याचे कार्य केले. त्यांच्या गुरुंच्या निधनानंतर जवळ जवळ 5 वर्षे त्यांनी भारतभर संचार केला यावेळी भारतातील वास्तव समाजाचे त्यांना दर्शन घडले. जातीव्यवस्था, दारिद्र्य,शूद्रांना छळण्याचे विविध प्रकार, निरक्षरता, अज्ञान इत्यादींनी त्रस्त असलेल्या भारतीय समाजाला पिळवणूकमुक्त करण्यासाठी त्यांनी आजीवन अविरत प्रयत्न केला. लोकांना प्रथम शिक्षण द्या मग सुशिक्षित समाज स्वतः सुधारणा घडवून आणेल असे त्यांचे मत होते. शासकीय संस्था निर्माण होऊन त्यांच्यामार्फत समाज सुधारणे संदर्भातील कायदे अंमलात यावेत अशी त्यांची अपेक्षा होती. पाश्चिमात्यांचे अंधानुकरण करू नये असे त्यांनी सांगितले. अंधारात चाचपडणाऱ्या लोकांना ज्ञान प्रकाशाच्या दिशेने नेणे हेच धर्माचे मुख्य कर्तव्य आहे, नाही तर तो धर्मच नव्हे गरीब लोकांच्यासाठी जो आत्मा कार्य करत असतो त्यालाच 'महात्मा' म्हणावे नाहीतर दुरात्मा म्हणावे. जाती पद्धत, अस्पृश्यता धर्माच्या नावाखाली होणारी पिळवणूक याचा त्यांनी विरोध केला.

> मानव वर्गाला जेथे वेद, बायबल, कुराण हे नाहीत अशा ठिकाणी घेऊन गेले पाहिजे. तरीपण वेद, बायबल, कुराण यांच्या एकत्रित येण्यामुळे हे साध्य होण्यासारखे आहे आपल्या देशात हिंदू व मुसलमान धर्म यांचा मिलाफ झाला पाहिजे. वेदांताचा मेंदू व इस्लामचे शरीर या मुळे पुरोगामीत्वाकडे आपली वाटचाल होऊ शकते. (स्वामी विवेकानंद कृती खंड-7-पृष्ठ क्र. 238)

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

स्वामी विविकानंदांच्या 1893 मधील अमेरिकेच्या 'शिकागो' शहरातील विश्वधर्म संमेलनात केलेल्या भाषणामुळे पाश्चिमात्य लोकांना भारतीय संस्कृतीची महती कळाली. त्याच प्रमाणे 1900 मध्ये पॅरिस मध्ये झालेल्या 'काँग्रेस ऑफ रिलिजिन्स' या संमेलनात अमेरिकेतील भाषणाप्रमाणे त्यांनी लोकांना मंत्रमुग्ध करून सोडले. त्यांची भाषणे म्हणजे त्यांचा राष्ट्रीय विचारप्रणालीचा आरसा आहे. विवेकानंद अमेरिकेला जाण्यापूर्वी दहावे चाम रज वडेयर यांच्याकडे म्हैसूरला अतिथी म्हणून आले होते. विवेकानंदाच्या म्हणण्यानुसार महाराजांनी अस्पृश्य मुलांसाठी शाळा सुरू केली, ज्ञानयोग, राजयोग, कर्मयोग व भक्ती योग या कृतींची त्यांनी रचना केली. स्वातंत्र्याच्या चळवळीस त्यांच्या विचारसरणीमुळे प्रेरणा मिळाली. स्वातंत्र्य म्हणजे सामाजिक समानता ही त्यांची विचारप्रणाली होती.

थिऑसॉफिकल सोसायटी

मूलत: या संस्थेची स्थापना रशियन विदुषी मादाम ब्लेव्हटस्की व अमेरिकेचे कर्नल एम.एस. ऑलकॉट यांनी केली. यानंतर त्यांनी मद्रास जवळ 'अडयार' येथे 1886 मध्ये मुख्य कार्यालय सुरू केले. विविध धर्मांचा, उपनिषदांचा व विज्ञानाचा तुलनात्मक अभ्यास करणे हा या संस्थेचा मुख्य उद्देश होता. माणसाच्या अंतरंगातील अगाध चैतन्य शक्तीचा शोध घेण्याचा प्रयत्न करणे हा त्यांचा दुसरा उद्देश होता. माणसाला विश्वबंधुत्वाची भावना असणे महत्वाची आहे असे त्यांनी प्रतिपादन केले.

ॲनी बेझंट

थिऑसॉफिकल सोसायटीने हिंदू धर्मग्रंथाशी संबंधित वेद, उपनिषदे, सांख्ययोग व वेदांताचे तात्विक चिंतन यातील मूलतत्वे घेऊन त्यांचा प्रचार केला. या सोसायटीने धार्मिक व तात्विक परंपरांचा अभ्यास करून त्या द्वारे तत्कालिन समस्यांवर उपाय योजना करण्याचा प्रयत्न केला. या सोसायटीने केलेले प्रयत्न म्हणजे हिंदू धर्माची 'पुनरुज्जीवन चळवळ' असे मानले जाते. परकीयांनीही या चळवळीमध्ये विशेष रस घेतला हे महत्वाचे आहे.

आयरिश महिला ॲनी बेझंट 1893 मध्ये भारतात आल्यानंतर थिऑसॉफिकल सोसायटीच्या चळवळीची लक्षणीय प्रगती झाली. 1893 मध्ये थिऑसॉफिकल सोसायटीच्या अनुयायी म्हणून त्या भारतात आल्या. त्यांचा जन्म 1847 मध्ये लंडन शहरात झाला.

आंग्लिक चर्चचे पाद्री असणाऱ्या त्यांच्या पतीशी त्यांनी घटस्फोट घेतला व 1889 मध्ये या संस्थेच्या कार्यात स्वत:ला झोकून दिले. वेदांत शास्त्राविषयी त्यांनी विशेष ज्ञान संपादन केले. भौतिक संपत्तीवर आधारित पाश्चिमात्य संस्कृतीपेक्षा आध्यात्मिक संस्कृतीवर आधारित भारतीय संस्कृती सर्वश्रेष्ठ आहे असे त्यांनी प्रतिपादन केले. एका

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

अर्थाने ही चळवळ हिंदूधर्माची पुनरुजीवन चळवळ मानली गेली. त्यांनी हिंदू, बौद्ध धर्माचा तुलनात्मक अभ्यास केला.

भगवद्गीतेचा त्यांनी इंग्रजी भाषेत अनुवाद केला. म्हणून त्यांना 'श्वेत सरस्वती' नाव पडले. सर्व स्तरातील लोकांना शिक्षण मिळावे हा त्यांचा उद्देश होता. त्यासाठी त्यांनी अनेक शाळा सुरू केल्या. 1898 मध्ये बनारस येथे 'सेंट्रल हिंदू कॉलेज' सुरू केले. पुढे मदनमोहन मालवीय यांच्या मदतीने त्याचे 1916 मध्ये बनारस हिंदू विश्वविद्यालयात रूपांतर झाले. तत्कालीन समस्यावर चर्चा करण्यास व संवाद घडविण्यास 'न्यू इंडिया' आणि 'कॉम नव्हील' ही वृत्तपत्रे सुरू केली 1916 मध्ये 'होमरूल लीग' सुरू करून मद्रास प्रांतात होमरूल चळवळीस चालना दिली. थिऑसॉफिकल सोसायटी व त्याचा अविभाज्य घटक असलेल्या ॲनी बेझंटनी 20 व्या शतकाच्या प्रारंभीच्या काळात भारतात नवीन धार्मिक व सामाजिक जागृती निर्माण करण्याचे कार्य केले. भारताच्या स्वातंत्र्य चळवळीमध्ये सक्रीय भाग घेतलेल्या ॲनी बेझंट या भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या अधिवेशनाच्या पहिल्या महिला अध्यक्षा होत्या.

हे तुम्हाला माहिती असू दे.

होमरूल : ब्रिटनच्या ताब्यात असलेल्या आयर्लंडमधील लोकांनी आपला राज्यकारभार आपल्याकडेच असावा या हक्कासाठी ही चळवळ सुरू केली. यामुळे प्रभावित होऊन ॲनी बेझंटनी पुन्हा भारतात ही चळवळ सुरू केली. 1916 मध्ये 2 होमरूल लीग अस्तित्वात आल्या. एक टिळकांच्या नेतृत्वाखाली पुणे येथे सुरू झाली व त्याच्या शाखा महाराष्ट्र, उत्तर कर्नाटक, केंद्रीय प्रांत, बिरार प्रदेश येथे होत्या. दुसरी होमरूल लीग चळवळ ॲनी बेझंटच्या नेतृत्वाखाली मद्रास येथे सुरू झाली. टिळकांनी मराठा केसरी ही वृत्तपत्रे सुरू केली. तसेच ॲनी बेझंट यांनी 'न्यू इंडिया', 'कॉमनवेल्थ' व 'यंग इंडिया' ही वृत्तपत्रे सुरू करून या चळवळीचा प्रचार केला.

श्री नारायण गुरु धर्म परिपालन योगम्

1903 मध्ये श्री नारायण गुरु यांनी प्रबोधनाची चळवळ सुरू केली. यांचा जन्म केरळमधील 'इळव' या खेड्यात झाला. मागासलेल्या व पिळवणूकग्रस्त जमातींना सक्षम करणे हा या संघटनेचा मुख्य उद्देश होता. नाराणगुरू (1854-1928) अणि त्यांचे सहकारी पटापू आणि कुमारन आसन यांनी या चळवळींचे नेतृत्व केले.



श्री नारायण गुरु

www.textbookpdf.in

केरळ मध्ये जातीभेदाची समस्या मोठया प्रमाणात होती. मागासलेल्या व दलित समाजातील लोकांवर अनेक सामाजिक निर्बंध लादलेले होते. त्याकाळात या समाजातील लोकांना विहिरीतील पाणी वापरण्यास मनाई होती. रस्त्यावर फिरणे, चप्पल घालणे, मंदिरात प्रवेश यावर बंदी होती. महिलांच्या वेशभूषेवरही निर्बंध होते. शाळांमध्ये त्यांना प्रवेश मिळत नव्हता या जमातीतील लोकाना कनिष्ठ मूलभूत हक्क नव्हते . त्यामुळे त्यांचा कोंडमारा होत असे. या जमातीच्या उद्धारासाठी नारायण गुरु यांनी 'धर्म परिपालन योगम' नावाची संस्था स्थापन केली.

सर्वांना प्रतिष्ठेने जीवन जगता यावे हा या संघटनेचा उद्देश होता. सर्वांसाठी एकच जात, एकच धर्म व एकच परमेश्वर हे त्यांच्या चळवळीचे ब्रीदवाक्य होते. हे साध्य करण्यासाठी त्यांनी शिक्षण हा एकमेव मार्ग आहे असे जाहीर केले. मागासलेल्या जमातींना मंदिरात प्रवेश नव्हता म्हणून त्यांनी पर्यायी मंदिर बांधले.

1924 मध्ये नारायण गुरु व त्यांच्या सहकाऱ्यांनी 'वैकम सत्याग्रह' नावाची मंदिर प्रवेश चळवळ सुरु केली या चळवळीमध्ये महात्मा गांधी व 'आत्मगौरव चळवळीचे' प्रवर्तक पेरियार यांनी सहभाग घेतला होता. 'गुरु वायूर मंदिर प्रवेश चळवळ' ही एक यातील महत्वाची घटना होय.

पेरियार

वीसाव्या शतकातील प्रारंभीच्या काळात ब्राम्हणेतर चळवळ नावाची एक नवीन चळवळ दक्षिण भारतात सुरु झाली. बहुसंख्याक असलेल्या ब्राम्हणेतरांनी आपल्या लोकांना सरकारी क्षेत्रात लोकसंख्येवर आधारित संधी व प्रतिनिधित्व मिळावे यासाठी ही चळवळ सुरू केली. कर्नाटक व इतर विविध राज्यात ही एक प्रमुख चळवळ मानली गेली. ब्राम्हणेतर समुदायातील लोक आपल्यावर लादलेल्या सामाजिक निर्बंधाचा विरोध करू लागले.

ब्रिटीशांनी 1870 मध्ये केलेल्या जनगणनेच्या अहवालानुसार ब्राम्हणेतरांना आपल्या लोकसंख्येबद्दल कल्पना आली. 1916 मध्ये तामिळनाडू येथे सुरू झालेल्या 'जस्टीस पार्टी'ने ही चळवळ पुढे चालू ठेवली.


पेरियार

जस्टीस पार्टीच्याद्वारे ब्राम्हणेतर चळवळीस नवीन वळण मिळाले. या चळवळीने काही क्रांतीकारक पावले उचलली व इ.व्ही. रामस्वामी नायर यांच्या नेतृत्वाखाली 'आत्मगौरव चळवळ' नावाची नवीन चळवळ आस्तित्वात आली. 1925 मध्ये काँग्रेस

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

पक्षातून बाहेर पडलेल्या रामस्वामी यांनी 1926 मध्ये आत्मगौरव चळवळ (Self respect movement) सुरु केली. लोक त्यांना आदराने 'पेरियार' (ज्येष्ठ व्यक्ती) असे म्हणू लागले. पेरियार यांचा जन्म तामिळनाडूतील 'ईरोडी' येथील एका श्रीमंत कुटुंबात झाला. काँग्रेस पक्ष हा वर्णाश्रम पद्धतीच्या बाजूने आहे. म्हणून त्याला पर्याय म्हणून 'द्राविड वांशिक ओळख' या नावाने नवीन चळवळ सुरू केली. आर्य, ब्राम्हण यांचे श्रेष्ठत्व सांगणाऱ्या विचारांना त्यांनीविरोध केला. तामिळ भाषा ही द्राविड भाषा आहे. असे त्यांचे मत होते. संस्कृतभाषा व साहित्याला त्यांनी विरोध केला. आणखी एक विशेष म्हणजे रामायण या महाकाव्यामध्ये येणाऱ्या रावणाला द्रवीडांचा नायक म्हणून त्यांनी लोकांच्या मनावर बिंबवले आणि रामाचा वैदिक लोकांचा देव म्हणून तिरस्कार केला. बनारसमध्ये आलेल्या कटू अनुभवामुळे पेरियार हे क्रोधीत झाले. व त्यांनी संस्कृत भाषा व रामायणातील राम व रावणाच्या सांस्कृतिक आदर्शाचे परिवर्तन करून रावणाचे श्रेष्ठत्व वाढविले. जातिभेद व लिंगभेद यांना विरोध करून समानतेचा पुरस्कार केला. 1924 मध्ये केरळमधील 'वैकम' येथे अस्पृश्यांना मंदिर प्रवेश मिळावा म्हणून चळवळ केली. 1939 मध्ये ते जस्टीस पक्षाचे अध्यक्ष झाले. 'द्राविड कळघम' नावाची संघटना सुरू करून 'जस्टीस' नावाचे नियतकालिक सुरू केले.

आजही तामिळनाडूतील राजकीय क्षेत्रात पेरियारांचे नाव आदर्शाचे प्रतीक म्हणून आदराने घेतले जाते. आजही राजकीय पक्ष आपल्या पक्षाच्या नावाच्या सुरुवातीस 'द्रवीड' हा शब्द जोडतात. यावरून त्यांचे महत्त्व कळून येते. आयोथीदास, टी. एम्. नायर इत्यादिंनी सुरू केलेल्या आदर्शवादी ब्राम्हणेतर चळवळीचे रूपांतर पेरियार यांनी सांस्कृतिक चळवळीमध्ये केले. पिळवणूक मुक्त समाज, जातीभेद, लिंगभेदरहित सर्वधर्म सहिष्णुतेवर आधारित समाजाची रचना व्हावी हेच त्यांच्या जीवनाचे ध्येय होते.

स्वाध्याय

I. खालील रिकाम्या जागा योग्य पदांनी भरा.

1. 19 व्या शतकाला _____ चा काळ असेम्हटलेजाते.
2. राजा राम मोहन रॉय यांनी _____ हे वृत्तपत्र सुरू केले.
3. _____ यांनी प्रार्थना समाजाची स्थापना केली.
4. 'तरुण बंगाली चळवळ' _____ यांनी सुरू केली.
5. _____ हे स्वामी विवेकानंदाचे गुरु होते.
6. अँग्लो ओरिएन्टल कॉलेजची स्थापना _____ येथे झाली.

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

II. समूहात चर्चा करून खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.

1. ब्राम्हो समाजाची शिकवण कोणती?
2. 'वेदांकडे परत चला' या दयानंद सरस्वतीच्या विधानाचे विश्लेषण करा.
3. सत्यशोधक समाजाने प्रतिपादन केलेल्या सुधारणांचे विवरण करा.
4. अलिगढ चळवळीचे उद्देश कोणते?
5. रामकृष्ण मिशनची उद्दिष्टे स्पष्ट करा.
6. 'स्वामी विवेकानंद हे तरुणांचे प्रेरणास्थान होते' कसे ते स्पष्ट करा.
7. ॲनी बेझंट यांनी कोणकोणत्या सुधारणा केल्या?
8. 'श्री नारायणगुरु धर्मपरिपालन योगम्' या संघटनेचे योगदान कोणते?
9. पेरियार चळवळीतील प्रमुख घटनांची यादी करा.

उपक्रम :

1. जवळच्या रामकृष्ण आश्रमाला भेट देऊन विवेकानंदांच्या विचारांचे संकलन करा.

प्रकल्प :

1. वाचनालयास भेट देऊन समाज सुधारणेवरील पुस्तके वाचा. शिक्षकांच्या मदतीने इंटरनेटवरील अधिक माहिती मिळवा.
2. समाज सुधारणेसाठी कार्य करणाऱ्या सध्याच्या संस्थेविषयी शिक्षकांकडून माहिती मिळवून चर्चा करा.

***

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

प्रकरण - 6

भारतीय स्वातंत्र्याचे पहिले युद्ध (इ.स.1857)

या पाठातील खालील गोष्टीचा अभ्यास करूया :

- **पहिल्या स्वातंत्र्ययुद्धाची कारणे**
- **बंडाची तत्कालीन कारणे**
- **बंडाचा विस्तार आणि त्याचे स्वरूप**
- **बंडाचे अपयश आणि परिणाम**

भारतात इंग्रजानी आपला राज्यविस्तार वाढविण्याकरिता सहाय्यक सैन्य पद्धती आणि डॉक्टरीन ऑफ लॅप्स (खालसा तत्व) या दोन पद्धती अंमलात आणल्या. या पद्धतीमुळे बरेचसे प्रांत व राज्ये त्यांच्या वर्चस्वाखाली आली. त्यामुळे भारतीय लोक नाराज झाले. ब्रिटिशांच्या या शासनपद्धतीमुळे ते असंतुष्ट झाले. याच असंतोषाचे कारण म्हणजे '1857 चे बंड' होय. भारतीयांनी त्याला भारतीय स्वातंत्र्याचे पहिले युद्ध तर ब्रिटीश इतिहासकारानी त्याला 'शिपायाचे बंड' असे म्हटले आहे.

पहिल्या स्वातंत्र युद्धाची कारणे :

राजकीय कारणे : या तत्वानुसार ज्या स्थानिक राजांच्या गादीला वारस नाही अशी राज्ये खालसा करून इंग्रजी राज्यात समाविष्ट करण्यात आली. या धोरणानुसार डलहौसीने सातारा, झांशी, जयपूर, उदयपूर अशी विविध संस्थाने इंग्रजांच्या अधिपत्याखाली आली. डलहौसीने तंजावरचा नवाब आणि कर्नाटकचे नवाब यांची राज्यपदे काढून घेतली. याच पद्धतीने दिल्लीचा मोंगल बादशहा, अवधचा नवाब आणि अशा इतर अनेक राजांना सत्तेवरून काढून टाकले. परिणामत: या राजावर अवलंबून असलेले लक्षावधी सैनिक बेकार झाले. 1857 च्या युद्धाला हे एक प्रमुख कारण ठरले.

> **हे तुम्हाला माहित असू द्या**
> दत्तक वारसा नामंजूर या कायद्याप्रमाणे दत्तक पुत्राला कोणतेही अधिकार नव्हते. लॉर्ड डलहौसीच्या या पद्धतीमुळे वारस नसलेली संस्थाने खालसा केली गेली.

आर्थिक कारणे: इंग्लंडमध्ये झालेल्या औद्योगिक क्रांतीमुळे भारतीय कुटिरोद्योगांचा नाश झाला. भारतीय कारागीर बेकार झाले. इंग्लंडमध्ये झालेल्या औद्योगिक क्रांतीमुळे ते केवळ व्यापारी राष्ट्र न राहता औद्योगिक कार्यशाळेत त्याचे रूपांतर झाले होते. भारतातील सुतीवस्त्रे आणि लोकरी वस्तूंची पीछेहाट झाली. लाखो विणकर आणि कारागीर बेकार झाले. सुतीवस्त्रोद्योगांचा ऱ्हास झाला भारतातून इंग्लंडमधे आयात होणाऱ्या सुतीवस्त्रावर मोठ्या

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

प्रमाणात जकात कर लादला गेला. जमीनदारी पद्धतीत जमिनदारांनी गरीब शेतकऱ्यांची आर्थिक पिळवणूक चालवली, जमिनदार, शेतकरी आणि सरकार यामधील करवसुली करणारे हस्तक बनले. त्यानी तालुकादारांना दिलेला करवसुलीचा हक्क काढून घेतला गेला. स्थानिक राज्यकर्त्यांनी ज्या करमुक्त जमिनी जमीनदारांना बहाल केलेल्या होत्या त्या जमिनी सरकारने नेमलेल्या इनाम कमिशनने जप्त केल्या. यामुळे शेतकरी अपमानित आणि हवालदिल झाले. सरकारविरूद्ध बंड करण्यास जमीनदारांना हे एक कारण पुरेसे ठरले.

शासकीय कारणे : ब्रिटिशांनी दिवाणी आणि फौजदारी न्यायालयांची स्थापना केली ती फक्त भारतीयांसाठीच होती. इंग्रजी ही न्यायालयाची भाषा होती. बहुतेक करून इंग्रजांच्या बाजूनेच न्याय दिला जात असे. सामान्य लोकांच्या आकलनाबाहेर या पद्धती होत्या.

लष्करी कारणे : इंग्रजी सैन्यामधे असलेल्या भारतीय शिपायांची अवस्था अत्यंत हलाखीची होती. सैन्यातील अधिकाराच्या जागा, दाम दुप्पट पगार आणि संधी फक्त इंग्रजांना होत्या. भारतीय सैनिकांना योग्यता असूनही या संधी नाकारल्या गेल्या. शिपायांना समुद्र ओलांडून जाण्याची केलेली सक्ती ही आपणास जातीभ्रष्ट करण्याचा प्रयत्न आहे अशी सैनिकांची भावना झाली.

बंडाचे तात्कालिक कारण

भारतीय सैन्य संख्याबळामुळे आपण सर्वांनी एकजुटीने लढा दिल्यास इंग्रजांना भारताबाहेर सहजपणे पळवून लावू शकू असा आत्मविश्वास भारतीय सैनिकामधे बळावला. त्याचवेळी कंपनी सरकारने नवीन लांब पल्ल्याच्या 'रॉयल एन्फिल्ड बंदुका' वापरण्यास सुरवात केली. या बंदुकीसाठी जी काडतुसे वापरली होती त्याच्या आवरणात गाईची व डुकराची चरबी लावली आहे अशी अफवा सैन्यात पसरली. हिंदूना गाईची चरबी तर मुस्लीमांना डुकराची चरबी ही अधार्मिक बाब होती. हेच या बंडाचे तात्कालीक कारण होते.

या अफवेमुळे बराकपूरमधील सैन्य असंतुष्ट झाले. ज्यावेळी इंग्रजी अधिकाऱ्यानी जबरदस्तीने पायदळातील शिपायाना काडतुसे दातांनी सोलण्यास भाग पाडले, त्यावेळी तो आदेश धुडकावून वरिष्ठ अधिकाऱ्याविरुद्ध बंड केले. 'मंगल पांडे' या शिपायाला त्या गोष्टीचा राग येऊन आदेश देणाऱ्या इंग्रज अधिकाऱ्याला त्याने गोळी घालून ठार मारले. नंतर मंगल पांडेला फाशी देण्यात आली.

बंडाचा प्रसार

मीरत हे इंग्रज सैन्याचे प्रबळ तळ असलेले ठिकाण होते. मीरत येथील सैनिकांना चरबीयुक्त काडतुसे वापरण्याचा आदेश दिला तेव्हा तो धुडकावून लावण्यात आला. त्यांना तुरूंगात डांबण्यात आले. याचाच परिणाम म्हणून मीरत येथे बंड सुरू झाले. शिपायानी तुरूंग

www.textbookpdf.in

फोडून कैद्यांची मुक्तता केली. बंडाचा वणवा पेटण्यासाठी ही एक ठिणगी पुरेशी होती. मीरत येथील बंडखोर सैनिकांनी दिल्लीच्या दिशेने कूच केली. त्यांनी लाल किल्ल्याला वेढा घातला. आणि मोंगल राजा दुसरा बहादूरशहा याला सम्राट घोषित केले. वेगवेगळ्या ठिकाणांहून इतर बंडखोर शिपाई दिल्लीकडे येऊ लागले. अशा रीतीने बंडाची व्याप्ती वाढली. बघता बघता या बंडाने मीरत आणि कानपूर येथे उग्र स्वरूप धारण केले.

तात्या टोपे

नानासाहेबांनी कानपूर येथील बंडाचे नेतृत्व केले. तात्या टोपे हा त्यांचा सहकारी होता. झांशी येथे राणी लक्ष्मीबाईच्या नेतृत्वाखाली बंडाची सुरूवात झाली. ज्यावेळी इंग्रजानी कानपूर ताब्यात घेतले तेव्हा तात्या टोपे राणीच्या मदतीला झांशीला आला.

बंडाचे लोण लखनौ येथेही पोहचले. इंग्रजानी लखनौही ताब्यात घेतले. यमुनेच्या दक्षिणेकडे युद्धाचे लोण पसरले. त्याचा परिणाम असा झाला की झाशीतील सैन्याला चिथावणी मिळाली. 'दत्तक वारस नामंजूर' झाल्यामुळे क्रोधित राणी लक्ष्मीबाईने इंग्रजाविरूद्ध युद्ध घोषित केले. तिने दत्तक मुलाला पाठीशी बांधले आणि ती युद्धात उतरली. तिने ग्वाल्हेर वर ताबा मिळविला. पण इंग्रजाबरोबर ज्यावेळी युद्ध सुरू झाले त्यावेळी ती धारातीर्थी पडली. आजही स्वातंत्र्ययुद्धाच्या इतिहासामध्ये राणीचे स्थान आदराचे आहे.

झांशीची राणी लक्ष्मीबाई

बंडाच्या अपयशाची कारणे

1857 चे बंड असफल होण्यास अनेक कारणे आहेत. ही स्वातंत्र्यसंग्रामाची चळवळ संपूर्ण भारतात पसरली नाही. भारताला स्वातंत्र मिळविण्यापेक्षाही चळवळ कांही ठराविक लोकांच्या हितापुरती मर्यादित राहिली. एकत्रितपणे उठाव होण्याऐवजी कांही अनपेक्षित कारणांचा तो स्फोट होता. इंग्रजी सैन्यामधील एकी आणि भारतीय सैन्यामधील असंघटितपणा हे अपयशाला कारणीभूत ठरले. बंडखोराना योग्य नेतृत्व आणि दिशा लाभली नाही. त्याचबरोबर अयोग्य युद्ध नीती, अकुशलता, नेतृत्वाचा अभाव, बेशिस्तपणा व दिशाहीनता या सारखी अनेक कारणे ही या असफलतेमागे होती. अनेक संस्थानिकानी इंग्रजाशी एकनिष्ठ राहून बंडवाल्याना पाठिंबा दिला नाही. बंडखोरानी लूट, दरोडे घातल्यामुळे त्यांनी जनसामान्यांचा विश्वास गमावला.

बंडाचे परिणाम

ईस्ट इंडिया कंपनीची भारतातील सत्ता संपुष्टात येऊन इंग्लंडमधील राणीने भारतातील राज्यकारभार आपल्या हाती घेतला. भारतातील राज्यकारभार राज्य सचिवाकडे सोपविण्यात

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

आला आणि तो ब्रिटिश पार्लमेंटला जबाबदार मानला गेला. इ.स. 1858 मधे इंग्लडच्या राणीने जाहीर घोषणा केली. या जाहीरनाम्यालाच 'भारताचा मॅग्ना चार्टा' असे म्हणतात. खालील घटकांचा त्यात समावेश होता-

1. ईस्ट इंडिया कंपनीने स्थानिक संस्थानिकांशी केलेला करार स्वीकारण्यात आला.
2. महत्वाकांक्षी प्रादेशिक विस्तारयोजनांना आळा बसला.
3. भारतीयांना स्थिर सरकार देण्याचे आश्वासन दिले.
4. कायद्यामधे समानता ठेवली गेली.
5. धार्मिक सहिष्णुता असेल. त्याचबरोबर भारतीयांच्या धार्मिक बाबतीत हस्तक्षेप केला जाणार नाही.

भारतीयांचा पाठिंबा, विश्वास संपादन केल्याशिवाय आपणाला येथे शांततेने राज्य करता येणार नाही याची जाणीव इंग्रजाना झाली. अन् भारतीयांच्यात राष्ट्रीयत्व प्रज्ज्वलीत झाले.

स्वाध्याय

I. खालील गाळलेल्या जागा योग्य पदानी भरा.

1. ब्रिटीश इतिहासकारांनी 1857 च्या स्वातंत्र्य युद्धाला ____ असे म्हटले आहे.
2. डलहौसीनी _____ हे धोरण अंमलात आणले.
3. 1857 च्या बंडात _____ ने ब्रिटिश अधिकाऱ्याला ठार केले.
4. झांशीच्या राणीने इंग्रजाविरूद्धाच्या युद्धात _____ हे ताब्यात घेतले.

II. खालील बाबीची समूहामध्ये चर्चा करा आणि उत्तरे द्या.

1. दत्तक वारस नामंजूर या तत्वाचे परिणाम काय झाले ते सांगा.
2. 1857 च्या युद्धाची आर्थिक कारणे कोणती होती?
3. 1857 च्या युद्धात शिपायांच्या धार्मिक भावना कशा दुखविल्या गेल्या?
4. पहिल्या स्वातंत्र्ययुद्धाला कारणीभूत असलेली तत्कालीन कारणे कोणती?
5. बंडाच्या अपयशाची कारणे नमूद करा.
6. 1858 मधे राणीने जाहीर केलेली आश्वासने कोणती?

III. उपक्रम

1. भारताच्या नकाशात दत्तक वारस नामंजूर या तत्वाखाली खालसा झालेले प्रदेश दाखवा.
2. 1857 चे बंड हे पहिले स्वातंत्र्य युद्ध होते यावर तज्ज्ञांची भाषणे आयोजित करा.

***

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

राज्यशात्र

प्रकरण - 1

भारतासमोरील आव्हाने व त्यावरील उपाययोजना

या पाठात आपण पुढील घटकांचा अभ्यास करूया.

- **बेकारी (बेरोजगारी)**
- **असमानता किंवा भेदभाव (लिंग, जात, प्रांतवाद)**
- **भ्रष्टाचार**
- **दहशतवाद**
- **जातीयवाद**
- **कार्पोरेट धोरण**

1947 पासून भारताला अनेक अंतर्बाह्य समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. या समस्या योग्य नियोजन आणि उत्तम व्यवस्थापनाने सोडविता येतात. आपल्या लोकशाही पद्धतीत केंद्र राज्य आणि स्थानिक पातळीवरील सरकारला लोकांची समस्या सोडविण्यासाठी सहकार्य करणे अपेक्षित आहे.

आपल्या देशासमोरील समस्या कोणत्या? हे जाणून घेणे हे प्रत्येक नागरिकाचे आद्य कर्तव्य नाही का? निश्चितच, आम्हा सर्वांना या राष्ट्रीय विषयांची व त्यावरील योग्य उपाय योजनांची माहिती असावयास हवी. यातील बहुतेक समस्या या मानवनिर्मित आणि राष्ट्रीय आपत्तीमुळे निर्माण झालेल्या आहेत. योग्य शासकीय सुधारणा, सक्षम राज्यकारभार, निःपक्ष न्याय-व्यवस्था आणि जनतेचे सहकार्य यांच्या सहाय्याने या समस्यांवर मात करता येते.

बेकारी (बेरोजगारी)

'बेकारी' म्हणजे काम करण्याचे सामर्थ्य असणाऱ्या व्यक्तीला कामाची किंवा उद्योगाची संधी न मिळणे होय. आज भारताच्या लोकसंख्येत प्रचंड वाढ झाल्यांने बेकारीची मोठी समस्या उद्भवली आहे. सतत वाढणारी लोकसंख्या व आधुनिक तंत्रज्ञानाचा वाढत्या प्रमाणातील वापर ही बेकारीची प्रमुख दोन कारणे आहेत. त्याशिवाय नैसर्गिक साधनसंपत्तीची कमतरता, शेतीवरील अवलंबन, लघुउद्योगांची कमतरता, कौशल्यपूर्ण शिक्षणाचा अभाव इ.मुळे बेकारीची समस्या तीव्र झालेली आहे. 2011 च्या जनगणनेनुसार गरीबीचा दर 21.9% इतका होता. यावरून बेकारीची समस्या दिवसेंदिवस वाढतच आहे हे सुचित होते. अशारितीने गरीबीच्या या भीषण परिस्थितीवर मात करण्यासाठी भारत सरकार व देशातील राज्य सरकारे

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

विविध प्रकारे उद्योगाच्या संधी उपलब्ध करून देणारे कार्यक्रम राबवित आहेत. यामध्ये व्यवसायासाठी आवश्यक असणारे कौशल्याधारित व दर्जेदार शिक्षण, स्वयंरोजगारासाठी लागणारे भांडवल कर्जस्वरूपात उपलब्ध करून देवून स्वयंरोजगाराला प्रोत्साहन देण्याचे प्रयत्न होत आहेत. परंतु वास्तविक पहाता हस्तव्यवसाय व स्वयंरोजगाराद्वारे तयार होणाऱ्या वस्तू जागतिकीकरणाच्या युगात आधुनिक औद्योगिकीकरणाद्वारे तयार होणाऱ्या वस्तूंपूढे स्पर्धेत टिकू शकत नाहीत. यामूळे बेकारीची समस्या कमी करण्यासाठी, आधुनिक बाजारपेठेत टिकण्यासाठी दर्जेदार तांत्रिक शिक्षण उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. तसेच देशातील प्रत्येक नागरिकांने एकातरी व्यवसायात गुंतून राहण्यासाठी पोषक वातावरण तयार केले पाहिजे. व्यावसायिक व तांत्रिक शिक्षण देवून सामाजिक बदल घडविला पाहिजे म्हणजे बेकारीच्या या भेडसावणाऱ्या समस्येचे निवारण करता येईल.

भ्रष्टाचार

भारतीय समाजात आज भ्रष्टाचार ही मोठी डोकेदुखी ठरत आहे. खरे पाहता समाजातील सर्वच स्तरात भ्रष्टाचाराला ऊत आला आहे. भ्रष्टाचार म्हणजे पैशाचे आमिष दाखवून अथवा लाच देवून बेकायदेशीर काम करून घेणे. भ्रष्टाचारामुळे सार्वजनीक क्षेत्रात लोक योग्य आणि कानूनबद्ध कामापासून दूर जातात. सर्व नितीनियम धाब्यावर बसवून वैयक्तिक फायदा करून घेतला जातो. भ्रष्टाचार हा संसर्गजन्य रोगासारखा आहे.

भ्रष्टाचाराचे अनेक दुष्परिणाम आहेत. याचा देशाच्या सामाजिक, आर्थिक, राजकीय व्यवस्थेवर थेट परिणाम होतो. दुसऱ्या शब्दात सांगायचे तर भ्रष्टाचार हा समाजविरोधी आणि आर्थिक सुव्यवस्थेच्या विरोधी आहे. हे राजकीयदृष्ट्या अपायकारक आणि नैतिकतेच्या दृष्टीकोनातून अत्यंत गैर आहे.

भ्रष्टाचाराचे प्रमाण पुढील पैकी 3 गोष्टीवर अवलंबून असते.

1. व्यक्तिची वैयक्तिक नितीमूल्ये आणि विचार.
2. सामाजिक मूल्ये अथवा नितीनियमांची जाणीव.
3. सरकारी व्यवहारामध्ये लाचखोरी, वशिलेबाजी, जातीयता,

भ्रष्ट व्यवहार या सगळ्या गोष्टी भ्रष्टाचारातच मोडतात. आपल्याला याचा दाखला निवडणूकांच्या कालावधीमध्ये सहजपणे दिसून येतो. सार्वजनिक जीवनात भ्रष्टाचार ठिकठिकाणी प्रवेश करताना दिसून येतो.

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

राजकीय भ्रष्टाचार संघटीत गुन्ह्याना प्रवृत्त करतो. सार्वजनिक क्षेत्रात अनेक ठिकाणी गुन्हे होताना आढळून येतात. करचुकवेगिरी, साठेबाजी, चोरटाव्यापार, अफरातफर, आर्थिक घोटाळा, विदेशी चलनासंदर्भातील नियमांचा भंग, व्यवसायिक गैरव्यवहार या गोष्टी देखील भ्रष्टाचाराच्या प्रकारात येतात.

भ्रष्टाचाराबद्दल बोलून, टीका किंवा फक्त उपहास करून, आहे त्या परिस्थितीत सुधारणा होणार नाही. तर, नैतिकतेच्या दृष्टीकोनातून प्रत्येक व्यक्तीने सामाजिक स्तरावर भ्रष्टाचाराला आळा घालण्याचा प्रयत्न केला पाहिजे. अनेक वेळा माणसांचा स्वाभाविक स्वार्थ, पूढील संकटांचा सामना करण्यासाठी आर्थिक तरतूद, वैयक्तिक फायदा या सगळ्या गोष्टी भ्रष्टाचाराला खतपाणी घालतात. शिथील व्यवस्थापन किंवा देखरेख आणि दुर्बल कायदे व्यवस्था भ्रष्टाचाराला वाट मोकळी करून देतात. म्हणूनच जर भ्रष्टाचाराचे समूळ उच्चाटन करावयाचे असेल तर दृढ राजकीय इच्छाशक्ती त्याचबरोबर सामान्य लोकांचा पाठिंबा असावयास हवा. दुसऱ्या शब्दात सांगावयाचे तर उत्तम राजकीय नेतृत्व, कार्यक्षम अधिकारी वर्ग, राजकीयदृष्ट्या परिपक्व आणि संवेदनशील नागरिक हे सर्वजण जर एकत्र आले तर भ्रष्टाचाराचे उच्चाटन करणे शक्य होईल. कर्नाटकात लोकायुक्त आणि लोकयुक्त कचेरी भ्रष्टाचाराला आळा घालण्यासाठी कार्यरत आहेत. समाजप्रमुख, शैक्षणिक संस्था, नेतेमंडळी हे देखील भ्रष्टाचाराची समस्या सकारात्मक रितीने हाताळू शकतात. सर्वच स्तरावर भ्रष्टाचाराशी संबंधित कठोर दंडात्मक उपाययोजना करणेदेखील अत्यंत आवश्यक आहे. याबबतीत शैक्षणिक संस्था पुढाकार घेवू शकतात. सरकारी कचेऱ्यांमध्ये C.C.T.V कॅमेरे बसवून व सरकारची कार्यक्षमता वाढवून भ्रष्टाचाराची तीव्रता कमी करता येते. भ्रष्ट अधिकाऱ्यांना कडक शासन करूनही हा बदल घडवून आणता येतो. तसेच न्यायालयांची व न्यायधिशांची संख्या वाढवूनही यावर नियंत्रण ठेवता येते. थोडक्यात सांगायचे झाले तर हा ज्वलंत प्रश्ना सोडविण्यासाठी सर्वांनी संयुक्तपणे प्रयत्न करणे अत्यंत गरजेचे आहे.

असमानता किंवा भेदभाव:

भारतामध्ये लिंगभेद, जातीभेद व प्रांतभेदही अस्तित्वात आहे. भारतीय समाज पुरुषप्रधान आहे. त्यामुळे समाजामध्ये स्त्री पुरुष असमानता आढळून येते तर स्त्री-पुरुषांच्या भूमिकाही वेगवेगळ्या आहेत. ही असमानता दूर करण्यासाठी निवडणुकांमध्ये 1/3 आरक्षण ठेवले आहे. कर्नाटकात स्थानिक निवडणुकामध्ये स्त्रियांना 50% आरक्षण दिले जाते. अशा अनेक उपायांद्वारे स्त्रीपुरुष असमानता किंवा लिंगभेद नष्ट करण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत.

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

लिंगभेदाप्रमाणेच जातीभेद हेही भारतापुढील एक मोठे आव्हान आहे. वर्णरचनेवर आधारित असणारा हा जातीयवाद भारतात पुरातन काळापासूनच अस्तित्वात आहे. भारतीय घटनेमध्येसुद्धा या जातीयवादाचे उच्चाटन करण्याविषयी तरतूद केली आहे. भारतीय संविधानाच्या तिसऱ्या कलद्यामध्ये नागरिकांना समानतेचा व स्वातंत्र्याचा हक्क प्रदान करण्यात आला आहे. या सर्व प्रयत्नांव्यतिरिक्त भारतात आजही जातीयवाद आढळून येतो. ही समस्या फक्त शासनाच्या किंवा कायद्याच्या प्रयत्नाने सुटणार नाही तर समाजातील सर्व व्यक्तींनी स्वत:हून दृढनिश्चय करणे गरजेचे आहे. त्याशिवाय या समस्येचे निर्मूलन होणे शक्य नाही.

लिंग व जातीभेदाबरोबरच प्रांतीयवाद ही सुद्धा देशाला भेडसावणारी एक महान समस्या आहे. देशातील कांही राज्यांनी प्रचंड प्रगती केली आहे तर कांही राज्ये अजूनही मागासलेलीच आहेत. हा असमतोल दूर करण्यासाठी भारतीय संविधानाच्या 371 कलमातील A ते J पर्यंतच्या कायद्यामध्ये दुरुस्ती करण्यात आली आहे. या दुरुस्ती अन्वये मागासलेल्या भागांना विशेष दर्जा दिला आहे. इतक्या उपायांव्यतिरिक्तही हा प्रश्न इतक्या पराकोटीला गेला आहे की कांही राज्ये स्वत:ला स्वतंत्र दर्जा देण्याची मागणी करीत आहेत. म्हणून या प्रादेशीक असमानतेचे समूळ उच्चाटन करण्यासाठी लवकरात लवकर कांही तातडीचे निर्णय घेणे आवश्यक आहे. कर्नाटकमध्ये ही असमानता दूर करण्यासाठी 2001 मध्ये डी.एम. नंजुंडप्पा यांच्या नेतृत्वाखाली विविध उपाययोजना असणारा एक विशेष अहवाल सादर करण्यात आला आहे. 371 (J) कलमांतर्गत कर्नाटकातील कांही अती मागासलेल्या भागांना विशेष दर्जा देण्यात आला आहे. आपण रहात असलेल्या प्रदेशाबद्दल अभिमान बाळगणे यालाच प्रांतियवाद असे म्हणतात.

जातीयवाद

जातीयवाद हा भारतीय समाजाचा सर्वात मोठा शत्रू आहे. धर्माच्या आधारावर संपूर्ण समाजाची विभागणी आणि त्यानंतर आपल्या धर्माबद्दलचा पराकोटीचा अभिमान आणि इतर धर्मांबद्दल असहिष्णुवृत्ती, जातियवाद, समाजामध्ये धार्मिक फूट पाडून किंवा विभाजन करून असुरक्षिततेचे वातावरण निर्माण करतो. यामूळे वेगवेगळे गट निर्माण होतात. आर्थिक वर्चस्व आणि राजकीय शत्रुत्व वाढीस लागते. थोडक्यात सांगायचे म्हणजे जातियवाद हा देशाच्या एकतेचा आणि समग्रतेचा मोठा शत्रु आहे. जातीयवाद हा धार्मिक आणि तात्विक फूट पाडतो. यामुळे दंगे होऊन जिवित आणि वित्तहानी होते. धर्माधर्मामध्ये किंवा समूहामध्ये द्वेष निर्माण करणे, अपमान आणि शारीरिक हल्ले व दंगे पसरविण्याचे काम जातीयवाद करतो.

www.textbookpdf.in

ब्रिटीशांच्या 'फोडा आणि राज्य करा' या नितीमुळे भारतात जातीयवादाची बीजे पेरली गेली आणि स्वातंत्र्यानंतर राजकीय पक्षाकडून विशेषतः निवडणूकांच्या दरम्यान जातीयवादाला खतपाणी घालण्यात आले. जातीयवादामुळे देशाचे हित दुर्लक्षिले जाते. यामुळे देशाची एकता आणि शक्ती भंग पावते. जातीयवादामुळे धार्मिक सलोखा नाहीसा होऊन शत्रुत्वाचे वातावरण निर्माण होते.

जातीयवादावर नियंत्रण ठेवण्यासाठी सक्षम उपाय योजना आवश्यक आहेत. समान नागरीक कायदा, समान वागणूक, जीवनाच्या सर्वच क्षेत्रात जात्यातीत मनोभावना, राष्ट्रीय एकात्मता या गोष्टी जातीयवादाला नियंत्रीत करू शकतात. राष्ट्रीय समाजाची धार्मिक, सामाजिक व आर्थिक विभागणी जातीयवादाला अधिकच गंभीर करते. भारतीय समाजातील सर्व जातीधर्माच्या लोकामध्ये सहज आणि निरोगी राष्ट्रीय भावना वाढविण्यासाठी प्रयत्न केले गेले पाहिजेत. धार्मिक मूलतत्ववादाला, देशाच्या राष्ट्रीयत्वाला अपाय करण्यापासून रोखले पाहिजे. मुलांना निधर्मी शिक्षणाचे धडे देऊन जातीयवादावर सकारात्मक उपाय योजले पाहिजेत. जनजागृती, अढळ राजकीय निर्धार, राजकीय पारदर्शीपणा, सक्षम कायदे पद्धत, राष्ट्रीय आदर्शवाद आणि निकोप प्रसार माध्यमे एकत्रीत आली तर जातीयवादावर पूर्ण नियंत्रण मिळविता येईल.

दहशतवाद

दहशतवादालाच आंतकवाद असेही म्हटले जाते. सरकारवर दबाव आणण्याची ही एक पद्धत आहे. राजकीय विचारसरणी, धार्मिक श्रद्धा व वैचारिक पात्रता यावर आधारित असणारा दहशतवाद व्यक्तीचे तथा जमातीचे नुकसान घडवू शकतो. दहशतवाद सांस्कृतीक व मानसिक हानीलाही कारणीभूत ठरतो. समाजामध्ये भीतीचे वातावरण निर्माण करून हिंसाचार घडवून आणणे हे दहशतवादी संस्थाचे उद्दिष्ट असते. अशा संघटनांच्या हिंसक कृतीना सरकार कायदेशीररित्या देशद्रोही ठरविते. 2001 मध्ये अमेरिकेच्या वर्ल्ड ट्रेड सेंटरवर झालेला बॉंबहल्ला, तसेच फ्रान्स ब्रिटन, पाकीस्तान, अफगाणिस्तान, इंडोनेशिया इ. देशातील विविध शहरामध्ये झालेले साखळी बॉंबस्फोट जागतिक स्तरावर काळजीचे वातावरण निर्माण करतात. दहशतवाद हा तीव्र धार्मिक भावना, वेगळेपण, वंशद्वेश किंवा डाव्या मतप्रणालीवर आधारित असतो.

बऱ्याचदा एक देश दुसऱ्या देशातील दहशतवादास आर्थिक पाठबळ देतो. दहशतवादी एखाद्या देशाच्या नागरिकांना, लष्कराला, कांही भाषिकांना, जातीना, जमातीना, वर्गीयांना

www.textbookpdf.in

उद्दिष्ट ठरवतात व दहशत घडवून आणतात. जिवीत हानीच्या आधारे अधिकाधिक भितीचे वातावरण निर्माण करणे हेही दहशतवादाचे उद्दिष्ट असते. त्यांचे उद्दिष्ट गाठण्यासाठी कांही स्फोटके आणि विषारी वायूंचा वापर करतात. दहशतवाद्यांच्या या कारवाया पूर्वनियोजित असतात. स्वतःच्या बुद्धीने आंतरजालाचा (internet) वापर करून ते दहशतवादी कारवाया करतात. यासाठी ते अत्याधुनिक उपकरणांचा व वाहतुकीच्या साधनांच्या वापर करतात. हल्ला करण्यासाठी ते विमानतळे, रेल्वे स्थानके, प्रमुख सरकारी कचेऱ्या, बाजारपेठासारख्या गर्दीच्या ठिकाणांना लक्ष्य करतात व हिंसाचार घडवून आणतात. त्यांच्या लपूर्तीसाठी अथवा ध्येयपूर्तीसाठी ते आत्मघाती बॉंब, निष्पाप लोकांचे अपहरण यासारख्या कारवाया करतात.

भारत हा जगातला एक असा देश आहेकी जो बऱ्याच वर्षापासून दहशतवाद्यांचे लक्ष्य ठरवला जात आहे. आसाम मिझोराम, नागालँड, मणिपूर, काश्मीर, पंजाब आणि इतर कांहीं राज्यामध्ये अनेक वर्षांपासून दहशतवाद सुरू आहे 26 नोव्हेंबर 2007 रोजी मुंबईतील ताज हॉटेलवर साखळी बॉंबस्फोट झाला. त्याचबरोबर संसदेलाही दहशतवाद्यांनी लक्ष्य बनवले आहे. दहशत निर्माण करण्यासाठी दहशतवाद्यानी हैदराबाद, चेन्नई, बेंगळूरु, बुद्धगया आणि इतर कांही शहरांनाही आपले लक्ष्य बनविले होते. भारतात दहशतवाद पसरविण्यासाठी पाकिस्तान व चीनसारखी आपली शेजारीराष्ट्रे दहशतवाद्यांना आर्थिक सहाय्य व पाठिंबा देत आहेत. भारतातील दहशतवादाविषयी इतर देशांकडून सतत टीका केली जाते. हा दहशतवाद थांबविण्यासाठी राज्य व केंद्र सरकार सतत प्रयत्न करीत आहेत. सामान्य माणसांचे जीवन व त्यांच्या संपत्तीचे रक्षण करण्यासाठी सरकार प्रयत्न करीत आहे. सरकारने दहशतवादी कारवायांवर आळा घालण्यासाठी विशेष पथके नेमली आहेत. भारत हा एक शांतता प्रधान देश असुन दहशतवाद रोखण्यासाठी अनेक उपाययोजना करीत आहे.

थोडेसे इतिहासात डोकावून पाहिल्यावर लक्षात येते की दहशतवादी हिंसाचाराने विशेष कांही साध्य झालेले नाही याउलट सत्य, अहिंसा, प्रेम यामूळेच इतिहास रचला गेला आहे. गांधीजी, इंदिरा गांधी, राजीव गांधीच्या हत्तेद्वारे कोणताही इतिहास रचला गेला नाही. तर बुद्ध, महावीर, येसू ख्रिस्त, महंमद पैगंबर, बसवेश्वर, गांधी, नेहरू, आंबेडकर, मर्टिन ल्यूथर, नेल्सन मंडेला आणि इतर कांही नेत्यांनी आपल्या कार्याद्वारे जगाला नवा प्रकाश, नवा मार्ग व नवे जीवन दिले आहे. हिंसा व द्वेष यापेक्षा शांतता व प्रेम यांचे स्थान केंव्हाही महान आहे.

स्त्रियांचे स्थान: स्वातंत्र्यपूर्व काळातील स्त्रियांचा दर्जा लक्षात घेता झाशीची राणी लक्ष्मीबाई, राणी कित्तूर चन्नम्मा, ॲनी बेझंट, कस्तुरबा गांधी सावित्रीबाई फुले, सरोजिनी

www.textbookpdf.in

नायडू इ. ची नांवे आठवतात. सध्या स्त्रिया शिक्षिका, डॉक्टर, इंजिनियर, वैज्ञानिक, अंतराळवीरा, पोलीस, राजकारणी, सुरक्षा दल इ सारख्या विविध क्षेत्रात कार्यरत आहेत. अजूनही स्त्रियांचा दर्जा उंचावणे आवश्यक आहे. सामाजिक रूढी, गरीबी, अशिक्षितता इ गोष्टी त्यांच्या विकासाच्या आड येतात. यामुळे राष्ट्रीय विकासाला खीळ बसतो. स्त्रियांचे शिक्षण आणि सबलीकरणासाठी सरकारने महिला आणि बालकल्याण खात्याची निर्मिती केली. याद्वारे महिलांचे आरोग्य शिक्षण, सामाजिक दर्जा सुधारला जातो. स्त्री शिक्षण बाल विवाह निर्मूलन कायदा, हुंडा प्रतिबंध कायदा इ मुळे स्त्रियांचे सबलीकरण झाले. कर्नाटक सरकारने ग्रामीण स्त्रियांच्या विकासासाठी स्त्री-शक्ती योजना अंमलात आणली. त्यांच्या स्वयंरोजगारासाठी आर्थिक सहाय्य आणि कर्जाची योजना आखण्यात आली. त्यांच्या सर्वांगिण विकासासाठी महिला-युवती मंडळे, स्त्रीशक्ती संघटना, स्वसहाय्यसंघ, सहकारी संस्था सहाय्य करतात. राष्ट्र आणि राज्य पातळीवर महिला आयोगाची स्थापना करण्यात आली. यानुसार स्त्रियांवरील खटल्यांची चौकशी होवून न्याय दिला जातो. विधानसभा आणि लोकसभेमध्ये स्त्रियांना आरक्षण देण्याचा प्रयत्न चालू असून सध्या स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये महिलांना आरक्षण देण्यात आले आहे नोकऱ्यामध्ये त्यांना राखीव जागाची तरतूद केली आहे.

प्रतिभाताई पाटील- पहिल्या महिला राष्ट्रपती

इंदिरा गांधी पहिल्या महिला पंतप्रधान



सरोजिनी नायडू प्रथम महिला राज्यपाल

सुचेता कृपलानी पहिल्या महिला मुख्यमंत्री

भारतामध्ये इंदिरा गांधी, प्रतिभासिंग पाटील या पंतप्रधान व राष्ट्रपती झाल्या. अशाप्रकारे असंख्य स्त्रियांनी राज्यपाल, मुख्यमंत्री, राजदूत यासारखी मानाची पदे भूषवून उत्तम कामगिरी केली आहे.

कार्पोरेट धोरण

21 व्या शतकाच्या प्रारंभापासून कार्पोरेट धोरण हे भारतापुढील सर्वात मोठे आव्हान आहे. एखाद्या कंपनीकडून अथवा संघटनेद्वारे पूर्वनिर्धारित उद्दिष्टे गाठण्यासाठी एकत्रितपणे केलेले प्रशासकीय प्रयत्न म्हणजेच कार्पोरेट धोरण होय. आजकाल कार्पोरेट धोरणांसाठी जागतिकीकरणाचे वातावरण व आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला जात आहे. कंपनीचा नफा वाढविणे हे या धोरणाचे मुख्य उद्दिष्ट आहे. यामूळे लोकांवर, समाजावर व देशावर

www.textbookpdf.in

नकारात्मक परिणाम होतात. बऱ्याचदा कार्पोरेट धोरणे सरकारच्या निर्णयांवरपण प्रभाव पाडतात. सकारात्मक बाजूने विचार केल्यास या कार्पोरेट धोरणांचा उपयोग कांही सामाजिक समस्या उदा. गरिबी, कुपोषण, आरोग्य, कौशल्य प्रशिक्षण आणि समाजातील बऱ्याच गोष्टी दूर करण्यासाठी होतो हे कार्यक्रम 'कार्पोरेट सोशल रिस्पाँसिबिलिटी' (CSR) या संस्थेद्वारे राबविले जातात.

योग्य कायेदशीर उपययोजना करण्यासाठी सरकारने पुढाकार घेवून आदेश देणे गरजेचे आहे. फक्त अशा कार्पोरेट धोरणांच्या पुढाकारानेच भारतीय समाजाला पुढे जाण्याचा मार्ग सापडू शकतो.

स्वाध्याय

I. रिकाम्या जागी योग्य शब्द भरा.

1. आपण रहात असलेल्या प्रदेशाबद्दल अत्यंत अभिमान बाळगणे याला _____ असे म्हणतात.
2. भारतात _____मध्ये भाषावार प्रांतरचना करण्यात आली.
3. भ्रष्टाचारावर नियंत्रण ठेवण्यासाठी कर्नाटकात _____ ही संस्था अस्तित्वात आहे.
4. 2011 च्या जनगणनेनुसार भारताची लोकसंख्या _____ कोटीपेक्षा जास्त आहे.

II. समूहात चर्चा करून उत्तरे लिहा.

1. जातीयवाद राष्ट्रीय एकात्मतेला कसा मारक आहे हे स्पष्ट करा.
2. प्रांतीयवाद राष्ट्रीय विकासात कशी बाधा आणतो? चर्चा करा.
3. स्त्रियांचा दर्जा उंचावण्यासाठी तुम्ही कोणते उपाय सुचवाल?
4. बेकारी नष्ट करण्यासाठी कोणकोणते उपाय करण्याची गरज आहे?
5. कर्नाटकात प्रांतीय असमतोल दूर करण्यासाठी कोणकोणते उपाय केले जातात?
6. 'कार्पोरेट धोरण' म्हणजे काय? सध्याच्या परिस्थितीबद्दल थोडक्यात माहिती लिहा.
7. दहशतवादाचे दुष्परिणाम कोणते?
8. दहशतवादाच्या निर्मूलनासाठी भारत सरकारने योजलेले उपाय कोणते?

III. उपक्रम

1. घटनेच्या कलम 371 अंतर्गत विशेष दर्जा दिल्या गेलेल्या राज्यांची यादी करा.
2. 'प्रांतीयवाद' देशातील ऐक्यास कसा बाधक ठरतो या विषयावर वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करा.
3. स्त्रियांच्या दर्जाबाबत चर्चा करण्यासाठी स्थानिक महिला प्रतिनिधींची मुलाखत घ्या.

***

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

प्रकरण - 2

भारताचे परराष्ट्र धोरण

या पाठात आपण खालील घटकांचा अभ्यास करुया.

- **भारताच्या परराष्ट्र धोरणाचे स्वरुप.**
- **पंचशिल तत्वे**
- **वर्णभेदाला विरोध**
- **अलिप्ततावाद**
- **निःशस्त्रीकरण**

आंतरराष्ट्रीय स्तरावर विविध देशांचे हितसंबंध कसे जोपासले जातात याचा आपल्याला अभ्यास केला पाहिजे. व्यक्ति एकाकी राहू शकत नाही. त्याचप्रमाणे राष्ट्र एकाकी राहूच शकत नाही त्याला आंतरराष्ट्रीय संबंध ठेवावेच लागतात. एखाद्या राष्ट्राने अवलंबिलेले धोरण म्हणजेच त्या देशाचे परराष्ट्र धोरण होय. सध्या प्रत्येक राष्ट्राला स्वतःचे असे स्वतंत्र परराष्ट्र धोरण अवलंबिण्याची गरज आहे. आपल्या विश्वकुटुंबात 200 सभासद राष्ट्रे आहेत. त्यापैकी काही अधिक शक्तीशाली आहेत तर काही कमकुवत आहेत. तरीसुद्धा प्रत्येकाचे स्वतंत्र असे परराष्ट्र धोरण आहे. म्हणून अनेक विद्वानानी असे म्हटले आहे की प्रत्येक सार्वभौम राष्ट्राचे स्वतंत्र असे परराष्ट्र धोरण असते. त्यांच्यामधे अंतर्गत व बाह्य धोरण असते.

स्वातंत्र्यपूर्व काळापासून भारताचे आजतागायत स्वतःचे असे स्वतंत्र परराष्ट्र धोरण आहे. प्रचंड लोकसंख्या, अगणित नैसर्गिक साधनसंपत्ती, असामान्य बुद्धिमत्ता, तांत्रिक क्षमता, औद्योगिक पात्रता, भक्कम सुरक्षा व्यवस्था इ. मुळे भारत हे जगातील एक प्रभावी राष्ट्र म्हणून ओळखले जाते. ठाम आणि विशिष्ट परराष्ट्र धोरण असणाऱ्या कांही राष्ट्रापैकी भारत हे एक राष्ट्र आहे.

हे माहित असू द्या -

कोणतेही धोरण असो, हितकारी परराष्ट्र धोरण अवलंबिणे ही एक कला आहे. आपण जगाच्या कल्याणाविषयी बोलू किंवा विचार करु शकतो. आपण शांतता आणि स्वातंत्र्या बद्दल परखडपणे मत व्यक्त करु शकतो. प्रत्येक देशाचे सरकार हे स्वतःच्या फायदयासाठीच कार्यरत असते. वर्तमानात किंवा भविष्यात देशाच्या हिताला बाधा येईल असे कोणतेही धाडस सरकारने अंगीकारु नये.

- जवाहरलाल नेहरु

1947 साली स्वातंत्र्य प्राप्तीनंतर भारत एक स्वतंत्र राष्ट्र बनले. जगातील इतर देशांशी मैत्री प्रस्थापित करण्यासाठी स्वतःचे असे परराष्ट्र धोरण त्याने अवलंबिले आहे. भारताच्या परराष्ट्र धोरणाची प्रमुख वैशिष्टये खालील प्रमाणे.

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

1. राष्ट्राची सुरक्षा
2. राष्ट्राचा आर्थिक विकास
3. भारताच्या सांस्कृतिक मूल्यांचे देशातंर्गत प्रसारण
4. मित्रराष्ट्रांची संख्या वाढविणे.
5. आंतरराष्ट्रीय शांतता प्रस्थापित करणे.

चर्चा करा

''हे जग दुष्ट आहे''. आपल्याला शांततेचा झेंडा सर्वत्र फड्कवायचा आहे परंतू आमच्या सारखे निष्पापी फसविले गेले आहेत''. चीनच्या अतिक्रमणानंतर नेहरुनी काढलेले हे उद्‌गार आहेत.

7 सप्टेंबर 1946 रोजी आपल्या रेडियोवरील भाषणात पंडीत जवाहरलाल नेहरुनी भारताच्या परराष्ट्र खात्याची सूत्रे हाती घेऊन ती यशस्वी करुन दाखविली. म्हणून भारताचे परराष्ट्र धोरण हे नेहरुंचे परराष्ट्र धोरण असे मानले जाते. राष्ट्रीय धोरणे, भौगोलिक स्थिती, राजकीय परिस्थिती, आर्थिक पद्धती, संरक्षण क्षमता, आंतरराष्ट्रीय वातावरण इ. गोष्टींचा प्रभाव आपल्या परराष्ट्र धोरणाच्या निर्मितीवर पडलेला आहे.

भारताच्या परराष्ट्र धोरणाची मूलभूत तत्वे :

1) पंचशील तत्वे : प्रत्येक देशाची सामाजिक आर्थिक आणि राजकीय पद्धती वेगळी असली तरी त्यांचे परराष्ट्र धोरण परस्परसहकार्यावर अवलंबून असते. चीनचे पंतप्रधान चाऊ-एन-लाय आणि भारताचे पंतप्रधान जवाहरलाल नेहरु यांनी जागतिक शांततेसाठी जून 1954 मधे पंचतत्वाचा अवलंब केला. ती पंचतत्वे खालील प्रमाणे. पंचशिल करारातील तत्वे पुढील प्रमाणे,

1. प्रत्येकाच्या प्रादेशिक ऐक्यतेचा आणि सार्वभौमत्वाचा परस्परांनी आदर करणे.
2. परस्परांनी, परस्परांवर, आक्रमण न करणे.
3. एकमेकांच्या वैयक्तिक व अंतर्गत बाबतीत ढवळाढवळ न करणे.
4. समानता आणि परस्परांचे फायदे याकडे लक्ष देणे.
5. शांततापूर्ण सहजीवन निर्माण करणे.

2) अलिप्ततावादी धोरण : दुसऱ्या महायुद्धानंतर जग दोन गटात विभागले गेले. अमेरिकेच्या नेतृत्वाखाली लोकशाही राष्ट्रे तर सोव्हियत रशियाच्या नेतृत्वाखाली कम्युनिस्ट राष्ट्रे असे दोन गट पडले या दोन महासत्ता (अमेरिका-रशिया) मधील संघर्षाला शीतयुद्ध (Cold war) म्हटले गेले यावेळी भारताने वेगळा मार्ग चोखाळला भारताने कोणत्याही गटात सामील न होता, जागतिक समस्या अथवा मुद्याबाबत स्वतःचे असे वेगळे मत मांडले. भारताच्या याच

www.textbookpdf.in

नितीला अलिप्ततावादी धोरण म्हटले जाते. भारताला अमेरिकेकडून अर्थसहाय्य तर रशीयाकडून संरक्षण सहाय्य मिळाले. अशा रितीने या दोन्ही राष्ट्रांचा भारताला पाठिंबा मिळाला. 1965 ते 1971 च्या दरम्यान इंडोपाकिस्तान युद्धाच्या वेळी नेहरू नंतर लाल बहादूर शास्त्री आणि इंदिरा गांधीजी ही आव्हाने बलशालीपणे पेलण्यासाठी हे धोरण अवलंबिले. अटलबिहारी वाजपेयी पंतप्रधान असतांना या अलिप्ततावादी धोरणामुळे भारत पाकिस्तान संबंध सुधारले.

तुम्हाला माहित असू दे

SAARC - सार्क (South Asian Association for Regional co-operation) : 8 डिसेंबर 1985 मध्ये दक्षिणपूर्व आशियायी राष्ट्रांची ही संघटना अस्तित्वात आली, भारत, श्रीलंका, भूतान, मालदीव, बांग्लादेश, नेपाळ, पाकिस्तान आणि आफगाणिस्तान ही सदस्य राष्ट्रे आहेत. 1986 चे सार्कचे संमेलन आपल्या राज्यात भरले होते.

3) वसाहतवादाला विरोध : वसाहत म्हणजे एखाद्या राष्ट्राने दुसऱ्या राष्ट्रावर नियंत्रण मिळवून स्वतःच्या फायद्यासाठी स्वार्थासाठी त्या राष्ट्राचा उपयोग करणे. ब्रिटीश साम्राज्यवादाचा बळी ठरलेल्या भारताने ही दुःखे भोगली आहेत म्हणूनच, भारत वसाहतवादाला तीव्र विरोध करतो. भारताने या वसाहतवादा विरोधात लढून स्वातंत्र मिळविले आणि आशियायी संमेलनामधे (1949-1955) स्वतःचे वसाहत विरोधी धोरण जाहिर केले.

4) वर्णभेदाला विरोध : वर्णभेद किंवा वर्णद्विष हा अमानवी प्रकार आहे. वर्णभेद म्हणजे एका वंशाच्या अथवा वर्णाच्या लोकांनी दुसऱ्या वर्णियांना खालच्या दर्जाचे समजून वाईट वागणूक देणे. भारताचे परराष्ट्र धोरण वर्णभेदाला तीव्र विरोध करुन विश्वातून वर्णद्विषाच्या समूळ उच्चाटनासाठी बद्ध आहे. विश्वातील सगळी माणसे समान आहेत हा विचार आमच्या परराष्ट्र धोरणातील महत्वाचा मुद्दा आहे. मूठभर गोऱ्या लोकांनी बहुसंख्य आफ्रिकन लोकांवर अंकुश ठेवला याची नोंद घेतली पाहिजे, नेल्सन मंडेलानी त्याला विरोध केला. त्यांना 'आफ्रिकेचे गांधी' असे संबोधले गेले. आफ्रिकेतील राष्ट्रीय काँग्रेसने आणि भारताने या चळवळीला पूर्ण पाठिंबा दिला.

5) निःशस्त्रीकरण : निःशस्त्रीकरण म्हणजे टप्या टप्प्याने शस्त्रांस्त्राचे उच्चाटन करणे. या शस्त्रास्त्रांचा साठा, निर्मिती आणि विक्रीच्या संदर्भात देशांतर्गत जीवघेणी चर्चा आहे. या स्पर्धेमुळे महायुद्ध होईल याची भीती सर्वांना भेडसावित आहे. प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षरीत्या किंवा गैरसमजूतीमुळे शस्त्रास्त्रांचा वापर देशाकडून केला जाण्याची शक्यता असते. शांतताप्रिय भारताला याचा वापर विघातक नव्हे तर विधायक कार्यासाठी करावयाचा आहे. अगदी

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

नेहरुंच्या काळापासून भारताने निःशस्त्रीकरणाला जागतिक शांततेसाठी विरोध केला आहे. प्रत्येक देशाला स्वतःच्या संरक्षणार्थ शस्त्रांची गरज असल्यामुळे संपूर्ण निःशस्त्रीकरण केवळ अशक्य आहे तरीसुद्धा भारताने जागतिक शांतता आणि सहकार्याचे धोरण अवलंबिले आहे.

कृती

इंटरनेटद्वारा भारताच्या आधुनिक परराष्ट्रधोरणासंदर्भात माहिती गोळा करा.

भारताच्या घटनेतील 51 वे कलम सूचीत करते की भारताचे परराष्ट्रीय धोरण आंतरराष्ट्रीय सहजीवन आणि आंतरराष्ट्रीय नियमांचा आदर करणारे आहे. भारताचे परराष्ट्र खाते आमच्या परराष्ट्र धोरणाची रुपरेषा ठरविते. हे करत असताना मात्र देशाच्या मूलभूत गरजा आणि लोकाभिप्राय निश्चितच लक्षात घेतलेला असतो. संयुक्त राष्ट्रसंघ (UNO), राष्ट्रकूल संघटना आणि सार्क या संघटनांना सहकार्य आणि त्यांच्या तत्वाचे हितरक्षण करणे ही देखील आमच्या परराष्ट्रधोरणाची एक बाजू आहे.

स्वाध्याय :

I. रिकाम्या जागा भरा.

1. भारताच्या परराष्ट्र धोरणाचे शिल्पकार _____ यांना म्हटले जाते.
2. जगातील कोणत्याही गटात सामील न होणे म्हणजे _____ धोरण होय.
3. स्वातंत्र्यापूर्वी भारत _____ या देशाची वसाहत होता.

II. खालील प्रश्नांवर समूहामध्ये चर्चा करुन त्यांची उत्तरे लिहा.

1. परराष्ट्र धोरण म्हणजे काय ?
2. ''परराष्ट्र धोरण राष्ट्राच्या विकासाला सहाय्यक असते'' कसे?
3. भारताच्या परराष्ट्र धोरणाचे ध्येय काय आहे ?
4. भारत वसाहतवादाच्या विरोधात का आहे ?
5. 'पंचशील तत्वे' कोणकोणती ?
6. 'सध्याच्या जगाला निःशस्त्रीकरणाची अत्यंत गरज आहे' असे भारत प्रतिपादन करतो का ? स्पष्ट करा.

III. उपक्रम :

1. वृत्तपत्रात येणाऱ्या विदेशी धोरणाबद्दल माहिती गोळा करुन त्याचा अल्बम तयार करा.
2. 'आंतरराष्ट्रीय समस्या उद्‌भवल्या तेव्हा भारताने पार पाडलेल्या भूमीकेबद्दल माहिती गोळा करा. उदा. सिरिया समस्या, श्रीलंका समस्या.

IV. प्रकल्प

1. भारत अलिप्ततावादी राष्ट्रांच्या अभिवृद्धीसाठी सहाय्य करतो या विषयावर चर्चा करा.

****

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

प्रकरण - 3

भारत आणि इतर राष्ट्रांचे नातेसंबंध

या पाठात आपण खालील घटकांचा अभ्यास करूया :

- **भारत - चीन संबंध**
- **भारत - पाकिस्तान संबंध**
- **भारत - रशिया संबंध**
- **भारत - अमेरिका संबंध**

ज्याप्रमाणे एका कुटुंबाचे दुसऱ्या कुटुंबाशी व्यावहारिक संबंध असल्याशिवाय त्या कुटुबांची प्रगती होवू शकत नाही त्याचप्रमाणे एका राष्ट्राचे दुसऱ्या राष्ट्राशी व्यावहारिक संबंध असल्याशिवाय ते राष्ट्र प्रगत होवू शकत नाही. सध्याच्या या जागतिकीकरणाच्या व आधुनिकीकरणांच्या युगात एखाद्या देशाला दुसऱ्या देशाशी चांगले संबंध ठेवणे गरजेचे नव्हे तर आनिवार्यच झाले आहे. आपल्या संविधानाच्या चौथ्या भागात 51 व्या कलमांतर्गत आंतरराष्ट्रीय शांती व साहचर्यभाव याबद्दलच्या मार्गदर्शक तत्वांची तरतूद केली आहे. संविधानाच्या या मार्गदर्शक तत्वानुसार भारताचे इतर राष्ट्रांशी सलोख्याचे व बंधुभावाचे संबंध आहेत.

शेजारील प्रमुख राष्ट्रांशी संबंध :

भारत व चीन :

चीन हे एक भारताच्या शेजारील बलाढ्य राष्ट्र आहे. भारत व चीन यांच्यामधील संबंध अगदी पूर्वापार म्हणजेच मेसापोटेमिया व सिंधू संस्कृतीपासूनचे आहेत. भारतामध्ये उदयास आलेल्या बौद्ध धर्माचा प्रसार चीनमध्ये झालेला आढळून येतो. प्राचीन काळापासूनच भारताचे चीनशी संबंध प्रस्थापित झालेले आहेत. अनेक भारतीय राजांचे चीनमधील राजांशी व्यापारी संबंध होते. भारत व चीनमधील रेशीम व्यापाराचा उल्लेख कौटिल्य अर्थशास्त्रात केलेला आहे. जेंव्हा भारत व चीन ही दोन सार्वभौम राष्ट्रे म्हणून उदयाला आली तेंव्हा पंचशील तत्वानुसार त्यांनी आपापले परस्पर हितसंबंध जपले. परंतू 1962 मध्ये तिबेट वाद चिघळल्यांने भारत व चीनमध्ये युद्ध झाले. या युद्धानंतर सीमावाद उद्भवला आणि आजतागायत हा संघर्ष सुरूच आहे. चीन अरूणाचलवर आपला हक्क सांगत आहे आणि हेच या दोन्ही देशांमधील संघर्षाचे प्रमुख कारण आहे. युद्ध आणि सीमावाद असूनही भारत व चीनमधील द्विपक्षीय संबंध मात्र अजूनही चांगलेच आहेत. लोकसंख्येच्या क्रमवारीत दोन्ही देश जगात प्रथम स्थानावर असून जगातली पुढारलेली राष्ट्रे म्हणून ओळखली जातात. 1980 नंतर चीन व भारतामध्ये उत्तम व्यापारी संबंध निर्माण होवून हे संबंध आणखीनच दृढ झालेले आहेत. याव्यतिरिक्त 2015 नंतर भारत व चीनच्या प्रयत्नांचे फलित म्हणून BRICS राष्ट्रांच्या समूहाची स्थापना झाली. यामूळे भारत चीन संबंध आणखीनच दृढ झाले. BRICS समूहामध्ये ब्राझील, रशिया, भारत, चीन व दक्षिण आफ्रिका या राष्ट्रांचा समावेश आहे.

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

भारत व पाकिस्तान : भारत व पाकिस्तान ही दोन शेजारी राष्ट्रे आहेत. पाकिस्तान हा आपला फक्त शेजारी नसून स्वतंत्र्यपूर्व काळात भारताचाच एक भाग होता. परंतू 1947 मध्ये भारत स्वातंत्र्य कायद्यानुसार या दोन सार्वभौम राष्ट्रांची रचना करण्यात आली. स्वातंत्र्यानंतर लगेचच दोन्ही देशांमध्ये परदेश-व्यवहार सुरू झाले. परंतू, जम्मू-काश्मीरवाद, दहशतवाद, पाणीवाटप यासारख्या समस्यांमूळे आत्तापर्यंत दोघांमध्ये 3 युद्धे झाली आहेत. हे द्वीपक्षीय संबंध सुधारण्यासाठी ताष्कंद करार, सिमला करार, लाहोर बस यात्रा, आग्रा परिषद इ सारखे अनेक प्रयत्न केले गेले आहेत. याबाबतीत दोन्ही देशांतर्गत अनेकवेळा बोलणी होवूनसुद्धा 2001 साली भारतीय संसदेवर झालेला हल्ला, 2008 मधील मुंबई बॉंबस्फोट आणि 2016 मध्ये झालेला पठाणकोटवरील हल्ला यासारख्या विध्वंसक घटनांमुळे दोन्ही देशांतील संबंध बिघडतच चालले आहेत.

> भारत पाकिस्तान संबंधित आलेल्या वृत्तपत्रातील बातम्यांचा संग्रह करा.

जम्मू-काश्मीर वादामुळे भारत-पाकिस्तानमध्ये अनेक वर्षापासून संघर्ष सुरूच आहे. तरीसुद्धा दोन्ही देशात कांही बाबतीत साम्य आहे. दोन्ही देशांमध्ये पूर्वीपासून असणारे सांस्कृतीक व आर्थिक परस्पर संबंध सुरूच आहेत. स्वातंत्र्यकाळापासून सुरु झालेले परस्परातील व्यापारी संबंध सुरूच आहेत. आणीबाणी व कांही नैसर्गिक आपत्तींच्या काळात दोन्ही देशांनी एकमेकांना सहाय्य केलेले आहे. व अजुनही करीतच आहेत.

प्रबल राष्ट्रांशी संबंध:

भारत आणि अमेरिका संबंध : भारत व अमेरिका ही जगातील सर्वात मोठी लोकशाही असलेली राष्ट्रे आहेत. हेच मैत्रीपूर्ण संबंध मात्र अलिकडच्या राजकीय जगात थोडेसे तणावाचे आहेत. 1947 पासूनच्या परस्पर संबंधात अनेक वेगवान बदल घडले आहेत जे, परस्परांच्या राष्ट्रीय हितरक्षणावर आधारित आहेत अलिप्ततावादी राष्ट्र (NAM) असल्याने भारतांने शीत-युद्धाच्या काळात लोकशाहीवादी अमेरिका आणि कम्युनिस्ट विचार सरणीचा रशिया यांच्या बरोबरील आपल्या नात्यात समान आणि सुरक्षित अंतर राखले आहे. अमेरिकेने भारताला आर्थिक विकासासाठी पंचवार्षिक योजनांच्या काळात आर्थिक मदत केली होती. 1962 मधील चीनच्या आक्रमणाच्या काळात देखील अमेरिकेने भारताला सहाय्य केले होते पण नंतरच्या अमेरिकन नेत्यानी भारत-पाक युद्धात पाकिस्तानला सहाय्य केले. बऱ्याचवेळा अमेरिकेच्या विदेशी धोरणाने पाकिस्तानला झुकते माप दिले. भारत व अमेरिका संयुक्तरित्या दहशतवादाचे निर्मूलन करण्याचा प्रयत्न करत आहेत. विदेशी व्यापार, विज्ञान आणि तंत्रज्ञान, अंतराळ आणि शिक्षण या क्षेत्रात भारत व अमेरिकेचे संबंध मैत्रीपूर्ण आहेत. संयुक्त राष्ट्रसंघाच्या आंतरराष्ट्रीय शांततेच्या तत्वाशी उभय देश कटीबद्ध आहेत. अमेरिकेचे लोकशाहीवादी राष्ट्राध्यक्ष व त्यांचे विदेशी धोरण यावर भारताचे बारीक लक्ष आहे. त्याला अनुसरुन भारत देखील अमेरिकेसंदर्भात आपले विदेशी धोरण ठरवितो.

©KTBS Not to be republished
www.textbookpdf.in

भारत आणि रशिया संबंध : भारत-रशिया मध्ये नेहमीच बंधुत्वाचे नाते आहे. रशियाच्या विघटनाच्या पूर्वीपासून सोविएत युनियन व भारत यांच्यात मैत्रीचे नाते आहे. जरी भारताने अलिप्ततावादी धोरण अवलंबिले असले तरी रशिया व भारताच्या दरम्यान राजकीय, आर्थिक आणि इतर क्षेत्रातील सहकार्य प्रगतीपथावर आहे. 1962 च्या चीनच्या आक्रमणाला रशियाने कठोर विरोध केला होता 1961 च्या गोवा-मुक्ती संदर्भात पोर्तुगालच्या विरोधात भारताला पाठिंबा दर्शविला होता. 1966 साली भारत-पाकिस्तान दरम्यान झालेल्या 'ताश्कंद करारात' रशियाने मध्यस्थी केली होती. 1971 मध्ये भारत-रशिया दरम्यान 20 वर्षांचा शांती, मैत्री व सहकार्याचा करार झाला होता. औद्योगिक आणि व्यापारवृद्धीसाठी बोकारो व भिलई येथील लोह-पोलाद उद्योगांच्या स्थापनेस रशियाने सहकार्य केले. संयुक्त राष्ट्र संघटनेच्या (UNO) सुरक्षा समितीत (Security Council) भारताला कायमचे सदस्यत्व मिळावे यासाठी रशिया प्रयत्नशील आहे.

याव्यतिरिक्त भारताचे भूतान, अफगाणिस्तान, मालदीव आणि इंडोनेशिया यासारख्या शेजारी राष्ट्रांशी सलोख्याचे संबंध आहेत.

स्वाध्याय

I. रिकाम्या जागी योग्य शब्द भरा.

1. पंचशील तत्वानुसार भारताचे _____ शी संबंध दृढ झाले.
2. आंतरराष्ट्रीय शांती आणि साहचर्यभाव याबद्दल आपल्या संविधानाच्या _____ कलमात तरतूद केली आहे.
3. 1962 मध्ये _____ ने भारतावर आक्रमण केले.

II. खालील प्रश्नांची उत्तरे समूहात चर्चा करून लिहा.

1. इतर राष्ट्रांशी उत्तम नातेसंबंधाची आवश्यकता का आहे?
2. भारत व पाकिस्तानमधील तणावाची कारणे कोणती?
3. भारत व चीनदरम्यान असलेले संबंध अलिकडेच बिघडलेले आहेत. कारणे द्या.
4. भारत व अमेरिका दोन लोकशाही राष्ट्रे आहेत. या दोन्ही देशातील परस्पर संबंध कसे आहेत याबद्दल सविस्तर माहिती लिहा.
5. भारत व रशियामधील संबंध कसे आहेत. स्पष्ट करा.

III. उपक्रम :

1. भारताचे इतर कांही देशांशी संबंध कसे आहेत याबद्धल अधिक माहिती गोळा करा.
2. भारताचा नकाशा काढून त्यामध्ये शेजारील राष्ट्रे दाखवा.

***

www.textbookpdf.in

©KTBS Not to be republished

समाजशास्त्र

प्रकरण - 1

सामाजिक स्तर

या पाठात आपण पुढील घटकांचा अभ्यास करुया.

- **सामाजिक असमानता (शिक्षण, लिंग, व्यवसाय, उत्पन्न. संधी आणि इतर).**
- **सामाजिक स्तर.**
- **अस्पृश्यता-एक सामाजिक समस्या.**
- **अस्पृश्यता निर्मूलनासाठी अंमलात आणलेली कायदेशीर उपाय योजना.**

सामाजिक असमानता

एक वस्तुस्थिती अशी आहे की निरनिराळ्या गुणांमुळे लोकांमधील स्तर विभागला गेला आहे. (लिंग. जात. व्यवसाय, वर्ग आणि वंश). हाच सामाजिक असमानतेचा पुरावा आहे. ही सामाजिक असमानता याप्रमाणे-उत्पन्नाचे मार्ग, शिक्षण आणि व्यावसायिक संधी, आरोग्याच्या सुविधा आणि राजकीय प्रतिनिधित्व आणि सहभाग. याचा अर्थ असा की अगोदरच अस्तित्वात असलेल्या सामाजिक संधींची असमानता हीच सामाजिक असमानतेचे कारण आहे. ही असमानता अशीच सुरु आहे. त्यामध्ये साहित्य, स्त्रोत. उत्पन्न, संधी, मान्यता, आणि सामाजिक स्तर. उदा. सामाजिक सेवांमधील लोकांसाठीच्या आरोग्य सुविधा, लोकशिक्षण आणि सामाजिक असुरक्षितता दुर्लक्षिली गेल्यामुळे गरीबांचे आयुष्य अवघड बनले आहे. त्यामुळे फारच थोडयाजणांकडे संपत्ती जमा होते. आर्थिक विकास आणि एकूण राष्ट्रीय उत्पन्नातील वाढीमुळे पन्नास अब्जाधीश आणि एक लाख लक्षाधीशांची निर्मिती होते. पण अन्न आणि सामाजिक सुरक्षितता, जात, उत्पन्न आणि लिंगावर आधारित भेदभावातील दुर्लक्षांमुळे आज समाजात असमानता दिसून येते.

शिक्षण आणि असमानता

समान संधी आणि सामाजिक न्याय माणसाला त्याच्या आयुष्यात मिळण्यासाठी शिक्षण हा एक विशेष घटक आहे. याचा अर्थ असा की सरकारने प्रत्येक मुलाला समान संधी देणे गरजेचे आहे. आपल्या घटनेमध्येच प्रत्येकाला सामाजिक न्याय देऊ केला आहे आणि हेच शिक्षणाचे ध्येय आहे. 39 व्या कलमानुसार, सामाजिक न्याय आणि लोककल्याण करणे हे राज्यसरकारचे कर्तव्य आहे. 45 व्या कलमानुसार, 14 वर्षाखालील मुलांना मोफत आणि सक्तीचे शिक्षण पुरवले पाहिजे. 19 व्या कलमानुसार, भाषण स्वातंत्र्य व स्वत:चे मत मांडण्याचे स्वातंत्र्य हा मूलभूत अधिकार मानण्यात आला. त्याचप्रमाणे अल्पसंख्यांक मुलांचे कल्याण करणे, त्यांना संधी उपलब्ध करुन देणे हे घटनात्मक कर्तव्य आहे 29 वे कलम

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

अल्पसंख्यांकांना सांस्कृतिक हक्कांचे संरक्षण पुरवते तर 30 नं. चे कलम अल्पसंख्यांक शैक्षणिक संस्था स्थापण्यासाठी मदत पुरवते. 46 व्या कलमामध्ये मागासवर्गीय जाती आणि जमातींना शिक्षण पुरवणे हे सरकारी कर्तव्य ठरवण्यात आले आहे.

सर्वोच्च न्यायालयाने 21 व्या कलमांतर्गत जगण्याचा हक्क हा शैक्षणिक हक्काशी जोडला आहे. शालेय शिक्षण पुरवण्याअंतर्गत सर्वोच्चन्यायालयाने दाखला दिला आहे की, शालेय शिक्षण हा एक मूळ हक्क आहे. या निर्णयानुसार मुलांच्या जीवनात एक नवी आशा पल्लवित झाली आहे. उन्नीकृष्णन विरुद्ध आंध्रप्रदेश सरकार यांच्यातील न्यायप्रविष्ट घटनेमध्ये 1993 साली सर्वोच्च न्यायालयाने ठणकावून सांगितले आहे की 21 A कलमानुसार 14 वर्षाखालील मुलांना शिक्षण हक्क मिळालाच पाहिजे.

या निर्णयानुसार न्यायालयाने सांगितले आहे की अंगणवाडी ते उच्च शिक्षणापर्यंत, संपूर्ण शैक्षणिक स्तराकडे समान दृष्टीकोनातून पाहिले पाहिजे. यामुळे, आपल्या देशातील सर्व नागरिकांना शिक्षणाचा मूलभूत हक्क मिळाला आहे. जगण्याच्या हक्काचाच तो एक भाग आहे.

पण निरनिराळ्या कायदेशीर घटनांमुळे शैक्षणिक संधीमध्ये असमानता निर्माण झाली आहे. शिक्षणातील निरनिराळ्या आर्थिक स्तरांमुळे ही असमानता वाढली आहे. तरीसुध्दा शिक्षणातील या असमान संधी, घटनेच्या कलमांच्या आधारे पूर्णपणे निकाली काढण्याचे प्रयत्न सुरु आहेत.

लिंग असमानता

आता आपण पाहूया की लिंग असमानता ही सामाजिक असमानता कशी निर्माण करते? खरे पाहता, आमचा सामाजिक दृष्टीकोन हा परस्परावलंबी आहे. म्हणजे, एका माणसाचे विचार दुसऱ्या माणसाच्या विचारावर प्रभाव पाडतात. असा व्यक्तीवरील प्रभाव हा त्याच्या कुटुंबातील सदस्यांचे विचार किंवा शेजारील व्यक्तींचे विचार यामुळे पडतो म्हणून प्रेरणादायी घटनाच एखादा मुलगा अथवा मुलीच्या शिक्षणाला पूरक ठरते. लिंग असमानता ही प्रामुख्याने शालेय शिक्षण आणि आरोग्याच्या सोयींमध्ये प्रकर्षाने दिसते.

2015-16 च्या राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षण (NFHS)-4 नुसार, कर्नाटकातील ग्रामीण स्त्रियांचा शरीर द्रव्यमान सूचकांक (Body Mass Index / BMI) हा 24.3 आहे तर शहरी स्त्रियांचा 16.2 आहे. याचाच अर्थ तो फारच कमी आहे. 6 महिने ते 56 महिन्यापर्यंतच्या मुलांमध्ये तीव्र अशक्तपणा असण्याचे प्रमाण 60.9% आहे. 45.2% गर्भवती महिलांना रक्तहीनतेची समस्या भेडसावते. अशा परिस्थितीत, स्त्रिया आणि मुलांना अन्न व पोषणद्रव्ये पुरवण्यात वाढ व्हायला हवी. यामुळे लिंग असमानता नाहीशी होईल.

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

सामाजिक स्तर

मानवी समाजात, लोकांमधील वर्गवारी ही श्रेष्ठ-कनिष्ठ, उच्च-नीच अशी विभागली गेली आहे. लोकांची हीच वर्गवारी आणि निरनिराळे स्तर, यालाच 'सामाजिक स्तर' म्हणतात.

सामाजिक स्तराची वैशिष्टये

1. सामाजिक स्तर ही सामाजिक धारणा आहे.

सामाजिक मान्यता आणि महत्व यावर हा स्तर आधारलेला आहे. कोणत्याही शारीरिक वैशिष्ट्यावर तो अवलंबून नाही. उदा एखाद्या व्यक्तीचा स्तर हा त्याची उंची, सौंदर्य, शक्ती यासारख्या शारिरीक वैशिष्ट्यावर अवलंबून नसून त्याचे शिक्षण उत्पन्न, व्यवसाय, बुद्धिमत्ता, कौशल्य आणि इतर सामाजिक वैशिष्ट्यांवर अवलंबून आहे.

2. सामाजिक स्तर हा सार्वत्रिक आहे

जेव्हा मानवी समाज अस्तित्वात आला, तेंव्हा सामाजिक स्तर हा श्रम विभागणी, व्यवसाय, उत्पन्न अणि इतर सामाजिक वैशिष्ट्यांवर आधारला गेला.

3. सामाजिक स्तर प्राचीन आहे

मानवाच्या जन्मापासूनच सामाजिक स्तर अस्तित्वात आहे. भटक्या समाजापासून ते सध्याच्या आधुनिक सुसंस्कृत समाजापर्यत हा सामाजिक स्तर आढळतो.

4. सामाजिक स्तर हा निरनिराळ्या मार्गाने अस्तित्वात आहे

सामाजिक स्तराला निरनिराळ्या भागात निरनिराळी नावे आहेत. उदा. प्राचीन रोममध्ये गरीब आणि श्रीमंत (प्लेबियन आणि पॅट्रीशियन) असा सामाजिक स्तर होता. तर भारतात कर्मावर आधारीत ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र असे चार वर्ण किंवा स्तर होते.

सामाजिक स्तराचे मुख्य प्रकार

जरी आज घडीला जगातील सर्व समाजामध्ये हे स्तर असले, तरी त्यांचे प्रकार मात्र निरनिराळे आहेत. पण त्यांची रचना व स्वरुप मात्र भिन्न आहेत. आता आपण जाणून घेऊया प्राचीन काळापासून ते आजच्या डिजीटल युगापर्यंत सामाजिक स्तर कसे आहेत ते याप्रमाणे

1) आदिवासी समाज (primitive society)
2) गुलामगिरी (slavery)
3) वतनदारी पध्दत (estates system)
4) वर्णव्यवस्था (varna system)
5) जाती व्यवस्था (caste society)

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

अस्पृश्यता - एक कलंक

सुरवातीला भारतीय समाजात वर्णव्यवस्था अस्तित्वात होती पण ही पध्दत का सुरु झाली हे मात्र संशयास्पद आहे. सामाजिक विभागणीची पध्दत म्हणून हे 'चार वर्ण' अस्तित्वात आले. कर्मावर आधारित ही पध्दत होती असे मानले जाते, ब्राम्हण-अभ्यास, अध्यापन, यज्ञातील सहभाग इ. क्षत्रिय राजकीय व्यवस्था; वैश्य - व्यवसाय, किंवा व्यापार; शूद्र-श्रमिक हे सर्व लोक ते ज्या वर्णाचे असतील, त्यांनी आपापली भूमिका पार पाडावी.

पण यामध्ये उल्लेख न केलेला एक वर्ग असाही होता की ज्यांना मनुष्य म्हणूनही कधी गणले गेले नाही आणि तो वर्ग म्हणजे अस्पृश्य. अस्पृश्यता ही वर्ण व्यवस्थेत अगदी सुरवातीपासून होती. स्पृश्य आणि अस्पृश्य यांचा संबंध हा अपवित्र आणि पवित्र या कल्पनांशी होता. ब्रिटिश सरकारच्या काळातील 1935 चा केंद्रिय कायदा. यामध्ये अस्पृश्य आणि आदिवासी लोकांना अनुसूचित जाती व जमाती म्हणून मानले गेले.

भारतरत्न डॉ. बी. आर. आंबेडकरांनी म्हटले आहे की, '' कांही लोकांना गावाच्या बाहेर का रहावे लागते, की ते बाहेरुन आलेले आहेत, किंवा त्यांना बाहेर हाकलले गेले आहे, या विश्लेषणाचे उत्तर अस्पृश्यतेचा उगम आणि पध्दतीवरुन शोधता येते''. गांधीजींच्या मतानुसार, ''अस्पृश्यता ही वर्ण व्यवस्थेतील भयंकर दुष्ट पध्दत आहे. हा भारतीय त्वचेला झालेला कुष्ठरोग आहे''. आंबेडकरांचा अस्पृश्यते विरोधी लढा फारच महत्वाचा आहे.

अस्पृश्यतेच्या समस्या

सामाजिक स्तरावरील कनिष्ठ दर्जा- समाजातील जातीय व्यवस्थेमध्ये अस्पृश्यतेला कनिष्ठ दर्जा देण्यात आला आहे. मनुस्मृतीनुसार, जो कोणी अस्पृश्यांना (चांडाळ) स्पर्श करेल, त्याला पुष्कळ वेळेस शुध्दीकरण करावे लागेल. व्याघ्रपाद स्मृतीनुसार एखादा स्पृश्य मनुष्य, एखादया अस्पृश्या पासून अगदी गाईच्या शेपटी एवढया अंतरावरुन गेला, तरी त्याला आंघोळ करुनच शुध्द होता येईल.

मलबारमध्ये, जे अस्पृश्य, पादत्राणे तयार करतात त्यांना ते वापरण्याचा हक्क नाही. स्पृश्यांनी वापरलेल्या विहिरी, तळे, कट्टा, दफनभूमी यांना स्पर्श करण्याचा अधिकार त्यांना नाही बी. कुप्पुमींच्या नुसार अस्पृश्यांनी आपल्याबरोबर फक्त रात्रीच मैला वाहून न्यावा, मेलेले प्राणी घेऊन जावेत आणि इतर अस्वच्छ कामे करावीत.

त्यांना जातीव्यवस्थेमध्ये सर्वात कनिष्ठ दर्जा देण्यात आला. त्यांना सामाजिक गतीशीलतेमध्ये मर्यादा घालण्यात आली, याचे मुख्य कारण म्हणजे त्यांचा जन्म.

शिक्षणापासून त्यांना अलिप्त ठेवण्यात आले- बऱ्याच शतकांपासून अस्पृश्यांना शिक्षणापासून अलिप्त ठेवण्यात आले. वेद मंत्रांचे श्रवण अथवा वाचन यापासूनही त्यांना लांब ठेवण्यात आले. संस्कृत शिकण्यापासूनही त्यांना दूर ठेवण्यात आले. कोणतीही धार्मिक पुस्तके त्यांनी

www.textbookpdf.in

वाचू नयेत. कोणत्याही स्पृश्य मुलांबरोबर खेळू नये आणि शिकू नये. अस्पृश्यांना चिकटलेल्या याच असभ्य शब्दामुळे त्यांना शिक्षणाच्या कक्षेपासून बाहेर ठेवण्यात आले.

शिक्षणामुळेच आंबेडकरांनी सामाजिक न्याय मिळावा ही आग्रहाची मागणी केली. भारतीयांच्या संदर्भात ही एक मोठीच गोष्ट होती. लोकशाहीमध्ये प्रत्येकाला त्याचा वैयक्तिक निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य आहे. प्रत्येकाने तात्विक विचार आणि कृती यांचे कौशल्य आत्मसात करावे. यासाठीच शिक्षणाचे महत्व अधोरेखीत व्हावे म्हणून आंबेडकरांनी लढा दिला.

माणसाच्या आयुष्यातील शिक्षणाचे महत्व कळल्यामुळेच आंबेडकरांनी 'शिक्षण ही सार्वजनिक मालमत्ता आहे' हे प्रतिपादले. याच क्रांतीकारी कल्पना आणि विचारामुळे आंबेडकरांनी भारताच्या घटनेमध्ये अनेक तरतूदी आणि निर्देश दिलेले आहेत. आणि म्हणूनच त्यांना 'भारतीय घटनेचे शिल्पकार' म्हणून ओळखले जाते.

मालमत्तेचा हक्क नाकारला- परंपरागतरीतीने, अस्पृश्यांनी स्वतःची मालमत्ता निर्माण करू नये आणि फक्त आपल्या मालकाची सेवा करावी अशी अपेक्षा होती. धर्मशास्त्रातील निर्णयानुसार त्यांना मालमत्ता बाळगण्याचा हक्क नाकारण्यात आला. हे अनैसर्गिक आहे आणि मानवाच्या नैसर्गिक हक्कांच्या विरोधी आहे.

राजकीय सहभाग नाकारला- लष्कर आणि राजकारण यामध्ये अस्पृस्यांनी सहभागी होऊ नये. बिटिशांच्या काळापर्यंत त्यांना राजकीय संधी नव्हती. कित्येक शतकांपासून त्यांना आरक्षणाचा हक्क आणि राजकीय हक्क नाकारण्यात आला. आंबेडकरांच्या प्रयत्नामुळे अस्पृश्यांना मूलभूत अधिकार आणि स्वातंत्र्य देण्यात आले.

भारतीय घटनेनेच अस्पृश्यतेचे समूळ उच्चाटन करण्याचे वचन दिले आहे आणि जगाच्या इतिहासात ही एकमेव घटना आहे. आमची घटना ही याट्टष्टीने महत्वाची आहे. याचा परिणाम म्हणून अनेक कायदेशीर कलमांचा अंतर्भाव अस्पृश्यता निवारण्यासाठी केला आहे.

अस्पृश्यतेच्या निर्मूलनासाठी केलेले उपाय (कायदे)

अस्पृश्यतेच्या निर्मूलनासाठी जोतिबा फुले, डॉ. बी. आर आंबेडकर इ.नी भरपूर प्रयत्न केले तरीसुध्दा अस्पृश्यतेचे पूर्णपणे निर्मूलन झालेले नाही. भारतीय समाजात अजूनही ही प्रथा अस्तित्वात आहे. म्हणून अस्पृश्यता उच्चाटनासाठी अनेक कायदे करण्यात आले आहेत.

भारतीय घटनेच्या 17 व्या कलमानुसार अस्पृश्यता निषिध्द मानण्यात आली आहे. 1955 साली भारत सरकारने 'अस्पृश्यता फौजदारी कायदा' अस्तित्वात आणला. 1976 मध्ये 'नागरिक हक्क संरक्षण कायदा' तयार करण्यात आला. 1955 मधील कायद्यात काही सुधारणा करण्यात आल्या. या कायद्यानुसार अस्पृश्यता पाळणे हा गुन्हा आहे. मतदान करणे आणि निवडणुकीत सहभागी होणे हा हक्क देण्यात आला. याशिवाय अनुसूचित जाती, जमाती व इतर मागासवर्गीयांना शिक्षण आणि नोकऱ्यामध्ये आरक्षण ठेवण्यात आले. अस्पृश्यतेच्या

www.textbookpdf.in

उच्चाटनासाठी 1989 च्या कायद्यानुसार राज्यसरकारला काही जबाबदाऱ्या देण्यात आल्या. याप्रमाणे स्वतंत्र भारताने सर्वजण समान आहेत याचा नारा दिला.

तुम्हांला माहिती असू द्या

- घटनेच्या 15, 16, 17, 38 आणि 39 व्या कलमानुसार भारतीय नागरिकांसाठी कोणत्याही प्रकारच्या भेदभावाचा निषेध करण्यात आलेला आहे.
- अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातींना 16 (4) आणि 320 (4) या कलमांन्वये नोकरीत आरक्षण ठेवण्यात आले आहे.
- अनुसूचित जाती आणि जमातींसाठी 330, 332, 334 या कलमानुसार राजकारणात आरक्षण ठेवण्यात आले आहे.
- 29 वे कलम शिक्षणाची सुविधा पुरवते.
- सार्वजनिक देवालयामध्ये प्रवेशासाठी 25 वे कलम परवानगी देते.

स्वाध्याय

I. योग्य शब्द भरुन खालील रिकाम्या जागा भरा.

1. भारतीय घटनेच्या _____ कलमानुसार अल्पसंख्यांक समाज शैक्षणिक संस्था उभ्या करू शकतो.
2. _____ कलमान्वये अस्पृश्यतेचे उच्चाटन करण्यात आले.
3. ''अस्पृश्यता फौजदारी कायदा'' _____ मध्ये अस्तित्वात आला.

II. गटचर्चा करून खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.

1. सामाजिक असमानतेची कारणे काय आहेत?
2. लिंग असमानता कशी पसरली?
3. सामाजिक स्तराची वैशिष्टये कोणती?
4. अस्पृश्यता हा सामाजिक कलंक आहे कसा? चर्चा करा.

III. उपक्रम

1. तुमच्या खेडयातील सामाजिक असमानतेमुळे उद्भवलेल्या समस्यांची यादी करा.

IV. प्रकल्प

1. तुमच्या शाळेत एखाद्या कायदेतज्ज्ञाला पाचारण करा त्यांचे अस्पृश्यता आणि सामाजिक असमानता यावर व्याख्यान आयोजित करा.

***

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

प्रकरण - 2

श्रम

या प्रकरणात आपण खालील घटकांचा अभ्यास करु या.

- **श्रम विभागणी.**
- **नोकरी, व्यवसाय अथवा श्रमामधील असमानता आणि भेदभाव.**
- **मजुरीसहित आणि मजुरीरहित श्रम.**
- **संघटित व असंघटित क्षेत्रातील मजूर / कामगार.**
- **असंघटीत कामगारांसमोरील आव्हाने.**

श्रमविभागणी - (Division of Labour)

श्रमविभागणीबद्दल प्लेटो यांनी आपल्या 'दि रिपाब्लिक' या पुस्तकात लिहिले आहे, ''मानवी समाज नैसर्गिक असमानतेमुळेच बनला आहे व ही असमानता श्रमविभागणीवरच आधारित आहे'' समाजाला लागणाऱ्या अत्यावश्यक सुविधा व वस्तूंचा पुरवठा करण्यासाठी विविध वर्गातील श्रमिक लोकांची गरज भासते. उदा. समाजाला अत्यावश्यक असणाऱ्या अन्नधान्याचे उत्पादन करण्यासाठी शेतकरीवर्गाची गरज आहे, वस्त्रपुरवठ्यासाठी विणकरवर्ग हवा, कपडे शिवण्यासाठी शिंपी हवा, श्रमविभागणीतील या सर्व वर्गातील कामगारांच्या परस्परावलांबित्वामुळे समाजामध्ये ऐक्य निर्माण होण्यास मदत होते श्रमविभागणीमुळे समाजाच्या आर्थिक, सामाजिक व राजकीय गरजा पुरविल्या जातात. श्रमविभागणीमध्ये शोषणाला अजिबात वाव असू नये.

कार्ल मार्क्स श्रमविभागणी बद्दल म्हणतात ''श्रमविभागणीमुळे अकुशल कामगारांची निर्मिती होते'' त्यांनी श्रमाची विभागणी सामाजिक व आर्थिक अशा दोन विभागात केली आहे. आर्थिक श्रमविभागणी तांत्रिक घटकांबरोबरच जास्तीत जास्त कामगारांच्या सहकार्यामुळेच यशस्वी होते असे कार्ल मार्क्स यांचे मत आहे, तसेच सामाजिक श्रमविभागणी ही वर्ग, दर्जा (स्थिती) व सामाजिक स्तर इ द्वारे नियंत्रित केली जाते असे ते म्हणतात.

औद्योगिकरणानंतरच्या काळामध्ये मात्र वेगळ्या पद्धतीची श्रमविभागणी आपल्याल पहायला मिळते. सध्याच्या माहिती अथवा डिजीटल विश्वात श्रमविभागणीचे प्रकार संगणकाद्वारे रुपांतरित केले जातात उदा. माहिती तंत्रज्ञानावर आधारित नेटवर्क सोसायटीमध्ये व्यक्तींची श्रमविभागणी त्याला अवगत असणाऱ्या विविध संगणकीय कौशल्यांवर, ज्ञानावर केली जाते हे आज आपण पहातो आहोत. उदा. आपल्याला एखादा आजार झाला तर आपल्या शरीराच्या अंतर्गत तपासणीकरिता आपल्याला वेगवेगळ्या

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

तज्ज्ञांकडे जावून वेगवेगळ्या तपासण्या करून घ्याव्या लागतात. या यंत्रांवर आधारित तपासण्या करण्यासाठी त्यातील तज्ज्ञ तंत्रज्ञांचीच गरज असते श्रमविभागणीमुळेच एखाद्या क्षेत्रात, एखाद्या व्यक्तीला 'विशेष नैपुण्य' प्राप्त होवू शकते 'विशेष नैपुण्य' म्हणजे एखाद्या विशिष्ट क्षेत्रात विशेष व्यक्तीने अवगत केलेले विशेष कौशल्य, प्राविण्य, ज्ञान, अथवा प्रशिक्षण होय. या श्रमविभागणी मुळेच आज लोक विविध क्षेत्रात आपल्या ज्ञानाच्या व कौशल्याच्या आधारे आर्थिक लाभ घेवू शकतात. आर्थिक हितासक्ती व श्रमविभागणीमुळे वर्गव्यवस्था निर्माण झाली. श्रमविभागणीच्या या विस्तीर्ण स्वरूपामुळेच सर्व क्षेत्रातील व्यवसाय व व्यापार वृद्धींगत झाले. आणि याचा परिणाम असा झाला की, कांही लोक यामध्ये भांडवल गुंतवू लागले व मोठ्या प्रमाणात त्याचा लाभ घेवू लागले.



नोकरी, व्यवसाय अथवा श्रमामधील असमानता आणि भेदभाव

श्रम म्हणजे एखाद्या व्यक्तीने शारिरीक अथवा बौद्धिक परिश्रमाद्वारे पैशाच्या अथवा वस्तूच्या रूपात मोबदला मिळविणे. मानवी समाजामधे श्रमाला अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. श्रम हे असे एक कार्य आहे की त्याद्वारे कांहीतरी मिळविण्याच्या हेतूने ते केले जाते. एखाद्या व्यक्तीच्या शक्तीने अथवा परिश्रमाने आर्थिक किंवा वस्तूरूपात मोबदला मिळणार असेल तर त्याला 'श्रम' म्हणतात.

जेंव्हापासून श्रेणीवर आधारित श्रमविभागणी सुरू झाली तेंव्हापासूनच समाजामध्ये श्रमातील असमानतेला प्रारंभ झाला. म्हणूनच भारताच्या बाबतीत श्रम हे फक्त आर्थिक विषयांशी संबंधित नाहीत. तर ते सामाजिक रचनेतील असमानतेचा एक भाग बनले आहेत भारतात श्रम हे पैशाच्या मोबदल्याबरोबरच जात, प्रदेश, लिंग, धर्म यांच्या आधारावर अनेक प्रकारच्या असमानतेमध्ये विभागले गेले आहेत. यामुळे सर्व क्षेत्रात असमानता दिसून येते. भारताच्या या सामाजिक व्यवस्थेवर आधारित एखादी व्यक्ती खालच्या स्तरावरून वरच्या हुद्दयावर गेली तर त्याचे अधिकार व त्याला मिळणारे उत्पन्न या दोन्ही गोष्टीमध्ये वाढ होते.

'समान कामासाठी समान वेतन' या नियमाच्या विरोधात जर वेतन/मोबदला मिळत असेल तर त्याला श्रमातील असमानता असे म्हणतात. दोन व्यक्ती एकाच प्रकारचे काम

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

एकाच वेळी करत असतांना, एका व्यक्तीला जास्त मोबदला व एका व्यक्तीला कमी मोबदला मिळत असेल तर त्याला 'श्रमातील असमानता' असे म्हणतात. तसेच कांही वेळा जास्त श्रम करूनही कमी मोबदला तर कमी श्रम करून जास्त मोबदला दिला जातो त्यावेळीही 'श्रमातील असमानता' दिसून येते. तसेच महिला व पुरुष एकाच प्रकारचे काम करीत असूनही त्यांना समान मोबदला दिला जात नाही. भारतामध्ये पुरुषांना जास्त व महिलांना कमी मोबदला दिला जातो.

सरकारी क्षेत्रात अशा प्रकारची असमानता दिसून येत नसली तरी हुद्दयानुसार अथवा दर्जानुसार ही असमानता आढळून येते. परंतु खाजगी कंपन्यामध्ये आणि कार्पोरेट क्षेत्रात कुणाला किती मोबदला अथवा वेतन मिळते ते इतरांना अजिबात समजत नाही. या क्षेत्रात प्रचंड प्रमाणात असमानता आढळते. ही असमानता असंघटित क्षेत्रात मोठ्या प्रमाणात आढळून येते. कृषी क्षेत्रात लिंग, वय व क्षमतेच्या आधारे मोबदला दिला जातो. इथे स्त्रियांना मिळणाऱ्या कमी वेतनाबद्दल अथवा मोबदल्याबद्दल फारसा विचार केला जात नाही. उदा. शेतकरी कुटुंबात शेतीविषयक अनेक कामे महिलांना करावी लागतात. महिलांना पहाटे लवकर उठून शेतावर जाणाऱ्या लोकांसाठी स्वयंपाक (चहा, नाष्टा, जेवण इ.) तयार करावा लागतो. तसेच घरातील सर्व छोटी-मोठी कामे तर त्या पूर्ण करतातच परंतु शेतीसंबंधीतही बरीच कामे त्या पूर्ण करतात. यानंतर पुन्हा त्या शेतावरही जावून काम करतात. असे असूनही कामाचा मोबदला देत असताना मात्र त्यांना पुरुषांपेक्षा कमी मोबदला दिला जातो. सर्व समाजामध्ये महिलांच्या श्रमांना फारसे महत्त्व दिले जात नाही. तसेच श्रमातील मोबदल्यातही असमानता आढळून येते हे प्रमाण खेड्यापेक्षा शहरामध्ये कमी आहे. परंतु खेड्यामध्ये आढळणाऱ्या या असमानतेचे प्रमाण कमी करण्यासाठी विशेष प्रयत्न केले पाहिजेत.

सुशिक्षित व अशिक्षित लोकांमध्येही फार मोठ्या प्रमाणात असमानता आढळून येते आपल्याकडे (ग्रामीण व शहरी) सर्वच ठिकाणी काम करणाऱ्या सफाई कामगारांना (रस्ते, गटारी साफ करणाऱ्यांना) अत्यल्प मोबदला मिळतो. आपला समाज व परिसर स्वच्छ ठेवण्यासाठी त्यांच्या श्रमांना खूपच महत्त्व दिले गेले आहे. तरीसुद्धा आजही आपल्याला समाजात वर्ग, लिंग, वेतन, प्रदेश, जाती व धर्मांच्या आधारे असमानता दिसून येते. श्रमाम धली ही असमानता मजुरीसहित व मजुरीरहित अशा दोन प्रकारात विभागलेली आहे. ही असमानता कशा स्वरूपात आढळते याबद्दल आपण आता चर्चा करू.

उपक्रम : '1976 च्या समान वेतन कायद्या' बद्दल अधिक माहिती समजून घेवून समाजातील ही श्रमांची, असमानता कशी दूर करता येईल याविषयी विद्यार्थ्यांशी चर्चा करा. व त्यांना समानतेचे महत्त्व पटवून द्या.

www.textbookpdf.in

मजुरीसहित व मजुरीरहित श्रम

मजुरीरहित श्रम : एखाद्या व्यक्तीकडून एखादे काम कोणत्याही प्रकारच्या पैशाच्या रूपात अथवा वस्तूच्या रूपात मोबदला न देता करून घेणे म्हणजेच मजुरीरहित श्रम होत.

कांहीवेळा कोणताही आर्थिक लाभ अथवा मोबदला न घेता श्रम केले जातात. या प्रकारच्या श्रमामध्ये कामगार आपल्या कामाचा मोबदला न घेता काम करीत असतात. सहसा अशा प्रकारचे श्रम हे कुटुंबातील सदस्यांमार्फत सहकार्याच्या भावनेने कांही वेळा सक्तीने, कांहीवेळा स्वयंप्रेरणेने तर कांही वेळा प्रेमाच्या भावनेतूनही केले जातात. उदा. शाळेतील अथवा कॉलेजमधील विद्यार्थी कोणत्याही प्रकारचा आर्थिक लाभ अथवा मोबदला न घेता 'स्काउट अँड गाईडस्', राष्ट्रीय सेवा योजने (N.S.S) मध्ये सहभागी होवून श्रम करतात. कांहीवेळा शिक्षण संपल्यानंतर शिक्षणाचाच एक भाग म्हणून कांही शैक्षणिक संस्थामध्ये काम करतात. कांही कोर्स करतात. या कालावधीत त्यांनी केलेल्या श्रमाचा कोणताही मोबदला त्यांना मिळत नाही. उदा. आय. टी. आय, नर्सिंग सारखे कोर्स, तसेच एखादा चित्रकार आपल्या आत्मसमाधानासाठी एखादे चित्र काढत असेल तर तेंही मजुरीरहित श्रमामध्येच मोडते.

सामान्यतः मजुरीरहित श्रम हे कुटुंबामध्ये आढळतात. कौटुंबिक श्रमामध्ये महिलांवर श्रमाचा भार जास्त पडतो. मजुरीरहित श्रम करणाऱ्या महिलांबद्दल स्त्री विषयक अर्थशास्त्रा मध्ये बऱ्याचदा चर्चा, उहापोह झाला आहे. घरकामाशी जखडल्या गेल्यामुळे या महिलाना कुटुंबाबाहेर जाऊन कमाई करणे शक्य होत नाही. महिला कुटुंबातील सदस्यांच्या अथवा जीवनसाथीच्या कमाईमध्ये औपचारिकपणे सहभागी होवून आपला संसार शहाणपणाने चालवितात. यालाही मजुरीरहित श्रमच म्हटले जाते. अलिकडील काळात कुटुंबातील जबाबदाऱ्या समर्थपणे पेलण्यामध्ये महिलांचा सहभाग अत्यंत महत्त्वाचा आहे कुटुंबातील या जबाबदाऱ्या पेलण्यासाठी व सर्व प्रकारची कामे करण्यासाठी त्यांना कोणताही मोबदला मिळत नाही म्हणूनच ते मजुरीरहित श्रमामध्ये मोडतात.

मजुरीसहित श्रम

ठराविक मोबदल्यावर अथवा वेतनावर तासांवर, दिवसावर, आठवड्यावर अथवा महिन्यावर आधारित केलेल्या शारीरिक, अर्धकुशल, कुशल कामाला मजुरीसहित श्रम असे म्हणतात. मजुरी म्हणजे कामाच्या अवधीवर आधारित दिला जाणारा मोबदला होय. हा मोबदला तासावर, दिवसावर अथवा महिन्यावर दिला जातो. चरितार्थ चालविण्यासाठी केलेले छोटेमोठे व्यापार व श्रम, या गल्लीबोळातील छोट्या-मोठ्या व्यापारापासून ते अतिमोठ्या व्यापारापर्यंत केल्या जाणाऱ्या सर्व प्रकारच्या श्रमांना, शेतीवाडीवर केलेले श्रम, औद्योगिक क्षेत्रामधील श्रम, शाळेतील शिक्षकांचे श्रम, बांधकाम मजुराचे श्रम, वीटभट्टीवरील

©KTBS Not to be republished
www.textbookpdf.in

कामगाराचे श्रम, वाहनदुरुस्ती करणाऱ्या गॅरेज कामगाराचे श्रम, यासारख्या अनेक प्रकारच्या श्रमांना मजुरीसहित श्रम अथवा चरितार्थासाठी केलेले श्रम असे म्हणतात. आजकाल समाजामध्ये जगण्यासाठी वरील प्रकारचे सर्व श्रम करणे अपरिहार्य आहे. वरील क्षेत्रांमध्ये काम करणाऱ्या कामगारांना मोबदला/वेतन न मिळण्याची शक्यता क्वचितच आढळून येते.

मोबदला/वेतन हा कामगार व मालक यांच्यामधील एक प्रकारचा करार असतो. कांहीवेळा हा मोबदला कंत्राटी स्वरूपात अथवा वस्तूच्या रुपात दिला जातो. प्राचीन काळात प्रत्येक व्यक्तीमध्ये पारंपरिक कौशल्य असायचे. त्यामुळे एका भागात रहाणाऱ्या व्यक्तींमध्ये परस्परावलंबन आढळत असे. यामुळेच प्राचीन काळात आर्थिक व्यवहारामध्ये पैशांचा वापर अत्यंत कमी होत असे. विविध जाती व वर्गामध्ये असणाऱ्या परस्परावलंबनाला अतिशय महत्त्व दिलेले होते. गावातील अंतर्गत, आर्थिक व्यवहार एका वस्तूच्या बदल्यात दुसऱ्या वस्तूच्या देवाण-घेवाणीद्वारे होत असत. बऱ्याचवेळा शारिरिक श्रमाच्या बदल्यात दिला जाणारा मोबदला हा वस्तूच्या रूपात अथवा धान्याच्या रुपात दिला जात असे. या पद्धतीला त्यावेळी 'वस्तूविनिमय पद्धत' (Barter System) असे म्हणत. जसजसा पैशाचा वापर वाढत गेला, तसतसा श्रमाचा मोबदला पैशांच्या स्वरूपातच दिला जावू लागला. 'वस्तूविनिमय पद्धती' मधील कांही दोष व अडचणींमुळेच श्रमाचा मोबदला पैशाच्या रूपात देण्याची पद्धत वाढली असे अनेक समाजशास्त्रज्ञांचे मत आहे.

संघटित व असंघटित क्षेत्रातील श्रम अथवा कामगार

संघटीत क्षेत्रातील कामगार

श्रम हे प्राथमिक, माध्यमिक, व तृतीय अशा तीन क्षेत्रामध्ये विभागलेले आहेत. त्याचप्रमाणे श्रमांच्या परिस्थिती व सुविधांच्या आधारे त्याचे पुन्हा दोन भाग पडतात - संघटीत कामगार व असंघटीत कामगार. जी क्षेत्रे सरकारी नोंदणीकृत असून कायदेशीर सर्व सुविधा कामगारांना दिल्या जातात; त्याला 'संघटीत क्षेत्र' असे म्हणतात. संघटीत क्षेत्रात उद्योगाच्या हमीबरोबरच अनेक कायदेशीर सुविधा किमान वेतन कायदा विशेष भत्ता कायदा, प्रॉव्हिडंट फंड (P.F. भविष्य निर्वाह निधी) इ. कायदेशीर बाबी इथे बंधनकारक असतात.

संघटित क्षेत्रामध्ये प्रामुख्याने शाळा, दवाखाने, कारखाने, सरकारी प्रशासकीय सेवा, वाणिज्य बँका, जीवन विमा कंपनी, लष्कर इ. विविध खात्यांचा समावेश होतो. संघटीत क्षेत्रांना आपल्या कार्यांचा प्रारंभ करण्यासाठी कायदा व सरकारची परवानगी घेणे बंधनकारक असते. तसेच सरकारी तिजोरीत करभरणा करणेही बंधनकारक असते. या क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या कामगारांना उद्योगाच्या हमीबरोबरच अनेक सुविधा पुरविणे ही त्या त्या संस्थांची जबाबदारी असते. ठरलेले वेतन ठरलेल्या वेळेत देण्याबरोबरच वार्षिक भत्ता व जादा तासांच्या कामासाठी जादा वेतन देणे त्यांना बंधनकारक असते. हे क्षेत्र पूर्णपणे कायद्याशी

www.textbookpdf.in

निगडीत असते याशिवाय कामगार व मालक यांच्यातील नाते संबंध हे कायदेशीर बाबीनी कटिबद्ध असतात.




असंघटित क्षेत्रातील कामगार

ज्या क्षेत्रात श्रमांना कोणत्याही कायदेशीर सुविधांची तरतूद केलेली नसते त्या क्षेत्रास 'असंघटित क्षेत्र' असे म्हणतात. म्हणजेच या क्षेत्रातील कामगार व मालकांमध्ये कोणताही कायदेशीर करार केलेला नसतो. असंघटित क्षेत्राला सरकारच्या परवानगीची गरज नसते व नोंदणी करणेही बंधनकारक नसते. या क्षेत्रात कोणत्याही सरकारी कायदेकानूनांचे व नितीनियमांचे पालन करणे गरजेचे नसते या क्षेत्राला कोणत्याही कायद्याची जरूर नसते. या क्षेत्रात सरकारला करभरणा करणे ही बंधन कारक नसते, या क्षेत्रात अत्यंत छोट्या व्यवहारांचा समावेश असतो. उदा. वाहन दुरुस्ती, डोक्यावरुन अथवा ढकलगाडीतून भाजीपाला, मासे व इतर वस्तू विकणे, टायरचे पंक्चर काढणे, सायकल दुरुस्ती यासारखे छोटे व्यवसाय करणारे लोक असंघटित क्षेत्रामध्ये मोडतात. इथे कामाच्या वेळेचे बंधन नसते. या क्षेत्रातील लोक रात्रंदिवस. सुट्टीच्या दिवशीसुद्धा काम करतात. असंघटित क्षेत्रातील मजुरी ही सरकारने ठरविलेल्या किमान मजुरीपेक्षा ही कमी असते. असंघटित क्षेत्रातील कामगारांना वैद्यकिय सुविधा नसतात, विशेष भत्ते नसतात. या क्षेत्रातील कामगारांना दररोज शारीरिक श्रम करावेच लागतात. यांना कामाची सुट्टी कधीच नसते. या क्षेत्रात काम करणारे प्रमुख असंघटित कामगार म्हणजे बांधकाम मजूर, रस्त्याची कामे करणारे मजूर, ट्रक व वॅगन्समध्ये मालाची चढ उतार करणारे हमाल, वीटभट्टीवर काम करणारे मजूर, भूमीहीन शेतमजूर, छोटे व अत्यंत छोटे शेतकरी, वाटपाने शेती करणारे, मच्छीमार, विडी कामगार, खाण कामगार,

www.textbookpdf.in

तेलाच्या घाण्यावर काम करणारे कामगार, लाकूड कापण्याच्या मशीनवर काम करणारे कामगार इ होत. भारतातील बहुतांश कामगार हे असंघटीत क्षेत्रात काम करतात. भारतात काम करणाऱ्या एकूण कामगारांपैकी 90% कामगार हे असंघटीत क्षेत्रामध्ये काम करतात.

असंघटित क्षेत्रातील कामगारांपुढील आव्हाने

असंघटीत क्षेत्रातील कामगारांना अनेक सामाजिक, आर्थिक समस्यांना तोंड द्यावे लागते. या क्षेत्रातील कामगारांना उद्योगाची हमी, निश्चित वेतन, मूलभूत सुविधा इ. गोष्टी मिळत नाहीत. त्यांच्या कामासाठी त्यांना किमान वेतनसुद्धा मिळत नाही.

स्थलांतर

असंघटित क्षेत्रातील कामगार कामाच्या शोधार्थ करीत असलेल्या स्थलांतराविषयी 'फूट लुजर्स' या पुस्तकात सविस्तर विश्लेषण केलेले आहे. जीवन चरितार्थ चालविण्यासाठी या क्षेत्रातील कामगारांना दररोज काम करावेच लागते. पण ते एकाच ठिकाणी उपलब्ध नसते ते रहात असलेल्या ठिकाणापासून ते कामाच्या ठिकाणापर्यंत कसे जातात व कसे येतात हे त्यांनाच माहित. हा त्रास कमी करण्यासाठी ते जिथें काम असेल तिथेच जावून रहातात. असंघटित क्षेत्रातील कामगारांना स्थलांतर करणे अनिवार्यच असते. म्हणून या असंघटित क्षेत्रातील कामगारांना कसलीही सुरक्षितता मिळत नाही.

सामाजिक सुरक्षितता

असंघटित क्षेत्रातील कामगारांना सामाजिक सुरक्षितता असत नाही. सामाजिक सुरक्षितता म्हणजे जगण्यासाठी मानवाला लागणाऱ्या मूलभूत गरजा (अन्न, वस्त्र, निवारा, आरोग्यसुविधा, पिण्याचे पाणी, कामाच्या समान संधी, समानता इ) सार्वजनिक अथवा

© KBS Not to be republished

www.textbookpdf.in

सामूहिकरित्या उपलब्ध करुन देणे होय. परंतु असंघटित क्षेत्रातील कामगारांना एवढयासुद्धा सुविधा मिळत नाहीत.

कायद्याचे संरक्षण

असंघटित क्षेत्रातील कामगाराना कोणत्याही कायद्याचे संरक्षण असत नाही. उदा. यांना निश्चित वेळेत केलेल्या कामासाठी निश्चित वेतन मिळत नाही. असंघटित क्षेत्रातील कामगारांना '1971 च्या पेमेंट ऑफ ग्रॅच्युइटी ॲक्ट' या कायद्यानुसार वेतन मिळत नाही. तसेच यांना प्रॉव्हिडेंट फंड (P.F. भविष्य निर्वाह निधी) यासारख्या कोणत्याही कायदेशीर योजनांचा लाभ मिळत नाही.

बालमजूर

असंघटित क्षेत्रात बहुतांश लहान मुले अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत अर्ध कुशल अथवा अकुशल शारीरिक श्रम करीत असतात उदा - फटाके तयार करणाऱ्या कारखान्यात काम करणारी मुले. इथे वापरण्यात येणाऱ्या रासायनिक स्फोटकांमुळे कोणतीही जीवनसुरक्षा नसते, या ठिकाणी काम करणाऱ्या कामगारांमध्ये लहान मुलांची संख्या जास्त आहे. लोभी भांडवलदार कमी मोबदला देऊन या छोट्या मुलांकडून जास्त श्रम करुन घेतात. याला लहान मुले बळी पडतात. असंघटित क्षेत्र बालमजुरीला उत्तेजन देते.

शारीरिक व मानसिक शोषण

असंघटीत क्षेत्रात घरकामासाठी राबणाऱ्या महिलांचे प्रमाण जास्त आहे. अलिकडे घरकाम करणाऱ्या महिलांच्या शारीरिक व मानसिक शोषणाचे प्रमाण वाढले आहे-जवळजवळ दुप्पट झाले आहे. भारतात ग्रामीण भागामध्ये 2014-15 च्या ग्रामीण अभिवृद्धीच्या अहवालानुसार 77% महिला असंघटित क्षेत्रात काम करतात. चरितार्थ चालविण्यासाठी कांही महिलांना घरकाम करुन पुन्हा कांहीतरी काम करावे लागते. अशा असहाय्य महिला असंघटित क्षेत्रात काम करतात अशा महिलांचे व मुलांचे कामाच्या ठिकाणी लैंगिक, शारीरिक शोषण केले जाते हे आपण दररोज पहातो आहोत, ऐकतो आहोत. अशारीतीने असंघटित क्षेत्रात काम करणाऱ्या कामगारांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. परंतु इथे कांही निवडक समस्यांचाच उहापोह केला आहे.

स्वाध्याय

I. रिकाम्या जागी योग्य शब्द भरा.

1. श्रमविभागणीमुळे _____ ला प्रोत्साहन मिळते.
2. भूमीहीन शेतमजुरांना _____ कामगार असे म्हणतात.
3. वैद्यकिय संस्थेमधील कर्मचाऱ्यांना _____ कामगार असे म्हणतात.

www.textbookpdf.in

©KTBS Not to be republished

II. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.

1. श्रमविभागणी म्हणजे काय?
2. मजुरी सहित श्रम म्हणजे काय?
3. मजुरी रहित श्रम म्हणजे काय?
4. संघटित श्रमाचे क्षेत्र म्हणजे काय?
5. असंघटित श्रमाचे क्षेत्र म्हणजे काय?
6. असंघटित कामगारांना कोणत्या समस्यांना सामोरे जावे लागते?
7. असंघटित क्षेत्रा वर कोणते परिणाम झाले आहेत?

III. समूहात चर्चा करुन खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.

1. संघटीत श्रमांचे प्रकार कोणते? स्पष्ट करा.
2. श्रमातील असमानता म्हणजे काय? स्पष्टीकरण द्या.
3. असंघटित कामगारांना सामोरे जाव्या लागणाऱ्या सामाजिक सुरक्षिततेच्या समस्या कोणत्या?
4. संघटित व असंघटीत कामगारांमधील फरक स्पष्ट करा.

IV. उपक्रम

1. तुम्ही रहात असलेल्या परिसरातील संघटित व असंघटित क्षेत्रात काम करणाऱ्या कामगारांची यादी तयार करा.

V. प्रकल्प

1. तुमच्या भागातील असंघटित कामगारांबरोबर सर्व मुले मिळून चर्चा करा ब त्याबद्दलचा एक अहवाल तयार करा.

***

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

भूगोलशास्त्र

प्रकरण - 1

भारताचे स्थान आणि विस्तार

या पाठात आपण पुढील घटकांचा अभ्यास करूया.

- **भारताचे आशिया खंडातील व जगातील स्थान**
- **भारताचा विस्तार आणि सीमा**
- **भारताच्या शेजारील राष्ट्रे**

भारताचे स्थान :

भौगोलिकदृष्ट्या भारत हा उत्तर गोलार्धात असून तो पूर्व गोलार्धाच्या मध्यभागी स्थित आहे. हा आग्नेय आशियातील एक प्रमुख द्वीपकल्प आहे. भारताच्या मुख्य भूमीचे स्थान हे $8^0.4^0$ ते $37^0.6^0$ उत्तर अक्षांश आणि $68^0.7^0$ ते $97^0.25^0$ पूर्व रेखांशामध्ये विस्तारले आहे. अंदमान आणि निकोबार या बेटांनी पुढे दक्षिणेकडे भारताचा रेखांशीय विस्तार वाढविला आहे. निकोबार बेटाचे $6^0.45^0$ उत्तर अक्षांशावर असलेले 'इंदिरा पॉईंट' हे भारताचे सर्वात दक्षिणेकडील टोक आहे. जम्मू व काश्मीर मधील 'इंदिरा कोल' हे भारतातील उत्तरेकडील टोक आहे.



जग आणि आशियामध्ये भारताचे स्थान

भारताच्या मध्यातून कर्कवृत्त ($23\ 1/2^0$ उत्तर अक्षांश) गेले असून $82\ 1/2^0$ पूर्व रेखांश देशाच्या मध्यातून गेलेले आहे. $82\ 1/2^0$ पूर्व रेखांश हे भारताचे मध्य रेखांश असून ते अलाहाबाद शहराजवळून गेलेले आहे. त्यावरूनच भारताची प्रमाणवेळ (IST) निश्चित केलेली आहे.

©KTBS Not to be republished
www.textbookpdf.in

विस्तार : रशिया, कॅनडा, चीन, अमेरिकेची संयुक्त संस्थाने, ब्राझील आणि ऑस्ट्रेलिया यासाररख्या देशानंतर भारत हे जगातील सातवे मोठे राष्ट्र आहे. भारताचे एकूण क्षेत्रफळ 32, 87, 263 चौ.कि.मी इतके आहे. जगाच्या एकूण भूभागापैकी 2.42% भाग भारताने व्यापलेला आहे. भारताची पूर्वपश्चिम रूंदी 2,933 कि.मी आणि उत्तर - दक्षिण लांबी 3,214 कि.मी, इतकी आहे.

सीमा : भारताला भूसीमा व जलसीमा दोन्ही लाभल्या आहेत. देशाच्या भूसीमेची लांबी 15,200 कि.मी. असून देशाचा काही भाग वगळता सर्व भागाला नैसर्गिक सीमा लाभली आहे. उत्तरेकडे असलेला हिमालय पर्वत ही भारत आणि चीन यांच्यातील नैसर्गिक सीमा आहे.



भारताच्या प्रमुख भूप्रदेशाला 6100 कि.मी. लांबीची समुद्र किनारपट्टी लाभलेली आहे. तसेच अंदमान निकोबार बेटे आणि लक्षद्वीप बेटांचा किनारा धरून देशाच्या एकूण सागरी किनारपट्टीची लांबी 7516.5 कि.मी. इतकी होते. भारत देशाच्या पश्चिमेला अरबी समुद्र, पूर्वेला बंगालचा उपसागर आणि दक्षिणेला हिंदी महासागर या जलसीमा आहेत. त्यासुद्धा देशाच्या नैसर्गिक सीमाच आहेत.

शेजारील राष्ट्रे : भारताच्या शेजारी 7 राष्ट्रे आहेत. भारताच्या वायव्येला पाकीस्तान आणि अफगणिस्तान, उत्तरेला नेपाळ, भूतान आणि चीन. तसेच पूर्वेकडे बांग्लादेश आणि म्यानमार हे देश आहेत. भारताच्या आग्नेयेला श्रीलंका देश असून तो पाल्कची सामुद्रधुनी आणि मन्नारचे आखात यामुळे भारताच्या प्रमुख भूभागापासून वेगळा झाला आहे.

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in



राजकीय विभाग : भारत हे लोकशाही प्रजासत्ताक राष्ट्र आहे. देशाच्या राज्यकारभाराच्या सोयीच्या दृष्टीने भारत 29 घटक राज्ये आणि 7 केंद्रशासित प्रदेशांमध्ये विभागलेला आहे. दिल्लीला राष्ट्रीय राजधानी म्हणून विशेष दर्जा आहे. 'तेलंगाणा' हे अलिकडेच निर्माण झालेले

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

नवीन राज्य आहे. सर्व राज्यांमध्ये राजस्थान हे विस्ताराने सर्वात मोठे व गोवा हे सर्वात लहान राज्य आहे.

हे तुम्हाला माहिती आहे का?-

- **रॅडक्लिफरेषा : भारत आणि पाकिस्तान मधील सीमारेषा.**
- **ड्युरांड रेषा : भारत आणि आफगाणिस्तानमधील सीमारेषा.**
- **मॅकमोहनरेषा : भारत व चीनमधील सीमारेषा.**

स्वाध्याय

I) रिकाम्या जागी योग्य शब्द भरा.

1. भारताचे एकूण क्षेत्रफळ _____ चौ.कि.मी. इतके आहे.
2. भारताच्या आग्नेय दिशेला _____ हा देश आहे.
3. भारताच्या मध्यातून _____ हे वृत्त गेले आहे.
4. भारतामध्ये अलिकडेच निर्माण झालेले नवीन राज्य _____

II) समूहात चर्चा करून खालील प्रश्नांची उतरे लिहा.

1. भारताचा अक्षांशीय आणि रेखांशीय विस्तार सांगा.
2. भारताचे सर्वात दक्षिणेकडील टोक कोणते?
3. भारताच्या वायव्येकडील शेजारील राष्ट्रांची नावे लिहा.
4. भारताच्या सीमांबद्दल टीप लिहा.

III) उपक्रम

1. भारताचा नकाशा काढा. त्यामध्ये राज्ये व केंद्रशासित प्रदेश आणि राजधान्या दाखवून त्यांची नावे लिहा.

IV) प्रकल्प

1. तुमच्या शिक्षकांच्या सहाय्याने तुमच्या राज्याचा नकाशा काढा. त्याचा अक्षांशीय व रेखांशीय विस्तार दाखवून, शेजारची राज्ये दाखवा.

***

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

प्रकरण - 2

भारताची प्राकृतिक वैशिष्ट्ये

या पाठात आपण पुढील घटकांचा अभ्यास करूया.

- **भारतातील भू स्वरूपांची सर्व सामान्य वैशिष्टये**
- **भारताचे प्राकृतिक (स्वाभाविक) विभाग**
- **प्राकृतिक विभागांचे महत्त्व**

भारत हा एक विस्तीर्ण देश आहे. या ठिकाणी विविध प्रकारची भूस्वरूपे आढळून येतात. ती म्हणजे पर्वत, पठारे, मैदाने, दऱ्या आणि किनार पट्ट्याची मैदाने वगैरे भू-स्वरूपे आहेत. या सर्वांचा देशातील नदीव्यवस्था, हवामान नैसर्गिक वनस्पती, जमिनीचा वापर, कृषी, वाहतूक, लोकसंख्येची विभागणी वगैरे गोष्टींवर प्रभाव पडतो.

भारताचे प्राकृतिक विभाग :

भूरचना आणि भूमीवरील लक्षणांच्या आधारावर भारताची चार प्रमुख प्रकारात विभागणी केली जाऊ शकते. ते म्हणजे

1) उत्तरेकडील पर्वत
2) उत्तरेकडील महामैदाने
3) द्वीपकल्पीय पठार
4) किनाऱ्यापट्ट्यांची मैदाने व बेटे

i) उत्तरेकडील पर्वत :

हा आताच्या तरूण आणि घडीच्या पर्वतरांगांचा समूह असून त्याचा पर्वतश्रेणींमध्ये समावेश होतो. ही भारताच्या उत्तर सीमेवरील अत्युच्च आणि सलग पसरलेली पर्वतांची साखळी आहे. ही जगातील सर्वात उंच पर्वतरांग असून त्यामध्ये अत्यंत उंच पर्वत शिखरे, खोलदऱ्या, अरूंदखिंडी आणि नद्यांचे खोरे, हिमनद्या यांचा समावेश होतो. भारतामध्ये ही रांग पश्चिमेकडे सिंधू नदीच्या खोऱ्यापासून पूर्वेकडे ब्रम्हपुत्रा नदीच्या खोऱ्यापर्यंत 2400 कि.मी. लांब पसरलेली आहे. त्याची रुंदी 240 ते 320 कि.मी. इतकी आहे. याची पश्चिमेकडे रूंदी जास्त असून पूर्वेकडे ती अरूंद होत जाते. याने सुमारे 5 लाख चौ.कि.मी. इतका भूप्रदेश व्यापलेला आहे भारताच्या बाजूने (दक्षिण) तीव्र उताराचा आणि तिबेटच्या बाजूने (उत्तरेला) कमी उताराचा भाग आहे. हिमालय पर्वतामध्ये तीन समांतर पर्वत रांगा आहेत.

हे तुम्हाला माहिती आहे का ?-
माऊंट एव्हरेस्ट : याला नेपाळी लोक 'सागरमठ' असे म्हणतात. याचा अर्थ 'आकाशातील देवता' असा आहे. तिबेटीयन लोक याला 'चोमोलुंग्मा' या नावाने ओळखतात.

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

i) बृहद् हिमालय ii) मध्य हिमालय (लेसर हिमालय)

iii) शिवालिक टेकड्या

i) बृहद् हिमालय : ही हिमालय पर्वतरांगांच्या मध्यावर असलेली सलग आणि अतिउंच पर्वत श्रेणी आहे. याची समुद्र सपाटीपासून सरासरी उंची 6100 मीटर आहे. येथे काही अत्युच्च पर्वतशिखरे आहेत. त्यामध्ये 'माऊंट एव्हरेस्ट' (8848 मी.) हे जगातील सर्वात उंच पर्वत शिखर आहे. इतर प्रमुख शिखरे म्हणजे कांचनजंगा (8156 मी.), माकालू (8481मी.), धवलगिरी (8172 मी.) मानस्लू (8156 मी.) नंदादेवी इत्यादी. बृहद् हिमालयातील पर्वतरांगा वर्षभर बर्फाच्छादित असतात. त्यामुळे त्यांना 'हिमाद्री' असे म्हणतात. येथे अनेक हिमनद्या उगम पावतात उदा. गंगोत्री यमनोत्री हिमनद्या. अनेक खिंडीही आहेत. उदा. बुर्जिल, जोजिला, शिप्कीला इत्यादी.

हिमाद्री पर्वत रांगांच्या वायव्येला असणाऱ्या पर्वत रांगांना 'पलिकडील हिमालय' (ट्रान्स हिमालय) म्हणून ओळखतात. यामध्ये 'काराकोरम' पर्वत रांगांचा समावेश होतो. येथे K-2 किंवा 'गॉडविन ऑस्टिन' हे सर्वोच्च शिखर आहे. हे भारतातील सर्वात उंच शिखर आहे.



www.textbookpdf.in

ii) मध्य हिमालय (लेसर हिमालय) : या रांगा बृहद् हिमालयाच्या दक्षिणेला आहेत. याला 'हिमाचल 'रांगा' असेही म्हणतात. त्यांची लांबी सुमारे 60 ते 80 कि. मी. असून उंची 1500 ते 4500 कि.मी. आहे. याचा पूर्वभाग अरण्यांनी व्यापलेला आहे. येथे अनेक समांतर पर्वतरांगा दिसून येतात उदा. पीरपंजाल, धौलधर, नागतिब्बा, मुसोरी, महाभारत आणि दार्जिलिंग या रांगा आहेत. त्याच बरोबर येथे अनेक आकर्षक आणि सुंदर दऱ्यासुद्धा आहेत. कांग्रा दरी, काश्मीरदरी, कुलूदरी, काठमांडू दरी वगैरे. या पर्वतरांगात अनेक थंड हवेची ठिकाणे आढळून येतात. उदा. सिमला, राणीखेत, मुसोरी, नैनिताल अलमोडा, आणि दार्जिलिंग.



iii) शिवालिक टेकड्या : या हिमालयाच्या बाहेरील किंवा पायथ्याकडील टेकड्यांच्या रांगा आहेत. या टेकड्या प्रमुख हिमालयाच्या दक्षिण भागात आहेत याला 'बाह्य हिमालय' असेही म्हणतात. हिमालयातील या अत्यंत कमी उंचीच्या रांगा आहेत. याची उंची 600 ते 1500 मीटर असून रुंदी 15 ते 150 कि.मी. इतकी आहे. ही रांग पश्चिमेकडे जम्मू काश्मीर पासून पूर्वेकडे अरुणाचल प्रदेश पर्यंत पसरलेली आहे. येथे सपाट मैदानांनी बनलेल्या दऱ्या निर्माण झालेल्या आहेत. त्यांना 'डून्स' असे म्हणतात. उदा. डेहराडून.

© KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

महत्त्व :

1. हिमालय पर्वत ही नैसर्गिक तटबंदी असून त्यामुळे परकीय आक्रमणे आणि मध्य आशियातून येणारे अतिशीत वारे अडविले जातात.
2. बाष्पयुक्त मान्सून वारे अडविले जातात त्यामुळे भरपूर पाऊस पडण्यास मदत होते.
3. त्याच्या उतरणीवर घनदाट अरण्ये आहेत आणि येथील प्रदेश मळयांच्या वाढीसाठी उपयुक्त आहेत. उदा. आसाम मधील चहाचे मळे.
4. विविध प्रकारच्या खनिजसंपत्तीने हा प्रदेश समृद्ध आहे.
5. अनेक नद्यांचे उगमस्थान आहे. या नद्यांवर धबधबे निर्माण झाले असून त्यांचा जलविद्युतशक्ती निर्माण करण्यासाठी उपयोग होतो.

2) उत्तरेकडील महा मैदान :

हे हिमालय पर्वत आणि भारताच्या द्वीपकल्पीय पठाराच्यामध्ये पसरलेले आहे. हे सतलज, गंगा आणि ब्रम्हपुत्रा या तीन नद्यांनी वाहून आणलेल्या गाळाच्या संचयनामुळे बनलेले आहे. हे जगातील अतिविशाल असे गाळाच्या मातीचे मैदान आहे. हे मैदान पूर्व पश्चिम पसरलेले असून त्याची लांबी 2500 कि.मी. व रूंदी 240 ते 340 कि.मी. इतकी आहे. सुमारे 7 लक्ष चौ.कि.मी. प्रदेश याने व्यापलेला आहे. हे मैदान हिमालयातून नद्यांनी वाहून आणलेल्या सुपीक गाळाच्या मातीने बनलेले आहे. हे अत्यंत सपाट मैदान आहे याच्या पृष्ठ भागावर कोठेही खडक आढळत नाही.



©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

महत्त्व : उत्तरेकडील महामैदान हे अत्यंत विशाल असे मैदान असून तेथे पिकांसाठी अत्यंत सुपीक जमीन आणि बारमाही पाणीपुरवठा करणाऱ्या नद्या आहेत. म्हणूनच शेतीसाठी ही उपयुक्त अशी भूमी आहे. येथील सपाट जमिनीमुळे रस्ते, रेल्वेमार्ग निर्माण करणे सुलभ झाले आहे. संपर्क माध्यमांसाठीही अनुकूल वातावरण आहे. त्याचबरोबर औद्योगिकरण, शहरीकरण आणि व्यापारासाठी सुद्धा हा भाग उपयुक्त आहे. या भागात अनेक तीर्थक्षेत्रेही आहेत.

3) द्वीपकल्पीय पठार :

भारताच्या प्राकृतिक विभागामध्ये अत्यंत विस्तीर्ण असलेला, गोंडवन भूप्रदेशाचा भाग असलेला, पुरातन खडकांपासून बनलेला हा भाग आहे. उत्तेकडील महामैदानाच्या दक्षिणेला हा भाग येतो आणि त्याने 16 लाख चौ.कि.मी. भूप्रदेश व्यापलेला आहे. हे पठार आकाराने त्रिकोणाकृती असून याच्या दक्षिणेकडील टोकाला कन्याकुमारीचे भूशिर आहे. अनेक टेकड्या आणि पठारांनी हा भाग वेढलेला आहे. उदा. अरवली, विंध्य, सातपुडा, पश्चिमघाट, पूर्वघाट, छोटा नागपूरचे पठार, दख्खनचे पठार, माळव्याचे पठार इत्यादी.



www.textbookpdf.in

अरवली रांग ही पुरातन गाळांच्या पर्वताचा भाग असून वायव्य भागात ही पर्वतरांग आहे. येथील अबुपर्वतावरील गुरुशिखर (1772 मी.) हे अत्यंत उंच शिखर आहे. नर्मदा नदी खोऱ्याच्या उत्तरेला विंध्य पर्वत रांग आहे. विंध्य पर्वताच्या दक्षिणेला पूर्व-पश्चिम दिशेने पसरलेली 'सातपुडा' पर्वतरांग आहे. ती नर्मदा व तापी या दोन्ही नद्यांच्या खोऱ्यांच्या मध्ये आहे.

पश्चिम घाट : हा तापी नदीच्या खोऱ्यापासून कन्याकुमारीच्या भूशिरापर्यंत पश्चिम किनार पट्टीस (अरबी समुद्र) समांतर पसरलेला आहे. यालाच 'सह्याद्रीच्या रांगा' असेही म्हणतात. या रांगा अखंड व सलग पसरलेल्या आहेत. याच्या पश्चिम बाजूस तीव्र उतार असून पूर्वभाग सौम्य उताराचा आहे. बोरघाट, तालघाट आणि पालघाट या येथील प्रमुख खिंडी आहेत. पश्चिम घाटातील पालघाटाच्या दक्षिणेस अन्नामलाई, पळणी, कार्डमम (इलाईमलाई) या पर्वत रांगा पुढे विस्तारल्या आहेल. अन्नामलाई पर्वत रांगात 'अनैमुडी' (2695 मी.) हे दक्षिण भारतातील अति उंच शिखर आहे.

पूर्वघाट: हा भारताच्या पूर्व किनारपट्टीस समांतर पसरलेला आहे. उत्तरेकडे महानदीच्या खोऱ्यापासून दक्षिणेकडे निलगिरी पर्वतापर्यंत विस्तारलेला आहे. येथे पश्चिमघाट व पूर्वघाट एकमेकांस जोडले जातात. हे पश्चिमघाटा इतके उंच नसून या रांगा तुटक तुटक अशा पसरल्या आहेत. पूर्व घाटांत 'आर्मकोंडा' हे अति उंच पर्वत शिखर आहे.

दख्खनचे पठार : वायव्येकडे सातपुडा व विंध्य पश्चिमेकडे पश्चिमघाट व पूर्वेकडे पूर्वघाट, उत्तरेकडे महादेवाचा डोंगर आणि मैकल पर्वतरांग यांच्यामधील भागात हे बद्ध झालेले आहे. 'छोटा नागपूरचे पठार' हे द्वीपकल्पीय पठाराच्या ईशान्य भागात आहे.

महत्त्व :

1. द्वीपकल्पीय पठार हे खनिज संपत्तीने समृद्ध असून येथे घनदाट जंगले व जैवविविधता आढळून येते.
2. नैर्ऋत्य मान्सून वाऱ्यांचा येथे प्रभाव पडतो. येथील माती काळी असून ती शेतीसाठी उपयुक्त आहे.
3. दक्षिण भारतातील अनेक नद्यांचे येथे उगमस्थान असून जलविद्युतशक्ती निर्मितीसाठी त्यांचा उपयोग झालेला आहे.

तुम्हाला माहित आहे का?

- **सातपुडा :** हा शब्द संस्कृतच्या 'सातपुरा' या शब्दा पासून बनला आहे. सात म्हणजे '7' आणि 'पूर' म्हणजे पर्वत असा अर्थ आहे.
- **भाबर :** शिवालिक्स पर्वत श्रेणीच्या पायथ्याला पूर्व पश्चिम असणारा छोटासा भाग.
- **थरचे वाळवंट :** भारतातील एक मुख्य वाळवंट हे भारताच्या वायव्य भागात आहे.

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

4. येथे थंड हवेची ठिकाणेही आढळतात उदा. उद्‌गमंडलम् (उटी), महाबळेश्वर, माथेरान

4) किनारपट्टीची मैदाने : द्वीपकल्पीय पठाराच्या दोन्ही बाजूस समुद्रकिनारा लाभलेला आहे. भारताची ही किनारपट्टी पश्चिमेकडे कच्छपासून पूर्वभागातील गंगा नदीच्या मुखापर्यंत पसरलेली आहे.

याची पश्चिम किनारपट्टी आणि पूर्व किनारपट्टी अशी विभागणी केली आहे.

i) पश्चिम किनारपट्टी : ही मैदाने पश्चिमघाट व अरबी समुद्र यांच्यामध्ये आहेत. ही कच्छच्या आखातापासून कन्याकुमारीपर्यंत विस्तारलेली आहे. ही किनारपट्टी अरुंद, उतरती व खडकाळ आहे. याची तीन भागात विभागणी केली आहे.

a) कोकण किनारा : गुजराथ मैदानाच्या दक्षिणेकडे दमणपासून गोव्यापर्यंत पसरलेला आहे.

b) कर्नाटक किनारपट्टी : गोव्यापसून मंगळूरपर्यत पसरलेली आहे.

c) मलबार किनारा : मंगळूर पासून कन्याकुमारी पर्यंत पसरलेला आहे.

ii) पूर्वकिनारपट्टी : ही मैदाने सुवर्णरेखा नदीच्या उत्तर भागापासून कन्याकुमारी पर्यंत पसरलेली आहेत. ही पूर्वघाट व बंगालचा उपसागर यांच्यामध्ये आहेत. पश्चिम किनार पट्टीपेक्षा ही मैदाने रुंद आहेत.

दक्षिण भारतातील पूर्ववाहिनी नद्या येथे समुद्रास मिळतात. त्यामुळे नद्यांच्या मुखाजवळ त्रिभूज प्रदेश तयार झालेले आहेत. उदा. महानदी, गोदावरी, कृष्णा, कावेरी.

पूर्व किनारपट्टी ही दोन भागात विभागलेली आहे. उत्कल (उत्तर सरकार) व कोरोमांडेल. कृष्णानदीच्या मुखापासून उत्तरेकडील भागाला उत्तरसरकार व दक्षिणे कडील भागाला 'कोरोमांडेल' म्हणतात. पूर्व किनारपट्टीवर काही खाऱ्यापाण्याची सरोवरे आहेत. उदा. चिल्का, पुलिकत, कोलेरू सरोवरे.

महत्त्व : भारताच्या किनारपट्टीच्या मैदानात काही नैसर्गिक बंदरे तयार झाली आहेत. त्यामुळे भारताच्या विदेशी व्यापारात वाढ झाली आहे. उदा. कांडला, मुंबई, मार्मगोवा, कोचीन, विशाखापट्टण व कोलकत्ता इत्यादि याशिवाय किनारपट्टी प्रदेश हे मासेमारी, जहाजबांधणी, उद्योग, कृषी व मीठ उत्पादनासाठी सहाय्यकारी ठरतात. नौकापर्यटन व आकर्षक बीचेसमुळे पर्यटन क्षेत्राचा विकास झाला आहे.

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in



भारतातील बेटे - भारतात एकूण 247 बेटे आहेत. त्यापैकी 204 बेटे बंगालच्या उपसागरात व 43 बेटे अरबी समुद्रात आहेत. अंदमान निकोबार ही बेटे बंगालच्या उपसागरात आहेत व लक्षद्वीप बेटे अरबी समुद्रात आहेत. लक्षद्वीप बेटे ही प्रवाळापासून (पोवळे) बनली आहेत.

स्वाध्याय

I. रिकाम्या जागी योग्य शब्द भरा.

1. बृहद् हिमालय पर्वतरांगाना _____ असेही म्हणतात.
2. हिमालयातील _____ या रांगा थंड हवेच्या ठिकाणांसाठी प्रसिद्ध आहेत.
3. दक्षिण भारतातील _____ हे अतिउंच शिखर आहे.
4. पश्चिमघाट व पूर्वघाट हे _____ या पर्वतात एकत्र जुळतात.
5. उत्तरे कडील महामैदाने _____ मातीपासून बनलेली आहेत.

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

II. समूहात चर्चा करून खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.

1. भारताचे प्राकृतिक विभाग कोणकोणते?
2. उत्तरेकडील मैदानांची रचना कशी झाली आहे?
3. शिवालिक पर्वत रांगांबद्दल थोडक्यात माहिती लिहा.
4. पूर्वघाट व पश्चिम घाट यातील फरक स्पष्ट करा.
5. उत्तरेकडील पर्वत रागांचे महत्त्व स्पष्ट करा.

III. उपक्रम

1. भारताचा नकाशा काढून त्यामध्ये प्राकृतिक विभाग दाखवा.
2. भारताचा नकाशा काढून त्यात प्रमुख थंड हवेची ठिकाणे दाखवा

IV. प्रकल्प

1. भारताच्या नकाशात किनारपट्टी प्रदेश असलेली राज्ये ओळखून त्यांची नावे लिहा आणि प्रसिद्ध बीचेसची छायाचित्रे गोळा करा.

***

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

प्रकरण - 3

भारताचे हवामान

या पाठात आपण पुढील घटकांचा अभ्यास करूया.

- **भारतातील हवामानाचे प्रकार व त्यावर परिणाम करणारे घटक**
- **हवामानातील ऋतू व त्यांची प्रमुख वैशिष्टये**
- **भारतातील पावसाची विभागणी**

हवामानाचे प्रकार

भारत हा 'उष्णकटिबंधीय मान्सून' हवामानाचा देश म्हणून ओळखला जातो. कारण भारताचा बहुतांशी भाग उष्ण कटिबंधात आहे. येथील हवामानावर मान्सून वाऱ्यांचा प्रभाव पडतो. भारताच्या हवामानावर परिणाम करणारे प्रमुख घटक म्हणजे स्थान, जलसंपत्ती, भूस्वरूप व मान्सून वारे. म्हणून भारताचे हवामान प्रदेशानुसार व ऋतूमानानुसार बदलत जाते.

हे तुम्हाला माहिती असूदे
'मान्सून' हा शब्दअरबीशब्द 'मौसिम' यापासून बनला आहे. याचा अर्थ 'ऋतू'.

हवामानाचे चार ऋतू

भारताचे वार्षिक हवामान हे चार ऋतूंमध्ये विभागलेले आहे.

1) हिवाळा (डिसें ते फेब्रु) 2) उन्हाळा (मार्च ते मे)

3) पावसाळा (जून ते सप्टें) 4) परतीच्या मान्सूनचा काल (मध्य सप्टे. ते नोव्हें)

1) हिवाळा

या ऋतूत सूर्याची लंबरूप किरणे दक्षिण गोलार्धात पडतात. त्यावेळी भारतात सूर्याची किरणे तिरपी पडतात. देशाच्या उत्तरेला थंड वातावरण व दक्षिणेला उष्ण वातावरण असते. जानेवारी महिन्यात अतिथंडी असते. या मोसमात उत्तर भारतातील राज्ये जम्मू काश्मीर व हिमाचल प्रदेशातील पर्वतावर अति कमी तापमान असते. कारगील जवळील 'द्रास' येथे भारतातील सर्वात कमी म्हणजे (- 4^0) सें.ग्रे. इतके तापमान असते. पर्वतीय धुके व दंव हे सामान्यतः सगळीकडे दिसून येते. या पर्वत प्रदेशात प्रचंड हिमवृष्टी होते. भारतातील एकूण वार्षिक पर्जन्यापैकी फक्त 2% पाऊस हिवाळ्यात पडतो.

2) उन्हाळा : या ऋतूमध्ये सूर्याची लंबरूप किरणे उत्तर गोलार्धावर पडतात त्यामुळे भारतात उष्णता जास्त असते. वातावरण अतिउष्ण, कोरडे असून प्रचंड उकाडा असतो.

www.textbookpdf.in

©KTBS Not to be republished

राजस्थानमधील 'गंगानगर' येथे सर्वाधिक तापमानाची नोंद झाली आहे (49.4 सें.ग्रे.) देशातील काही भागात 'आरोह' किंवा 'अभिसरण' प्रकारचा पाऊस पडतो. या पावसाला वेगवेगळ्या ठिकाणी भिन्न भिन्न नावाने संबोधतात. उदा. उत्तर प्रदेशात 'आंधीस, पश्चिम बंगालमध्ये 'कालबैसाखी', हा पाऊस आंब्यासाठी जास्त उपयुक्त आहे. म्हणून केरळमध्ये याला 'मँगो शॉवर्स' (आंबेसरी) म्हणतात. तर कर्नाटकात कॉफी पिकासाठी हा पाऊस उपयुक्त आहे म्हणून त्याला 'कॉफीकारंजा' असे म्हणतात. उन्हाळ्यात भारताच्या एकूण पावसापैकी फक्त 10% इतका पाऊस पडतो.

3) पावसाळा : याला 'नैर्ऋत्य मान्सूनचाकाळ' असेही म्हणतात. उन्हाळ्याच्या अखेरच्या काळात उष्णता जास्त असल्याने मध्यभारतात कमी दाबाचा प्रदेश तयार होतो. या उलट हिंदी महासागरात जास्त दाबाचा प्रदेश तयार होतो त्यामुळे बाष्पयुक्त वारे नैर्ऋत्य दिशेकडून भारताकडे वाहू लागतात. यामुळे देशातील विविध भागामध्ये पाऊस पडतो जवळजवळ 75% पाऊस या ऋतूत पडतो.

नैर्ऋत्य मान्सून वाऱ्याच्या भारतातील द्वीपकल्पीय भागात दोन शाखा झाल्या आहेत. त्या म्हणजे अरबी समुद्रातील शाखा व बंगालच्या उपसागरातील शाखा. अरबी समुद्रावरून वाहणाऱ्या वाऱ्यांमुळे पश्चिम घाटाच्या पश्चिमेकडील भागात जोराचा पाऊस पडतो. हे वारे जसजसे पूर्वेकडे वाहतात. तसतसा पाऊस कमीकमी होत जातो. पश्चिम घाटाच्या पूर्वेकडील प्रदेशाला 'पर्जन्य छायेचा प्रदेश' म्हणतात. बंगालच्या उपसागरावरून वाहणारे वारे मेघालय आणि आसाम येथील टेकड्यांमुळे अडविले जातात व भरपूर पाऊस पडतो. मेघालयातील मौसीनराम' मध्ये भारतातील सर्वाधिक याऊस पडतो. जसे पश्चिमेकडे जावे तसे पावसाचे प्रमाण कमी होत जाते.

4) परतीच्या मान्सूनचा काळ

ऑक्टोबर महिन्याच्या सुरुवातीला उष्णता कमी असल्याने जमिनीवरील कमी दाबाचा प्रदेश नाहिसा होऊन जास्त दाबाचा प्रदेश तयार होतो. बंगालच्या उपसागरात कमी दाबाचा प्रदेश तयार होतो व त्याचा परिणाम म्हणून नैर्ऋत्य मान्सून वारे परततात. ते ईशान्य दिशेपासून नैर्ऋत्य दिशेकडे वाहू लागतात. त्यामुळे याला 'ईशान्य मान्सूनचा काळ' किंवा 'परतीचा मान्सून' म्हणतात. या काळात हवामान अस्थिर असते. या मोसमात भारतात 13% पाऊस पडतो. तमिळनाडू, आंध्रप्रदेश व ओडिशा या भागात पाऊस पडतो.

www.textbookpdf.in

याच कालावधीत बंगालच्या उपसागरात चक्रीवादळे निर्माण होतात. त्यामुळे काही वेळा पूर्व किनारट्टीच्या प्रदेशात नुकसान होत असते.

पावसाची विभागणी

पावसाच्या विभागणीनुसार भारताचे तीन विभाग केले आहेत.

i) कमी पावसाचा प्रदेश - सुमारे 50 सें.मी. पेक्षा कमी पाऊस पडणाऱ्या प्रदेशाला कमी पावसाचा प्रदेश म्हणतात यामध्ये कच्छचा पश्चिम भाग, राजस्थानमधील थर वाळवंट व त्याच्या सभोवतालचा प्रदेश म्हणजे पश्चिम पंजाब, हरियाणा व गुजराथ, उत्तर झास्कर पर्वतरांगा व पश्चिम घाटातील पर्जन्य छायेचा प्रदेश. राजस्थानच्या जैसलमेर जिल्ह्यातील 'रोयली' येथे वार्षिक सरासरी 8.3 से.मी. पाऊस पडतो. हे भारतातील अत्यंत कमी पाऊस पडणारे व शुष्क ठिकाण आहे.



©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

ii) मध्यम पावसाचा प्रदेश : (50 ते 100 सें.मी.)

उत्तर पंजाब पासून कन्याकुमारीपर्यंत हा प्रदेश आहे. उत्तर भारतात हा प्रदेश रुंद असून दक्षिणेकडे पश्चिम घाट व पूर्व घाटामध्ये अरुंद होत जातो.

iii) अधिक जोराच्या पावसाचा प्रदेश : (100 ते 250 से.मी.)

हा प्रदेश वेगवेगळ्या 4 पट्ट्यांमध्ये विभागला आहे.

a) पश्चिम घाटातील अरुंद पट्टा

b) जम्मूपासून प्रारंभ होऊन हिमाचल प्रदेश, उत्तर प्रदेशातील उत्तर भाग, बिहार व.प. बंगाल

c) ईशान्य भारत ('मौसीनराम' हे भारतातील सर्वात जास्त पाऊस पडणारे ठिकाण येथे आहे.)

d) पश्चिम किनारपट्टीचा प्रदेश

स्वाध्याय

I) खालील रिकाम्या जागी योग्य शब्द भरा

1. भारतात _____ या प्रकारचे हवामान आहे.
2. भारतातील _____ या ठिकाणी सर्वात जास्त पाऊस पडतो.
3. भारतातील _____ या ठिकाणी सर्वात कमी तापमान असते.
4. भारतात _____ या महिन्यात अतिशय थंडी असते.

II) समूहात चर्चा करून खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.

1. भारताच्या हवामानावर परिणाम करणारे घटक कोणते?
2. भारतातील प्रमुख मोसमाचे प्रकार कोणते?
3. नैर्ऋत्य मान्सून वारे कसे तयार होतात त्याचे वर्णन करा.
4. हिवाळ्यातील हवामानाच्या स्थितीचे वर्णन करा.
5. भारतातील कमी पावसाचे प्रदेश कोणते?

III) उपक्रम

1. भारताचा नकाशा काढून त्यामध्ये पर्जन्याची विभागणी दर्शवा.

IV) प्रकल्प

1. भारताचे दोन नकाशे काढून एकामध्ये नैर्ऋत्य मान्सून वारे व दुसऱ्यामध्ये ईशान्य मान्सून वारे दाखवा.

***

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

प्रकरण - 4

भारतातील माती

या पाठात आपण पुढील घटकांचा अभ्यास करूया.

- **मातीचा अर्थ व भारतातील मातीचे महत्त्व**
- **मातीचे प्रकार व त्यांची विभागणी**
- **मातीची धूप, कारणे व परिणाम, मातीचे संरक्षण**

खनिजे व सेंद्रिय पदार्थांच्या मिश्रणाने बनलेल्या भूपृष्ठावरील वरच्या पातळ थराला माती म्हणतात. आपल्या देशात शेती हा प्रमुख उद्योग असून माती ही प्रमुख नैसर्गिक साधन संपत्ती आहे. मातीच्या सुपीकतेवर कृषिउत्पादन अवलंबून आहे.

भारतातील विविध प्रकारच्या मातीची निर्मिती मूलभूत खडक, भूस्वरूपाची, वैशिष्ट्ये, हवामान व नैसर्गिक वनस्पतींवर अवलंबन आहे त्यामुळेच भारतातील मातीचे खालील प्रकार पडतात.

मातीचे प्रकार

भारतातील मातीचे प्रमुख्याने खालील प्रकार केले आहेत.

1) गाळाचीमाती 2) काळीमाती
3) लालमाती 4) लॅटेराईट माती
5) वाळवंटीमाती 6) डोंगरी माती

1) गाळाचीमाती : साधारणपणे गाळाचा समावेश असलेल्या मातीला 'गाळाची माती' असे म्हणतात. नद्यांनी पर्वत प्रदेशातून वाहून आणून संचित केलेली ही माती असते. उदा. सिंधू-गंगा नदी खोऱ्यातील प्रदेश, समुद्राच्या लाटांमुळे किनाऱ्यावर ही माती तयार होते. भारतात गाळाची माती मोठ्या प्रदेशात विभागली असून तिला फारच महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. देशाच्या कृषिविकासात तिचा मोलाचा वाटा आहे. भारतातील सुमारे 15 लाख चौ.कि.मी. क्षेत्र या मातीने व्यापलेले आहे. गहू, भात, ऊस, कापूस, ताग, बटाटे व भाजीपाला ही महत्त्वाची पिके या मातीत पिकविली

> **हे तुम्हाला माहित असू द्या.**
>
> स्थानिक भाषेत 'खदर' म्हणून ओळखली जाणारी माती म्हणजे पुरातन काळातील खरबरीत स्वरूपाची गाळाचीमाती अशी दोन प्रकारची माती सिंधू गंगा नदीच्या खोऱ्यात आढळून आली आहे.

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

जातात. गाळाची माती नदीच्या मैदानी प्रदेशात दिसून येते. उदा. सतलज, गंगा व ब्रम्हपुत्रा, नर्मदा, तापी, महानदी, गोदावरी, कृष्णा, कावेरी या नद्यांची मैदाने.

2. काळीमाती

या मातीला 'रेगूर मृदा' (तेलुगूमध्ये) असेही म्हणतात. ही माती कापसाच्या लागवडीस उपयुक्त असते. म्हणून या मातीला 'काळी कपाशीची माती' असे सुद्धा म्हणतात. ही माती बेसाल्ट खडकांपासून तयार होते म्हणून तिचा रंग काळा व गडद करडा असतो. ही माती चिकट माती असून जास्त काळ ओलावा टिकवून ठेवते. कापूस, ऊस, ज्वारी, मका, द्विदलधान्ये, गहू व मिरची या पिकांसाठी ही माती उपयुक्त आहे.

भारतात काळीमाती दख्खनच्या पठाराच्या बेसाल्ट खडकापासून बनलेल्या क्षेत्रात मोठ्या प्रमाणात आढळते. या क्षेत्रात महाराष्ट्र, मध्यप्रदेश, तेलंगाणाचा काहीभाग, उत्तर कर्नाटक, गुजराथ व तामिळनाडूतील काही भाग यांचा समावेश होतो. सुमारे 5.46 लक्ष चौ.कि.मी. एवढ्या विस्तीर्ण क्षेत्रात काळी माती आढळून येते.



लालमाती

ग्रॅनाईट, नीस व इतर स्फटिकमय खडकांची झीज होऊन त्यांच्या चुऱ्यापासून ही माती तयार होते. याचा रंग लाल किंवा फिक्कट लाल असतो. यात वाळूचे प्रमाण जास्त व चिक्कणमातीचे प्रमाण कमी असते. त्यामुळे ओलावा टिकवून ठेवण्याचे सामर्थ्य यात कमी

www.textbookpdf.in

असते. सुमारे 5.2 लक्ष चौ.कि.मी. प्रदेशात ही माती पसरलेली आहे. दक्षिण कर्नाटक, महाराष्ट्र, मध्यप्रदेश, ओडिशा, केरळ, गोवा, बिहार, उत्तर प्रदेश, आसाम, मणिपूर, नागालँड व पश्चिमबंगाल राज्यातील काही भागात ही माती आढळते. तामिळनाडूमध्ये ही माती मोठ्या प्रमाणात आढळून येते. नाचणी, तृणधान्ये,शेंगा तंबाखू, बटाटे या पिकांसाठी ही माती उपयुक्त आहे. पाण्याचा पुरवठा झाल्यास या मातीत विविध प्रकारची पिके घेता येतात.

4) बाजूकडील माती (लॅटेराईट माती)

अधिक उष्णता व अधिक पाऊस पडणाऱ्या उष्ण प्रदेशात ही माती तयार होते. पश्चिम घाट, पूर्व घाट, छोटा नागपूरचे पठार, मेघालयचे पठार, राजमहल पर्वत, विंध्य व सातपुडा पर्वतरांगा या ठिकाणी ही माती आढळते. भारतातील 2.48 लाख चौ.कि.मी. प्रदेशात ही माती आढळते. पावसाच्या पाण्यामुळे क्षार विरघळून द्रवरूपात जमिनीच्या खोलवर जातात त्यामुळे वरच्या भागात न विरघळणारे लोह ऑक्साईड व ॲल्युमिनियम मात्र दिसून येतात. म्हणून या मातीत सुपीकता फारच कमी प्रमाणात असते. काजू, रबर, चहा, कॉफी व भात ही पिके या मातीत पिकविता येतात.

5) वाळवंटी माती

वाळवंटात व अर्ध वाळवंटी परिस्थिती असलेल्या भागात ही माती तयार होते. भारताच्या वायव्य भागात ही माती आढळते. उदा. राजस्थानचा बराचसा भाग, दक्षिण हरियाणा, पंजाब व गुजराथचा उत्तर भाग. या मातीची सहजपणे पूड तयार होते. व त्यामध्ये मिठाचा अंश जास्त असतो. त्यामध्ये वाळूचे प्रमाण जास्त असते. ओलावा व सेंद्रिय पदार्थ फार कमी असतात. त्यामुळे विविध पिके पिकविता येत नाहीत. पाणी पुरवठ्याची सोय असल्यास काही पिके पिकविता येतात. भारतात सुमारे 1.42 लक्ष चौ.कि.मी. क्षेत्रात ही माती आढळून येते.

6) डोंगरी माती.

घनदाट अरण्याने आच्छादलेल्या डोंगरांच्या उतारावर या प्रकारची माती आढळते. जैविक अंश कुजल्याने ही माती बनते या मातीत क्षार व सेंद्रिय पदार्थांचे प्रमाण अधिक असते. मळ्यांची लागवड करण्यास ही माती अत्यंत उपयुक्त आहे. उदा. चहा, कॉफी, फळे इत्यादि. जम्मू व काश्मीर, हिमाचल प्रदेश, मणिपूर व पश्चिम घाटातील प्रदेशात डोंगरी माती आढळते. भारतात 2.85 लाख चौ.कि.मी. क्षेत्रात ही माती आढळून येते.

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

मातीची धूप

भूपृष्ठावरील मातीचा वरचा थर निघून जातो यालाच मातीची धूप म्हणतात नद्या, हिमनद्या, वारे, समुद्राच्या लाटा इ. मुळे मातीची धूप होत असते. मातीची धूप झाल्यामुळे त्याची सुपीकता कमी होते. देशातील महत्त्वाच्या समस्यांपैकी मातीची धूप ही पण एक समस्या आहे.

मातीची धूप होण्याची मुख्य कारणे

a) अरण्यांचा नाश
b) जनावरांचे सतत चरणे
c) जुन्या पद्धतीची शेती
d) बदलती शेती
e) मातीच्या वरच्या थराचा विटा, कौले इ.साठी वापर

मातीच्या धूपेचे परिणाम

1. मातीची सुपीकता कमी होते व शेतजमिनीची उत्पादन क्षमता किंवा कस कमी होतो.
2. नदीमध्ये गाळ साचतो, पूर परिस्थिती निर्माण होते नदीचे पात्र बदलते, धरणातील पाणीसाठ्याचे सामर्थ्य कमी होते.
3. भूमीमध्ये पाणी शोषून घेण्याची क्षमता कमी होते. त्यामुळे अंतर्जल पातळी खालावते.
4. वनस्पती वाळतात व दुष्काळी परिस्थिती निर्माण होते.
5. देशाच्या अर्थव्यवस्थेला हानी पोहोचते.

मातीचे संरक्षण

मातीची धूप यांबविणे व सुपीकता राखून ठेवणे याला 'मातीचे संरक्षण' असे म्हणतात. मातीच्या संरक्षणासाठी काही उपाययोजना हाती घेण्यात आल्या आहेत. त्या म्हणजे.

1. अरण्यांचे रक्षण, संवर्धन आणि पुनर्वनीकरण करणे.
2. जनावरांच्या चरण्यावर नियंत्रण घालणे.
3. समपातळीवरील शेतीपद्धतीचा अवलंब करणे
4. वाहत्या पाण्याच्या प्रवाहावर नियंत्रणासाठी समतल बांध, ढाळीचे वरंबे तयार करणे, पायऱ्या पद्धतीची शेती करणे.
5. समपातळीवरील बांधबंदिस्ती करणे
6. रोधी बांधांची निर्मिती करणे.

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

मातीचे संरक्षण करणे, ही एक अत्यंत निकडीची गरज आहे. यासाठीच पंचवार्षिक योजनांमध्ये त्याला जास्त प्राधान्य दिले जात आहे.

स्वाध्याय

I. खालील रिकाम्या जागी योग्य शब्द भरा

1. नद्यांनी वाहून आणून संचित झालेल्या मातीला _____ असे म्हणतात.
2. काळ्या मातीला _____ व _____ असेही म्हणतात.
3. अधिक उष्णता व अधिक पाऊस पडणाऱ्या उष्ण प्रदेशात _____ ही माती तयार होते.
4. डोंगरीमाती _____ या पिकांसाठी उपयुक्त आहे.

II. समूहात चर्चा करून खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.

1. भारतातील मातीचे प्रमुख प्रकार कोणते?
2. भारतात काळ्या मातीची विभागणी कशी झाली आहे?
3. लाल मातीची वैशिष्टये कोणती?
4. मातीची धूप व संरक्षण म्हणजे काय?
5. मातीची धूप झाल्यामुळे कोणते परिणाम होतात?
6. मातीची धूप होण्याची कारणे कोणती?

III. उपक्रम

1. भारताचा नकाशा काढून त्यामध्ये मातीची विभागणी दाखवा.

IV. प्रकल्प

1. तुमच्या जवळच्या शेतीखात्याच्या कार्यालयास भेट द्या. शिक्षकांच्या सहाय्याने तुमच्या तालुक्यात आढळणाऱ्या विविध मातीचे प्रकार कोणते त्याची यादी करा.

***

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

प्रकरण - 5

भारतातील अरण्यसंपत्ती

या पाठात आपण पुढील घटकांचा अभ्यास करूया.

- **अरण्यांचा अर्थ व त्यांचे महत्त्व**
- **अरण्यांचे प्रकार व त्यांची विभागणी**
- **अरण्यांचे संरक्षण**
- **वन्यजीव अभयारण्ये व राष्ट्रीय उद्याने**
- **भारतातील जैविक संरक्षण क्षेत्रे**

अरण्यांचा अर्थ व त्याचे महत्त्व

वृक्ष व इतर वनस्पती संकुलाने व्यापलेल्या विशाल भूप्रदेशाला 'अरण्य' असे म्हणतात. सर्वसाधारणपणे व्यापारीदृष्ट्या मौल्यवान वृक्षांनी व्याप्त हा प्रदेश असतो. अरण्ये ही नैसर्गिक किंवा मानवनिर्मित लागवडीखालील वनस्पतींनी युक्त असतात.

अरण्ये ही भारताची नैसर्गिक साधन संपत्ती आहे ते वैविध्यपूर्ण लाकूड मोठ्या प्रमाणात पुरवितात ज्यांचा उपयोग इंधन, इमारतीसाठी लाकूड व उद्योगधंद्यांना लागणारा कच्चा माल म्हणून केला जातो. अरण्ये जनावरांना चारा व लोकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देतात.

अरण्ये ही अप्रत्यक्षपणे जमिनीच्या भूपृष्ठावरील भागाचे संरक्षण करतात. जोरात वाहणाऱ्या पाण्याच्या प्रवाहापासून मातीची धूप होणे थांबवितात. वाळवंटीकरण थांबवितात. मातीची सुपीकता वाढविण्यासाठी सहाय्य करतात. तापमान वाढीवर नियंत्रण ठेवून पर्यावरणाचा समतोल राखतात. ते वन्यप्राण्यांचे आश्रय स्थान आहे.

अरण्यांचे प्रकार

हवामान, माती व भौगोलिक वैशिष्ट्ये या घटकांवर अरण्यांचे प्रकार अवलंबून असतात. त्यामध्ये हवामान हा महत्त्वाचा घटक आहे. विशाल अशा भारत देशात अरण्यांचे विविध प्रकार आढळतात. त्यांची सहा प्रमुख प्रकारात विभागणी केलेली आहे.

1) उष्ण कटिबंधातील सदाहरित अरण्ये
2) उष्ण कटिबंधातील पानझडी अरण्ये
3) खुरट्या वनस्पती आणि गवताळ प्रदेश
4) वाळवंटी अरण्ये
5) डोंगरी अरण्ये
6) मँग्रोव्ह अरण्ये

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

1) उष्ण कटिबंधातील सदाहरित अरण्ये :

ही अरण्ये 250 सें.मी. पेक्षा जास्त पाऊस पडणाऱ्या भागात आढळतात. पश्चिमघाट, पूर्वघाट व ईशान्येकडील राज्ये, आसाम, नागालँड, मेघालय, त्रिपुरा, मणिपूर येथील पर्वत तसेच अंदमान निकोबार बेटांमध्ये ही अरण्ये आढळून येतात. ही अरण्ये घनदाट असून येथील झाडे अतिशय उंच वाढतात. झाडांची पाने एकाच वेळी गळून पडत नाहीत. त्यामुळे ती कायम हिरवीगार असतात. टीक, रोजवुड, एबोनी, महोगनी, गुर्जान, चंपा हे येथील प्रमुख वृक्ष आहेत.



2) उष्ण कटिबंधातील पानझडी अरण्ये :

जेथे 100-200 सें.मी. वार्षिक पाऊस पडतो. अशा प्रदेशात ही अरण्ये आढळतात. देशाच्या विशाल भूप्रदेशात ही अरण्ये पसरलेली आहेत. पश्चिम घाटातील पूर्वेकडील उताराचा भाग, म्हणजे महाराष्ट्र, कर्नाटक, केरळ व तामिळनाडू राज्ये, छोटा नागपूरचे पठार, हिमालयातील पायथ्याचा प्रदेश, ओडिशा, व बंगालमधील काही भागात ही अरण्ये दिसून येतात.

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

या अरण्यातील झाडांची पाने वसंत ऋतूत व उन्हाळ्याच्या प्रांरभीच गळून पडतात. म्हणून यांना 'मान्सून अरण्ये' असेही म्हणतात. टिक, साल, चंदन, कुसुम, काजू, आवळा, सिरस, आंबा, कडूनिंब, चिंच ही झाडे या अरण्यात प्रामुख्याने आढळतात.

3) खुरट्या वनस्पती आणि गवताळ प्रदेश

60 ते 100 सें.मी. वार्षिक पर्जन्य असणाऱ्या प्रदेशात ही अरण्ये आढळतात. येथे तुरळक ठिकाणी खुरटे व खरबरीत गवत, काटेरी झाडे झुडपे आढळतात. ही वनस्पती कच्छ आणि थर वाळवंटाची सीमेलगतची बाजू येथे पसरलेली आहे. गवताळ प्रदेश प्रामुख्याने पूर्व राजस्थान, पंजाब, पश्चिम घाटातील काही भाग, आणि कार्डमम पर्वतात आढळून येतात.

4) वाळवंटी वनस्पती :

ज्या प्रदेशात वार्षिक पर्जन्यमान 10 ते 50 सें.मी. आहे; तेथे ही वनस्पती आढळते. थरवाळवंट, पंजाबचा काहीभाग, हरियाणा, राजस्थान आणि दख्खनचे पठार या प्रदेशात ही वनस्पती आढळून येते. पावसाचे प्रमाण तुरळक स्वरूपाचे असल्यामुळे काटेरी झुडपे, खुरटे गवत वगैरे येथे विरळ स्वरूपात आढळून येतात. त्यामध्ये निवडुंग, सुबाभूळ, खैर, झंड, कोल्को, खेजरी वगैरे वृक्ष आढळून येतात.

5) डोंगरी अरण्ये :

पर्वतांच्या उतरणीवर वाढणाऱ्या झाडांना व रोपट्यांना 'डोंगरी अरण्ये' म्हणतात. हिमालय पर्वताच्या उतारावर तसेच निलगिरी पर्वताच्या उतरणीवर ही अरण्ये आढळून येतात. उंची नुसार झाडे आणि रोपट्यांमध्ये विविधता दिसून येते. ओक, चेस्टनट, ॲश, बीच, पाईन, सीडर, स्प्रूस, फर, देवदार, वॉलनट या प्रमुख वनस्पती या अरण्यात दिसून येतात.

6) मँग्रोव्ह अरण्ये (भरतीओहोटीची अरण्ये)

अधिक पाऊस पडणाऱ्या प्रदेशात, नदीच्या मुखाजवळील त्रिभूज प्रदेशात व चढउतार असणाऱ्या समुद्रकिनारपट्टीच्या प्रदेशात ही अरण्ये दिसून येतात. भारतात पूर्व किनारपट्टीच्या नदी मुखा जवळील प्रदेशात ही अरण्ये जास्त प्रमाणात आढळून येतात. पश्चिम किनापट्टीम ध्ये तुरळक ठिकाणी ही अरण्ये आढळतात. सुंद्री, वेत, पाम, ताड,हायझोफोरा (कांदळ), केवडा, खारफुटी (Serew Pipe) या येथील प्रमुख वनस्पती आहेत. समुद्राकडे झुकलेल्या फांद्यांना पारंब्या (मुळे) फुटतात. या पारंब्या समुद्राच्या पाण्यात बुडालेल्या असतात.

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

हे तुम्हाला माहिती आहे का?

गंगानदीच्या त्रिभूज प्रदेशात सुंदरी वृक्षांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. म्हणून या त्रिभुज प्रदेशाला 'सुंदरबन' असे म्हणतात.

अरण्यांची विभागणी

भारतात एकूण 7.74 लाख चौ.कि.मी. अरण्य प्रदेश आहे. देशाच्या एकूण भौगोलिक क्षेत्रांपैकी 23.6% इतका भूप्रदेश अरण्यांनी व्यापलेला आहे.

1952 च्या राष्ट्रीय अरण्य धोरणानुसार कोणत्याही प्रदेशात अनुकूल वातावरणासाठी 33.3% एवढे अरण्यव्याप्त क्षेत्र असावे लागते. पण भारतात हे क्षेत्र कमी आहे. जगातील एकूण अरण्यव्याप्त क्षेत्रापेक्षा (29.5%) हे प्रमाण कमी आहे.

भारतात अरण्यांची विभागणी असमान आहे. देशातील अरण्यांच्या शेकडा 60% भाग हिमालय पर्वत व द्वीपकल्पीय पठारांच्या पर्वतात दिसून येतो. तर 20% भाग उत्तरेकडील मैदानात आढळतो. मध्यप्रदेश राज्यात अरण्यक्षेत्र विशाल स्वरूपात आहे या उलट गोवा येथे कमी प्रमाणात अरण्य क्षेत्र आहे.

अरण्यांचे संरक्षण

भारताच्या आर्थिक व्यवस्थेत अरण्यांचा मोलाचा वाटा आहे. दुर्दैवाने अलिकडे अरण्यांचे क्षेत्र कमी होत आहे. शेतीची वाढ, रस्ते व रेल्वेमार्ग निर्मिती, पाणी पुरवठ्याच्या योजना, औद्योगिकरण, शहरीकरण, जनावरांचे अतिप्रमाणात चरणे, जंगलात वणवा पेटणे इत्यादिमुळे अरण्यांचे क्षेत्र कमी होत आहे. पुढील पिढीच्या भल्यासाठी जंगलांचे संरक्षण करणे अगत्याचे आहे. अरण्यतोडीवर नियंत्रण व त्यांचे रक्षण, अरण्यांचे व्यवस्थापन व संवर्धन इत्यादिंना 'अरण्यांचे संरक्षण' म्हणतात.

भारतात अरण्य संरक्षणासंबंधी केलेल्या उपाययोजना

1. अरण्यांच्या नाशावर नियंत्रण.
2. जनावरांच्या चरण्यावर निर्बंध.
3. वणव्यावर नियंत्रण ठेवणे.
4. अरण्य प्रदेशात अतिक्रमण होण्यावर बंधन
5. वनस्पतींवरील कीड व रोगांवर उपाय व नियंत्रण
6. बेकायदेशिररित्या झाडे तोडून त्याची तस्करी करण्यावर नियंत्रण
7. वैज्ञानिक पद्धतीने झाडे तोडणे

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

8. अरण्यतोड प्रतिबंधक कायदा अंमलात आणणे
9. अरण्यवाढीसाठी प्रोत्साहन देणे
10. अरण्यांचे महत्त्व लोकांना पटवून देणे व जनजागृती करणे.

वन्यजीव अभयारण्ये

वन्यजीवांना मुक्तपणे व निर्भयपणे फिरण्याची सोय करून देणे यालाच 'वन्यजीव अभयारण्ये' म्हणतात वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या हुकूमाशिवाय कोणत्याही प्राण्यांची शिकार करणे व पकडणे यावर येथे निर्बंध घातलेले असतात. भारतात सुमारे 523 वन्यजीव अभयारण्ये आहेत. अन्नामलाई व मदुमलाई (तामिळनाडू) दांडेली, भद्रा, तलकावेरी, बिळिगिरी रंगनबेट्ट (कर्नाटक), पेरियार (केरळ) नागार्जुनसागर (तेलंगाणा), भरतपूर (पक्षीधाम) आणि रणथंबोर (राजस्थान) मानस (आसाम), जल्दपारा (प.बंगाल) इत्यादी प्रमुख अभयारण्ये आहेत.

राष्ट्रीय उपवने

नैसर्गिक सौंदर्य, वनस्पती व प्राणी यांचे संरक्षण करण्यासाठी व जनतेच्या मनोरंजनासाठी तसेच वैज्ञानिक आवड जोपासण्यासाठी राष्ट्रीय उपवने निर्माण केली जातात. झाडे तोडणे, जनावरे चारवणे, व शेती करणे यावर तेथे निर्बंध असतात. भारत देशात एकूण 99 राष्ट्रीय उपवने आहेत.

भारतातील प्रमुख राष्ट्रीय उपवने

काझीरंगा (आसाम), सुंदरबन (प.बंगाल) कार्बेट (उत्तरांचल), गीर (गुजराथ), कान्हा (म ध्यप्रदेश) बंडीपूर, बन्नेरूघट्टा व नागरहोळे (कर्नाटक), सारिस्का (राजस्थान), दुधवा (उत्तर प्रदेश), ताडोबा (महाराष्ट्र).

तुम्हाला माहिती आहे का?

- यलोस्टोन उद्यान (U.S.A) (1872) - हे जगातील सर्वात पहिले राष्ट्रीय उपवन आहे.
- जिम कार्बेट (उत्तरांचल) 1936 - हे भारतातील पहिले राष्ट्रीय उपवन आहे.

जैविक संरक्षणक्षेत्र

कोणत्याही एका भूप्रदेशातील संरक्षित केलेला भाग किंवा किनारपट्टीच्या प्रदेशाला जैविक संरक्षण क्षेत्र असे म्हणतात. यामध्ये विविध प्रकारचे वैशिष्ट्यपूर्ण जीवसंकुल आढळतात. या व्यवस्थेमध्ये लोक हे अविभाज्य घटक आहेत. जीव संकुलाचे संरक्षण, संशोधन, शिक्षण, स्थानिक लोकांचा सहभाग ही जैविक संरक्षण क्षेत्राची उद्दिष्टे आहेत.

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

भारतात एकूण 18 जैविक संरक्षण केंद्रे आहेत. निलगिरी, नंदादेवी, नोक्रेक, मानस, ग्रेट निकोबार, मन्नारचे आखात, सुंदरबन, सिमोली पाल, कांचनजंगा, पचमरी, अगस्थामलाई, दिब्रू, सैखोव, दिबांग ही त्यापैकी प्रमुख आहेत.

हे तुम्हाला माहिती आहे का?

1) जैविक संरक्षण क्षेत्रांचा प्रारंभ मानव व जैविक कार्यक्रमांतर्गत 1971 मध्ये युनेस्कोने केला.

2) भारतात पहिले जैविक संरक्षण केंद्र 1986 मध्ये निलंगिरी पर्वतरांगात अस्तित्वात आले.

स्वाध्याय

I. खालील रिकाम्या जागी योग्य शब्द भरा

1. _____ या अरण्यातील झाडांची पाने वर्षातील एकाच ऋतूत व एकाचवेळी गळून पडत नाहीत.
2. _____ या अरण्यांना 'मान्सून अरण्ये' असेही म्हणतात.
3. हिमालय पर्वतात _____ प्रकारची अरण्ये आहेत.
4. नदीच्या मुखाजवळ _____ अरण्ये आढळतात.
5. 'नागार्जुनसागर' हे अभयारण्य _____ या राज्यात आहे.

II. समूहात चर्चा करून खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.

1. अरण्ये म्हणजे काय?
2. वाळवंटी अरण्ये कोणत्या प्रदेशात आहेत?
3. अरण्यांच्या संरक्षणासाठी असलेल्या कोणत्याही चार उपाय योजना लिहा.
4. वन्यजीव अभयारण्ये म्हणजे काय?
5. कर्नाटक राज्यातील राष्ट्रीय उद्यानांची नावे लिहा.
6. जैविक संरक्षण क्षेत्राची मुख्य उद्दिष्टे कोणती?

III. उपक्रम

1. तुमच्या घराजवळ आढळणाऱ्या प्रमुख वनस्पती झाडे व प्राणी ओळखून त्यांची यादी तयार करा.

IV. प्रकल्प

1. वन्यजीव अभयारण्यातील वन्यप्राण्यांची चित्रे गोळा करून एक अल्बम तयार करा.
2. भारताचा नकाशा काढून त्यात जैविक संरक्षण क्षेत्रे दाखवा व त्यांची नावे लिहा.

***

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

प्रकरण - 6

भारतातील जलसाधनसंपत्ती

या पाठात आपण पुढील घटकांचा अभ्यास करूया.

- **जलसाधनसंपत्तीचे महत्त्व**
- **भारतातील प्रमुख नद्या**
- **पाणी पुरवठा - त्याचा अर्थ व भारत देशात पाणीपुरवठ्याची आवश्यकता**
- **पाणी पुरवठ्याचे प्रकार व त्याची विभागणी**
- **बहुद्देशीय पाणीपुरवठा योजना**

महत्त्व : जलसंपत्ती ही एक अमूल्य अशी नैसर्गिक साधन संपत्ती आहे. पाण्याशिवाय जीवन कंठणे केवळ अशक्य आहे. मानवाला पिण्यासाठी, स्वयंपाकासाठी, स्वच्छता, पाणी पुरवठा, विद्युतशक्ती निर्मिती, उद्योगधंदे, शेती नौकापर्यटन व मासेमारी इ. विविध उद्देशांसाठी पाण्याची आवश्यकता आहे.

भारत देशात अफाट अशी जलसंपत्ती आहे. या देशात अनेक नद्या वाहतात व भरपूर पाऊस पडतो. अमर्यादित भूम्यांतर्गत पाण्याचा साठाही उपलब्ध आहे.

भारतातील प्रमुख नद्या

भारत देशात अनेक नद्यांचे जाळे पसरलेले आहे. नद्या या देशाची नैसर्गिक साधनसंपत्ती आहे. या नद्यांमधील पाण्याचा वापर जलविद्युत निर्मिती, देशांतर्गत जलमार्ग, मासेमारी व मनोरंजन इत्यादी उद्देशांसाठी केला जातो. भारतातील नद्यांची दोन प्रकारात विभागणी केली आहे. 1) उत्तर भारतातील नद्या 2) दक्षिण भारतातील नद्या

1) उत्तर भारतातील नद्या

या नद्यांना 'हिमालयातील नद्या' असेही म्हणतात. सिंधू, गंगा व ब्रम्हपुत्रा या उत्तर भारतातील प्रमुख नद्या आहेत.

सिंधू नदी : या नदीचा उगम कैलास पर्वतावर (तिबेट) झाला आहे. सुरुवातीस वायव्य दिशेने व नंतर नैर्ऋत्य दिशेकडे वळून ही नदी पाकीस्तानात प्रवेश करते. त्यानंतर दक्षिणेकडे वहात जाऊन कराची जवळ अरबी समुद्राला मिळते. सिंधू नदीची लांबी 2897 कि.मी. असून त्यापैकी 709 कि.मी. ती भारत देशात वाहते. या नदीचा जास्तीत जास्त भाग पाकिस्तानात आहे. या नदीला अनेक उपनद्या येऊन मिळतात. त्यापैकी झेलम, चिनाब, बियास, रावी, सतलज इ. प्रमुख आहेत.

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

गंगानदी : ही भारतातील सर्वात जास्त लांबीची नदी असून याची लांबी 2525 कि.मी. इतकी आहे. या नदीचा उगम 'गंगोत्री' येथे झाला आहे. सुरुवातीला दक्षिण दिशेकडे वाहात जाऊन ती आग्नेयेकडे वळते व बांग्ला देशात प्रवेश करून ब्रम्हपुत्रा या नदीस मिळते. नंतर पद्म नदीत रूपांतर होऊन शेवटी बंगालच्या उपसागरास मिळते. यमुना, घाग्रा, गंडक, रामगंगा, गोमती, शारद, सोन व कोसी या गंगानदीच्या उपनद्या आहेत. त्यापैकी यमुना नदी ही लांब पल्याची उपनदी आहे.

ब्रम्हपुत्रा नदी :

मानस सरोवराजवळील 'चेमयुंगडुंग' (तिबेट) येथे ही नदी उगम पावते. सुरूवातीला ही पूर्वाभिमुख वाहात जाऊन अरुणाचल प्रदेशातील रुंद अशा खोऱ्यातून भारतात प्रवेश करते. नंतर पश्चिमेकडे बांग्ला देशात वाहात जाते व गंगा नदीला मिळते. या नदीची लांबी 2589 कि.मी. आहे.

हे तुम्हाला माहिती असू दे

ब्रम्हपुत्रा या नदीस तिबेटमध्ये 'त्साँग पो' म्हणतात व बांग्ला देशात 'जमुना' असे म्हणतात या नदीमुळे 'मुजली' बेट तयार झाले आहे. ते जगातील सर्वात मोठे नदीनिर्मित बेट आहे.



©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

ii) दक्षिण भारतातील नद्या

दक्षिण भारतात अनेक नद्या वाहतात. त्यांना 'पठारी प्रदेशातील नद्या' असेही म्हणतात. येथील जास्तीत जास्त नद्यांचा उगम पश्चिम घाटात झाला आहे. महानदी, गोदावरी, कृष्णा, कावेरी, नर्मदा, तापी व इतर उपनद्या या दक्षिण भारतातील प्रमुख नद्या आहेत. या नद्यांमध्ये पूर्व वाहिनी, पश्चिम वाहिनी नद्या असे दोन प्रकार केले जातात.

a) पूर्ववाहिनी नद्या : महानदी, गोदावरी, कृष्णा व कावेरी या पूर्ववाहिनी नद्या आहेत.

महानदी 'सिवहा' 'पर्वत रांगात उगम पावून पूर्वाभिमुख (851 कि.मी.) वाहात बंगालच्या उपसागराला मिळते. गोदावरी ही नदी दक्षिण भारतातील सर्वात लांब नदी आहे. या नदीचा उगम 'त्र्यंबक' येथे झाला असून ती पूर्वेकडे वाहात (1465 कि.मी.) जाऊन बंगालच्या उपसागरास मिळते. कृष्णा नदी महाबळेश्वर येथे उगम पावते व आग्नेयेकडे वाहात जाऊन बंगालच्या उपसागरास मिळते. भीमा, तुंगभद्रा, कोयना, घटप्रभा व मलप्रभा या कृष्णानदीच्या उपनद्या आहेत. कावेरी नदी तलकावेरी (कोडगू) येथे उगम पावते व पूर्वेकडे वहात जाऊन बंगालच्या उपसागरास मिळते. हेमावती, शिम्शा कबिनी, अर्कावती, लक्ष्मणतीर्थ, सुवर्णावती व भवानी या कावेरी नदीच्या उपनद्या आहेत.

b) पश्चिम वाहिनी नद्या :

नर्मदा व तापी या नद्या पश्चिमेकडे वाहणाऱ्या मुख्य नद्या आहेत. नर्मदा नदी 'अम रकंटक' या पर्वतात उगम पावते व अरुंद अशा 'अमृतशिला' (मार्बल गॉर्ज) या खिंडीतून वाहात पश्चिमेकडे अरबी समुद्रास मिळते (1312 कि.मी.) तापी नदी 'मुलताई' येथे उगम पावते (724 कि.मी.) व अरबी समुद्रास मिळते. अनेक पश्चिम वाहिनी नद्या छोट्या व वेगवान आहेत. त्यापैकी साबरमती, मांडोवी, बेडती, शरावती काळी, नेत्रावती व पेरियार या मुख्य आहेत.

पाणीपुरवठा :

अर्थ : शेतीला कृत्रिम पद्धतीने पाण्याचा पुरवठा करणे यालाच 'पाणीपुरवठा' असे म्हणतात. म्हणजे नद्या, धरणे, तलाव व अंतर्जल या स्त्रोतापासून शेतीला पाण्याचा पुरवठा करणे.

पाणी पुरवठ्याची आवश्यकता : भारत हा शेती प्रधान देश आहे. त्यामुळे शेतीला आवश्यक व सतत पाणीपुरवठा करणे अगत्याचे आहे. भारतातील शेती ही प्रामुख्याने मान्सून पावसावर अवलबून आहे. पर्जन्याची विभागणी ही असमान असून काहीवेळा अवकाळी पाऊसही पडतो. काही पिकांना मुबलक प्रमाणात व सतत पाणीपुरवठयाची आवश्यकता असते. उदा. ऊस, भात इ. भरघोस पीक व अधिक उत्पादनासाठी जास्त पाणीपुरवठा करणे महत्वाचे आहे. या करिता पाणी पुरवठा पद्धतींची भारत देशाला आवश्यकता आहे.

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

पाणी पुरवठयाचे प्रकार : भारतात विहीर, कालवा व तलाव या पाणीपुरवठयाच्या पद्धती रूढ आहेत. अलिकडे ठिबक सिंचन व फवारा सिंचन हया पद्धती अंमलात आल्या आहेत.

1. विहिरीने पाणीपुरवठा :

ही भारतातील अतिशय महत्वाची पाणीपुरवठयाची पद्धत आहे. भारतामध्ये शेकडा 60.7% भागाला या पद्धतीने पाणीपुरवठा होतो. ही पद्धत कमी पावसाच्या प्रदेशात ही शक्य आहे. कमी खर्चामध्ये सहजपणे विहीर खोदता येते आधुनिक व खर्चिक तंत्रज्ञानाची गरज भासत नाही. अल्पभूधारक शेतकऱ्यांना पण ही पद्धत परवडण्यासारखी आहे.

गंगा नदीच्या मैदानात विहिरीने पाणीपुरवठा करण्याची पद्धत मोठयाप्रमाणात सुरु आहे. त्यामध्ये पंजाब, हरियाणा, उत्तर प्रदेश, बिहार व पश्चिम बंगाल ही राज्ये येतात. दक्षिण भारतात तामिळनाडू, आंध्रप्रदेश, कर्नाटक आणि ओडिशा या राज्यात विहिरीने पाणी पुरवठयाची पद्धत रुढ आहे.

विहिरींचे दोन प्रकार आहेत

(1) खुल्या विहिरी (2) कूपनलिका आज भारतात कूपनलिका ही पद्धत मोठया प्रमाणात प्रचलित आहे.

2. कालव्याने पाणीपुरवठा :

विहिरीने पाणीपुरवठा करण्यापाठोपाठ कालव्याने पाणीपुरवठा या पद्धतीला भारतात दुसरे महत्वाचे स्थान आहे भारतातील 27% भागाला या पद्धतीने पाणीपुरवठा केला जातो. जगात या प्रकारच्या पाणी पुरवठयाच्या पद्धतीत भारत अग्रेसर आहे. कालवे निर्माण करणे व त्यांचे व्यवस्थापन ही सरकारची जबाबदारी आहे.

यामध्ये दोन प्रकार आहेत.

(1) पुराचे कालवे (2) बारमाही कालवे

कोणतेही धरण न बांधता नदीचे पाणी कालव्यामार्फत थेट शेतीला पुरविणे याला 'पुराचे कालवे' म्हणतात व धरणे बांधून पाण्याचा संग्रह करणे आणि ते पाणी कालव्यामार्फत शेतीला पुरविणे म्हणजे 'बारमाही कालवे' होय.

उत्तर प्रदेश, पंजाब, हरियाणा, बिहार, मध्य प्रदेश राजस्थान, आंध्रप्रदेश, गुजराथ, तामिळनाडू, ओडीशा, पश्चिम बंगाल व कर्नाटक या राज्यात कालव्याने पाणीपुरवठा ही पद्धत विकसित झालेली आहे.

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

3. तलावाने पाणी पुरवठा :

नैसर्गिक व मानवनिर्मित (कृत्रिम) खोलगट भागात पावसाचे पाणी साचून तयार झालेल्या पाण्याच्या साठयांना 'तलाव' असे म्हणतात. हे पाणी शेतीसाठी वापरतात. परंतु जास्तीत जास्त तलाव हे फक्त पावसाळ्यातच पाण्याने भरलेले आढळतात. त्यामुळे भारतात ही पद्धत तितकीशी रुढ नाही. भारतात फक्त 3% क्षेत्राला या पद्धतीने पाणीपुरवठा केला जातो. तामिळनाडू, आंध्रप्रदेश, महाराष्ट्र, कर्नाटक, ओडिशा, मध्यप्रदेश, राजस्थान व उत्तर प्रदेश या राज्यात ही पद्धत जास्त प्रमाणात आढळून येते.

बहुद्देशीय नदी खोऱ्यातील योजना :

विविध उद्देशांसाठी निर्माण केलेल्या नदीखोऱ्यातील योजनांना 'बहुद्देशीय नदी खोऱ्यातील योजना' असे म्हणतात यांचे मुख्य उद्देश म्हणजे.

1. पाणीपुरवठा करणे
2. महापुरांवर नियंत्रण ठेवणे
3. जलविद्युतशक्ती तयार करणे
4. मातीची धूप होण्यावर नियंत्रण ठेवणे
5. देशांतर्गत नौकापर्यटन
6. अंतर्गत मासेमारी
7. मनोरंजनाच्या सुविधा
8. घरगुती वापरासाठी व उद्योगधंद्यांना पाणीपुरवठा
9. पडिक जमिनीचे शेतजमिनीत रुपांतर करणे
10. अरण्यांचे संरक्षण व संवर्धन करणे.

बहुद्देशीय नदी खोऱ्यातील योजना

1. दामोदर नदीखोरे योजना

दामोदर योजना ही स्वतंत्र भारतातील पहिली बहुद्देशीय योजना आहे. अमेरिकेतील 'टेन्नसी' खोऱ्यातील योजने प्रमाणेच ही योजना आखली गेली आहे. पावसाळ्यात दामोदर नदीच्या महापुरामुळे पिकांचे व लोकांचे फारच नुकसान होते. त्यामुळे या नदीला 'बंगालचे अश्रू' असे ग्हणतात. यावर नियंत्रण ठेवण्यासाठी बहुउद्देशीय योजना राबविण्यात आली. या योजनेचे मुख्य उद्देश महापुरावर नियंत्रण ठेवणे, पाणीपुरवठा करणे, नौकापर्यटन, जलविद्युतशक्ती तयार करणे, अरण्यांचा विकास करणे, मातीची धूप थांबविणे, खाणकाम व उद्योगधंद्याचा विकास करणे, मासेमारी व्यवसायाला प्रोत्साहन देणे इत्यादी आहेत.

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

बिहार प.बंगाल या दोन्ही राज्यसरकारांनी मिळून ही योजना संयुक्तपणे राबविली आहे. ही योजना दामोदर व तिच्या उपनद्यांवर बांधली गेली आहे. तिलैय्या, कोनार, मैथॉन व पंचत पर्वत अशी चार धरणे व एक दुर्गापूर बांध. बोकारो, दुर्गापूर व चंद्रपूर येथे 3 थर्मल विद्युत शक्ती केंद्रे निर्माण केली आहेत.

2. भाक्रानानगल योजना

ही पंजाब, हरियाणा व राजस्थान राज्यसरकारांची संयुक्त योजना आहे. या योजनेत सतलज नदीवर (हिमाचल प्रदेश) भाक्रा व नानगल (पंजाब) येथील दोन धरणे व चार जलविद्युतशक्ती निर्मिती केंद्रांचा समावेश होतो. महापुरांवर नियंत्रण ठेवणे, पाणीपुरवठा करणे, जलविद्युत शक्ती तयार करणे, मातीची धूप थांबविणे व अरण्यांचा विकास करणे ही या योजनेची मुख्य उद्दिष्टे आहेत. भाक्रा धरणाची उंची 226 मीटर आहे. भारतातील हे धरण भूकंपप्रवण क्षेत्रात येते. या धरणापासून निर्माण झालेल्या पाण्याच्या साठयाला 'गोविंदसागर' असे म्हणतात.

3. हिराकूड योजना

ओडिशा राज्यातील ही एक महत्वाची बहुउदेशीय योजना आहे. या योजनेत म हानदीवर तीन धरणे बांधली आहेत. उदा. हिराकूड, तिकारपूर आणि नराज. त्याबरोबर दोन जलविद्युतशक्ती निर्मिती केंद्रे ही आहेत. भारतातील एक जास्त लांबीचे धरण म्हणून हिराकूड प्रसिद्ध आहे.

पुरावर नियंत्रण, पाणीपुरवठा व जलाविद्युतशक्ती निर्मिती, अंतर्गत जलमार्ग, मासेमारी, अरण्यांचा विकास ही या योजनेची मुख्य उद्दिष्टे आहेत.

4. तुंगभद्रा योजना

कर्नाटक व आंध्र प्रदेश (सध्याचे तेलंगाणा) राज्य सरकारांची ही संयुक्त योजना आहे, पाणीपुरवठा, जलविद्युत निर्मिती व अंतर्गत मासेमारी ही या योजनेची प्रमुख उद्दिष्टे आहेत. या योजनेत एक धरण व तीन जलविद्युतशक्ती निर्मिती केंद्रांचा समावेश होतो. हे धरण कृष्णानदीची उपनदी तुंगभद्रा या नदीवर बल्लारी जिल्ह्यातील होसपेटे जवळच्या 'मल्लापूरम' येथे बांधण्यात आले आहे या धरणाच्या पाणीसाठयाला 'पंपासागर' असे म्हणतात.

5. अप्पर कृष्णा योजना

उत्तर कर्नाटकातील कृष्णा नदीवरील ही एक बहु उद्धेशीय नदी खोऱ्यातील योजना आहे. या योजनेत आलमट्टी व नारायणपूर येथील दोन धरणे व एक जलविद्युतशक्ती

www.textbookpdf.in

©KTBS Not to be republished

निर्मिती केंद्र यांचा समावेश होतो. पाणीपुरवठा करणे, पिण्याच्या पाण्याची सोय करणे, जलविद्युतशक्तीनिर्मिती हे या योजनेचे प्रमुख उद्देश, आहेत.



विजयपूर जिल्हयातील बसवन बागेवाडी तालुक्यातील 'आलमट्टी' येथे आलमट्टी धरण व मुद्देबिहाळ तालुक्यातील सिद्धापूर गावाजवळ 'नारायणपूर' हे धरण बांधण्यात आले आहे. बागलकोट, विजयपूर, कलबुर्गी, यादगिरी व बेळगावी जिल्हयातील काही भागाला या योजनेचा लाभ मिळाला आहे.

6. कोसी योजना

भारत व नेपाळ देशाची ही संयुक्त आंतरराष्ट्रीय योजना आहे. कोसी नदीवर हनुमाननगर (नेपाळ) जवळ हे धरण बांधले आहे. पाणीपुरवठा करणे, पुरावर नियंत्रण ठेवणे, जलविद्युतशक्ती निर्मिती व मासेमारी ही या योजनेची मुख्य उद्दिष्टे आहेत. ही योजना भारत सरकारने निर्माण केली असली तरी याचा लाभ भारत व नेपाळ या दोन्ही देशांना मिळतो.

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

7. रिहांद योजना

ही उत्तर प्रदेशातील बहुद्देशीय नदीखोऱ्यातील मुख्य योजना आहे. रिहांद नदी ('सोन' नदीची उपनदी) वर ही योजना राबविली गेली आहे. पुरावर नियंत्रण, पाणीपुरवठा, मासेमारी, मातीची धूप थांबविणे व जलविद्युतशक्ती निर्मिती ही या योजनेची प्रमुख उद्दिष्टे आहेत. या योजनेअंतर्गत पाण्याच्या साठ्याला 'गोविंद वल्लभ पंतसागर' असे म्हणतात.

हे तुम्हाला माहित असू द्या.

- नागार्जुन सागर योजना - या योजनेच्या उजवीकडील कालव्याला 'जवाहर कालवा' असे म्हणतात. व डावीकडील कालव्याला 'लालबहादूर कालवा' असे म्हणतात.
- कोसी नदीला 'बिहारचे अश्रू' व महानदीला 'ओडिशाचे अश्रू' असे म्हणतात.

8. नागार्जुनसागर योजना

तेलंगाणा राज्यातील 'नागार्जुन कोंड' जवळ कृष्णानदीवर हे धरण बांधले आहे. पाणीपुरवठा करणे व जलविद्युतशक्ती निर्मिती ही या योजनेची मुख्य उद्दिष्टे आहेत

स्वाध्याय

I. खालील रिकाम्या जागी योग्य शब्द भरा

1. सिंधूनदीचा उगम _____ येथे झाला अहे.
2. दक्षिण भारतातील सर्वात लांब नदी _____ ही आहे.
3. हिराकूड धरण _____ या नदीवर बांधले आहे.
4. _____ ही लांब पल्याची नदी गंगा नदीची उपनदी आहे.
5. कोसी योजना _____ व _____ देशाची संयुक्त योजना आहे.

II. समूहामध्ये चर्चा करून खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.

1. ब्रम्हपुत्रा नदीचे वर्णन करा.
2. पाणी पुरवठा म्हणजे काय?
3. भारतातील प्रमुख पाणी पुरवठयाचे प्रकार कोणते आहेत?

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

4. भारतात पाणीपुरवठ्याची आवश्यकता का आहे?

5. बहुदेशीय नदीखोऱ्यातील योजना म्हणजे काय?

6. 'आलमट्टी' योजनेबद्दल टीप लिहा.

7. विहिरीने पाणी पुरवठ्याचे महत्त्व व त्याची विभागणी याबद्दल माहिती लिहा.

III. जोड्या जुळवा:

A (योजना)	B (राज्ये)
1. नागार्जुनसागर	a) कर्नाटक
2. भाक्रानानगल	b) हिमाचल प्रदेश
3. हिराकूड	c) तेलंगाणा
4. तुंगभद्रा	d) ओडिशा

IV. उपक्रम

1. तुमच्या गावाजवळच्या पाणीपुरवठा केंद्राला भेट द्या.

2. भारतातील बहुदेशीय नदी खोऱ्यातील योजनांची यादी तयार करा.

V. प्रकल्प

1. भारताचा नकाशा काढून शिक्षकांच्या सहाय्याने प्रमुख पाणी पुरवठ्याच्या योजना दाखवा.

***

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

प्रकरण - 7

भारतातील भूमी संसाधन

या पाठात आपण पुढील घटकांचा अभ्यास करूया.

- **भारतातील जमिनीचा वापर**
- **भारतातील शेती आणि त्याचे महत्त्व**
- **भारतातील शेतीचे प्रकार**
- **भारतातील प्रमुख पिके**
- **पिकांचा मोसम व पिकांची विभागणी**
- **बागायती पिके व फूलशेती**

भारतातील जमिनीची वापरानुसार विभागणी

अर्थ : अरण्ये, मशागत, गवताळ प्रदेश इत्यादी विविध उद्देशांसाठी जमिनीचा उपयोग करून घेतला जातो. त्याला 'जमिनीचा वापर' असे म्हणतात. जमिनीच्या गुणधर्मानुसार त्याचा वापर निश्चित केला जातो. भूस्वरूप, हवामान, माती, लोकसंख्येची घनता, सामाजिक, आर्थिक व तांत्रिक घटकांवर त्याचा वापर अवलंबून असतो.

जमीन ही प्रत्येक देशातील एक महत्त्वाची नैसर्गिक साधनसंपत्ती आहे. आर्थिक विकासासाठी जमिनीचा योग्य प्रकारे उपयोग करून घेणे गरजेचे आहे.

विभागणी : भारतात असलेल्या जमिनीच्या वापरानुसार 7 प्रकारात विभागणी केली जाते.

1. लागवडीखालील एकूण जमीन
2. अरण्यव्याप्त जमीन
3. बिगर लागवडीखालील जमीन
4. पडित जमीन
5. वापरात नसलेली परंतु लागवडीस योग्य जमीन
6. गवताळ कुरणे व गायरान
7. इतर जमीन

1) लागवडीखालील एकूण जमीन : ही पिकांसाठी वापरात असलेली जमीन आहे. भारतासारख्या शेती प्रधान देशात ही जमीन फार महत्त्वाची आहे. भारत देशात एकूण भूप्रदेशाच्या 42.2% जमीन ही लागवडी खालील जमीन आहे. या जमिनीची विभागणी आम च्या देशात असमान आहे. पंजाब, हरियाणा, उत्तर प्रदेश, पश्चिम बंगाल व केरळ राज्यात जास्त प्रमाणात लागवडी खालील जमीन उपलब्ध आहे, तर ईशान्ये कडील राज्यात अति कमी प्रमाणात व इतर राज्यांमध्ये मध्यम प्रमाणात लागवडीखालील जमीन उपलब्ध आहे.

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

2) अरण्यव्याप्त जमीन : भारताच्या एका अहवालात शेकडा 22.8% अरण्यव्याप्त भूमी आहे असे सांगितले आहे. अंदमान निकोबार बेटे व ईशान्येकडील राज्यात ही जमीन मोठ्या प्रमाणात असून या उलट हरियाणा, पंजाब, राजस्थान व गुजराथमध्ये कमी प्रमाणात आढळते.

3) बिगर लागवडीखालील जमीन : मानवाची वस्तीस्थाने, रस्ते, रेल्वेमार्ग, कालवे, पर्वत, वाळवंटे वगैरे शेतीव्यतिरिक्त इतर उद्देशासाठी वापरलेली जमीन यामध्ये येते. देशाच्या एकूण जमिनीपैकी शे. 14.1% इतका भाग या प्रकारात मोडतो. आसाम, मणिपूर व सिक्कीम येथे जास्त प्रमाणात तर गोवा, केरळ, ओडिशा महाराष्ट्र येथे अत्यंत कमी प्रमाणात ही जमीन दिसून येते.

4) पडित जमीन : ही जमीन शेतीच्या लागवडीसाठी उपयोगात आणली जात नाही. देशाच्या एकूण जमिनींपैकी शेकडा 8.2% इतका भाग पडित जमिनीने व्यापलेला आहे. मिझोराम, तामिळनाडू व मेघालयामध्ये जास्त प्रमाणात व त्रिपुरा, पुदुच्चेरी, अंदमान व निकोबार बेटांमध्ये कमी प्रमाणात ही जमीन आढळते.

5) वापरात नसलेली परंतु शेतीला योग्य असलेली जमीन : जमिनीमध्ये योग्य कस नसल्यामुळे ही जमीन शेतीसाठी उपयोगात आणली जात नाही. मेघालय, गोवा, नागालँड व राजस्थानमध्ये ही जमीन मोठ्या प्रमाणात आढळून येते.

6) कायमची गवताळ कुरणे व गायराने : देशाच्या एकूण जमिनीपैकी शेकडा 3.4% इतकाच भाग गवताळी कुरणांनी व्यापलेला आहे. हिमाचल प्रदेश, गुजराथ, व मध्यप्रदेशात ही गवताळी कुरणे जास्त प्रमाणात आहेत.

7) इतर जमीन : मळे, फळबागा, रोपवाटिका इत्यादिंनी ही जमीन व्यापलेली आहे. शेकडा 1.1% फक्त ही जमीन आहे. आसाम, नागालँड, मेघालय, केरळ, कर्नाटक, हिमाचल प्रदेश इत्यादि राज्यात ही जमीन दिसून येते.

शेती

अर्थ : मानवाच्या गरजा भागविण्यासाठी आहारधान्ये व इतर कच्च्या मालाचे उत्पादन करण्यासाठी जमिनीची मशागत करणे म्हणजे शेती असे म्हटले जाते. अलिकडे पशुपालन, कुक्कुटपालन व मधमाशीपालन इ. कृषिपूरक व्यवसायही यामध्येच केले जातात.

महत्त्व : अतिप्राचीन काळापासून शेती हा मानवाचा प्रमुख व्यवसाय बनला आहे. भारत हा शेतीप्रधान देश आहे. देशाच्या एकूण लोकसंख्येच्या 65% लोक शेतीव्यवसाय करतात. शेतीच्या विकासावरच देशाची आर्थिक प्रगती अवलंबून आहे.

www.textbookpdf.in

©KTBS Not to be republished

भारत देशात शेती हे उपजीविकेचे प्रमुख साधन आहे. लोकांना व जनावरांना योग्य असा आहार शेतीमुळे मिळतो. शेतीमुळे राष्ट्रीय उत्पन्न मिळते. तृतीय क्षेत्रातील व्यवसाय म्हणजे दळणवळण, व्यापार, बँकिंग, विमा, निर्यात इ.ना. मदत होते औद्योगिक विकासासाठी शेतीला फारच महत्त्व आहे. शेतीमुळेच उद्योग धंद्यांना कच्चामाल मिळतो. उदा. कापूस, ताग, ऊस हा कच्चामाल अनुक्रमे कापड उद्योग, ताग उद्योग व साखर उद्योगांना मिळतो. शेतीमुळे देशाच्या राजकीय व सामाजिक परिस्थितीवर प्रभाव पडतो.

शेतीचे प्रकार

भारतात भौगोलिक, आर्थिक व सामाजिक घटकात विविधता असल्यामुळे शेतीचे निरनिराळे प्रकार दिसून येतात. त्यांचे संक्षिप्त वर्णन खाली दिलेले आहे.

1) उदरनिर्वाहासाठी केलेली शेती :

शेतकरी आपल्या कुटुंबाच्या पालनपोषणासाठी पिके पिकवितो या पद्धतीला 'उदरनिर्वाहासाठी शेती' असे म्हणतात. या पद्धतीत अति अल्प प्रमाणात शेती मालाची विक्री केली जाते. ही अतिशय प्राचीन पद्धतीची शेती आहे. भारतातील ईशान्येकडील राज्ये ओडिशा व मध्य प्रदेशात ही पद्धत जास्त प्रमाणात आढळते. उदरनिर्वाहासाठी शेतीचे दोन प्रकार आहेत.

a) **स्थायी निर्वाह शेती :** एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी न जाता कायमस्वरूपी एकाच ठिकाणी वास्तव्य करून शेती करण्याच्या पद्धतीला 'स्थायी निर्वाह शेती' असे म्हणतात. एकाच जमिनीत दरवर्षी पिके घेतली जातात.

> **हे तुम्हाला माहिती असू दे**
> स्थलांतरित शेतीला आसाममध्ये 'जूमिंग' केरळ मध्ये 'पोणम' आंध्रप्रदेशात व ओडिशामध्ये 'पोडू' असे म्हणतात.

b) **स्थलांतरित शेती :** जंगलातील काही प्रदेशातील झाडे तोडून किंवा जाळून त्या प्रदेशाचा शेतीच्या मशागतीसाठी उपयोग करतात. काही वर्षानंतर मातीचा कस कमी झाल्यावर तो प्रदेश सोडून देऊन दुसरीकडे परत जंगले तोडून ती जागा शेतीसाठी वापरणे यालाच स्थालांतरित शेती (फिरती शेती) असे म्हणतात. 'जंगलातील काही आदिवासी जमातीतील लोक या प्राचीन शेतीपद्धतीचा अवलंब करतात. आसाम, मेघालय, नागाँलड, मध्यप्रदेश, ओडिशा व केरळ राज्यात स्थलांतरित शेतीची पद्धत दिसून येते.

2) सघन शेती (Intensive farming)

छोटया प्रदेशात अधिक भांडवल व मजुरांना गुंतवून शेती करण्याच्या पद्धतीला 'सघन शेती' असे म्हणतात. वर्षभर या जमिनीचा वापर केला जातो. एका वर्षात दोन किंवा

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

तीन पिके घेऊन अत्यल्प प्रदेशात जास्त उत्पादन घेण्याचा प्रयत्न केला जातो. सुपीक जमीन व पाणी पुरवठयाची सोय असलेल्या ठिकाणी ही शेती पद्धत रुढ आहे.

3) व्यापारीशेती -

व्यापाराच्या उद्देशाने पिके काढणे याला 'व्यापारी शेती' म्हणतात. या पद्धतीत आर्थिक पिके मोठ्या प्रमाणात पिकविली जातात. मजुरांची संख्या कमी असते. मशागतीसाठी यंत्रांचा व वैज्ञानिक पद्धतींचा वापर केला जातो.

4) संयुक्त शेती (मिश्रशेती)

पिके घेणे त्याबरोबरच पशुपालनही एकाचवेळी एकाच जमिनीत करणे याला संयुक्त शेती (मिश्रशेती) म्हणतात. पिके व पशुपालन या दोन्ही स्त्रोतांपासून शेतकऱ्यांना उत्पन्न मिळते. भारतात 1951 पासून ही पद्धत रुढ आहे. अनेक राज्यांमध्ये संयुक्त शेतीची पद्धत प्रचलित आहे.

5) लागवडीची शेती (मळ्याची शेती) : विशाल अशा भूप्रदेशात एकाच प्रकारचे पिक पिकविणे याला लागवडीची शेती म्हणतात. यासाठी जास्त भांडवल व मजुरांची आवश्यकता असते. चहा, कॉफी, रबर व नारळ ही लागवडीच्या शेतीतील प्रमुख पिके आहेत.

6) कोरडवाहू शेती : अति कमी प्रमाणात पाऊस पडणाऱ्या व पाणीपुरवठ्याच्या सोयीचा अभाव असलेल्या प्रदेशात कोरडवाहू शेती पद्धत रुढ आहे. ही पद्धत पावसावर अवलंबून आहे. भारतात द्वीपकल्पीय पठारी प्रदेशात व राजस्थानच्या पश्चिम भागात या पद्धतीचा अवलंब केला जातो.

7) आर्द्र शेती : मुबलक प्रमाणात पाऊस पडणाऱ्या प्रदेशात पाणीपुरवठयाच्या सोयीवर अवलंबून न राहता पिके घेतली जातात. यालाच आर्द्र शेती असे म्हणतात.

पश्चिम किनारपट्टीच्या संपूर्ण प्रदेशात व इतर जास्त प्रमाणात पाऊस पडणाऱ्या प्रदेशात आर्द्र शेती पद्धत दिसून येते.

8) सिंचन शेती : पाणी पुरवठ्याची सोय करून पिके घेतली जातात. यालाचा 'सिंचन शेती' असे म्हणतात. ही पद्धत खर्चिक आहे परंतु भारतासारख्या देशात अत्यावश्यक आहे. कारण भारतात पावसाची विभागणी ही असमान असून अवकाळी मान्सूनवर अवलंबून आहे.

पिकांचे मोसम व पिकांचे प्रकार

एका विशिष्ट काळात शेतीमध्ये विविध प्रकारची पिके पिकविली जातात. त्याला पिकांचा मोसम असे म्हणतात.

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

भारत देशात प्रामुख्याने तीन पिकांचे मोसम आहेत.

1) खरीप मोसम 2) रब्बी मोसम 3) गळिताचा मोसम

i) **खरीप मोसम :** पावसाळ्यात पिके पिकविणे याला 'खरीप मोसम' असे म्हणतात. नैर्ऋत्य मान्सूनच्या सुरुवातीला म्हणजे जून, जुलै महिन्यात पेरणी करतात. सप्टेंबर, ऑक्टोबर महिन्यात पिकांची कापणी केली जाते.

भात, नाचणी, ज्वारी, कापूस, शेंगदाणा, तंबारवू इ. पिके या अवधीत घेतली जातात.

ii) **रब्बी मोसम :** ईशान्य मान्सूनच्या सुरुवातीला म्हणजे ऑक्टोबर नोव्हेंबर महिन्यात पेरणी करतात. फेब्रुवारी मार्च महिन्यात कापणी केली जाते. याला 'रब्बी मोसम' असे म्हणतात. गहू, बार्ली, हरभरा, जवस इ. पिके या अवधीत पिकविली जातात.

iii) **गळिताचा मोसम (zaid crop) :** वरील दोन अवधींच्या मध्ये म्हणजे खरीप मोसम व रब्बी मोसम या दोन कालावधींच्या मध्यंतरीच्या काळात पिके पिकवितात. याला 'गळिताचा मोसम' म्हणतात.

कलिंगड, काकडी, तेलबिया, काही द्विदल धान्ये, भाजीपाला इ. पिके या अवधीत घेतली जातात.

पिकांची विभागणी :

एखाद्या प्रदेशात ठराविक वेळेत, विविध प्रकारची पिके पिकविली जातात त्यांच्या प्रमाणाला पिकांची विभागणी असे म्हणतात. भारतात ही पिकांची विभागणी कालानुरुप व प्रदेशानुरूप भिन्न भिन्न आहे.

तेथील स्वाभाविक विभाग, माती, हवामान, भूस्वरूप, शेतीचा आकार, पाणीपुरवठयाची सोय, शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती, तंत्रज्ञानाचा उपयोग या घटकांवर पिकांची विभागणी अवलंबून आहे.

भारतातील प्रमुख पिके

देशातल्या विविध भागात वेगवेगळ्या प्रकारची पिके घेतली जातात. त्यांची अन्नधान्याची पिके, व्यापारी पिके, तेलबिया व लागवडीची पिके अशी विभागणी करता येईल.

अन्नधान्याची पिके

मानवाला अन्नधान्याचा पुरवठा करण्यासाठी काही पिके घेतली जातात. त्यांना अन्नधान्याची पिके असे म्हणतात. उदा. भात, गहू, ज्वारी, द्विदल धान्ये इ.

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

भात : हे भारतातील महत्त्वाचे खाद्यपीक आहे. जगातील सर्वात मोठा भात उत्पादक प्रदेश भारतात आहे. भात पिकविण्यात भारताचा जगात दुसरा क्रमांक लागतो तर चीनचा पहिला क्रमांक लागतो. हे मुख्यतः खरीप पीक आहे. भात हे उष्ण कटिबंधातील पीक असून त्या पिकाला अधिक उष्णता 18^0 ते 25^0 सें.ग्रे. व 100 ते 200 सें.मी. पेक्षा अधिक पावसाची गरज आहे. या पिकाला काळ्या चिकण मातीची सुपीक जमीन लागते. त्याच्या मुळाशी पाणीसाचणे महत्त्वाचे असते. म्हणून सपाट जमिनीची आवश्यकता आहे. जेथे पाऊस कमी पडतो त्याठिकाणी पाणीपुरवठा करून पीक घेतले जाते.



भारतातील सर्व राज्यात भात पिकविले जाते. भारतात पश्चिम बंगाल राज्यात सर्वाधिक प्रमाणात हे पीक पिकविले जाते. आंध्रप्रदेश, उत्तरप्रदेश, पंजाब, तामिळनाडू, ओडिशा व कर्नाटक राज्यातसुद्धा भात मोठ्या प्रमाणात पिकवितात.

गहू : भारतात मोठ्या प्रमाणात पिकणारे दुसरे महत्त्वाचे पिक म्हणजे 'गहू' होय. भारतात हे रब्बी पिक आहे. देशाच्या उत्तर व वायव्येकडील लोकांचे हे प्रमुख अन्नधान्य पिक आहे.

गहू हे समशीतोष्ण कटिबंधातील पीक असून याला 10^0 ते 15^0 सेल्सियस उष्णता व 50 ते 70 सें.मी. वार्षिक पावसाची आवश्यकता आहे. वाळूमिश्रित

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

माती व काळीमाती या पिकासाठी उपयुक्त आहे. उत्तरेच्या मैदानी प्रदेशात पंजाब, हरियाणा, उत्तर प्रदेश, बिहार, मध्यप्रदेश, राजस्थान, गुजराथ, महाराष्ट्र व कर्नाटक ही गहू पिकवणारी प्रमुख राज्ये आहेत. उत्तर प्रदेश हे सर्वाधिक गहू पिकविणारे राज्य आहे.

व्यापारी पिके : व्यापाराच्या उद्देशाने पिकविलेल्या पिकांना 'व्यापारी पिके' असे म्हणतात. उदा. ऊस, कापूस, तंबाखू, तेलबिया इ.



ऊस : हे भारतातील प्रमुख व्यापारी पिक आहे. जगातील अतिविशाल असा ऊस उत्पादक प्रदेश भारतात आहे. ऊस उत्पादनात ब्राझील नंतर भारताचा दुसरा क्रमांक लागतो. साखर, गूळ व खांडसारी तयार करण्यासाठी ऊसाचा कच्चामाल म्हणून वापर करतात.

ऊस हे वर्षभर घेतले जाणारे पीक आहे. आणि ते पाणी पुरवठ्याच्या प्रदेशात पिकणारे पिक आहे. यापिकाला अधिक उष्णता 21^0 ते 26^0 सेल्सियस व अधिक पाऊस 100 ते 150 सें.मी. लागतो. ऊसाला गाळाची व चिकणमातीची (वाळूमिश्रित) जमीन उपयुक्त आहे. उत्तर प्रदेश, महाराष्ट्र, कर्नाटक, तामिळनाडू, गुजराथ व आंध्रप्रदेश या राज्यात ऊस हे प्रमुख व्यापारी पिक आहे.



तंबाखू : भारतात तंबाखू हे प्रमुख व्यापारी पिक आहे. बिडी, सिगारेट, सिगार, चिलीम, चिरुट, हुक्का इत्यादि तयार करण्यासाठी तंबाखूचा वापर होतो. काही भाग चघळण्यासाठी, तसेच तपकीर

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

व कीटकनाशक औषांसाठी वापरला जातो. हे उष्ण कटिबंधातील पिक आहे. या पिकाला 21^0 ते 23^0 सेल्सियस तापमान व साधारण पावसाची आवश्यकता असते (50 ते 100 सें.मी.) वाळूमिश्रित माती या पिकाला उपयुक्त आहे. पुरेश्या रासायनिक खतांची आवश्यकता असते.

भारतात आंध्रप्रदेश, गुजराथ, उत्तरप्रदेश, कर्नाटक तामिळनाडू, महाराष्ट्र व बिहार राज्यातील तंबाखू हे प्रमुख व्यापारी पिक आहे. जगात भारताचा तंबाखू उत्पादनामध्ये तृतीय क्रमांक व तंबाखू निर्यातीमध्ये चौथा क्रमांक लागतो.

तंतूपिके : कापड उद्योगाला कच्चा माल पुरविणाऱ्या पिकांना 'तंतू पिके' असे म्हणतात. कापूस आणि ताग ही भारतात पिकणारी प्रमुख तंतू पिके आहेत.

कापूस : कापड गिरणीत (सूत गिणी) कापसाचा कच्चामाल म्हणून वापर केला जातो. भारतात कापड उद्योगांसाठी लागणारे हे प्रमुख तंतू पिक आहे. कापूस हे उष्णप्रदेश व उपउष्ण प्रदेशातील पिक आहे. याच्या उत्पादनासाठी 21^0 ते 24^0 सेंटिग्रेड तापमान व 50 ते 100 सें.मी. पावसाची आवश्यकता असते. काळी माती व चिकण मातीत हे पीक जोमाने येते. हे खरीपपिक म्हणून पिकवितात.

हे तुम्हाला माहित असू दे

- तंबाखूचे वैज्ञानिक नाव 'निकोशियान टोबॅकम्' असे आहे.
- वनस्पती वर्गाचे नाव - 'सोलाने सिय'
- मूळ ठिकाण - अँडिज पर्वत (दक्षिण अमेरिका)
- प्रथम परिचय - जीन निकोट (फ्रान्स)
- भारतात प्रथम आणले - पोर्तुगीज

भारतात गुजराथ, महाराष्ट्र, आंध्रप्रदेश, हरियाणा, मध्यप्रदेश, पंजाब, कर्नाटक व तामिळनाडू या राज्यात कापूस पिकवितात. जगामध्ये भारतात कापसाचेपीक पिकविण्याचे मोठे क्षेत्र असून कापूस उत्पादनामध्ये भारताचा तिसरा क्रमांक लागतो.

पेयपिक : अल्हाददायक पेय तयार करण्यासाठी जी पिके पिकविली जातात. त्या पिकांना पेयपिक असे म्हणतात. चहा व कॉफी ही प्रमुख पेयपिके आहेत.

चहा : अत्यल्प दरात व सहजपणे मिळणारे पेय म्हणजे चहा होय. जगामध्ये चीन नंतर चहाच्या उत्पादनामध्ये भारताचा दुसरा क्रमांक आहे. चहा हे लागवडीच्या (मळ्याच्या) शेतीतील पिक आहे. चहा उष्णक्षेत्र व उपउष्ण क्षेत्रात पिकविला जातो. सरासरी उष्णता 21^0 ते 30^0 सेल्सियस व 150 -250 सें.मी. वार्षिक

चहा : वनस्पतीचे नाव - 'केमिलिया थिया चहामध्ये 'थियेन' चा अंश आहे.

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

पर्जन्याची आवश्यकता असते. कुजलेले जैविक अंश व खोल अशी सुपीक जमीन या पिकांला उपयुक्त आहे. समुद्रसपाटीपासून 1200 ते 2400 मी. उंच असलेल्या पर्वताच्या उतरणीवर हे पीक चांगले येते.

भारतात आसाम, पश्चिम बंगाल, तामिळनाडू, व केरळ राज्यात हे पिक जास्त प्रमाणात पिकविले जाते.

बागायतीपिके, फुलांचीशेती आणि त्यांचे महत्व

बागायतीशेती

फळे, भाजीपाला, फुले, औषधी व अलंकारिक पिके मळ्यामध्ये पद्धतशीरपणे पिकवितात. यालाच 'बागायती शेती' असे म्हणतात. जामिनीचा समर्पक व योग्य वापर नैसर्गिक साधनसंपत्तीचा योग्य उपयोग व ग्रामीण भागातील लोकांना पर्यायी उद्योगाच्या संधी उपलब्ध करून देणे यामुळे बागायतीशेतीला भारतीय शेतीमध्ये भरपूर उत्तेजन मिळत आहे. त्यातून निर्यात व्यापार वृद्धिंगत होऊन पौष्टिक आहाराचाही पुरवठा होतो.

भारत देशात वैविध्यपूर्ण हवामान व मातीतही विविधता दिसून येते. त्यामुळे बागायती शेतीतील पिके भरघोसपणे घेण्यास हा देश समर्थ ठरला आहे बागायती शेतीतील पिके घेणारा एक प्रसिद्ध देश अशी भारताची ख्याती आहे. जगामध्ये फळे, भाजीपाला उत्पादनात भारताचा चीननंतर दुसरा क्रमांक लागतो. जगातील एकूण फळ उत्पादनात भारत 11% आणि भाजीपाला उत्पादनात 7% इतका पुरवठा करतो.

भारतातील आंध्रप्रदेश, हरियाणा, हिमाचल प्रदेश, जम्मू व काश्मीर, कर्नाटक, तामिळनाडू, केरळ, महाराष्ट्र व इतर प्रदेशात बागायती शेतीचा विकास मोठ्या प्रमाणात झालेला दिसून येतो.

फूल शेती

व्यापार करण्याच्या उद्देशाने फुलांचे उत्पादन करणे याला 'फूलशेती' असे म्हणतात. फुले उत्पादनाची कला भारतीयांना अतिप्राचीन काळापासून अवगत होती. देशाच्या शेतीवर फूलशेतीचा फार मोठा परिणाम दिसून येतो.

हे तुम्हाला माहित असू दे

- इंग्रजी मधील Horticulture हा शब्द Hortus व colere या शब्दापासून बनलेला संयुक्तिक शब्द आहे. Hortus म्हणजे 'मळा' व colere म्हणजे 'मशागत' असा अर्थ आहे.
- बागायत शेतीच्या विकासाला 'सुवर्णक्रांती' (Golden revolution)असे म्हटले जाते.

फूल शेतीमुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न, उद्योग व जास्त करून महिलांना काम करण्याची संधी मिळते देशाच्या निर्यात व्यापाराला चालना मिळते. विविध प्रकारच्या फुलांचे उत्पादन

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

करण्यास भारतातील शेती व हवामान हे अनुकूल आहे. भारत काही पारंपारिक फुलांच्या उत्पादनात फार प्रसिद्ध आहे.

उदा. मोगरा, झेंडू, शेवंती, गोलमोगरा, गुलाब, चमेली, अबोली, अस्टर इ. सुटी फुले म्हणजे आर्किड, ग्लाडियोलस, कार्नेशन, अंथूरियम, लिली इ. तामिळनाडू, कर्नाटक, आंध्रप्रदेश, महाराष्ट्र, पंजाब, हरियाणा, व पश्चिम बंगाल या राज्यात फूल शेतीचा विकास चांगला दिसून येतो.

स्वाध्याय

I. रिकाम्या जागी योग्य शब्द भरा.

1. लागवडी साठी उपयोगात आणल्या न जाणाऱ्या जमिनीला _____ असे म्हणतात.
2. पिके व पशुपालन या दोन्हींच्या एकत्रितपणे असणाऱ्या शेती पद्धतीला _____ असे म्हणतात.
3. खरीप मोसम व रब्बी मोसम पिकविण्याच्या मधल्या मोसमाला _____ असे म्हणतात.
4. भारतातील _____ या राज्यात भाताचे उत्पादन सर्वाधिक आहे.

II. समूहात चर्चा करून खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.

1. जमिनीची वापरानुसार विभागणी म्हणजे काय?
2. लागवडीची शेती म्हणजे काय? उदाहरणे द्या
3. खरीप मोसम व रब्बी मोसम यांच्यामध्ये कोणता फरक आहे?
4. ऊस पिकासाठी आवश्यक असणारे भौगोलिक घटक कोणते?
5. पेय पिके म्हणजे काय? उदाहरणे द्या.
6. भारतातील बागायती शेतीचे महत्त्व विशद करा.

III. उपक्रम

1. कर्नाटक राज्यात पिकणाऱ्या विविध अन्नधान्याची पिके कोणती? त्यांचे नमुने गोळा करा.
2. भारताचा नकाशा काढून त्यात कापूस व चहा पिकणारे प्रदेश दाखवा.

IV. प्रकल्प

1. तुमच्या घरा भोवताली आढळणाऱ्या पिकांची चित्रे गोळा करा व माहिती लिहा.
2. फूलशेती व महिलासबलीकरण याबद्दल समूहात चर्चेचे आयोजन करा.

***

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

अर्थशास्त्र

प्रकरण - 1

विकास (प्रगती)

या पाठात आपण पुढील घटकांचा अभ्यास करूया.

- **विकास आणि विकसनशीलता यांचे स्वरूप व अर्थ**
- **मानवी विकासाचे सूचक**
- **लिंग संबंधी विकास**

आपण सर्व आपल्या जीवनाच्या राहणीमानाचा दर्जा उंचावण्यासाठी सतत प्रयत्न करत असतो. आपली ध्येये आणि मागण्या जास्तीतजास्त प्रमाणात पूर्ण व्हाव्यात, अशी आपली आकांक्षा असते. त्याचप्रमाणे प्रत्येक देशातील अर्थव्यवस्था ही सर्वांना जास्तीत जास्त वस्तू व सेवांचा पुरवठा करून लोककल्याणार्थ प्रयत्न करीत असते. एखाद्या व्यक्तिच्या किंवा देशाच्या सर्व आशाआकांक्षा मोठ्या प्रमाणात पूर्ण करण्याची क्षमता वाढविण्याच्या प्रक्रियेस 'विकास' असे म्हणतात. आर्थिक विकास म्हणजे एखाद्या देशाने आपल्या जनतेच्या आर्थिक विकासाची क्षमता वाढविणे तसेच गरिबी, बेकारी, असमानता, चलनवाढ या सारख्या आर्थिक समस्यांचे निवारण करणे होय.

1) विकास आणि विकसनशीलता :

विकास - दैनंदिन जीवनात 'विकास' हा शब्द आपण वारंवार वापरतो. कोणत्याही एखाद्या व्यक्तीची किंवा क्षेत्राची प्रगती सुचविण्यासाठी सामान्यपणे आपण विकास 'हा शब्द वापरतो. उदा. ग्रामीणविकास, सामाजिक विकास, शैक्षणिक विकास, महिला आणि बालविकास वगैरे. एखाद्या देशाच्या आर्थिक उपक्रमांच्या विस्तारीकरणाला 'आर्थिक विकास' असे म्हणतात. तरीही आर्थिक विकासाची प्रक्रिया अत्यंत किचकट असून त्याची अचूक व्याख्या करणे तितकेसे सोपे नाही.

प्रा. मेअर आणि बाल्डविन यांच्या मते ''एखाद्या देशाच्या राष्ट्रीय उत्पन्नामध्ये दीर्घकाळपर्यंत निरंतर वाढ होण्याच्या प्रक्रियेला 'आर्थिक विकास' म्हणतात. ही व्याख्या आर्थिक विकासाच्या तीन मुद्यांवर प्रकाश टाकते. ते मुद्दे म्हणजे.

a) एक प्रक्रिया b) प्रत्यक्ष राष्ट्रीय उत्पन्नात वाढ c) दीर्घकाळ होणारी वाढ

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

a) एक प्रक्रिया : 'प्रक्रिया' हा शब्द उत्पादनाची मागणी व पुरवठा या दोन्हीच्या संरचनेतील बदल सुचवितो. अतिरिक्त साधन संपत्तीचा शोध, भांडवलाचा साठा, लोकसंख्यावाढ, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर इत्यादिमुळे उत्पादनाच्या पुरवठ्यामध्ये बदल घडून येतो. लोकसंख्यावाढ व लोकांच्या मानसिकतेतील बदल, उत्पन्न पातळी, उत्पन्नाच्या वाटपातील फरक, लोकांच्या अभिरुचीतील बदल इत्यादिमुळे उत्पादनाच्या मागणीत बदल घडून येतो. हा बदल राष्ट्रीय उत्पन्नाच्या दीर्घकालीन वाढीला पूरक असतो.

b) प्रत्यक्ष राष्ट्रीय उत्पन्न : एक वर्षाच्या मुदतीत त्या देशात उत्पादित झालेल्या सर्व वस्तू व सेवांची एकूण किंमत म्हणजेच 'प्रत्यक्ष राष्ट्रीय उत्पन्न' होय. हे एक आर्थिक विकास मोजण्याचे प्रमुख साधन आहे. राष्ट्रीय उत्पन्न जितके अधिक तितकाच राष्ट्रीय विकास अधिक. या उलट राष्ट्रीय उत्पन्न जितके कमी तितकाच राष्ट्रीय विकास कमी असतो. येथे 'प्रत्यक्ष' 'या शब्दावर जास्त भर दिलेला आहे. हा शब्द जनतेची खरेदीच्या सामर्थ्याची वाढ सुचवितो. 'प्रत्यक्ष उत्पन्न' म्हणजे काय ? आपल्या उत्पन्नाची किंमतीच्या बदलाशी तुलना केल्यास प्रत्यक्ष उत्पन्न मिळते. उदा. आज 100 रू मध्ये दरवाढीमुळे गतवर्षीपेक्षा कमी वस्तू मिळतात. अशारीतीने जेव्हा पैशाची तुलना दरवाढीशी केली जाते तेव्हा आम्हाला प्रत्यक्ष उत्पन्न मिळते. स्थिर किंमती हा विकासाच्या प्रक्रियेमधील महत्त्वाचा घटक आहे.

c) दीर्घकाळ होणारी वाढ : प्रत्यक्ष राष्ट्रीय उत्पन्नातील वाढ ही दहा वर्षांपेक्षा अधिक काळ स्थिर राहिली पाहिजे. अल्पमुदतीच्या वाढीला विकास म्हणता येत नाही. वस्तू व सेवा यांच्या मागणी आणि पुरवठ्यामधील परस्परबदलाची प्रक्रिया निरंतर सुरु राहिली तरच दीर्घकालीन विकास होऊ शकतो.

तथापि काही अर्थतज्ज्ञांच्यामते उत्पन्न हे फक्त लोकल्याणासाठी वापरले जाते म्हणून विकासाची व्याख्या ते त्यांच्या स्वतःच्या दृष्टीकोनातून करतात. उदा. प्रा. कोलीन क्लार्कच्या मते ''आर्थिक विकास म्हणजे लोकांच्या आर्थिक कल्याणामध्ये वस्तू व सेवांच्या किंमतीची बेरीज होय''. आर्थिक कल्याणाची सुधारणा याचा दुसरा अर्थ दारिद्र्य निर्मूलन. विकास म्हणजे दीर्घकाळ, अव्याहतपणे, गरिबीसारख्या दुष्टचक्रास भेदून एखाद्या देशाला स्वबळावर पोषक सुधारणेकडे घेऊन जाणारी प्राक्रिया होय. परंतु कालांतराने विकासाचे उद्देश बदलले असून विस्तारितपण झालेले आहेत. आता आपण सर्वसमावेशक

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

व दीर्घकालीन विकासाबद्दल बोलत आहोत. प्रत्येक व्यक्तिचा विकास प्रक्रियेमध्ये समावेश असणे म्हणजेच 'सर्वसमावेशक विकास' होय. तसेच पुढील पिढीसाठी नैसर्गिक साधन संपत्ती व परिसराचे संवर्धन करणे म्हणजे दीर्घकालीन विकास होय. उत्पन्नात वाढ, दारिद्र्यनिर्मूलन सर्वसमानता, परिसरसंवर्धन, बेकारी व विषमताकमी करणे, सर्व जनतेचे कल्याण करणे हीच विकासाची उद्दिष्टे आहेत.

अमेरिका, कॅनडा, जपान, जर्मनी, इंग्लंड, ऑस्ट्रेलिया, पश्चिम युरोपियनदेश, हे सर्व देश दीर्घकालीन उत्पन्न वृद्धीचे साक्षीदार आहेत. तर सिंगापूर, हॉगकाँग, मलेशिया व चीन आणि इतर काही राष्ट्रे गेल्या शतकात दीर्घकालीन उत्पन्नवृद्धी करत आहेत. या देशांचा जगातील विकसित राष्ट्रांमध्ये समावेश आहे.

अविकसितता : 'अविकसितता' हा शब्द मागासलेली, विकसित न झालेली स्थिती दर्शवितो. अविकसित देशात दरडोई उत्पन्न अत्यंत कमी असून, उत्पादनसुद्धा कमी असते तसेच लोकसंख्यावाढीचा दरही जास्त असतो. अशा देशातील बहुतांश लोकांना अन्न, वस्त्र व निवारा या सारख्या मूलभूत गरजा मिळविणेही कष्टप्रद असते. जास्तीत जास्त लोक निरक्षर असून अंधश्रद्धाळू असतात. आरोग्य व शुद्ध वातावरणाच्या अभावामुळे रोगग्रस्त झालेले असतात. आता अविकसित राष्ट्रांना 'विकसनशील राष्ट्रे' असे संबोधण्यात येत आहे कारण कमी उत्पन्न आणि गरिबी या सारख्या समस्यांवर मात करण्यासाठी ती राष्ट्रे अथक प्रयत्न करीत आहेत. संयुक्त राष्ट्रांच्या मते ज्या राष्ट्राचे दरडोई उत्पन्न अमेरिका, कॅनडा, ऑस्ट्रेलिया आणि पश्चिम युरोपियन राष्ट्रे यांच्या दरडोई उत्पन्नाच्या तुलनेत कमी आहे त्यांना अविकसित राष्ट्रे असे म्हणतात. विकसित राष्ट्रांच्या तुलनेत या राष्ट्रात कमी उत्पन्नाच्या स्तरावर जास्त भर दिला आहे.

जागतिक बँकेने आपल्या जागतिक विकास अहवालामध्ये या राष्ट्रांची श्रेष्ठ, मध्यम व कनिष्ठ अशी विभागणी केली आहे. मध्यम व कनिष्ठ उत्पन्न असणारी राष्ट्रे विकसनशील राष्ट्रे म्हणून ओळखली जातात. अलिकडील काही वर्षात उत्पन्नात झालेल्या लक्षणीय वृद्धीमुळे भारत हा विकसनशील देशामध्ये अग्रेसर बनलेला आहे.

2) विकासाची सूचके :

आपण आर्थिक विकासाचे मोजमाप कसे करतो? अर्थतज्ज्ञांनी यासाठी विविध सूचके पुरस्कृत केलेली आहेत. त्यापैकी राष्ट्रीय उत्पन्न हे विकासाच्या मोजमापाचे प्रमुख सूचक आहे.

www.textbookpdf.in

उत्पन्नाचे सूचक : देशातील सर्व लोकांचे उत्पन्न एकत्रित केल्यास येणारे उत्पन्न हे राष्ट्रीय उत्पन्न असते. उत्पन्नवाढीचा वेग वाढल्यास विकासाचा वेगही वाढतो. उत्पन्नाबरोबर लोकसंख्याही वाढल्यास विकासाचा वेग मंदावतो. वेगवेगळ्या देशांच्या आर्थिक विकासाची तुलना करताना त्या देशांची लोकसंख्या भिन्न असेल तर ती तुलना योग्य होऊ शकत नाही म्हणून राष्ट्रीय उत्पन्ना ऐवजी दरडोई उत्पन्न हे विकासाचे सूचक म्हणून वापरले जाते. देशाच्या एकूण राष्ट्रीय उत्पन्नाला लोकसंख्येने भागल्यास दरडोई उत्पन्न मिळते.

हे तुम्हाला माहिती असू दे :

2016 मध्ये भारतातील दरडोई उत्पन्न 1, 21, 603 रू. इतके होते. हे उत्पन्न जगातील सरासरी दरडोई उत्पन्नाच्या 15% एवढे आहे. त्या वर्षातील एकूण उत्पन्नाच्या म्हणजे 1, 47, 86, 557 कोटीला 121.6 कोटी एवढ्या लोकसंख्येने भागल्यास येणारे हे दरडोई उत्पन्न आहे. राष्ट्रीय उत्पन्नात भारताचा सातवा क्रमांक लागतो, तर दरडोई उत्पन्नात भारत 143 व्या क्रमांकावर आहे.

दरडोई उत्पन्न हे लोकप्रिय व साधे सूचक असले तरी लोकांमधील उत्पन्नाचे वाटप याद्वारे अचूकपणे होत नाही. त्याशिवाय अन्न, निवारा, शिक्षण, आरोग्य व इतर सामाजिक घटक या मूलभूत गरजा यात विचारात घेतल्या जात नाहीत. त्यासाठी आर्थिक विकासाचे योग्य मोजमाप करण्यास तज्ज्ञ प्रयत्नशील आहेत. 'मानव विकास सूचक' हे अत्यंत महत्त्वाचे सूचक आहे.

3) मानवी विकासाचे सूचक :

आर्थिक विकासाचा मुख्य उद्देश म्हणजे मानव कल्याणामध्ये वृद्धी करणे हा होय. लोकांना उत्तम दर्जाचे राहणीमान उपभोगण्यासाठी ते पूरक ठरते. अन्न, वस्त्र, निवारा या मूलभूत गरजांबरोबरच शिक्षण, आरोग्य, सामाजिक सुरक्षा, शुद्ध हवा व पाणी आणि प्रदूषणरहित परिसर इ. सुविधाही मिळाल्या पहिजेत. केवळ उत्पन्नामधील वाढीमुळे वरील सर्वगोष्टी सर्वांना मिळतीलच असे नाही. पाकीस्तानी अर्थतज्ज्ञ मेहबूब-उल-हक म्हणतात की उत्तम दर्जाचे राहणीमान उपभोण्यासाठी आवश्यक असणाऱ्या गोष्टी म्हणजे निरोगी व दीर्घायुषी होण्याची पात्रता असणे, ज्ञानी असणे आणि मूलभूत गरजा भागविण्याइतपत उत्पन्न असणे म्हणजेच मानवी विकास होय. अमर्त्य सेन यांच्यामते, 'मानवी विकास म्हणजे मानवाच्या क्षमता वृद्धिंगत करणे होय' या क्षमता म्हणजेच आरोग्य, शिक्षण आणि खरेदी करण्याची ऐपत होय. परंतु आपण त्याचे मोजमाप कसे करतो?

www.textbookpdf.in

संयुक्त राष्ट्रसंघाच्या विकास कार्यक्रमांतर्गत (UNDP) काहीकल्पना वापरण्यात आल्या आहेत. त्यांना 'मानवी विकासाचे सूचक' (Human Development Index, HDI) असे म्हणतात. याद्वारे एका देशाच्या विकासाचे मोजमाप करून दुसऱ्या देशांच्या विकासाशी तुलना केली जाते. आरोग्याचे मोजमाप, व्यक्तीच्या अपेक्षित आयुर्मर्यादिच्या आधारे करतात. तर शिक्षणाचे मोजमाप साक्षरतेच्या प्रमाणावरून आणि खरेदीच्या ऐपतीचे मोजमाप हे दरडोई उत्पन्नाच्या आधारे केलेजाते. हे सूचक खालील चित्रात दाखविले आहेत.



मानवी विकासाचे सूचक

एखाद्या देशातील लोक ठराविक वर्षे जगण्याची अपेक्षा करतात यालाच आयुर्मर्यादा म्हणतात. पौष्टिक आहार, उत्तम आरोग्य सुविधा, स्वच्छ परिसर इ. गोष्टींच्या उपलब्धतेमुळे दीर्घायुष्य लाभण्यास मदत होते. हे सर्व घटक आयुर्मर्यादिशी संबंधित आहेत. शिक्षणाचा दर्जा उंचावल्यास आर्थिक विकासाची पातळीही वाढते. एखाद्या देशाची शैक्षणिक गुणवत्ता दोन घटकांच्या आधारे मोजली जाते 1) 25 वर्षावरील व्यक्तींनी पूर्ण केलेला सरासरी शिक्षणाचा कालावधी आणि 5 वर्षापर्यंतच्या मुलांना त्यांच्या पुढील आयुष्यात मिळणारा अपेक्षित शिक्षणाचा कालावधी 2) राहणीमानाचा दर्जा दरडोई उत्पन्नाच्या आधारे मोजला जातो.

वरील तीन सूचकांची सरासरी म्हणजेच मानवी विकास सूची (HDI) होय. तुम्ही एखाद्या वैयक्तिक सूचकाचे अथवा एकूण मानव विकास सूचीचेही (HDI) मोजमाप करू शकता. तसेच तुम्ही त्यांच्यात झालेली वाढही पाहू शकता आणि जगातील इतर देशांशी आपल्या देशाची तुलना करू शकता. भारताची मानव विकास सूची (HDI) सतत वाढत आहे 2014 साली तो (HDI) 0.586 होता आणि 187 राष्ट्रांमध्ये 135 व्या स्थानावर होता.

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

संयुक्त राष्ट्र संघटनेच्या विकास कार्यक्रमाने (UNDP) HDI च्या आधारे राष्ट्रांचे तीन भागात वर्गीकरण केले आहे. ते म्हणजे श्रेष्ठ, मध्यम व कनिष्ठ. भारताचा समावेश मध्यम विभागामध्ये होतो.



भारताची मानव विकास सूची

चित्र क्र. 2 मध्ये दाखविल्याप्रमाणे भारताची मानव विकास सूची (HDI) 2012 मध्ये 0.554 होती व तिचा क्रमांक 186 राष्ट्रांमध्ये 136 वा होता. या 0.554 सूचक मूल्याच्या आधारे आयुर्मर्यादा 65.8, शिक्षणाचा कालावधी 4.4, दरडोई उत्पन्न $3203 होते. 1980 ते 2012 या कालावधीत मानवी विकासाची चहुबाजूने सुधारणा होऊन मानवी विकास सूचक (HDI) 0.334 वरून 0.554 पर्यंत वाढलेला आहे. परंतु प्रगतीशील 10 राष्ट्रांच्या तुलनेत भारताची प्रगती अजूनही खूपच कमी आहे.

4) लिंग संबंधी विकास

विकास प्रक्रियेत महिलांची भूमिका अतिशय महत्त्वाची आहे. लोकसंख्येच्या 50% असणाऱ्या महिलांमध्ये अर्थव्यवस्थेच्या सर्व क्षेत्रात काम करण्याची क्षमता आहे. महिलांना सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक व राजकीय क्षेत्रात समानता प्राप्त करून देणे हे सुसंस्कृत समाजाचे कर्तव्य आहे.

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

स्वतंत्र भारतात घटनेने महिलांना पुरुषांइतकेच स्वातंत्र्य, समानता व संधी मिळवून दिल्या आहेत. परंतु आजही भेदभाव केला जातो व अनेक महिला हिंसेला बळी पडत आहेत. अद्यापही महिलांना विकासाच्या सर्व क्षेत्रात समान संधीं उपलब्ध करून दिल्या जात नाहीत. हा भेदभाव कमी करण्यासाठी अनेक पातळीवर प्रयत्न सुरु आहेत.

भारताच्या राजकीय, सामाजिक व आर्थिक क्षेत्रात ही लिंग विषमता दिसून येते. दर 1000 पुरुषांमागे महिलांची संख्या किती यावरून लिंग गुणोत्तर काढले जाते. यावरून महिलांचे समाजातील स्थानमान कळते. सर्व क्षेत्रातील या भेद भावामुळे 2011 च्या जनगणनेनुसार लिंग गुणोत्तर प्रमाण 945 होते ही एक धक्कादायक बाब आहे. त्या पेक्षाही धक्कादायक बाब म्हणजे 0 ते 6 वयोगटातील मुलांमधील घटलेले लिंग गुणोत्तर प्रमाण होय.

> विकासामध्ये लिंग विषमता असेल तर तो विकास खुंटतो
> MDI अहवाल - 1994

याच प्रमाणे 2011 च्या जनगणनेनुसार महिलांमधील साक्षरतेचे प्रमाण 65.46% आहे. तर पुरुषांचे साक्षरतेचे प्रमाण 82.14 आहे. याचे कारण म्हणजे आजही काही लोक मुलींना शिक्षण देणे महत्त्वाचे आहे असे मानत नाहीत. काही ठिकाणी महिलांना पुरेशा शैक्षणिक सुविधा उपलब्ध नाहीत.

> **उपक्रम :** भारतातील स्त्रीपुरुष लिंग गुणोत्तर विषम आहे. त्याच्या कारणांची यादी करा.

सध्या बहुतांश महिला असंघटित क्षेत्रामध्ये काम करीत आहेत. (शेती, बांधकाम, लघुउद्योग, कुटिरोद्योग इ.) त्यांना पुरुषांपेक्षा कमी पगार दिला जातो. शिवाय त्यांनी मिळविलेला पैसा खर्च करण्याचे त्यांना स्वातंत्र्य नसते. अल्पशिक्षणामुळे जास्तीतजास्त माहिला असंघटित क्षेत्रामध्ये काम करतात. तर फारच कमी स्त्रिया उच्चवेतन श्रेणीतील उच्च पदांवर कार्यरत असलेल्या दिसून येतात.

बऱ्याच कुटुंबामध्ये पुरुष व घरातील सर्वांची जेवणे झाल्यावर शिल्लक राहिलेले अन्न महिलांना खावे लागते. त्यामुळे कुपोषण होऊन महिला आजारी पडतात. एकीकडे कुपोषण व दुसरी कडे कामाचा प्रचंड ताण यामुळे स्त्री आजारी पडली तरी पुरुष त्यांच्याकडे दुर्लक्ष करतात. गर्भवती महिला जर आजारी पडली तर त्याचा परिणाम जन्मणाऱ्या बालकावरही होतो. यामुळे कितीतरी महिला प्रसूतीच्या काळातच दगावतात.

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

5 वर्षाच्या आतील वयोगटातील मुलांच्या मृत्यूचे प्रमाण वाढत आहे. स्त्रीभ्रूण हत्येसारख्या अनिष्ट प्रथांचे प्रमाण वाढत आहे आणि हेच लिंग गुणोत्तर घटण्याचे प्रमुख कारण आहे. राजकीय क्षेत्रात (पंचायत, विधानसभा, लोकसभा) महिलांना विशेष आरक्षण असूनसुद्धा सभेमध्ये त्याची उपस्थिती दुर्लक्षित असते. सभेतील त्यांच्या मताला फारसे महत्त्व दिले जात नाही. यावरून लिंग भेद दिसून येतो.

आर्थिक विकासामध्ये महिलांना सहभागी होण्यास प्रोत्साहन देण्यासाठी म्हणून स्वसहाय्यसंघाची स्थापना खेड्यापासून शहरापर्यंत केली आहे. त्यामध्ये 20 एकमत असणाऱ्या महिलांचा संघ असतो. आपल्या जवळील अल्पभांडवल एकत्र करून, बाह्यमदत घेऊन त्या स्वतः चा व्यवसाय सुरु करतात आणि उत्पन्न वाढविण्यास प्रयत्न करतात.

हिशेब ठेवणे, बँकेचे व्यवहार सांभाळणे व उत्पन्न वाढविणे यासंबंधीचे प्रशिक्षण त्यांना दिले जाते. स्वसहाय्य संघांमुळे महिलांना उत्पन्न मिळविणे, बचत करणे व आपल्या इच्छेनुसार पैसा खर्च करण्याची मुभा मिळते. त्यामुळे महिलांची समाजातील प्रतिष्ठा वाढते व त्यांना स्वायत्तताही प्राप्त होते.

अलिकडील काळात महिला सबलीकरणासाठी अनेक उपक्रम राबविले जात आहेत. जीवनातील अनेक महत्त्वाच्या संधींची निवड आता त्या करू शकतात, ज्या पूर्वी त्यांना नाकारल्या जात होत्या. यालाच 'महिला सबलीकरण' असे म्हणतात सबलीकरण ही लोकांमधील सामर्थ्य वाढविण्याची एक प्रक्रिया आहे असे म्हटले जाते. घरामध्ये व कामाच्या ठिकाणी महिलांवरील हिंसा रोखण्यासाठी, त्यांना समान वेतन देण्यासाठी, आणि राजकीय क्षेत्रांमध्ये आरक्षण देण्यासाठी सरकारने अनेक कायदे लागू केले आहेत.

वरील सर्व उपक्रम महिलांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी नक्कीच सहाय्यभूत ठरतील.

हे तुम्हाला माहित आहेका ?

UNDP लिंग विषमता सूचीचे आंतरराष्ट्रीय स्तरावरसुद्धा मोजमाप करते. ही सूची 0 ते 1 च्या दरम्यान आहे. '0' हे संपूर्ण समानता दर्शविते तर '1' संपूर्ण विषमता दर्शवितो. 2015 मध्ये भारताचे लिंग गुणोत्तर 0.563 असून भारताचे स्थान 188 राष्ट्रांमध्ये 130व्या स्थानी आहे. यावरून असे दिसून येते की महिला विकासामध्ये भारताची अवस्था अत्यंत दयनीय असून लिंग विषमता मोठ्या प्रमाणात दिसून येते.

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

अभ्यास

I. खालील रिकाम्या जागा योग्य पदांनी भरा.

1. आर्थिक विकास ही एक निरंतर चालणारी _____ आहे.
2. _____ उत्पन्न वाढल्यास राष्ट्रीय विकास वाढतो.
3. _____ ही संस्था जागतिक मानव विकास अहवाल सादर करते.
4. मानवीविकास म्हणजे _____ वृद्धिंगत करणे.
5. अविकसित राष्ट्रांमध्ये प्रामुख्याने _____ कमी असते.
6. 2014 मध्ये भारत मानव विकास सूचीमध्ये _____ स्थानावर होता.
7. 2011 मध्ये भारताचे लिंग गुणोत्तर _____ इतके होते.

II. खालील प्रश्नांची उत्तरे 5 ते 6 वाक्यात लिहा.

1. विकासाची व्याख्या लिहून विकास प्रक्रिया स्पष्ट करा.
2. अविकसितता म्हणजे काय? त्याची कारणे कोणती?
3. मानव विकास म्हणजे काय? त्याचे मोजमाप कसे करतात?
4. भारतामध्ये मानव विकास सूचक कमी असण्याची कारणे कोणती?
5. लिंग समानता कशी साध्य केली जाते?
6. महिला स्वसहाय संघामुळे महिला सक्षम होत आहेत याचे समर्थन करा.

III. उपक्रम

तुमच्या गावात फेरफटका मारून तेथील कुटुंबाच्या विकासात कशा प्रकारे भिन्नता आहे ते समजून घ्या.

IV. प्रकल्प (Project Work)

1. अलिकडच्या काळात महिला सबलीकरणासाठी सरकारने कोणते उपक्रम हाती घेतले आहेत. त्यांची यादी तयार करा.

***

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

प्रकरण - 2

ग्रामीण विकास

या पाठात आपण पुढील घटकांचा अभ्यास करूया.

- **ग्रामीण विकासाचा अर्थ आणि महत्त्व**
- **ग्रामीण विकास आणि विकेंद्रीकरण**
- **ग्रामीण विकास आणि पंचायतराज संस्था**
- **ग्रामीण विकास आणि महिला सबलीकरण**

भारत हा खेड्यांनी बनलेला देश आहे. 2011 च्या जनगणनेनुसार 68.84% जनता खेड्यांमध्ये राहते. राष्ट्रपिता महात्मा गांधीजींच्या मते 'खेड्यांचा विकास म्हणजेच भारताचा विकास आहे 'स्वातंत्र्यानंतरच्या 70 वर्षांच्या काळानंतरसुद्धा भारतातील खेडी विकासापासून वंचित व मागासलेली आहेत. 1/3. ग्रामीण जनता अत्यंत दयनीय व दरिद्री अवस्थेत रहात आहे. विकासाच्या योजना व दारिद्रय निर्मूलन योजना तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचण्यात अयशस्वी झाल्या आहेत.

स्वातंत्र्यानंतर विकासाच्या योजना फक्त शहरामध्येच केंद्रित झाल्या आहेत असे विद्वानांचे मत आहे. ब्रिटीशांच्या काळात ग्रामीण व्यवसायांचा ऱ्हास झाला. स्वातंत्र्यानंतर आधुनिक उद्योगधंद्यांच्या स्पर्धेत ग्रामीण व्यवसाय मोठ्या प्रमाणात लयास गेले.

शेती या व्यवसायापासून नियमित रोजगार मिळत नाही व वेळेवर वेतनही मिळू शकत नाही. यासाठी ग्रामीण भागातील लोक शहरात स्थलांतर करू लागले. उदारीकरण व जागतिकीकरणामुळे तसेच अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या वापरामुळे उद्योगधंदे व सेवाकेंद्रे यांचा जलदगतीने विस्तार होऊन त्यांना भरपूर प्रोत्साहन मिळाले.

फक्त शेती व्यवसायावर अवलंबून असणाऱ्या ग्रामीणभागातील लोकांमध्ये दारिद्र्याचे प्रमाण सातत्याने वाढत आहे. त्यातील 33% जनता दारिद्रय रेषेखाली जीवन जगत आहे. अत्याधुनिकतेच्या लाटेमध्ये ग्रामीण भागातील कुटिरोद्योग व लघुउद्योग लोप पावत आहेत. 60% जनता प्राथमिक क्षेत्रामध्ये राबत असूनसुद्धा राष्ट्रीय उत्पन्नात यांचे योगदान नगण्य आहे. ते दिवसेंदिवस कमी होत आहे. त्यामुळे खेडी व शहरे यांच्यातील अंतर वाढत आहे. या दोन्हीतील तफावत दूर करण्यासाठी व देशाच्या सर्वांगीण विकासासाठी 'ग्रामीण विकास' करणे अत्यंत गरजेचे आहे.

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

या पाठात आपण ग्रामीण विकासाचा अर्थ समजून घेऊन तो साकार करण्यासाठी सरकारने कोणकोणते उपक्रम हाती घेतले आहेत याचा परामर्ष घेऊया.

1. ग्रामीण विकासाचा अर्थ आणि महत्त्व :

ग्रामीण विकासाचा अर्थ - ग्रामीण विकास म्हणजे ग्रामीण भागाच्या आर्थिक व सामाजिक उन्नतीसाठी तयार केलेली 'कृती योजना' होय. ग्रामीण भागातील लोकांचे राहणीमान उंचावणे म्हणजे ग्रामीण विकास. ही एक समग्र प्रक्रिया असून त्यामध्ये समाजातील गरीब जनतेच्या आर्थिक, सामाजिक, राजकीय व आध्यात्मिक उन्नतीचा समावेश आहे.

शेती व्यवसायातील अनिश्चितता आणि धीम्यागतीने होणारी प्रगती ही ग्रामीण मागासलेपणाची व गरिबीची प्रमुख कारणे आहेत. यासाठी शेतीला पूरक व्यवसाय सुरु करणे आवश्यक आहे. साक्षरता, कौशल्ये, आरोग्य, स्वच्छता, वाहतूक, उर्जा, दळणवळण, बाजारपेठा, वित्त या सारख्या सुविधा ग्रामीण भागात जास्त प्रमाणात देणे आवश्यक आहे. शेतीच्या विकासासाठी पाणीपुरवठा व भूविकास हे सुद्धा अत्यंत गरजेचे आहे.

त्याच प्रमाणे ग्रामीण विकासामध्ये साक्षरता, आरोग्य, मूलभूत सुविधा, भूसुधारणा, पाणीपुरवठा, गरिबांच्या राहणीमानात उन्नती यासारख्या विशिष्ट उपक्रमांचा समावेश करावा लागतो. ग्रामीण विकासासाठी आवश्यक असणाऱ्या कार्यक्रमांची यादी केल्यास ती खालील प्रमाणे होईल.

1) मनुष्य साधनसंपत्ती व त्याचा विकास
   a) साक्षरता (विशेषत: स्त्री साक्षरता), शिक्षण, कौशल्यांचा विकास
   b) स्वच्छता व सार्वजनिक आरोग्य सुधारणा
2) भूविकास
3) उत्पादनासाठी आवश्यक स्थानिक स्त्रोताचा विकास
4) विद्युतशक्ती, पाणीपुरवठा, अर्थ, बाजारपेठ, वाहतूक (ग्रामीण वं संपर्क रस्ता) कृषी संशोधन व विस्तार माहिती सुविधा व इतर मूलभूत सुविधांचा विकास.
5) दारिद्रय निर्मूलनाच्या विशिष्ट योजना

ग्रामीण विकासाचे महत्त्व : ग्रामीण विकास हा फक्त शेती व शेती पूरक व्यवसायाशी निगडीत नसून देशाच्या सर्वांगीण विकासामध्येही याचे योगदान आहे. त्यामुळे एकूणच राष्ट्रीय विकास होतो. शेतीच्या अधिक उत्पन्नामुळे उद्योगधंद्यासाठी लागणाऱ्या कच्चा

www.textbookpdf.in

मालाची मागणी वाढते व अधिकाधिक रोजगाराच्या संधी उपलब्ध होतात. उत्तम शिक्षणामुळे उत्पादन क्षमता व कौशल्य वाढते. उत्तम आरोग्यामुळे लोकांच्या कामाचा वेग वाढतो व राष्ट्रीय उत्पन्नही वाढते. शेती प्रक्रिया, लघुउद्योग यात वाढ होऊन एकूणच ग्रामीण विकासाची नांदी होते आणि दारिद्र्य कमी होण्यास मदतही होते.

2. विकेंद्रीकरण : प्रत्येक खेड्याच्या प्रशासनाचे अधिकार आणि विकासाची जबाबदारी खेड्यातील लोकांवरच सोपविणे म्हणजेच विकेंद्रीकरण होय. यामुळे अधिकारांची विभागणी होऊन निर्णय घेण्यामध्ये लोकही सहभागी होतात. खालच्या स्तरापासून सुरू होणारी योजनेची व विकासाचीही प्रक्रिया आहे. यालाच गांधीजींनी 'ग्रामस्वराज्य' असे म्हटले होते. विकेंद्रीकरणामुळे सर्व प्रकारचे शोषण थांबवून मानवी स्वातंत्र्य व प्रतिष्ठा उंचावली जाते. सहानुभूती, सहकार ही मानवी मूल्ये वृद्धिंगत होतात.

विकेंद्रीकरणाला प्रोत्साहन देण्यासाठी भारत देशात पंचायत राज व्यवस्थेला पुनरुज्जीवित करण्यात आले आहे. भारत सरकारने केलेल्या 1993 च्या घटनेतील 73 व्या घटना दुरुस्ती कायद्यानुसार देशभर पंचायत राज संस्था अस्तित्वात आल्या आहेत व त्यांना घटनात्मक दर्जा मिळाला आहे. या दुरुस्तीनुसार तीन टप्प्यांची पंचायत व्यवस्था अस्तित्वात आली आहे. भारतातील पंचायत राज व्यवस्थेची प्रमुख लक्षणे खालील प्रमाणे आहेत.

1) ग्रामपंचायत, तालुकापंचायत, व जिल्हा पंचायत या प्रमाणे तीन टप्प्यांची व्यवस्था असून ग्रामसभा ही या व्यवस्थेचा पाया आहे.
2) नियमित व प्रत्यक्ष निवडणुका
3) अनुसूचित जाती जमाती व इतर मागास वर्गीय महिलांना आरक्षण
4) अर्थ, प्रशासकीय अंदाजपत्रक व हिशेब तपासणीची (ऑडिट) जबाबदारी
5) दैनंदिन कामकाज पार पाडण्यास अधिकारी व कर्मचाऱ्यांची नियुक्ती
6) पंचायत बरखास्त करण्यासाठी कडक कायदे व बरखास्ती नंतर 6 महिन्यात निवडणुक घेणे बंधनकारक आहे. कर्नाटकात 30 जिल्हापंचायती, 176 तालुकापंचायती आणि 6022 ग्रामपंचायती आहेत.

3. ग्रामीण विकासामध्ये पंचायतराज संस्थेची भूमिका : ग्रामीण विकासात खेड्यातील लोकांना सहभागी करून घेण्यात पंचायत राज संस्थेची अत्यंत महत्त्वाची भूमिका आहे. दारिद्र्य निर्मूलन, जीवनाची सुरक्षा, सार्वजनिक सुविधा उपलब्ध करून देण्याच्या योजनेमध्ये या संस्थेची जबाबदारी महत्त्वाची आहे. रस्ते, गटारी, पिण्याचे पाणी, पथदीप, शौचालय,

www.textbookpdf.in

शाळा, दवाखाने, बाजारपेठा इ. लोकांना उपयोगी पडणाऱ्या मूलभूत सुविधांचा पुरवठा करतात. प्राथमिक व माध्यमिक शिक्षण, प्रौढ शिक्षण, तांत्रिक व व्यावसायिक शिक्षणाला प्रोत्साहन देतात. आरोग्य व स्वच्छतेच्या सुविधांची वाढ करून मानवी साधन संपत्तीचा विकास करण्याचे कार्य पंचायत राज करते.

ग्रामपंचायती मध्ये ग्रामसभा फार महत्त्वाची आहे. सहा महिन्यातून एकदा ग्राम सभा भरविणे सक्तीचे आहे. गावातील सर्व मतदार, ग्रामसभेचे सदस्य असतात. गावातील विकासांच्या सर्व योजनांची चर्चा ग्रामसभेतच होते.

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण उद्योग हमी योजना, स्वर्णजयंती ग्राम स्वयंरोजगार योजना यासारख्या उद्योग निर्मिती व दारिद्र्य निर्मूलनाच्या योजना पंचायत राज संस्थेकडून परिणामकारकरित्या राबविल्या जातात. त्यामुळे गरिबी व बेकारी दूर होण्यास मदत होते. प्रधानमंत्री आवास योजना, इंदिरा आवास योजना, आंबेडकर वाल्मिकी निवास योजना, आश्रय योजना इ. योजना अंमलात आणून बेघर लोकांना घरांची निर्मिती करून दिली जाते. सुवर्ण ग्रामोदय योजनेद्वारे मूलभूत सुविधा मोठ्या प्रमाणात मिळतात.

गावांमध्ये शिधापत्रिकेद्वारे धान्यवाटप व्यवस्था मजबूत करून गरीब व लाभार्थींना जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा केला जातो. गावातील ज्येष्ठ नागरिक, अपंग, विधवा, म नोरुग्ण यांना सरकारकडून मिळणाऱ्या सुविधा उपलब्ध करून देऊन समाजसेवा केली जाते.

महिला स्वसहाय्य संघाची स्थापना करून त्यांना स्वयंरोजगारासाठी प्रोत्साहन देऊन देशाच्या विकासात सक्रिय सहभागी होण्यास मदत केली जाते यात्रा, सण या दिवशी सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रमांना प्रोत्साहन देते; त्यामुळे ग्रामीण कलाकारांना व्यासपीठ मिळते त्यातून ग्रामीण संस्कृती जोपासली जाते.

खेड्यातील उत्पादक उपक्रम म्हणजे शेती, पशुपालन, कुक्कुटपालन, मासेमारी, सामाजिक वनीकरण इ. मुळे लोकांना काम करण्याची संधी उपलब्ध करून देता येते. तलाव निर्मिती, तलावातील गाळ काढणे, लघुपाटबंधारे योजना व कुटिरोद्योग यांचा विकास करता येतो.

वरील सर्व उपक्रमात पंचायत राज प्रमुख भूमिका निभावते व खेड्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना देते.

4. विकासामध्ये महिलांचा सहभाग : माणसाच्या जीवनात महिला आई, पत्नी, सून व मुलगी अशा विविध भूमिकेद्वारे आपले कर्तव्य पार पाडत असतात. स्त्री मुळे माणसाच्या

www.textbookpdf.in

जीवनाला एक आकार मिळतो. स्त्री फक्त घरातीलच कामे करते असे नाही तर शेती, मजुरी, नोकरी, अधिकारी, उद्योजिका अशा सर्व ठिकाणी पुरुषांच्या बरोबरीने सर्व क्षेत्रात काम करीत आहे. देशाच्या विकासात विशेषत. ग्रामीण विकासात महिलांची भूमिका निर्णायक आहे. फूलशेती, कुक्कुटपालन, मासेमारी, पशुपालन, रेशीम उद्योग, फळबागायती या सर्व क्षेत्रात महिलांचा सहभाग मोठ्या प्रमाणात आहे.

सुशिक्षित महिला अर्थव्यवस्थेच्या वेगवेगळ्या क्षेत्रात विभिन्न उद्योगात यशस्वीरित्या कार्य करीत आहेत. कार्यालय, व्यापारी संस्था, शिक्षणसंस्था, दवाखाने, वृद्धाश्रम इ. ठिकाणी महिलांची सेवा अनन्यसाधारण आहे. सुशिक्षित महिला लोकसंख्या नियंत्रणात महत्त्वाची भूमिका निभावत आहेत.

राजकीय क्षेत्रात महिलांनी आपला ठसा उमटविला आहे. ग्रामपंचायत ते राष्ट्रपती पदापर्यंत सरकारी स्तरावरील सर्व पदे समर्थपणे त्या सांभाळत आहेत. पंचायत राज व्यवस्थेत महिलांना आरक्षण असल्यामुळे सामान्य ग्रामीण महिलापण अधिकाराची सूत्रे सांभाळून ग्रामविकासात मोलाची भर टाकत आहेत. सध्या कर्नाटकात 50% पेक्षा जास्त महिला प्रतिनिधी आहेत. हे महत्त्वाचे आहे.

ग्रामीण प्रदेशात सर्वत्र महिला स्वसहाय्यसंघ अस्तित्वात आले आहेत. ते गरीब महिलांना संघटित करून आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनविण्यात महत्त्वाची भूमिका बजावत आहेत. या संघातील महिला सहजपणे कर्ज काढून उत्पादन प्रक्रियेत सक्रिय भाग घेऊ शकतात.

अत्यंत यशस्वीपणे कार्य करणाऱ्या या संघटना बचत करण्यात व कर्जाची परतफेड करण्यात सफल झाल्या आहेत. ग्रामीण विभागात मद्यपान, जुगार इ. वाईट व्यसने मोठ्या प्रमाणात फैलावत आहेत.

बालविवाह, हुंडा, जातीयता, अंधश्रद्धा, महिला व मुलांचे शोषण इ. सामाजिक अनिष्ट प्रथा अजूनही अस्तित्त्वात आहेत.

जागृत महिला संघटित होऊन या अनिष्ट प्रथांचे निर्मूलन करतात. याद्वारे स्वच्छ व प्रगत समाजाची बांधणी करण्यात त्या योगदान देतात.

एकंदरीत देशाच्या आर्थिक विकासामध्ये स्त्री व पुरुषांची समान जबाबदारी आहे व ते दोघेही प्रगतीपथावरील समाजरथाची दोन चाके आहेत.

तुमच्या गावातील महिला स्वसहाय्य संघाला भेट देऊन त्यांच्या कार्याची माहिती मिळवा.

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

स्वाध्याय

I. खालील रिकाम्या जागा योग्य पदांनी भरा.

1. 'खेड्यांचा विकास म्हणजेच भारताचा विकास आहे' असे _____ यांनी म्हटले आहे.
2. घटनेच्या 73 व्या दुरुस्तीनुसार भारत देशात पंचायत संस्थेचे _____ टप्पे आहेत.
3. पंचायत संस्था _____ तत्वाप्रमाणे कार्य करतात.
4. ग्रामीण महिलांना संघटित करून त्यांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनविण्यासाठी _____ अस्तित्वात आले आहेत.

II. खालील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिहा.

1. ग्रामीण विकासाचा अर्थ सांगा.
2. विकेंद्रीकरण म्हणजे काय?
3. पंचायत संस्थेचे तीन टप्पे कोणते?
4. कोणत्याही दोन निवास योजनांची नावे लिहा.

III. खालील प्रश्नांची उत्तरे 5 ते 6 वाक्यात लिहा

1. भारत देशात ग्रामीण भागातील आर्थिक परिस्थिती कशी आहे?
2. ग्रामीण विकासाचे महत्त्व थोडक्यात लिहा.
3. गांधीजींच्या 'ग्रामस्वराज्य' कल्पना विकेंद्रीकरणाच्या आधारे स्पष्ट करा.
4. ग्रामीण विकासात पंचायत राज संस्थेची भूमिका कोणती?

IV. उपक्रम

1. तुमच्या जवळच्या ग्रामपंचायतीला भेट देऊन ग्रामीण विकासाचे कामकाज कसे चालते याची माहिती लिहा.
2. तुमच्या जवळच्या महिला स्वसहाय्य संघाला भेट देऊन महिलांना स्वावलंबी बनविण्यात त्यांची भूमिका कोणती याबद्दल माहिती मिळवा आणि वर्गात त्याबद्दल चर्चा करा.

***

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

व्यवहार अध्ययन

प्रकरण - 1

बँकेचे व्यवहार

या पाठात आपण पुढील घटकांचा अभ्यास करूया.

- **बँकांचा अर्थ.**
- **बँकेचे आणि पोष्टाचे आर्थिक व्यवहार**
- **बँकांची वैशिष्ट्ये**
- **बँकेत उघडता येणारी वेगवेगळी खाती.**
- **बँकेत खाते उघडण्याच्या पद्धती.**
- **बँक खात्याचे फायदे.**

सुमारे दोनशे वर्षांपूर्वी बँकांची सुरवात झाली. कालानुसार बँकांचे स्वरूप बदलत आहे. 'बँक' हा शब्द आर्थिक व्यवहारांशी संबंधित आहे. बँका या अशा आर्थिक संस्था आहेत की ज्या ग्राहकांनी गुंतवलेल्या ठेवींच्या स्वरूपातील पैसा वापरतात आणि त्यांच्या गरजेनुसार त्यांना तो परत करण्याची हमी देतात. बँका ग्राहकांना कर्जे देतात आणि त्यावर व्याज आकारतात. बँका निरनिराळ्या देशांच्या पैशांची (चलनांची) अदलाबदल (Exchange) करतात. एखाद्या देशाचा विकास हा त्या देशाच्या बँकींग पद्धतीवर अवलंबून असतो. बँका, शेती, कारखाने, व्यापारी आणि समाजातील इतर क्षेत्रांना आगावू कर्जे देतात. ही सर्व क्षेत्र देशाच्या विकासात महत्वाची भूमिका निभावतात.

बँक म्हणजे काय?

'बँक' हा शब्द मूळ इटालियन शब्द "Banko" किंवा फ्रेंच शब्द "Banque" यावरून तयार करण्यात आलेला आहे. दोन्हीचा अर्थ 'बाक' (Banque) किंवा पैशांच्या देवाणघेवाणीचे टेबल (Money ecchange table) असा आहे. जी कंपनी व्यवसायातील किंवा व्यापारातील आर्थिक व्यवहार सांभाळते, ती बँकींग कंपनी होय अशी बँकेची व्याख्या केली जाते. बँक जनतेकडून ठेवी स्वीकारते आणि गरजू लोकांना कर्ज देते. ज्यांना ठेवींच्या स्वरूपात बचत करावयाची असते त्यांच्या ठेवी बँक स्वीकारते व ज्यांना पैशांची गरज असते त्यांना कर्जाच्या स्वरूपात पैसे देते. बँकेच्या देवाण-घेवाणीच्या या सेवांनाच 'बँक व्यवसाय'

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

(banking) असे म्हणतात. बँका धनादेश (चेक), ड्राफ्टद्वारे (हुंडी) किंवा इतर स्वरूपात ठेवी परत करतात.

बँकांची वैशिष्ट्ये

1. **पैशांशी संबंधित :** बँका या अशा आर्थिक संस्था आहेत की ज्या जनतेच्या पैशाशी संबंधित असतात.
2. **व्यक्ती/पेढी/कंपनी :** बँक ही एक व्यक्ती, पेढी किंवा कंपनी असू शकते. पैशांशी संबंधित असणारी संस्था म्हणजेच बँकींग कंपनी होय.
3. **ठेवींचा स्वीकार :** बँका जनतेकडून ठेवी स्विकारतात आणि जेंव्हा ग्राहक मागणी करतात तेंव्हा किंवा ठराविक कालावधीनंतर त्या परत करतात. बँका या ठेवींना संरक्षण देतात. थोडक्यात सांगायचे तर बँका जनतेच्या ठेवींचे पर्यवेक्षक म्हणून काम पाहतात.
4. **कर्जे देणे :** औद्योगिक क्षेत्र, कृषी क्षेत्र, शिक्षणक्षेत्र, घरबांधणी आणि विविध इतर क्षेत्रातील अनेक गोष्टींसाठी बँका कर्जे देतात.
5. **पैसे देणे व काढणे :** बँक आपल्या ग्राहकांना चेक किंवा ड्राफ्टद्वारे ठेवी किंवा पैसे काढण्याची सुविधा देते.
6. **एजंट अथवा एजंटची नेमणूक आणि उपयुक्त सेवा :** बँका आपल्या ग्राहकांना विविध बँकींग सुविधा उपलब्ध करून देतात. त्यामध्ये सामान्य उपयुक्त सेवा आणि एजन्सी सेवा यांचा समावेश होतो.
7. **फायदा आणि सेवाभावी संस्था :** बँका या फायदा मिळविणाऱ्या सेवाभावी संस्था असतात.
8. **कायम वाढणारी कार्ये:** बँका आपल्या कामामध्ये, सेवांमध्ये आणि कार्यक्षमतेमध्ये सतत फेरबदल आणि त्यांचा विस्तार करीत असतात.
9. **जोडणारा दुवा :** बँका ठेवीदार आणि कर्जदार यांना जोडणारा दुवा म्हणून काम करीत असतात. बँका ग्राहकांकडील शिल्लक असणारा पैसा गोळा करतात आणि गरजूंना कर्जरूपात देतात.

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

10. **बँक व्यवसाय :** हे बँकेचे प्रमुख कार्य आहे. म्हणजेच ग्राहकांकडून ठेवी स्वीकारणे आणि कर्जे देणे. हा व्यवसाय इतर कोणत्याही व्यवसायाचा सहाय्यक किंवा मदतनीस नसतो. तो एक स्वतंत्र व्यवसाय असतो.

11. **नावाची ओळख :** बँकांना नेहमी स्वतःची अशी वेगळी ओळख असते. म्हणजेच प्रत्येक बँकेला एक विशिष्ट नाव असते. उदा : कॅनरा बँक, विजया बँक, कार्पोरेशन बँक, स्टेट बँक ऑफ इंडिया, स्टेट बँक ऑफ मैसूरु इ. यामुळे ग्राहकांना आपल्या पैशांचे व्यवहार नक्की कोणत्या बँकेशी आहेत हे समजण्यास मदत होते. आता सर्व स्टेट बँका 'स्टेट बँक ऑफ इंडिया'मध्ये विलीन झाल्या आहेत.

बँकांचे कार्य -

1. जनतेकडून आणि इतरांकडून ठेवी स्वीकारणे.
2. जनतेला आणि संस्थांना कर्ज देणे.
3. एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी पैसे पाठवणे. (Remittances)
4. चेक्स, ड्राफ्टस् आणि बिलाद्वारे पैसे वसूल करणे.
5. बिलांमध्ये सूट देणे.
6. सेफ डिपॉझीट लॉकर्स भाड्याने देणे.
7. परदेशी चलनांची अदलाबदल (विनिमय) करण्याचे व्यवहार करणे.
8. अत्यंत मौल्यवान वस्तू सुरक्षित ठेवणे.
9. बँकेतील शिल्लक रक्कमेची आणि हमी देणारी पत्रे पाठविणे.
10. सरकारी व्यवहार करणे (केंद्र आणि राज्य)

बँकेचे मालक आणि ग्राहक यांच्यातील नाते -

बँकेचे मालक आणि ग्राहक यांचे नाते दोन प्रकारात विभागले जाते ते खालीलप्रमाणे -

1. सामान्य नाते -

- प्राथमिक नाते (कर्जदार आणि ठेवीदार यांच्यातील नाते)
- दुय्यम किंवा गौण नाते (विश्वस्त आणि लाभार्थी यांच्यातील नाते)
- दलाल (Agent) आणि प्रमुखाचे नाते

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

2. विशेष नाते-

- चेक देण्या - घेण्याबद्दलची कर्तव्ये किंवा बंधने
- ग्राहक खात्यांची गुप्तता राखण्याबद्दलची कर्तव्ये किंवा बंधने.

उपक्रम
तुमच्या जवळच्या बँकेला भेट देवून उच्च शिक्षणाच्या कर्जाबद्दल व्यवस्थापकांकडून माहिती मिळवा.

बँकांकडून दिल्या जाणाऱ्या सेवा-

1. क्रेडीट व डेबीट कार्डस् (उधारीने विकत घेण्यासाठीचे कार्ड)
2. खाजगी कर्जे
3. गृह आणि वाहन कर्जे
4. म्युच्युअल फंडस् (Mutual Funds) भागिदारीत परस्पर विनिमयासाठी गोळा केलेला निधी.
5. व्यवसाय कर्जे
6. सेफ डिपॉझिट लॉकर्स
7. विश्वस्त सेवा
8. सह्यांची खाती किंवा हमी
9. ई बँकींग (E-Banking services)

बँकेचे व्यवहार

बँका व टपाल कचेऱ्या-

पैशांसंदर्भातील किंवा खात्यातील पैशांच्या देवाण घेवाणीच्या बाबतीतले कोणतेही कार्य म्हणजेच बँकेचे व्यवहार बँका म्हणजे पैशांशी संबंधित असणाऱ्या संस्था होत. बँका ग्राहकांचा पैसा ठेवींच्या स्वरूपात ठेवतात आणि हा गोळा केलेला पैसा गरजू ग्राहकांना कर्ज म्हणून देतात. अशा प्रकारच्या कर्जानाच बँक कर्जे (Bank loans) म्हणतात. बँका कर्जे देतात आणि त्यावर व्याज आकारतात. व्याजाच्या स्वरूपात गोळा केलेल्या या पैशातीलच कांही भाग ठेवीदारांच्या ठेवीवर व्याज म्हणून देतात. या व्याजामुळे ठेवीदारांना उत्पन्न मिळते. ग्राहकांचा हा पैसा बँका राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय व्यवसायामध्ये गुंतवितात आणि त्यांचा निधी वाढवितात.

भारतातील सर्व बँकांचे व्यवहार हे रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या (RBI) नियंत्रणाखाली असतात. रिझर्व्ह बँक ही 'बँकांची जननी' किंवा 'बँकाची बँक' किंवा 'मध्यवर्ती बँक'

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

(Central Bank of India) म्हणून ओळखली जाते. रिझर्व्ह बँक पैशांविषयीची धोरणे ठरविते आणि इतर सर्व बँका त्यांचे अनुकरण करतात. आज आपल्या देशात पुढीलप्रमाणे बँकांचे समूह कार्यरत आहेत. 21 राष्ट्रीयीकृत बँका, 21 खाजगी बँका आणि 19 परदेशी बँका. बँकांच्या या जाळ्यामध्ये 8000 शाखांचा समावेश आहे. याव्यतिरिक्त ग्रामीण बँका, प्रादेशिक बँका सरकारी आणि खाजगी बँकासुद्धा कार्यरत आहेत.

उपक्रम

पोष्टाला भेट देवून पोष्टल बँकिंग पद्धतीच्या कार्याची माहिती मिळवा.

बँकींग क्षेत्रातील एक प्रगतीचे पाऊल म्हणजे नुकताच पोष्ट ऑफिसचा बँक व्यवहारात झालेला समावेश होय. भारतीय पोष्ट खाते हे 'पोष्टल बँक ऑफ इंडिया' या नावाची बँक सुरू करण्याचा विचार करीत आहे. त्यापैकी 90% पोष्ट ऑफिसिस ही निमशहरी व ग्रामीण भागात आहेत. या खात्याद्वारे विविध आर्थिक सेवा दिल्या जात आहेत. त्या म्हणजे-पोष्ट ऑफिस बचत बँक, राष्ट्रीय बचत पत्रके (NSC), किसान विकास पत्रे, मासिक रिकरिंग डिपॉझिटस् (RD), पोष्टल लाईफ इन्श्युरन्स (PLI), निवृत्ती वेतन, पैसे पाठविणे (Money transfer) इ. पोष्ट खात्याने बँक व्यवहारासाठी 1000 कोटी रुपयांचे भांडवल गुंतविलेले आहे. पोष्ट खात्याला हे उत्पन्न पूरक व सहाय्यकारी ठरेल.

बँकांचे प्रकार -

बँकाचे विविध प्रकार आहेत. प्रत्येक प्रकारची बँक ही वेगवेगळ्या प्रकारच्या कामामध्ये निपुण असते.

बँकांचे महत्त्वाचे प्रकार

1. सेंट्रल बँक किंवा रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया
2. व्यापारविषयक बँका (Commercial Banks)
3. औद्योगिक विकास बँका (Industrial Development Banks)
4. भूविकास बँका (Land Development Banks)
5. स्थानिक बँका (Money Lenders or Sahukars) पतपेढ्या
6. सहकारी बँका (Co-operative Banks)

(या बँकाबद्दलची अधिक माहिती तुम्ही मागील वर्गात अर्थशास्त्र विभागात शिकला आहातच)

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

बँक खात्यांचे प्रकार

सर्वसाधारणपणे बँकेमध्ये चार प्रकारची खाती उघडली जावू शकतात. ती पुढीलप्रमाणे-

1. बचत खाते (Savings Bank Account)
2. चालू खाते (Current Account)
3. आवर्ती ठेव खाते (Recurring Deposit Account)
4. मुदत ठेव खाते (Term Deposit Account)

1. बचत खाते (Savings Bank Account)

सर्वसाधारणपणे पगारदार व्यक्तीकरता किंवा नियमित उत्पन्न मिळविणाऱ्या व्यक्तींकरता बँका हे खाते उघडतात. ही सुविधा विद्यार्थ्यांना, ज्येष्ठ नागरिकांना आणि निवृत्तीवेतन धारकांनाही दिली जाते. पैशांची बचत करून पैसे साठविणाऱ्या लोकांना प्रोत्साहन देण्याकरिता ही खाती उघडली जातात. ठेवींच्या संख्येवर आणि रक्कमेवर कोणतेही बंधन नसते. हे पैसे चेक द्वारे अथवा संबंधित बँकेकडे उपलब्ध असलेल्या स्लीपद्वारे (Withdrawl Slip) काढले जावू शकतात.

2. चालू खाते (Current Account)

बँकांशी नियमितपणे व मोठया प्रमाणात व्यवहार करणारे व्यावसायिक किंवा उद्योजक हे खाते उघडतात. यामध्ये ठेवी, पैसे काढणे आणि अंतरण (Contra) व्यवहारांचा समावेश होतो. या खात्यामध्ये दिवसातून किती ही रक्कम कितीही वेळा ठेवली किंवा काढली जावू शकते. साधारणपणे बँका या ठेवीवर कांहीही व्याज देत नाहीत. परंतु बँकेचा सेवाकर (Service Charge) आकारतात.

3. आवर्ती ठेव खाते (Recurring Deposit Account)

सर्वसाधारणपणे हे खाते भविष्यातील तरतूद करण्याच्या उद्देशाने उघडले जाते. भविष्यातील गरजांसाठी या ठेवी मासिक हप्ता पद्धतीने नियमितपणे ठेवल्या जातात. (उदा. मुलांच्या लग्नखर्चासाठी, शिक्षणासाठी, जमीन, वाहने इ. महागड्या वस्तूंची खरेदी करण्यासाठी, मुदत संपल्यानंतर संपूर्ण रक्कम ठेवीदाराला व्याजासकट परत केली जाते.

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

4. मुदत ठेव खाते (Term Deposit Account)

विशिष्ट रक्कम विशिष्ट कालावधीकरीता ठेवण्यासाठी हे खाते उघडले जाते. या ठेवीचा कालावधी एक महिना, सहा महिने, एक वर्ष, पाच वर्षे, किंवा दहा वर्षे इ.असू शकतो. या ठेवीची रक्कम मुदतपूर्व काढली जावू शकत नाही मुदतीनुसार या खात्यावरील ठेवींचा व्याजदर जास्त असतो.

> **उपक्रम**
> (1) बचत बँक खाते (2) चालू खाते (3) रिकरिंग ठेव खाते यावर बँका कोणत्या दराने व्याज देतात याची माहिती मिळवा

बँकखाते उघडण्याची पद्धत -

आज बँका महत्त्वाच्या आर्थिक संस्था म्हणून उदयास आल्या आहेत. आपले आर्थिक व्यवहार व्यवस्थित व सुरक्षितपणे करण्यासाठी बँका आपले योगदान देतात. बँकेच्या व्यावसायिक सेवांचा लाभ घेण्यासाठी प्रत्येक व्यक्तीला बँकेत खाते उघडणे अनिवार्य आहे. बँकेत खाते उघडणे हे काही अवघड काम नाही. बँकेत खाते उघडण्यासाठी सात सोप्या पायऱ्या अवलंबल्या जातात. त्या खालील प्रमाणे-

> **उपक्रम**
> वार्षिक 8% प्रमाणे 50,000 रू. चे मुदत ठेवी वरील मासिक व्याज किती?

1. तुम्हाला कोणत्या बँकेत कोणते खाते उघडायचे आहे ते ठरवणे : बँकेमध्ये विविध प्रकारची खाती असतात - बचत बँक खाते, चालू खाते, आवर्ती ठेव खाते, मुदतठेव खाते इ. यापैकी तुम्हांला कोणते खाते उघडायचे आहे ते ठरवा.

> **उपक्रम**
> जवळच्या बँकेला भेट देवून, तेथील कामाचे स्वरूप समजून घ्या.

2. तुमच्या पसंतीची बँक निवडल्यानंतर तेथील अधिकाऱ्यांना भेटणे : बँक आणि कोणत्या प्रकारचे खाते काढायचे हे निश्चित झाल्यानंतर तेथील अधिकाऱ्यांना जावून भेटणे आणि आपण कोणते खाते उघडणार आहोत याची माहिती देणे. बँकेचे संबंधित अधिकारी तुम्हांला आवश्यक फॉर्मस् आणि त्यासंदर्भातील माहिती देतील.

> **तुम्हाला माहिती असू द्या -**
> जॉईट खाते - दोन किंवा दोनपेक्षा जास्त व्यक्तींच्या नावाने खाते उघडून व्यवहार करण्याच्या खात्याला 'जॉईंट खाते' म्हणतात.

3. बँक खाते काढण्याचा फॉर्म भरणे : या फॉर्ममधील सर्व माहिती - तुमचे नाव, पत्ता, व्यवसाय इतर दोन किंवा तीन नमुना स्वाक्षऱ्या (Signature) व्यवस्थितपणे कराव्यात नंतर ही सही बदलता येत नाही.

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

जर जॉईंट खाते (दोन किंवा दोनापेक्षा जास्त व्यक्तींच्या नावाने) उघडायचे असल्यास फॉर्म सर्वांच्या सहीने एकत्रितपणे भरला जातो. पण नमुनास्वाक्षऱ्या मात्र वेगवेगळ्या स्वाक्षरी कार्डवर केल्या जातात. ग्राहकाची पटकन ओळख पटावी म्हणून आजकाल बँका पासपोर्ट साइझचे फोटो घेतात. ही सर्व माहिती व्यवस्थित भरून तो फॉर्म संबंधित अधिकाऱ्यांकडे सुपूर्द केला जातो. सध्या स्वतःच्या सहीच्या आधारकार्ड झेरॉक्स प्रत द्यावी लागते.

4. बँक खाते उघडण्यासाठी संदर्भ देणे : नवीन खातेदाराची ओळख पटविण्याकरिता त्यांच बँकेतील एखाद्या खातेदाराचा संदर्भ द्यावा लागतो. बँकेत खाते असलेला खातेदार नवीन खातेदाराची ओळख पटवून देण्यासाठी संबंधित रकान्यामध्ये स्वतःची नमुनास्वाक्षरी करतो. बँकेच्या सुरक्षेसाठी हा ओळखीचा संदर्भ देणे आवश्यक असते.

5. पूर्ण भरलेला फॉर्म सादर करणे : सर्व माहिती भरून पूर्ण झालेला फॉर्म आणखी काही कागद पत्रांसह म्हणजेच रहिवासी दाखला, पॅनकार्ड, आधारकार्ड, फोटो इ. संबंधित अधिकाऱ्याकडे सुपूर्द करणे.

6. सादर केलेल्या सर्व कागदपत्रांची सत्यता अधिकाऱ्यांद्वारे पडताळणे : आपण सादर केलेला फॉर्म बरोबर भरला आहे की नाही, सर्व कागदपत्रांची पूर्तता झाली आहे की नाही, तसेच त्या कागदपत्रांची सत्यता इ. गोष्टी अधिकारी पडताळून पहातो. सर्व बाबी समाधानकारक असतील तरच तो फॉर्म वैध ठरवतो.

7. प्रारंभीची ठेव ठेवणे : आपला फॉर्म जर वैध ठरला तर आपल्याला काही ठरावीक रक्कम ठेव म्हणून बँकेत भरावी लागते. त्यानंतर बँक आपल्याला पासबुक, चेकबुक आणि बँकेच्या काही स्लिप्स (Slips) सेव्हिंग्ज किंवा बचत बँक खात्याच्या संदर्भात देते. मुदत ठेव पावती बँक आपल्याला देते चालू खात्याच्या संदर्भात स्लीपबुक (Pay-in-slip book) आणि चेकबूक दिली जातात. रिकरिंग खात्यासाठी जमाखात्याचे पासबुक आणि स्लीपबुक दिले जाते.

बँक खाते उघडण्याचे फायदे -

- बँक खाते आपल्याला आपले पैसे सुरक्षित ठेवण्याची सुविधा देते.
- बँक खाते दुसऱ्यांना पैसे देण्यासाठी उपयोगी आहे.
- बँक खाते पैसा गोळा करण्यासाठी(साठविण्यासाठी) उपयोगी आहे.
- बँक खातेदारांना बँकेकडून कर्ज मिळणे सुलभ होते.
- बँक खात्यामुळे आर्थिक व्यवहार सुरळीत होण्यास मदत होते.
- बँक खातेदारांना सेफ डिपॉझीट लॉकर्सची सुविधा मिळते.

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

स्वाध्याय

I. रिकाम्या जागी योग्य शब्द भरा.

1. 'बँक' हा शब्द _____ या फ्रेंच शब्दावरुन घेतला आहे.
2. _____ ही बँकांची बँक आहे.
3. राष्ट्रीयीकृत बँकेचे उदाहरण _____ हे आहे.
4. राष्ट्रीय बचत पत्रके _____ कडून वितरित केली जातात.
5. एकाच दिवशी बँकेशी कितीही वेळा कितीही व्यवहार _____ या प्रकारच्या खात्याद्वारे केले जातात.
6. _____ या खात्याद्वारे ठराविक मुदतीसाठी ठेवी _____ ठेवल्या जावू शकतात.

II. समूहात चर्चा करून खालील प्रश्नांची उत्तरे द्या.

1. बँक म्हणजे काय?
2. बँक व्यवहारांशी संबंधित असलेली वैशिष्ट्ये लिहा.
3. बँकेची कार्ये कोणती?
4. बँक व बँकेचे ग्राहक यांच्यातील नात्यांची माहिती लिहा.
5. 'बचत बँक खातेदारांची संख्या वाढत आहे'. कारणे द्या.
6. बँक खाते उघडण्याचे फायदे कोणते?

III. उपक्रम

1. तुम्हाला माहित असलेल्या बँकाच्या नावाची यादी करा.
2. बँकेला भेट द्या आणि मुदत ठेवींवर मुदतीनुसार मिळणाऱ्या व्याजाबद्दलची माहिती गोळा करा.

IV. प्रकल्प (Project Work)

बँकेला आणि बँकांच्या अधिकाऱ्यांना भेट देवून बँकखाते कसे काढायचे याबाबतचा अहवाल तयार करा व बँक खाते उघडा.

***

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

प्रकरण - 2

उद्योजकता (Entrepreneurship)

या पाठात आपण पुढील घटकांचा अभ्यास करूया.

- **उद्योजकता-अर्थ**
- **उद्योजकतेचे महत्त्व आणि भूमिका**
- **स्वयं उद्योगाची संधी**
- **स्वयं उद्योग योजना**
- **प्रमुख उद्योजकांची माहिती**

आजच्या आर्थिक बाजारपेठेत उद्योजक हे प्रमुख भूमिका निभावत आहेत. उद्योगजकता हा जमीन, कामगार, भांडवल आणि संघटना या चार आर्थिक घटकांपैकी एक महत्त्वाचा घटक आहे. एखाद्या देशाच्या औद्योगिक आणि व्यापारीक्षेत्रात संपूर्ण परिवर्तन घडविण्यासाठी हा एक महत्त्वाचा घटक आहे.

उद्योजकता म्हणजे काय? (Meaning of Entrepreneur)

उद्योजकता हा शब्द एन्टरप्रेन्डे (entreprende) या फ्रेंच शब्दापासून घेतला आहे. याचा अर्थ एखादी क्रिया हाती घेणे असा आहे. व्यवसाय प्रक्रियेमध्ये - उद्योजक नवनवीन कल्पनांचा वापर करतो. आपला उद्योग चालविण्यासाठी उत्तम व्यवस्थापन कौशल्य, संघटन कौशल्य आणि उत्कृष्ट नेतृत्व गुण याचा वापर तो कुशलतेने करतो.

प्राप्त संधीचा फायदा घेण्याचे धाडस करण्यात तो किंवा ती अग्रेसर असते. आपल्या उद्योगामध्ये, उद्योजक एखादी वस्तू किती व कशी चांगल्या प्रकारे उत्पादित करता येईल ते ठरवितो. तो बाजारपेठेतील नवनवीन तंत्रांचा अभ्यास करतो. सोप्या भाषेत सांगायचे म्हणजे उद्योजक बाजारपेठेतील गरजा ओळखून त्याची निर्मिती करतो व संधीचा फायदा घेतो. संगणक, मोबाईल फोन्स, वॉशिंग मशीन्स, ए.टी.एम्. कुरियर सर्व्हिस आणि तयार अन्न पदार्थ ही उद्योजकांच्या नवीन कल्पनांतून साकार झालेली सेवा आणि उत्पादने आहेत.

उद्योजकता (Enterpreneurship)

आपला उद्योग स्थापन करण्यासाठी उद्योजक जी प्रक्रिया हाती घेतो, त्या प्रक्रियेलाच 'उद्योजकता' असे म्हणतात. ती एक सृजनात्मक प्रक्रिया आहे. कांहीतरी नवीन निर्माण करण्याची ती एक कला आहे. सर्वसामान्यांना वाटणारी ती एक किचकट प्रक्रिया. परंतु त्यांना ती एक संधी वाटते. उद्योजकता ही मनाची अशी एक धारणा आहे की ज्यामध्ये संधी शोधणे, जोखीम घेणे आणि फायदा करून घेणे यासाठी आवश्यक प्रक्रिया राबवल्या जातात. उद्योजकता ही एक प्रक्रिया आहे. बदल घडवून आणण्यासाठी ती एक हेतूपूर्ण

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

आणि संघटितपणे केलेली क्रिया होय. ते एक तत्वज्ञान आहे. उद्योजकता ही एका व्यक्तीने नियोजनपूर्वक अंमलात आणलेली कार्यपद्धती असून ती सरकारी क्षेत्र, शिक्षण क्षेत्र. विज्ञान आणि तंत्रज्ञान. दारिद्रय निर्मूलन आणि यासारख्या इतर क्षेत्रामध्ये दिसून येते.

उद्योजकांची वैशिष्टये

- सृजनात्मकता
- जोखीम घेणे
- वचनबद्धता
- नेतृत्वगुण
- उद्दिष्टपूर्ती
- चैतन्यशील व क्रियात्मक व्यक्तीमत्त्व
- समस्यांचे निवारण
- संघटन कौशल्य
- नावीन्यपूर्ण पद्धती अवलंबणे
- ध्येयपूर्तीसाठी प्रोत्साहन
- निर्णयक्षमता
- आत्मविश्वास

उद्योजकांचे कार्य

उद्योजकाने संधीचे निरीक्षण करून त्याचा लाभ घेण्यासाठी नियोजन, लागणारी साधन संपत्ती, उत्पादन, बाजारपेठा या सर्व घटकांचा विचार करून आवश्यक प्रक्रिया केली पाहिजे. त्यांच्या सहकाऱ्यांना तो उत्तेजन देतो. अतिशय महत्त्वाचे म्हणजे नवीन वस्तूंचे उत्पादन करून त्याची जोखीम घेतो. उद्योजकांचे प्रमुख कार्य खालीलप्रमाणे-

1. व्यवसायाचे नियोजन करून त्याची प्रक्रिया राबवणे.
2. उत्पादनाच्या सर्व घटकांचे संयोजन करणे
3. उत्पादन, तंत्रज्ञान, बाजारपेठ, रोजगार इ. बाबत निर्णय घेणे.
4. वस्तूंची योग्य जमवाजमव करणे.
5. नवनवीन पद्धतींचा अवलंब करणे.
6. यासंदर्भातील खर्चाचा आराखडा मांडणे.
7. त्यातील धोके आणि अनिश्चिततेचा अंदाज घेणे.
8. उद्योगधंद्याची दिशा निश्चित करून ती अंमलात आणणे.

उद्योजकांची भूमिका आणि महत्त्व

उद्योजक हे व्यवसायाचे मार्गदर्शक आहेत. आर्थिक अभिवृद्धीसाठी नवीन कल्पना राबवितात आणि त्याचे संवर्धन करतात. देशाच्या अर्थव्यवस्थेमध्ये ते महत्त्वाची भूमिका निभावतात. फक्त देशाच्या औद्योगिक क्षेत्रातच नव्हे तर कृषिविकास आणि सेवाक्षेत्रात देखील ते प्रमुख भूमिका निभावतात. आर्थिक विकासामध्ये उद्योजकांची प्रमुख भूमिका खालीलप्रमाणे -

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

1. ते नागरिकांच्या निष्क्रिय बचत ठेवींचे भांडवलामध्ये रुपांतर करतात आणि त्याचा आपला उद्योग सुरू करण्यासाठी वापर करतात.
2. कुशल कारागीरांना, कलाकारांना, व्यावसायिकांना व तंत्रज्ञांना मोठ्या प्रमाणात रोजगार उपलब्ध करून देतात.
3. देशाचे राष्ट्रीय उत्पन्न(Gross domestion) आणि दरडोई उत्पन्न वाढविण्यास मदत करतात.
4. देशाचा आर्थिक विकास साधण्यासाठी नवनवीन कौशल्ये, उत्पादन आणि सेवांद्वारे विकसित बाजारपेठांना प्रोत्साहन देतात.
5. त्यांचे राहणीमान उंचावण्यासाठी उत्तम दर्जाच्या वस्तू कमी किंमतीत उपलब्ध करून देतात.
6. कारखानदारीचा विकास करतात. उद्योगधंद्याद्वारे ग्रामीण, मागासलेल्या भागात सुधारणा घडवितात. अशाप्रकारे प्रांतभेद दूर करतात.
7. समाजाचा विकास करण्यासाठी पैशाचे किंवा संपत्तीचे विकेंद्रीकरण करून योगदान देतात.
8. ते विदेशी व्यापाराला चालना देतात.
9. बदलत्या तंत्रज्ञानानुसार नवनवीन उत्पादन करून जास्तीत जास्त फायदा मिळवितात.

उद्योजकांचे महत्त्व-

उद्योजक हे आर्थिक बाजारपेठेचा केंद्रबिंदू असतात इंजिनरूपी अर्थ व्यवस्था क्रियाशील करण्यात आणि त्याला उत्तेजन देण्यात उद्योजक स्पार्क प्लगप्रमाणे काम करतात. देशाच्या आर्थिक विकासासाठी जगभर प्रक्रिया राबवल्या जातात. म्हणूनच त्यांना प्रोत्साहन आणि पुरस्कार दिला गेला पाहिजे. समाजाचा उत्कर्ष हा फक्त उद्योजकीय उपक्रमाद्वारे प्रोत्साहित व पुरस्कृत केलेल्या सामाजिक दर्जावर अवलंबून असतो. उद्योजक हे देशाच्या यशाचे, उत्कर्षाचे, विस्ताराचे आणि संधीचे प्रवर्तक असतात. ज्या देशामध्ये उद्योजकांची संख्या जास्त तो जगातील उत्कर्षवादी देश असतो. आपल्या उद्योगाचा जम बसविण्यासाठी समाजातील निष्क्रिय बचत ठेवी आणि साधन संपत्तीचा वापर करून भांडवलाचा उपयोग करतो. अशाप्रकारच्या उद्योगामुळे देशाचा औद्योगिक व आर्थिक विकास होण्यास मदत होते. उत्पादकीय ऊर्जा, सृजनशीलता किंवा निर्मिती आणि प्रेरणेमुळेच नवीन उत्पादनांना आणि सेवांना उद्योजकामुळेच चालना मिळते. उद्योजकच एखाद्या उद्योगाच्या नफ्याची जोखीम घेतो. तसेच जास्त फायदा कोठून मिळेल अशा संधी शोधून देतो. त्यामुळे आवश्यक गरजा भागविल्या जातात.

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

उद्योजकतेमध्ये स्वयंरोजगाराच्या संधी-

स्वयंरोजगार हा देशाचा कणा आहे. चहाच्या टपऱ्या, किराणा मालाची दुकाने, भंगार विक्रेता, सायबर कॅफे ही काही स्वयंरोजगाराची उदाहरणे आहेत. जागतिक अर्थ व्यवस्थेमध्ये स्पर्धा करण्यासाठी प्रोत्साहन आणि मदतीची अत्यंत गरज आहे. नावीन्य आणि विकासासाठी उद्योजकांना योग्य सामाजिक व आर्थिक सहाय्य करण्यामध्ये भारत सरकार अग्रेसर आहे. एखादी व्यक्ती छोट्या व्यवसायातूनच मोठा उद्योजक बनू शकते. स्वयंरोजगार ही त्याच्या यशाची गुरुकिल्ली असते. हा बदल घडवून आणण्यासाठी लघु उद्योजक खाते जबाबदार असते. कमीतकमी भांडवलात जास्तीत जास्त दूरदृष्टीने नवीन उद्योग बऱ्याच लोकांनी सुरू केले. एखादी व्यक्ती स्वतःला शक्य असणारा कोणताही व्यवसाय करू शकते.

उदा : खालील व्यवसाय करू शकतात.

1. जाहिरात कंपन्या
2. व्यापार विषयक सल्ला केंद्रे
3. औद्योगिक सल्ला केंद्रे
4. भाडे आणि करारतत्त्वावरील उपकरणे
5. झेरॉक्स केंद्रे
6. औद्योगिक संशोधन आणि विकास
7. औद्योगिक प्रयोगशाळा
8. सायबर किंवा इंटरनेट कॅफे
9. केबल आणि टी.व्ही. जोडणे
10. सौंदर्य प्रसाधनगृहे आणि पाळणागृहे

स्वयंरोजगाराच्या योजना-

कोणताही उद्योग सुरु करण्यासाठी वित्तसहाय्य अत्यंत आवश्यक असते. भांडवलाशिवाय धंदा वाढविला किंवा सुरू केला जाऊ शकत नाही या गरजा पूर्ण करण्याकरिता केंद्र आणि राज्यसरकारी स्तरावर अनेक अर्थसहाय्य करणाऱ्या संस्था सुरु करण्यात आल्या आहेत. या वित्तसंस्था लघु उद्योगधंद्याना सुद्धा कर्ज पुरवठा करून सहाय्य करतात. वित्तव्यवस्था ही उद्योजकाच्या अनेक गरजांपैकी एक अत्यावश्यक गरज आहे. पुरेशा निधीशिवाय कोणत्याही व्यवसायाचा विकास होवू शकत नाही. भारतात केंद्र आणि राज्यसरकारने औद्योगिक विकास घडवून आणण्यासाठी असंख्य वित्तसंस्थांची स्थापना केली आहे. त्यापैकी काही महत्त्वाच्या वित्तसंस्था किंवा अर्थसंस्था खालीलप्रमाणे-

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

1. इंडस्ट्रियल डेव्हलपमेंट बँक ऑफ इंडिया (IDBI) (औद्योगिक विकास बँक)
2. नॅशनल बँक फॉर ॲग्रीकल्चर अँड रूरल डेव्हलपमेंट (NABARD) (राष्ट्रीय कृषी व ग्रामीण विकास बँक.)
3. एक्सपोर्ट इंपोर्ट बँक ऑफ इंडिया (आयात व निर्यात बँक) (EXIM Bank)
4. स्मॉल इंडस्ट्रियल डेव्हलपमेंट बँक ऑफ इंडिया (SIDBI) (लघुउद्योग विकास बँक)
5. इंडस्ट्रियल फायनान्स कार्पोरेशन ऑफ इंडिया (IFCI) (औद्योगिक अर्थ सहाय्य निगम)
6. इंडस्ट्रियल क्रेडीट अँड इन्व्हेस्टमेंट कार्पोरेशन ऑफ इंडिया (ICICI) (भारतीय औद्योगिक कर्ज व गुंतवणूक निगम)
7. इंडस्ट्रियल रिकन्स्ट्रक्शन बँक ऑफ इंडिया (भारतीय औद्योगिक पुनर्बांधणी बँक.)
8. इंडियन बँकींग सिस्टीम अँड कमर्शियल बँक्स (भारतीय व्यापारी बँक व इतर बँका)
9. स्टेट फायनान्शियल कार्पोरेशन्स (राज्य अर्थ निगम) (SFC)
10. लाइफ इन्शुरन्स कार्पोरेशन ऑफ इंडिया (LIC) (भारतीय आयुर्विमा महामंडळ)
12. युनिट ट्रस्ट ऑफ इंडिया (UTI)

उद्योग विकासासाठी स्थापलेल्या काही संस्था-

उद्योजकांच्या वृद्धीकरिता आणि विकासाकरिता केंद्र आणि राज्य सरकारने अनेक उपाय योजले आहेत. उदयोन्मुख आणि सुस्थापित उद्योजकांना मदत करण्यासाठी सरकारने अनेक आर्थिक एजन्सीज आणि संस्थांची स्थापना केली आहे. विशेषतः लघु आणि मध्यम उद्योजकांसाठी या संस्था या उद्योजकांना प्रशिक्षण, वित्त किंवा अर्थ आणि बाजारपेठा यामार्फत मदत करतात आणि आधार देतात. अशा काही संस्था याप्रमाणे-

1. डिस्ट्रीक्ट इंडस्ट्रियल सेंटर्स (DICS) जिल्हा औद्योगिक केंद्रे
2. स्मॉल इंडस्ट्रिज डेव्हलपमेंट कार्पोरेशन लि (SIDO) लघुउद्योग विकास संस्था
3. दि नॅशनल स्मॉल इंडस्ट्रिज कार्पोरेशन लि. (NSIC) राष्ट्रीय लघुउद्योग निगम मर्यादित.
4. स्मॉलस्केल इंडस्ट्रिज बोर्ड (SSIB) लघुउद्योग संस्था
5. स्मॉल इंडस्ट्रिज सर्व्हिस इन्स्टीट्यूटस् (SISIS) लघुउद्योग सेवा संस्था
6. इंडस्ट्रियल इस्टेटस्/औद्योगिक वसाहती
7. खादी अँड व्हिलेज इंडस्ट्रिज कार्पोरेशन (KVIC) खादी व ग्रामोद्योग मंडळ
8. टेक्निकल कन्सल्टन्सी ऑर्गनायझेशन्स / तांत्रिक सल्लागार केंद्रे

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

यशस्वी उद्योजकांचे चरित्र (Profile of Successful Entrepreneur)

भारतातील अत्यंत सुप्रसिद्ध उद्योजकांमध्ये एकाच प्रकारचे उद्योगशील चैतन्य दिसून येते. कांही उद्योजकाना वंशपरंपरेने ऐश्वर्य मिळालेले आहे ; तर कांहीनी क्रीडा क्षेत्रांमध्ये लाखो डॉलर्सच्या करारावर स्वाक्षऱ्या करून देशाच्या उत्पादनाविषयीचे स्वप्न साकार केले आहे. त्यांनी त्यांच्या श्रमाने, समर्पणवृत्तीने आणि अखंड उद्योगसाधनेने लाखो रूपये मिळविले आहेत. त्यापैकी काही यशस्वी उद्योजकांचा संक्षिप्त परिचय खाली दिला आहे.

यशस्वी उद्योजकांची थोडक्यात माहिती -



डॉ. प्रताप रेड्डी - 'अपोलो हॉस्पिटल्स' या आरोग्यकेंद्राचा (hospitals) समूह स्थापन करणारे हे भारतातील पहिले डॉक्टर होत. त्यांनी वैद्यकीय क्षेत्रात आमूलाग्र क्रांती घडवून आणली. आज या समूहाची संपूर्ण देशभरामध्ये सुमारे 750 सुरक्षा आरोग्यकेंद्रे आहेत. एका रुग्णाला हृदयशस्त्रक्रियेसाठी अमेरिकेतील टेक्सास येथे जाता आले नाही. या घटनेवरून त्यांना ही कल्पना सुचली. डॉ. रेड्डी यांनी अत्याधुनिक आरोग्य सुविधा उपलब्ध करून दिल्या. तसेच त्या सर्वांना परवडणाऱ्या आणि सहजशक्य होत्या.



नरेश गोएल - हे 'जेट एअरवेज' या विमानकंपनीचे संस्थापक व अध्यक्ष आहेत. ही भारतातील एक अत्यंत मोठी खाजगी विमान सेवा आहे. पदवीनंतर त्यांनी एका वाहतूक व्यवसायामध्ये काम केले. 1974 मध्ये एका विदेशी विमानकंपनीत विक्री आणि मार्केटिंग अधिकारी म्हणून काम पाहू लागले. 1917 मध्ये भारत सरकार द्वारा सुरू करण्यात आलेल्या मुक्त हवाई धोरणाचा (open sky policy) त्यांनी पुरेपूर फायदा घेतला आणि 'जेट एअरवेज' ही कंपनी नियमित विमानसेवा देणारी भारतातील अग्रगण्य कंपनी ठरली.

नारायण मूर्ती - 1999 मध्ये स्थापन झालेल्या 'इन्फोसिस टेक्नॉलॉजीज लिमिटेड' या कंपनीच्या संस्थापकांपैकी ते एक आहेत. NASDAQ (National association of securities dealers Automated Quotations) अंतर्गत नोंदवण्यात आलेली ही भारताची पहिली तंत्रज्ञान संस्था होय. 2006 मध्ये त्या संस्थेत 50,000 लोक कार्यरत होते. त्यांची उलाढाल 2 बिलीयन डॉलर्स पेक्षा जास्त होती. प्रामाणिकता, पारदर्शकता आणि नैतिक ऐक्य या गोष्टी यश देण्यात महत्त्वाचे घटक आहेत असा मूर्ती यांचा विश्वास आहे.

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in



वर्गिस कुरियन - हे एक नावाजलेले आणि प्रमुख भारतीय उद्योजक आहेत. त्यांना 'धवल क्रांतीचे जनक' असे संबोधले जाते. लाखो लिटर दुग्धव्यवसायाबरोबरच कृषि क्षेत्रातही अग्रेसर असे हे व्यक्तीमत्व आहे. अमूल दूध आणि दुधाचे पदार्थ ही त्यांची सर्वश्रेष्ठ कामगिरी आहे. गुजराथ येथील कैरा जिल्ह्यामध्ये 'आनंद दूध डेअरी' हा छोटासा दुग्ध प्रकल्प त्यांनी स्थापन केला आणि आज तो भारतातील सर्वात मोठा दुग्ध व्यवसाय आहे.

धीरूभाई अंबानी - हे भारतातील सर्वात यशस्वी उद्योजक आहेत. रंकाचा राव कसा होतो, याचे हे मूर्तीमंत उदाहरण आहे. भारताच्या उद्योगांचा इतिहास घडवणाऱ्यांपैकी हे एक असून त्यांनी उद्योगसमूहाची बीजे रोवली. धीरूभाई अंबानी उर्फ हीरालाल हीराचंद अंबानी. यांचे वडील एका शाळेत शिक्षक होते. यानी आपल्या उद्योजकीय जीवनाची सुरूवात आठवडा अखेरीस माउंट गिरनार येथील यात्रेकरूना भजनाची पुस्तके विकण्यापासून केली. वयाच्या सोळाव्या वर्षी मॅट्रीकची परीक्षा पास झाल्यानंतर ते आफ्रिकेतील एडन येथे गेले. तेथे त्यांनी पेट्रोल पंपावर एक कर्मचारी म्हणून आपल्या कार्याला सुरूवात केली. नंतर ते एका तेल कंपनीत कारकून झाले. 1958 मध्ये रू. 50,000 इतके भांडवल घेऊन ते भारतात परतले आणि कापड व्यवसाय सुरू केला. आज 'रिलायन्स उद्योग' हा जगातील एक प्रमुख उद्योग समूह म्हणून ओळखला जातो.

अझीम प्रेमजी - भारतातील अत्यंत मोठ्या सॉफ्टवेअर कंपन्यांपैकी 'विप्रो टेक्नॉलॉजीज' चे हे अध्यक्ष होत. विद्यार्थी असताना वडिलांच्या आकस्मिक निधनामुळे प्रेमजीना शाळा सोडून घरी बसावे लागले. एका वार्षिक सर्वसाधारण सभेत एका भागधारकाने त्यांचे भाग (शेअर्स) विकून टाकण्याचा त्यांना सल्ला दिला. यामुळे आपली कंपनी यशस्वी करून दाखवण्याचा त्यानी दृढनिश्चय केला. आज 'विप्रो टेक्नॉलॉजीज' ही सर्वात मोठी स्वतंत्र संशोधन आणि विकास पुरवठा करणारी कंपनी आहे.

एकता कपूर - ती भारतीय दूरदर्शनची सम्राज्ञी म्हणून ओळखली जाते. ती बालाजी टेलीफिल्मसची एक सृजनशील दिग्दर्शिका आहे. 2001 मधील यशस्वी उद्योजिका म्हणून 'अर्नेस्ट यंग' या संस्थेकडून तिला गौरविण्यात आले. वयाच्या 19 व्या वर्षीच दूरदर्शन क्षेत्रातील निर्मिती क्षेत्रात तिने पाऊल ठेवले.

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

किरण मुजुमदार शहा- ती भारतातील सर्वात मोठी जैविक तंत्रज्ञान संस्था 'बायोकॉन लिमिटेड' ची अध्यक्षा आणि व्यवस्थापकीय अधिकारी आहे. तिने 1978 साली एका छोट्याशा गॅरेजमध्ये 'बायोकॉन' ही कंपनी सुरु केली. जैविक तंत्रज्ञान हे नवीन क्षेत्र असल्यामुळे तिला अनेक अडचणी आणि आव्हानांना तोंड द्यावे लागले. त्या काळात या क्षेत्रात महिलांचा सहभाग अत्यंत क्वचित होता. परंतु या सर्व अडचणींवर मात करून बायोकॉन हा उद्योग समूह तिने यशस्वी करून दाखविला.

स्वाध्याय

I. रिकाम्या जागी योग्य शब्द भरा.

1. 'उद्योजक' हा शब्द फ्रेंच भाषेतील _____ या शब्दावरून घेण्यात आला.
2. उद्योजकांनी उद्योग स्थापण्याकरिता हाती घेतलेल्या प्रक्रियेला _____ म्हणतात.
3. अपोलो हॉस्पीटल सुरु करणारी व्यक्ती _____ ही होय.
4. विप्रोचे अध्यक्ष _____ हे होत

II. समूहात चर्चा करून खालील प्रश्नांची उत्तरे द्या.

1. 'उद्योजक' म्हणजे काय?
2. 'उद्योजकता ही एक सृजनशील प्रक्रिया आहे' कसे?
3. उद्योजकांची वैशिष्ट्ये कोणती?
4. उद्योजकांचे महत्त्व स्पष्ट करा.

III. उपक्रम

1. जवळच्या उद्योगकेंद्राला भेट देउन औद्योगिक कर्मचाऱ्यांची माहिती मिळवा.
2. इंटरनेटच्या सहाय्याने विविध उद्योगांची माहिती मिळवा.
3. भारतातील प्रसिद्ध उद्योजकांची छायाचित्रे गोळा करा.

IV. प्रकल्प (Project Work)

1. तुमच्या जवळच्या उद्योजकाला बोलावून त्यांची मुलाखत घ्या आणि त्याच्या तिच्या उद्योगाबद्दल माहिती मिळवून अहवाल तयार करा.

***

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in